(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

चंद्रपूर जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करणेबाबत करावयाची कार्यवाही

(१) * २६२९३ *श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्रीमती अलका देसाई , श्री.जयप्रकाश छाजेड* : सन्माननीय ***वैद्यकीय शिक्षण मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयासाठी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यासाठी मा. लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांनी मागील काही वर्षापासून संबंधित मा. मंत्री यांना तसेच संबंधित विभागाकडे वारंवार मागणी करण्यात येवूनही अद्याप चंद्रपूर जिल्हयासाठी वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली नसल्यामुळे तेथील नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०१२ मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्हयासाठी वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापना करण्याबाबत शासनाने कोणती तातडीची कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.विजयकुमार गावित : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) शासनाने नुकताच अलिबाग, नंदूरबार, मुंबई व सातारा येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याचा निर्णय घेतलेला असून राज्याची साधन संपत्ती लक्षात घेता चंद्रपूर येथे सद्यस्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे शक्य नाही. तथापि, खाजगी संस्थाकडून शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्या संस्था भारतीय आयुर्विज्ञान परिषदेचे निकष पुर्ण करीत असतील अशा संस्थांचा विचार करण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने ज्यांची ताकद आहे अशा मंडळीच्या क्षेत्रात वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले आहे. चंद्रपूर हा १०० टक्के आदिवासी जिल्हा आहे. त्या जिल्हयाचा विकास झाला पाहिजे. त्या जिल्हयात अद्याप वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यात आलेले नसल्यामुळे तेथील जनतेमध्ये प्रचंड असंतोष आहे. चंद्रपूर जिल्हयात वैद्यकीय महाविद्यालय केव्हा स्थापन केले जाईल?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, शासनाने नुकतीच चार वैद्यकीय महाविद्यालये मंजूर केली आहेत. आर्थिक भार लक्षात घेता नवीन वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करणे शक्य होत नसल्यामुळे यापुढील काळात शासनातर्फे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा विचार झाल्यास प्रामुख्याने चंद्रपूर जिल्हयाचा विचार केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आर्थिक भार सहन होत नाही म्हणून भविष्यकाळात चंद्रपूर जिल्हयात वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचा विचार केला जाईल असे मंत्री महोदयांनी सांगितले आहे. केंद्रीय अर्थसंकल्पात सात नवीन वैद्यकीय महाविद्यालये प्रस्तावित केली आहेत. त्यापैकी एखादे वैद्यकीय महाविद्यालय महाराष्ट्रात स्थापन करण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारकडे पाठपुरावा केला जाईल काय? अलिबाग, नंदूरबार, मुंबई आणि सातारा या चार ठिकाणी नेमकी कोणत्या भागात वैद्यकीय महाविद्यालये सुरु केली जाणार आहेत, जागेची निश्चिती झालेली आहे काय? खाजगी संस्था भारतीय आयुर्विज्ञान परिषदेचे निकष पूर्ण करीत असतील तर अशा संस्थांचा विचार केला जाईल असे उत्तरात म्हटले आहे. अशा संस्थांना वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केल्यास त्यांच्यावर राज्य सरकारकडून बंधने आणली जातील काय?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, शेवटच्या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे आहे. केंद्र सरकारने अर्थसंकल्पात सात नवीन वैद्यकीय महाविद्यालये प्रस्तावित केली आहेत. त्यापैकी एखादे वैद्यकीय महाविद्यालय आपल्या राज्याला मंजूर करावे या दृष्टीने मागणी केली जाईल आणि ती मागणी मान्य झाल्यास चंद्रपूर येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु केले जाईल. वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी जागा निश्चित करुनच पुढील कार्यवाही केली जाते. अलिबाग, नंदूरबार आणि सातारा येथील वैद्यकीय महाविद्यालये त्याच मुख्यालयी सुरु केली जाणार आहेत आणि मुंबई येथील वैद्यकीय महाविद्यालय जी.टी.रुग्णालयाच्या नवीन इमारतीमध्ये सुरु करणार आहोत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, अलिबाग, नंदूरबार, मुंबई आणि सातारा या चार ठिकाणी वैद्यकीय महाविद्यालये सुरु होणार आहेत. सामान्य माणसांची प्रतिक्रिया अशी असते की, ज्या भागातील मंत्री आहेत त्या भागात वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले जाते. २०१२-१३ हे वर्ष स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. स्व.यशवंतराव चव्हाण केंद्रीय मंत्री म्हणून दिल्लीला गेल्यानंतर स्व.कन्नमवार हे या राज्याचे मुख्यमंत्री झाले, ते चंद्रपूर जिल्हयाचे होते. त्यामुळे चंद्रपूर जिल्हयाचा वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी प्राधान्याने विचार करण्यात येईल काय?

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२६२९३.....

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, मी पूर्वीच सांगितले की, शासन वैद्यकीय महाविद्यालय काढण्याचा विचार करेल त्यावेळी प्राधान्याने चंद्रपूर जिल्हयाचा विचार केला जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, राज्याच्या दृष्टीने आरोग्याच्या फार मोठ्या योजना राबविण्याचे शासनाने ठरविले आहे. त्या योजनेमध्ये प्रशिक्षित तज्ज्ञ डॉक्टर निर्माण करणे, मनुष्यबळ निर्माण करणे आणि ते आवश्यक त्या विभागात उपलब्ध करुन देणे यासाठी दूरगामी कार्यक्रम आखताना नियोजन केले जाते. विदर्भातील मागास भागात शिक्षणाच्या सोयी मुळात कमी असताना चंद्रपूर जिल्हयाचा विचार करण्याची आवश्यकता आहे. मेडिकल एज्युकेशनमधून प्रशिक्षित वर्ग तयार करुन त्या भागातील रोगराई कमी करण्यासाठी, मानवी विकास निर्देशांक वाढविण्यासाठी ही दूरगामी योजना राबविली जात आहे. चंद्रपूर हा भाग महत्वाच्या ठिकाणी असल्यामुळे तेथे वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्यासाठी राज्य शासन प्राधान्याने विचार करणार आहे काय?

डॉ.विजयकुमार गावीत : मी पूर्वीच सांगितले की, चंद्रपूर जिल्हा हा संपूर्ण आदिवासी भाग आहे. तेथे इंडस्ट्री आहे. त्या दृष्टीने त्या जिल्हयाचा प्राधान्याने विचार करावयाचे ठरविले आहे.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, राज्य शासनाने नवीन वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव आणला तर चंद्रपूर जिल्हयाचा प्राधान्याने विचार केला जाईल. उत्तरामध्ये म्हटले आहे की, खाजगी संस्थांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्या संस्था भारतीय आयुर्विज्ञान परिषदेचे निकष पूर्ण करीत असतील तर अशा संस्थांचा विचार केला जाईल. राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी चंद्रपूर येथे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याची घोषणा करुनही ती अंमलात आलेली नाही. चंद्रपूर जिल्हयात वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याबाबत आर्थिक तरतूद करुन पुढील वर्षी प्रस्ताव सादर केला जाईल काय?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, मला सभागृहाला सांगितले पाहिजे की, आता नवीन चार वैद्यकीय महाविद्यालये मंजूर झाली आहेत. केंद्र सरकारने त्यांच्या अर्थसंकल्पात नवीन सात वैद्यकीय महाविद्यालये प्रस्तावित केली असून त्यापैकी एक महाविद्यालय आपल्या राज्याला मंजूर करण्याबाबत आपण विनंती करणार आहोत. केंद्र सरकारने ती विनंती मान्य केली तर ठीक आहे. अन्यथा पुढील काळात नवीन वैद्यकीय महाविद्यालय मंजूर करावयाचे झाल्यास चंद्रपूर जिल्हयाचा प्राधान्याने विचार केला जाईल.

..४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२६२९३.....

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक-२५१०३ याच विषयाशी संबंधित आहे. त्या प्रश्नाच्या उत्तरात मंत्री महोदयांनी म्हटले आहे की, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची मान्यता मिळाल्यानंतर याचा विचार केला जाईल. जी चार वैद्यकीय महाविद्यालये मंजूर करण्यात आली त्या संदर्भातील प्रस्ताव केव्हा पाठविण्यात आले होते आणि त्या प्रस्तावांची कार्यवाही आणि पाठपुरावा केव्हा केला होता?

डॉ.विजयकुमार गावीत : सभापती महोदय, मागील वर्षी सुध्दा हे प्रस्ताव पाठविले होते आणि एम.सी.आय.ची टीम राज्यात आली होती. आर्थिक तरतूद केली नाही म्हणून प्रस्ताव प्रलंबित राहिले होते. यावर्षी पुन्हा प्रस्ताव पाठविले असून त्यांची टीम मे महिन्यात येणार आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, डॉ.पंतगराव कदम या ठिकाणी उपस्थित आहेत. ते या राज्यातील आणि देशातील एक शिक्षणसम्राट असल्यामुळे मला प्रश्न विचारावयाचा आहे. शासनाने उत्तरामध्ये ओपन टेंडरच जाहीर केले आहे. सद्यस्थितीत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे शक्य नाही. तथापि, खाजगी संस्थांकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्या संस्था भारतीय आयुर्विज्ञान परिषदेचे निकष पूर्ण करीत असतील तर अशा संस्थांचा विचार केला जाईल. म्हणजे एकप्रकारे शिक्षणसम्राटांना हे निमंत्रण दिलेले आहे. शासनाने याची जाहिरात करावी आणि कोणी शिक्षणसम्राट पुढे येतात का हे पहावे. सभागृहाला माहिती देण्यापेक्षा कोणी वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास तयार असेल तर शासन मान्यता द्यायला तयार आहे असे जाहीर केले तर अनेक शिक्षणसम्राट पुढे येतील. विदर्भात सर्वाधिक शिक्षणसम्राट आहेत.

डॉ.विजयकुमार गावीत : एम.यु.एच.एस.ने जाहिरात दिली आहे. खाजगी क्षेत्रात वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्यास कोणी पुढे आले तर आणि ते भारतीय आयुर्विज्ञान परिषदेचे निकष पूर्ण करीत असतील तर निश्चितपणे त्यांना परवानगी देण्यात येईल.

नंतर श्री.शर्मा यांचेकडे ए.5..

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जमा : सभापति महोदय, यह विदर्भ के लिए बहुत महत्वपूर्ण विषय है. न केवल चंद्रपुर जिले में, बल्कि उसके पड़ोस के नक्सलग्रस्त गडचिरोली जिले में गवर्नमेंट हॉस्पिटल छोड़कर दूसरा कोई हॉस्पिटल नहीं है, इसलिए वहां पर मेडीकल कॉलेज होना बहुत अनिवार्य है. डब्ल्यू.सी.एल. के 20 हजार कामगार चंद्रपुर जिले में काम करते हैं और डब्ल्यू.सी.एल. का 500 बेड का एक हॉस्पिटल बनाने का प्रस्ताव हैं और उसके लिए वे फंड दे रहे हैं. हमने माननीय मुख्यमंत्री को पिछले साल पत्र लिखा था और अभी मुझे मेडीकल एज्यूकेशन डिपार्टमेंट की तरफ जबाब आया है कि भारत सरकार को हमारा प्रस्ताव भेजा गया है. 500 बेड का हॉस्पिटल बनाने के लिए डब्ल्यू.सी.एल. पैसा दे रहा है. मेरा मंत्री महोदय से सवाल है कि सरकार डब्ल्यू.सी.एल. के साथ टाइ-अप करके सब्सिडाइज्ड रेट पर जमीन देकर और उनसे एम.ओ.यू. करके क्या वहां पर एक मेडीकल कॉलेज और हॉस्पिटल बनाने का प्रस्ताव मंजूर करेगी ?

. . . नंतर खर्चे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26293.....

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, ज्यावेळेस नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय काढण्यासंबंधीचा निर्णय होईल तेव्हा प्राधान्याने मान्य करण्याचे ठरलेले आहे. तसेच डब्ल्यूसीएल कंपनीने जर 500 खाटांचे रुग्णालय बांधले तर त्या कंपनीला ते स्वत:चे दाखवावे लागेल व नंतर शासनाकडे वर्ग केल्यानंतर निश्चितपणे त्याला मान्यता देण्याचा विचार करण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील विविध जिल्ह्यात बालगृहांच्या संख्येत विसंगती असल्याबाबत

(2) * 25056 श्री.भगवान साळुंखे, डॉ.रणजित पाटील, श्री.रामनाथ मोते, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील बालगृहाच्या संख्येत प्रचंड विसंगती असून त्यामध्ये बीड-134, नांदेड-130, लातूर-110, उस्मानाबाद-90, सोलापूर-82, परभणी-70, नगर-63, पुणे-59 शिवाय अनेक जिल्ह्यात एकही बालगृह नसल्याचे वास्तव सन 2012 मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अशा प्रकारच्या बालगृहाच्या संख्येतील विसंगती निर्माण होण्याची कारणे काय आहेत,

(3) नसल्यास, याप्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, प्रा.वर्षा गायकवाड यांच्याकरिता : (1) जिल्हानिहाय मंजूर बालगृहात विसंगती आहे, हे खरे आहे. परंतु, अनेक जिल्ह्यात एकही बालगृह मंजूर नाही, हे खरे नाही.

(2) व (3) जिल्हानिहाय बालगृह मंजूर करण्याबाबत यापूर्वी कोणतेही निकष निश्चित करण्यात आलेले नसल्यामुळे विसंगती निर्माण झालेली आहे.

श्री. भगवान साळुंखे : सभापती महोदय, राज्यात जवळपास 90 हजार मुले 1100 बालगृहांमध्ये राहतात. या बालगृहांची पाहणी करण्यासाठी उच्च न्यायालयाने एक याचिका दाखल करुन घेतली होती. त्यानुसार आशा वाजपेयी नांवाची एक समन्वय समिती गठित करुन त्या समितीने पाहणी केली. त्यानुसार सादर केलेला अहवाल शासनाकडे प्राप्त झालेला आहे. त्यानुसार ज्या ज्या संस्थांनी केवळ शासनाचे अनुदान हडप करण्याचा प्रयत्न केला त्या संस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली आहे, तसेच या बालगृहांची गुणवत्ता सुधारणासाठी कोणत्या उपाययोजना केला आहेत, आणि जी बालगृहे आहेत ती फक्त काही जिल्ह्यांमध्येच देण्यात आली, 20 जिल्ह्यांमध्ये एकही बालगृह नाही. अशी बालगृहे राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये मंजूर करण्यासंबंधी शासन कोणते धोरण आखणार आहे ?

प्रा. फौजिया खान : महोदय, सन 2010-11 मध्ये शासनाच्या सूचनेनुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या माध्यमातून पथक पाठवून सर्व बालगृहांची तपासणी करण्यात

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आली. ही तपासणी झाल्यानंतर त्यांनी त्या अहवालाचे अ, ब, क आणि ड अशा प्रकारे वर्गीकरण करुन सदर अहवाल महिला व बालकल्याण आयुक्त, पुणे यांच्याकडे पाठविला. सध्या त्याची तपासणी राज्यातील बाल हक्क संरक्षण आयोगाच्या माध्यमातून होत आहे. त्यांनी "ड" वर्गात मोडत असलेल्या बालगृहांची मान्यता रद्द करण्याची शिफारस केली व त्यानुसार तशी मान्यता काढण्यात आली आहे. तसेच ज्या बालगृहांमध्ये सुविधांचा अभाव असेल त्यांची मान्यता देखील काढण्यात येणार आहे. याशिवाय आयुक्तांनी ऑक्टोबर-नोव्हेंबर, 2011 मध्ये पुन्हा अचानक एक तपासणी मोहीम सुरु केली होती. त्या माध्यमातून सर्व बालगृहांची तपासणी होऊन ज्या त्रुटी आढळून आल्या त्यांच्या संदर्भात त्या त्या संस्थांना कारणे दाखवा नोटिसेस बजावून खुलासे मागविण्यात आले. मराठवाड्यात ही मोहीम प्रथम सुरु केली होती आणि आता संपूर्ण राज्यातच ती राबवून तपासणी करण्यात येईल. त्यात ज्या त्रुटी आढळून येतील त्या त्या संस्थांची मान्यता रद्द करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : महोदय, मंत्री महोदयांनी उत्तरात सांगितले की, यापूर्वी कोणतेही निकष निश्चित करण्यात आलेले नव्हते. आता तरी हे निकष निश्चित झालेले आहेत काय, असल्यास त्यांची माहिती संबंधितांना दिली आहे काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, हे खरे आहे की, मागील काळात ज्या ज्या संस्थांनी बालगृहाची मागणी केली त्यांना बालगृहे मान्य करण्यात आली. पण आता यासाठी निश्चित आराखडा तयार करुन प्रत्येक तालुक्यात किमान एक बालगृह तयार झाले पाहिजे असा प्रयत्न करण्यात येईल. तसेच त्यासाठी जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात येतील व त्यासंबंधीचे निकष देखील तयार केले जातील.

डॉ. नीलम गोऱ्हे : महोदय, हा प्रश्न केवळ सभागृहातच उपस्थित होतो असे नाही तर महिना दोन महिन्यात या बालगृहांच्या व्यवस्थापनाबद्दलचे प्रश्न समोर येतच असतात. तसेच काही ठिकाणी विना परवाना बालगृहे सुध्दा जणू शासनाचीच आहेत अशा थाटात काही धर्मादाय संस्था चालवित आहेत. त्यांच्या माध्यमातून छोट्या बालकांचा व्यापार केला जातो अशा प्रकारच्या गंभीर तक्रारी सुध्दा आलेल्या आहेत. या बालगृहांची क्वॉलिटी कशी आहे यासंबंधीची तपासणी सन

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

2008 मध्ये करुन एक अहवाल सुध्दा दिला होता. त्या संस्थेने 400 बालगृहांची तपासणी केली होती. त्यात कोणते निकष असावेत, एखाद्या तालुक्यात एकही बालगृह नाही तर दुसऱ्या तालुक्यात नको तितकी दिलेली आहेत आणि जेथे गरज आहे तेथे बालगृहच नाही. त्या अहवालाच्या संदर्भात शासनाने कोणती कारवाई केली याची माहिती कोणालाच नाही. तसेच या बालगृहांच्या निकषांबद्दल जे जे अहवाल शासनाकडे आले असतील त्यांच्या बाबतीत शासनाच्या वतीने कोणता निर्णय घेण्यात आला, त्याचबरोबर जी बालगृहे विना परवाना चालू आहेत त्यांना कोणते निकष लावण्यात येणार आहेत, नोंदणी न करता ज्या ज्या ठिकाणी बालगृहांच्या माध्यमातून गैरप्रकार चालू असतील त्यांच्यासंबंधीची माहिती प्राप्त झाल्यानंतर ज्याप्रमाणे इतर प्रश्नांना आपण सभागृहात वेळ देतो त्याप्रमाणे बालगृहांच्या बाबतीत देखील एखादी चर्चा द्यावी व या बालगृहांना संरक्षण द्यावे, अशी माझी मागणी आहे, ती मान्य होईल काय ?

प्रा. फौजिया खान : महोदय, बालगृहांच्या निकषांच्या बाबतीत 22 डिसेंबर, 2011 रोजी एक शासन निर्णय काढण्यात आला असून त्यानुसार कोणते निकष असावेत, प्रत्येक तालुक्यात काय अपेक्षित आहे यासंबंधीची कार्यवाही चालू आहे. सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी जो प्रश्न उपस्थित केला त्यानुसार जी विना परवाना बालगृहे चालविली जात आहेत त्यांना कोणत्याही प्रकारची मुभा नसून तातडीने ती बंद करण्यात येतील.

श्री. विक्रम काळे : महोदय, शासनाने मागील कालावधीत बालगृहांचे वाटप खिरापतीसारखे केलेले आहे. मंत्री महोदयांनी आताच उत्तरातून सांगितले की, प्रत्येक तालुक्यात एक बालगृह पाहिजे. त्यासाठी शासनाने नवीन निकष तयार केले आहेत काय, याबाबतीतील बृहत आराखडा किती कालावधीत तयार करणार आहे आणि ज्या सक्षम व मान्यताप्राप्त संस्था असतील त्यांना शासन अशी बालगृहे काढण्यासाठी परवानगी देणार आहे काय ?

प्रा. वर्षा गायकवाड : महोदय, बालगृहे हा अतिशय संवेदनशील विषय आहे. आम्ही मान्य करतो की, मधल्या काळात जास्त संख्येने बालगृहांना मान्यता देण्यात आली. आज आपण पाहिले तर शासकीय संस्थांची 46 ठिकाणी, स्वयंसेवी संस्थांमार्फत 1124 अशा प्रकारे एकूण 1170 ठिकाणी बालगृहे आहेत आणि ही संख्या खूपच मोठी आहे. मधल्या काळात सन 2010-11

.....5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

च्या कालावधीत मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या माध्यमातून तपासणी करण्यात आली व त्या तपासणीचा अहवाल आपण "यशदा" या संस्थेकडे दिलेला आहे. त्यांच्याच माध्यमातून आपण ठरविले की, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे हा तपासणी अहवाल देऊन त्या मार्फत ही तपासणी करावी व प्रत्येक केसचे हिअरिंग घ्यावे. त्यानुसार सर्व प्रकरणांची सुनावणी संपलेली आहे. हेच प्रयत्न मधल्या काळात शासनाने केल्याची माहिती माननीय राज्य मंत्री यांनी दिलेलीच आहे. आपण देखील क्वॉसी व्हेरिफाय सीडीपीओ यांच्या माध्यमातून मराठवाडा रिजनमध्ये प्रयत्न केलेले आहेत. याचे कारण मराठवाडा रिजनमध्ये सर्वात जास्त बालगृहे आहेत. त्या भागातील 577 बालगृहांची तपासणी आपण केली असून त्यातील 285 संस्थांना कारणे दाखवा नोटिसेस इश्यू करण्यात आल्या. ज्यांच्यामध्ये त्रुटी नाहीत अशा 5 संस्था आढळून आल्या. तसेच कारणे दाखवा नोटिसेस इश्यू केल्यानंतर आजपर्यंत 107 संस्थांचे खुलासे प्राप्त झालेले आहेत.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25056....

प्रा.वर्षा गायकवाड ....

उर्वरित संस्थांचे खुलासे आम्हाला 5-7 दिवसात प्राप्त होतील.

मागच्या वर्षापासून 23 बालगृहे बंद करण्यात आलेली आहेत. ज्या बालगृहाचे काम चांगले नाही अशी बालगृहे बंद करण्याचा आम्ही निर्णय घेतलेला आहे. फेब्रुवारी 2012 रोजी यांसदर्भात जी.आर. काढण्यात आला असून त्यासंदर्भात मराठवाडा सोडून उर्वरित महाराष्ट्रासाठी भरारी पथकाकडून तपासणी करुन कारवाई केली जाणार आहे. तसेच जिल्हाधिका-यांना सुध्दा त्यांच्या स्थरावर तपासणी करण्यास सांगितले आहे तसेच यासंदर्भातील रिपोर्ट सुध्दा विभागाला पाठविण्यात यावा अशाही सूचना देण्यात आलेल्या आहेत. जी बालगृहे विना परवानगी सुरु आहेत तसेच कोथरुड येथील बालगृहाच्या संदर्भात जो प्रकार घडलेला आहे अशी बालगृहे बंद करण्यात येतील. जी बालगृहे विना परवानगी सुरु आहेत त्यासंदर्भात वर्तमान पत्रातून, आकाशवाणीवरुन जाहिरात दिली जाते. त्यामुळे ज्या संस्था विना परवाना चालतात त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कारवाई करुन एफआयआर सुध्दा दाखल केला जात असतो. बरीच बालगृहे विना परवाना सुरु असल्याचे दिसून येत आहे त्यामुळे यासंदर्भात कडक कायदा करण्याचा सुध्दा शासन विचार करीत आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, बालगृहाचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. विना परवाना बालगृहे आढळून आल्यामुळे शासनाने यासंदर्भात कडक नियम तयार केलेले आहेत. यामध्ये व्हेरीफिकेशन करण्यासाठी बरेच दिवस निघून जातील. आपल्याकडे मूल दत्तक घेण्यासाठी फार किचकट व कडक नियम आहेत. त्यामुळे ज्यांना खरोखर मूल दत्तक घ्यावयाचे असते ते सुध्दा कडक नियमामुळे मूल दत्तक घेऊ शकत नाहीत. आता जर बालगृहाच्या व्हेरीफिकेशनमध्ये जास्त दिवस गेले तर ज्या मुलांना खरोखर बालगृहाची आवश्यकता आहे अशा मुलांना खूप त्रास सहन करावा लागणार आहे. त्यामुळे ठराविक दिवसात बालगृहे सुरु करण्याची प्रक्रिया पूर्ण होईल त्यामुळे यासंदर्भात शासन निर्णय घेणार आहे काय ? प्रत्येक जिल्हयामध्ये तसेच तालुक्यामध्ये बालगृहे सुरु करण्याच्या संदर्भात स्वयंसेवी संस्था तसेच समाज सेवी लोकांना विश्वासात घेऊन काम केले गेले तर यातून चांगला निर्णय लागू शकेल. शासकीय कामकाजात विलंब लागत असतो त्यामुळे बालगृह सुरु करण्याची प्रक्रिया किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. :25056...

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, आदरणीय मंत्री महोदयांनी सांगितल्या प्रमाणे बाल हक्क संरक्षण आयोगाकडे तपासणीचे काम दिलेले असून त्यांनी अनेक संस्थांची केस बाय केस हेअरींग घेतलेली असून हे काम आता पूर्ण झाले असून केवळ एक्झामीन करुन यासंदर्भात रिपोर्ट द्यावयाचा आहे. हे काम लवकरच पूर्ण होईल अशी अपेक्षा आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, बालगृहामुळे आपल्या राज्याची जेवढी नाचक्की झाली तेवढी नाचक्की आपल्या राज्याची कधीही झाली नव्हती. सर्व्हे करीत आहोत, बृहत आराखडा तयार केला आहे असे शासनाकडून सांगितले जाते, यासंदर्भात शासनाची इच्छा प्रामाणिक असू शकेल परंतु बालगृहाची लक्तरे वेशीला टांगल्या गेल्यानंतरच आपल्या विभागाकडून कारवाई करण्यात येते. खरे म्हणजे आपल्या विभागाची इफेक्टीव्ह सिस्टीम नसल्यामुळे हे सर्व प्रकार होत आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. आपल्या विभागात बालगृहाचा विषय प्रायोरिटीवर नसून बाकीचेच विषय प्रायोरिटीवर आहेत. बालगृहे अनावश्यक प्रमाणात दिली गेली आहेत ती कशा पध्दतीने सुरु आहेत हे काही बघितले जात नाही. त्यामुळे क्रिमिनल वेस्टेज ऑफ मनी सर्व ठिकाणी चालला आहे असे म्हटले तर ते चुकीचे होणार नाही. ज्याप्रमाणे शिक्षण मंत्र्यांनी राज्याच्या शाळेतील विद्यार्थ्यांची पटपडताळणी केली त्या प्रमाणे यांसदर्भात आपण पटपडताळणी केली तर खरी वस्तुस्थिती आपल्याला दिसून येईल. काही बालगृहातील मुलांचा चुकीच्या कामासाठी सुध्दा उपयोग झाल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे बालगृहाची केवळ बाल संरक्षण समिती तर्फेच नाही तर हाय पॉवर कमिटी नेमून यासंदर्भात चौकशी केली तरच चांगला आऊटपूट निघू शकेल त्यामुळे हाय पॉवर कमिटी नेमून चौकशी करण्याची शासनाची मानसिकता आहे काय ? तसेच हे करण्यासाठी टाईम बाऊंड प्रोग्राम करुन ज्या चुकीच्या गोष्टी बालगृहाच्या संदर्भात झालेल्या आहेत त्यांच्यावर क्रिमिनल केसेस फाईल केल्या जातील काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात मला सांगावेसे वाटते की, मागच्या वर्षापासून आपण 23 बालगृहे बंद केलेली आहेत. यावर्षी 577 बालगृहांची तपासणी केलेली आहे. ज्या ज्या संस्थांच्या संदर्भात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वर्षा गायकवाड.....

एफआयआर दाखल केलेल्या आहेत तसेच काही संस्थावर फौजदारी कारवाई करण्यात आलेली आहे. तसेच यासंदर्भात एका डेप्युटी कमिशनरावर फौजदारी कारवाई करण्याचे काम केलेले आहे.

श्री. विनोद तावडे : या लोकांनी पुन्हा नवीन अर्ज करुन नवीन बालगृहे मिळवली आहेत.

प्रा. वर्षा गायकवाड : सन्माननीय सदस्य म्हणतात ते चुकीचे आहे. आम्ही मंत्री पदाचा पदभार स्वीकारल्यापासून एकही बालगृह दिलेले नाही. माननीय राज्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, बालगृहाच्या संदर्भात नव्याने निकष ठरविण्यासाठी 22 डिसेंबर, 2011 ला जीआर काढण्यात आलेला आहे. तसेच संस्थेने कसे काम केले पाहिजे यासंदर्भात केअर प्लॅन सुध्दा काढलेला आहे. तसच सर्व संस्थांना आयुक्तांनी भेटी किती वेळा भेटी दिल्या आहेत तसेच व्यवस्थापन समित्या तत्काळ निर्माण करण्यास सांगितलेल्या आहेत तसेच व्यवसाय प्रशिक्षणाच्या संदर्भात सुध्दा माहिती देण्यात आली असून बालगृहे चांगली सुरु रहावीत यासाठी आमच्या विभागाकडून सातत्याने प्रयत्न सुरु आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रायगड जिल्हापरिषदेने जिल्हा नियोजन समितीस डावलून
१० कोटीच्या कामास मंजुरी दिल्याबाबत

(३) * २५०८९ ***श्री.जयंत प्र. पाटील , श्री.कपिल पाटील*** **:** सन्माननीय ***उप मुख्य मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा नियोजन समिती तथा जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांना कोकण विकास कार्यक्रमाअंतर्गत वाडीजोड रस्त्याचा कार्यक्रम रायगड जिल्हा परिषदेने दिनांक ९ नोव्हेंबर, २०११ रोजी सादर केला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेने सादर केलेला कार्यक्रम डावलून सार्वजनिक बांधकाम विभागाकडील रुपये १० कोटीचा कार्यक्रम (११७ कामे) दिनांक २९ डिसेंबर, २०११ रोजी मंजूर केला, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, मंजूर केलेली ११७ कामे ही वाडीजोड रस्ता कार्यक्रमांतर्गत निकषाप्रमाणे मंजूर करण्यात आली होती काय,

(४) सार्वजनिक बांधकाम खाते, अलिबाग व महाड यांनी सादर केलेली व मंजूर करण्यात आलेली किती कामे रायगड जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील होती,

(५) रायगड जिल्हा परिषदेच्या अधिपत्याखालील असलेली कामे सार्वजनिक बांधकाम खात्याकडे वर्ग करताना जिल्हा परिषदेचे ना हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले होते काय,

(६) जिल्हा परिषदेने सादर केलेला वाडीजोड रस्त्याचा प्रस्ताव मंजूर न करण्याची कारणे कोणती आहेत ?

श्री.अजित पवार : (१) हे अशंत: खरे आहे. रायगड जिल्हा परिषदेने कोकण विकास कार्यक्रम अंतर्गत दिनांक २२ नोव्हेंबर, २०१० रोजीच्या पत्रान्वये वाडीजोड रस्त्याचा रु.२८.५४ कोटी रकमेचा व दिनांक १९/११/२०११ च्या पत्रान्वये रु. १०.०० कोटी रकमेचा सुधारित कार्यक्रम, जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, रायगड यांचेकडे सादर केला होता.

(२) हे अशंत: खरे आहे. रायगड जिल्ह्यासाठी एकूण रु.३०.०० कोटीचा वाडीजोड रस्ते कार्यक्रम मंजूर आहे. त्यापैकी वाडीजोड रस्ते कार्यक्रम रु.२०.०० कोटीच्या आराखड्याना शासनाने अनुक्रमे दि.२५/१०/२०१० व दि.९/११/२०१० पूर्वीच मान्यता दिली आहे. जिल्हा परिषदेने दि. २२/११/२०१० च्या पत्रान्वये सादर केलेला आराखडा रु.२८.५४ कोटीचा असल्याने सदर आराखडा जिल्हाधिकारी यांचेकडे परत पाठवून त्यांना रु.१०.०० कोटी मर्यादेत आराखडा सादर करण्याचे कळविण्यात आले होते. दरम्यान जिल्हाधिकारी यांनी दि. १८/१०/२०११ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाचा रु.१०.०० कोटी रकमेचा आराखडा शासनास सादर केला व सदर आराखड्यास शासनाने दि.५/११/२०११ च्या पत्रान्वये मंजुरी दिली आहे.

(३) होय.

(४) सार्वजनिक बांधकाम खाते, अलिबाग व महाड यांच्या मंजूर करण्यात आलेल्या वाडीजोड कार्यक्रमातील एकूण १२१ कामे मंजूर असून त्यापैकी ११७ कामे जिल्हा परिषद, रायगड यांच्या अधिपत्याखालील आहेत.

(५) सार्वजनिक बांधकाम विभाग, अलिबाग ते महाड यांनी सदर कामे हाती घेण्यासाठी परवानगीबाबत जिल्हा परिषद, रायगड यांचेकडे रितसर प्रस्ताव सादर केलेला आहे.

(६) कोकण विकास कार्यक्रमा अंतर्गत रायगड जिल्ह्यासाठी एकूण रु.३०.०० कोटी रकमेंचा वाडीजोड रस्ते कार्यक्रम मंजूर आहे. जिल्हा परिषद, रायगड दि.२२/११/२०१० च्या पत्रान्वये सादर केलेला रु.२८.५४ कोटीचा आराखडा जिल्हाधिकारी, रायगड यांनी शासनास दि.३/१२/२०१० च्या

...५..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ...
पत्रान्वये सादर केला होता. मात्र वाडीजोड रस्ते योजनेसाठीचा रु.२०.०० कोटीचा आराखडा अगोदरच मंजूर झाल्याने उर्वरित रु.१०.०० कोटीचा आराखडा सादर होणे आवश्यक होते. सबब जिल्हापरिषदेचा सदरचा आराखडा जिल्हाधिकारी यांचेकडे दिनांक १९/१०/२०११ च्या पत्रान्वये परत पाठवून त्यांना रु.१०.०० कोटी मर्यादेत सुधारित आराखडा पाठविण्याबाबत कळविण्यात आले. दरम्यान जिल्हाधिकारी यांनी दि.१८/१०/२०११ च्या पत्रान्वये सार्वजनिक बांधकाम विभागाचा रु.१०.०० कोटी रकमेचा आराखडा शासनास सादर केला. सदर आराखड्यास शासनाने दि.५/११/२०११ च्या पत्रान्वये मंजुरी दिली असून जिल्हा परिषदेचा आराखडा जिल्हाधिकारी यांचेकडून मागविण्यात आला होता. त्यानुसार जिल्हा परिषद, रायगड यांनी दि.१९/११/२०११ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी यांना सादर केलेला रु.१०.०० कोटीचा सुधारित आराखडा जिल्हाधिकारी यांनी दि.२३/११/२०११ च्या पत्रान्वये शासनास सादर केला आहे. सदर आराखडा शासनाच्या विचाराधीन असून यासाठी अतिरिक्त तरतूद देण्याबाबतची बाब तपासण्यात येत आहे.

दरम्यान, वाडीजोड रस्तेबाबत चुकीचे आराखडे मंजूर केल्याबाबत व जिल्हा परिषदेच्या आराखड्यास मंजुरी न दिल्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे श्रीमती मिनाक्षी पाटील, विधानसभा सदस्य यांनी जनहित याचिका क्र. ७६२६/२०११ दाखल केली असून सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ट आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,..

सभापती : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सदर प्रश्न हा न्यायप्रविष्ट आहे त्यामुळे सभागृहाच्या प्रथा,परंपरेप्रमाणे जो प्रश्न न्याय प्रविष्ट असतो त्या प्रश्नावर सदनात चर्चा केली जात नाही यासंदर्भात अनेक दाखले आहेत.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझी बाजू मांडून झाल्यानंतर आपण रुलींग दिले तर योग्य होईल.

सभापती : ठीक आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय मिनाक्षी पाटील यांचा प्रश्न वेगळा आहे. कार्यक्रमात त्यांना डावलल्या बद्दलचा तो प्रश्न आहे. परंतु माझा प्रश्न असा आहे की, नियोजन समितीलाच गुंडाळण्याचे काम सुरु झालेले आहे. जिल्हा नियोजन समितीला न विचारता कामकाज केले जात आहे.

सभापती महोदय, घटनेने जिल्हा नियोजन मंडळ कसे स्थापन करावे व त्यांचे अधिकार काय असतात हे ठरवलेले आहे. कलम 143 क(घ) मध्ये असे म्हटले आहे की, "प्रत्येक जिल्हा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.: २५०८९...

श्री. जयंत प्र.पाटील...

नियोजन समितीचा अध्यक्ष अशा समितीने शिफारस केलेल्या विकास योजनांच्या संदर्भात राज्य शासनाला शिफारस करेल." परंतु सन्माननीय पालक मंत्र्यांनी जिल्हा नियोजन समितीला विचारलेलेच नाही. पालक मंत्र्यांनी स्वत:च्या अधिकारात "कोकण विकास कार्यक्रमांतर्गत शासनाच्या निर्णयाप्रमाणे जिल्हा वाडी जोड रस्त्यासाठी सन 2011-2012 अंतर्गत खालील रस्त्याच्या कामांना मंजुरी देण्यात येत आहे. सदर रस्त्याच्या कामाला शासन मान्यता देऊन प्रशासकीय मान्यता तात्काळ देण्यात यावी" असे म्हटलेले आहे. घटनेने जिल्हा नियोजन मंडळ तयार केलेले आहे. ज्या घटनेच्या आधारावर आपण कारभार करतो ती घटनाच पालक मंत्र्यांनी गुंडाळलेली आहे.

सभापती महोदय, दुसरी बाब अशी आहे की, खालापूर तालुक्यातील उंबरेगावाच्या दोन्ही बाजूला हायवे जातो परंतु अशा गावाला आदिवासी निधी दिलेला आहे. वाडी जोड रस्ता कधी दिला जातो तर ज्या गावात जाण्यासाठी रस्ता नाही त्या ठिकाणी वाडी जोड रस्ता दिला जातो. परंतु ज्या ठिकाणी स्टेट हायवे आहे त्या ठिकाणी इलेक्शनच्या वेळेस जशी खिरापत वाटावी तसेच या प्रकरणात वाटले गेले आहे. 15 हजार, 5 हजार, 10 हजार या प्रमाणे वाटले गेले आहे. हा काय प्रकार चालला आहे ? हा प्रकार झाल्यानंतर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य, आमदार असे मिळून आम्ही जिल्हाधिका-यांना घेराव घातला होता.

सभापती : प्राथमिक परिस्थिती जाणून घेण्यासाठी मी आपल्याला विचार मांडण्याची संधी दिली होती. या प्रश्नाच्या संदर्भात मी असा निर्णय घेत आहे की, हा प्रश्न मी आता राखून ठेवतो. कायदेशीर रित्या या पूर्वीच्या ज्या प्रथा परंपरा आहेत, विशेषत: न्यायप्रविष्ट बाब असतांना ...

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, न्याय प्रविष्ट बाबीमध्ये स्थगिती दिली गेली असेल तर चर्चा करता येत नाही. परंतु न्याय प्रविष्ट बाबीमध्ये न्यायालयाने कोणताही निर्णय दिला नसेल तर सभागृहाला पूर्ण चर्चा करण्याचा अधिकार आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25089 . . . .

श्री.अजित पवार : सभापती महोदय, अनुक्रमांक 3 वरील तारांकित प्रश्न क्रमांक 25089 हा सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांनी जिल्हा नियोजन समितीस डावलून 10 कोटी रुपयांच्या कामाबद्दल प्रश्न विचारलेला आहे.आपणही सुरुवातीला 3 क्रमांकाच्या पानावर 4 थ्या ओळीमध्ये जे सांगितले आहे ते वाचून दाखविले आणि सन्माननीय राज्यमंत्री महोदयांनीही वाचून दाखविले आहे. माझी सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांना विनंती आहे. सभापती महोदय, अर्थात हा आपला अधिकार आहे. आपण आपल्या दालनामध्ये मला तसेच सन्माननीय राज्यमंत्री महोदयांना, नियोजन विभागाचे प्रिन्सिपल सेक्रेटरींना, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेबांना बोलावून घ्यावे.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : सभापती महोदय, त्यावेळी विरोधी पक्षनेत्यांना, आणि आम्हाला देखील बोलविण्यात यावे. हा आमचा देखील प्रश्न आहे.

श्री.अजित पवार : सभापती महोदय, याठिकाणी फक्त राज्याच्या बाबतीत प्रश्न विचारलेला आहे. तसेच त्यावेळी विधी व न्याय विभागाच्या सचिवांना देखील उपस्थित रहाण्याबाबत सांगण्यात येईल आणि कोर्टाचाही अपमान होणार नाही आणि सन्माननीय सदस्यांचा जो मुद्दा आह तो देखील समजून घेता यावा आणि मग त्यातून मार्ग निधावा यासाठी माझी स्वत:ची चर्चा करण्याची तयारी आहे.

सभापती : आता माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी जे सांगितले, त्या पध्दतीने . . . .

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ते मला मान्य आहे. सभापती महोदय, मी आपल्या आदेशाच्या बाहेर नाही. म्हातारी मेल्याचे दु:ख नाही तर काळ सोकावलेला आहे.जिल्हा नियोजन मंडळाच्या बाबतीत महाराष्ट्रामध्ये ही परिस्थिती आहे.प्रत्येक पालकमंत्री 4-5 लोकांना गोळा करतात,टॅकल करतात अशा प्रकारचे सगळीकडे स्थिती आहे. 60-70 कोटी रुपये असेच वाटतात. मग आम्ही आमदार कशासाठी आहोत ?

सभापती : मला असे वाटते की, तारांकित प्रश्न क्रमांक 3 च्या अनुषंगाने सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी येथे विचार मांडले.त्यानंतर सन्माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी देखील या सदनामध्ये विचार मांडले आहेत. याबाबतीत माझ्या दालनामध्ये मी या विषयाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांच्या बरोबर बैठक घेतो आणि याबाबतीत कशा प्रकारचा निर्णय घेता येईल तसेच न्यायप्रविष्ट बाब यादृष्टीने कशा प्रकारे काळजी घेता येईल तसेच नियोजन विभागाच्यादृष्टीने

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25089 . . . .

सभापती . . . .

सुध्दा काय करणे आवश्यक आहे हे देखील पहाता येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, न्याय प्रविष्ट असलेला विषय कृपा करुन काढून टाकावा.या सदनामध्ये बलात्काराची प्रकरणे, खून, दरोडे यासंबंधातील प्रकरणे येतात आणि ती न्याय असतात. मग त्याबाबतीत सुध्दा काहीच करता येणार नाही.

सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते यांना सांगू इच्छितो की, जेव्हा या संबंधातील बैठक असेल तेव्हा या विषयाच्या अनुषंगाने कायदे विभागाचे जे सचिव आहेत त्यांना सुध्दा बैठकीसाठी बोलावून त्यांचाही सल्ला घेऊ.

. . . .डी-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील महानगरपालिकांचे लेखापरिक्षण शासनाच्या लेखापरिक्षकाकडून करुन घेण्याबाबत

(4) *26047 श्री.सुभाष चव्हाण, श्री.राजन तेली, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.सुरेश नवले : सन्माननीय **उप मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील महानगरपालिकेतील आर्थिक गैरव्यवहाराला आळा घालण्यासाठी शासनाच्या लेखापरिक्षकाकडून लेखापरीक्षण करण्याचा शासनाने निर्णय घेतला असल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, संबंधित महानगरपालिकेचे लेखापरिक्षण लेखापरीक्षकाकडून केव्हापासून करण्यात येणार आहे,

(3) अद्याप, लेखापरीक्षण सुरु केले नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री.अजित पवार : (1), (2) व (3) 13 व्या वित्त आयोगाच्या अहवालातील शिफारस क्रमांक 10.121 प्रमाणे राज्यातील पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वित्तीय स्थितीबाबत आयोगास विश्वसनीय माहिती प्राप्त व्हावी त्याचबरोबर शिफारस क्रमांक 10.161 अन्वये विषद करण्यात आलेल्या कार्यात्मक अनुदान (Performance Grant) राज्याला वितरित करणे वित्त आयोगास शक्य व्हावे यासाठी शिफारस क्रमांक 10.121 ची अंमलबजावणी दिनांक 31 मार्च, 2011 पर्यंत करणे आवश्यक होते. त्यानुसार राज्यातील पंचायती राज संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लेख्यांचे लेखापरीक्षण संचालक स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य यांना नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या तांत्रिक मार्गदर्शक तत्वानुसार लेखापरीक्षण दिनांक 31/3/2011 च्या शासन निर्णयानुसार करावयाचे आहे.

लेखा परीक्षणासाठी आवश्यक ते प्रशिक्षण महालेखापाल यांच्याकडून घेण्यासाठी तसेच पद भरतीची कार्यवाही करण्यात येत आहे. कार्यक्रमाची आखणी करून लेखा परीक्षणाला सुरूवात करण्यात येत आहे.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, आपल्या राज्यात पंचायत राज, नागरी आणि स्थानिक स्वराज्य संस्था, मोठमोठ्या महानगरपालिका यांचे जे बजेट आहे ते देशातील जी छोटी-छोटी राज्ये आहेत उदाहरणार्थ मणिपूर, कर्नाटक यांच्या पेक्षाही मोठे आहे. त्यामुळे गैरव्यवहाराला आळा घालण्यासाठी दिनांक 31-3-2001 रोजी शासनाचे देखील ऑडीट करुन लेखा परिक्षण करण्याचा जो निर्णय घेतलेला आहे, त्याचे मी स्वागत करतो. शासनाच्या निर्णयानुसार कारवाई करावयाची आहे असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. त्यानुसार सदरहू कारवाई कधीपासून सुरु करणार आहात ? त्या संबंधातील ऑडीट कधी पासून करणार आहात ? तसेच ऑडीट करण्यासाठी हा विभाग कोणत्या विभागाकडे दिला जाणार आहे आणि या कामासाठी किती पदांची आवश्यकता आहे आणि सदरहू पदे कधी भरण्यात येणार आहेत ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण साहेबांनी हा मुद्दा उपस्थित केलेला आहे. यापूर्वीच्या काळामध्ये ज्या महानगरपालिका किंवा नगरपालिका होत्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्यांना एवढ्या मोठया प्रमाणात निधी दिला जात नव्हता. पण अलीडच्या काळामध्ये यु.आय.डी. एस.एस.एम.टी. अशा वेगवेगळया केंद्र शासनाच्या, राज्य शासनाच्या योजना असतात किंवा 13 वा वित्त आयोग आहे आणि त्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणात निधी मिळत आहे आणि एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी दिल्यानंतर तो खर्च करीत असताना त्यामध्ये निश्चितपणे पारदर्शकता असावयास पाहिजे याच्याशी राज्य सरकार देखील सहमत आहे.

सभापती महोदय, याठिकाणी राज्य शासनाने दि.31 मार्च 2011 रोजी आदेश काढले की, "1100 कोटीचे कार्यात्मक अनुदान राज्याला प्राप्त होण्यासाठी राज्य शासनाने सदर अटींची पूर्तता दि.31 मार्च 2011 पर्यंत पूर्ण करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या लेखा परीक्षणासाठी स्थानिक निधी लेखा अधिनियम, 1930 मध्ये आपण आवश्यक ते बदल हे महानगरपालिकेचे लेखा परीक्षण करण्यासाठी केले आणि त्यासंबंधीच आदेशही दि.31 मार्च 2011 रोजी निगर्मित केले आहेत. या वर्षभराच्या काळामध्ये साधारणपणे वित्त विभागाच्या शासन निर्णयाव्दारे यासाठी 119 पदे निर्माण केलेली आहेत. आम्ही एवढेच करुन थांबलो नाही तर संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा विभाग यांनी लेखापरीक्षण करण्यासाठी त्यांच्या अधीनस्थ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचा कार्यक्रम देखील आम्ही निश्चित केला आणि त्याप्रमाणे 7 अधिकारी आणि 482 कर्मचाऱ्यांना 2011-2012 मध्ये प्रशिक्षणही दिले आहे. यानंतर 2012-2013 मध्ये देखील एकंदर 26 अधिकारी आणि 589 कर्मचारी यांनाही प्रशिक्षण देण्याचे प्रस्तावित केले आहे. कारण संबंधितांनी कशा पध्दतीने काम केले पाहिजे कारण त्यांना जर प्रशिक्षणच देण्यात आले नाही तर हे काम कसे करावयाचे ते त्यांना समजणार नाही. म्हणून आम्ही याबाबतीत अशा प्रकारची भूमिका स्वीकारलेली आहे.

सभापती महोदय, यामध्ये साधारणपणे पुढच्या काळामध्ये देखील महाराष्ट्राला निधी मिळत रहाणार आहे.साधारणपणे 4 वर्षामध्ये 1100 कोटी रुपये देण्याचे कबूल करण्यात आले आहे. सुरुवातीला सांगितल्याप्रमाणे हे सर्व होत असताना जुलै 2012 मध्ये देखील सुरुवातीला संगितल्याप्रमाणे 119 पदांना मंजुरी देण्याबाबत मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे आणि संचालक, लोकल फंड ऑडीट यांच्याकडून राज्यातील महानगरपालिकेच्या लेखा परीक्षणास सुरुवात होईल आणि याबाबतीत नियोजन देखील करण्यात आलेले आहे.परंतु आम्ही येथपर्यंतच थांबलो नाही तर

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जिल्हा परिषदांचे कामकाज झाल्यानंतर विधी मंडळाची एक कमिटी असते आणि ती याबाबतीत आढावा घेते.तसे यामध्ये होऊ शकत नव्हते आणि त्याबाबतीत देखील आम्ही विचार करीत आहोत. याबाबतीत आमच्या विभागाने शिफारस केली असून सहाजिकच याबाबतीतील अधिकार माननीय सभापती आणि माननीय अध्यक्ष यांचा आहे, विधीमंडळाचा आहे. परंतु सध्या आहे त्याच कमिटीला हे कामकाज देखील पहावयास सांगावयाचे की महानगरपालिकांसाठी नवीन कमिटी करावयाची याबाबत सर्वमताने जो निर्णय होईल तो मान्य
करण्याची आमची तयारी आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेमध्ये स्वत:चे ऑडीट करण्याची क्षमता आहे आणि महानगरपालिकेचा स्टाफ देखील आहे. अशा वेळी लेखा परीक्षण झाल्यानंतर सदरहू स्टाफच्या संबंधात काय करणार आहात ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, या सगळया गोष्टी करीत असताना बऱ्याचशा ठिकाणी वेगवेगळ्या संस्था असतात. सभापती महोदय, आपण सहकारामध्ये काम केलेले आहे, काम करीत आहात. पूर्वीच्या काळामध्ये आपल्याला सहकार विभागाकडून ऑडीट करुन घ्यावे लागत असे. मात्र नंतर आपण एक पॅनेल तयार केले आणि त्यामध्ये चार्टर्ड अकाऊंन्टच्या ज्या कंपन्या आहेत त्यांना सांगितले की, या पॅनेलमध्ये अमुक-अमुक कंपन्या आहेत, त्यामुळे तुम्ही त्यांच्याकडून ऑडीट करुन घ्या. आता जिल्हा बँका देखील तशा पध्दतीने ऑडीट करुन घेतात. अशाच पध्दतीचा मुद्दा सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या बाबतीत निर्माण झालेला आहे. मी त्याबाबत एवढेच सांगेन की, ज्या महानगरपालिकांची व्यवस्था पारदर्शक असेल, यामध्ये कुठे काही अडचणी येत नसतील तर हे सर्व निर्णय घेत असताना याबाबतीत देखील विचार केला जाईल. मात्र यामध्ये कोणाला तरी त्रास द्यावयाचा आहे किंवा कुणाला तरी जाणीवपूर्वक अडचणी मध्ये आणावयाचे आहे अशा प्रकारची राज्य सरकारची अजिबात भावना नाही. म्हणून आपण मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत उदाहरण दिलेले आहे,अशा प्रकारच्या इतरही काही महानगरपालिका आहेत.त्याबाबतीत साधकबाधक विचार करुन केंद्र व राज्य सरकार कडून देण्यात आलेला पैसा व्यवस्थितपणे खर्च व्हावा, त्यामध्ये पारदर्शकता असावी अशी जी या सदनातील सर्वांची भूमिका आहे, ती भूमिका व्यवस्थितरित्या राबविण्यासाठी राज्य शासन कसोशीने प्रयत्न करील. तसे करीत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असताना सन्माननीय सदस्यांनी महानगरपालिकेचा मुद्दा उपस्थित केला, त्यामध्ये कोणतेही राजकारण न आणता त्याबाबतीत योग्य प्रकारचा मार्ग काढला जाईल.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26047...

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री महोदयांचे मी अभिनंदन करतो कारण त्यांनी वित्त विभागाचा कार्यभार स्वीकारल्यापासून आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न केलेला आहे. या ठिकाणी महानगरपालिका आणि नगरपलिकेच्या ऑडीट संबंधी उल्लेख झाला. परंतु ग्रामपंचायतीचे ऑडीट चार-चार वर्षे होत नाही. आम्ही पंचायत राज समितीच्या माध्यमातून जिल्हापरिषदांना भेटी देतो त्यावेळी या गोष्टी आमच्या निदर्शनास आलेल्या आहेत. ऑडीट झाल्यानंतर गैरव्यवहारामध्ये किती रक्कम गुंतलेली आहे हे समजते. हे जेव्हा लक्षात येते तेव्हा संबंधित अधिकारी / कर्मचारी सेवानिवृत्त झालेले असतात किंवा काही मयत झालेले असतात. तेव्हा त्यांच्याकडून वसुली होत नाही. ऑडीट वेळेवर न झाल्यामुळे गैरव्यवहारामध्ये किती रक्कम गुंतलेली आहे हे लक्षात येत नाही आणि शासनाचे कोट्यवधी रुपये अडकून पडतात. महानगरपालिका आणि नगरपालिका तपासण्यासाठी समिती करणार आहोत असे सांगण्यात आले. तेव्हा पंचायत समितीच्या बाबतीत देखील तशी शिफारस करणार काय ? तसेच ग्रामपंचायती आणि पंचायत समित्यांचे ऑडीट त्याच वर्षात होईल काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी वेगळा प्रश्न उपस्थित केलेला आहे. मी सुरुवातीलाच सांगितले की, कारभारामध्ये पारदर्शकता येण्यासाठी जे काही निर्णय घेण्याची आवश्यकता आहे ते निर्णय घेण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्याबाबत सांगू इच्छितो की, महालेखापाल, मुंबई यांचेकडून मार्गदर्शक तत्वे प्राप्त इ ालेली आहेत. सर्वसाधारणपणे ज्या संस्थांचे लेखापरीक्षण करावयाचे आहे त्याचा डेटा प्लान करावा, त्यांचे मागील तीन वर्षाचे बजेट, वार्षिक खर्च, त्यांनी हाती घेतलेले मोठे प्रकल्प इत्यादीचा त्यामध्ये समावेश होणार आहे. ज्या संस्थेचे ऑडीट करावयाचे आहे त्याचे कायदे, नियम, उपविधी यांचा देखील अभ्यास केला जाणार आहे. सखोल नियोजन असावे हीच त्या मागील भूमिका आहे. केंद्रांचा मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होतो. तेव्हा झालेल्या विकास कामांमध्ये पारदर्शकता असली पाहिजे. त्यामध्ये काही आर्थिक घोटाळे असतील तर ते वेळेत निदर्शनास येतील. अशा उघडकीस

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26047...

श्री.अजित पवार..

आलेल्या प्रकरणांचा अहवाल संचालक, लोकल फंड ऑडीट हे कॅगला कळवतील आणि कॅग सदरचा अहवाल नगर विकास विभागामार्फत विधिमंडळाला सादर करतील. सदर अहवाल सादर झाल्यानंतर त्याबाबत पुढे कोणती कारवाई करायची याबाबत विधिमंडळ निर्णय घेईल, अशा पध्दतीने हे सर्व अभिप्रेत आहे. सन्माननीय सदस्यांनी जो मुद्दा उपस्थित केला त्याबाबत सांगू इच्छितो की, तेथेही अशाच पध्दतीने पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने ग्रामविकास विभागाशी चर्चा करुन त्यातून मार्ग काढला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यात उभारण्यात येत असलेल्या धरण प्रकल्पाच्या कामासाठी निधीची तरतूद करण्याबाबत

(5) * 25333 श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.रामनाथ मोते : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यात उभारण्यात येत असलेल्या रांगाव वाशी येथील गडनदीवर, आरे येथील शास्त्रीनदीवर व कुचांबे येथे गडनदीवरील प्रकल्पाचे काम निधीची कमतरता व प्रकल्पग्रस्तांचे पुर्नवसनाबाबत अक्षम्य दिरंगाईमुळे अपुर्ण आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या कामास आत्तापर्यंत किती निधी उपलब्ध करुन दिला, यापुढे प्रकल्प पुर्णतेसाठी किती निधीची गरज असून तो उपलब्ध करुन देणे व प्रकल्पग्रस्तांचे तातडीने पुर्नवसन करुन देणे यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(3) उक्त प्रकल्पांपैकी किती प्रकल्पांवर वीज निर्मिती होणार आहे तसेच उक्त प्रकल्प नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(4) नसल्यास, या प्रकरणी होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुनील तटकरे : (1) नाही.

(2) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील रांगव, गडगडी (वाशी) व गडनदी (कुचांबे) या प्रकल्पांसाठी आजतागायत उपलब्ध झालेला व उर्वरित कामासाठी आवश्यक निधी खालीलप्रमाणे आहे.

योजना	आजतागायत उपलब्ध निधी (कामाप्रित्यर्थ) रु.कोटी	उर्वरित कामासाठी आवश्यक निधी (कामाप्रित्यर्थ) रु.कोटी
रांगव ल.पा.यो.	40.14	8.44
गडनदीमध्यम (कुचांबे) प्रकल्प	437.90	134.15
गडगडी (वाशी)	45.22	142.30

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25333...

श्री.सुनील तटकरे...

कुचांबे येथील गडनदी मध्यम पाटबंधारे प्रकल्पांचा समावेश ए.आय.बी.पी. अंतर्गत केला असून वरील 3 प्रकल्पांची कामे निधीच्या उपलब्धतेनुसार प्रगतीपथावर आहेत.

रांगव ल.पा. योजनेच्या प्रकल्पग्रस्तांनी स्वेच्छा पुनर्वसन स्वीकारले असून बुडीत क्षेत्रातील बाधित कुटुंबे स्थलांतरित झालेली आहेत. गडगडी लघु पाटबंधारे प्रकल्पांच्या पुनर्वसनाची कामे पूर्ण झाली आहेत. गडनदी पाटबंधारे प्रकल्पांच्या बुडीत क्षेत्रातील गावे पुनर्वसित करण्याचे बहुतांशी पूर्ण झाले असून उर्वरित कामे प्रगतीपथावर आहे.

(3) गडनदी मध्यम प्रकल्पाच्या प्रकल्प अहवालानुसार 1.25 मे.वॅट वीज निर्मिती प्रस्तावित आहे. गडनदी प्रकल्पाचे काम नियोजित वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रकल्पाचा समावेश केंद्र शासनाच्या ए.आय.बी.पी. कार्यक्रमांतर्गत करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे गडगडी व रांगव ल.पा. प्रकल्पाचे काम निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, हा प्रश्न पुनवर्सनाशी देखील संबंधित आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील संगमेश्वर तालुक्यातील धरणग्रस्तांचा हा प्रश्न आहे. राखीवली, कुडगिरी, रातांबे, पातांबे ही प्रकल्पग्रस्त गावे आहेत. या गावांचे पुनर्वसन जवळपास 30 कि.मी.अंतरावर करण्यात आलेले आहे. पुनर्वसन गावाकरिता निधी दिलेला आहे. जलाशयाचे बाधित क्षेत्र सोडून ज्या जमिनी आहेत त्या कसायला ते इतक्या लांबून येऊ शकत नाहीत. तसेच जी अतिरिक्त जमीन आहे त्यावरील निर्बंध देखील उठविलेले नाहीत. एकीकडे त्यांना शेतजमीन नाही तर दुसरीकडे जी अतिरिक्त जमीन राहिलेली त्यावरील निर्बंध उठविलेले नाहीत. या संदर्भात दिनांक 24 ऑगस्ट रोजी माननीय राज्य मंत्री महोदयांकडे बैठक होऊन पुढे काय कार्यवाही करता येईल याचा विचार देखील झालेला आहे. माझा पहिला प्रश्न आहे की, 65 टक्के रक्कम भरुन देखील अजून किती शेतकऱ्यांना पर्यायी जमिनीचे वाटप करायचे आहे ? पुनर्वसन गावांमध्ये अनेक गोष्टींची कमतरता आहे. मग त्यामध्ये विहिरी असतील, नळ पाणी पुरवठ्याचा प्रश्न असेल, विद्युत पोल असतील,

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25333...
श्री.संजय केळकर...

समाज मंदिरे असतील, ही कामे किती दिवसांत पूर्ण होणार आहेत ? शेतकऱ्यांच्या मालकीची अधिकची जमीन आहे परंतु ते इतक्या लांबून येऊन कसू शकत नाही. शिवाय ती बुडीत क्षेत्राबाहेरील जमीन आहे. त्या जमिनीवरील निर्बंध उठविल्यास शेतकऱ्यांना ती जमीन विकता येऊ शकेल. तेव्हा ते निर्बंध उठविणार आहात काय ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, या प्रकल्पांतर्गत ज्या गावांचे पुनर्वसन झालेले आहे ते स्वेच्छेने झालेले आहे. या गावांना दोन ठिकाणी स्वेच्छेने वसविलेले आहे. त्या अनुषंगाने गावठाणामध्ये जी कामे करावयाची होती ती पूर्ण झालेली नाहीत. या कामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. ती कामे लवकरात लवकर पूर्ण् करण्याची तजवीज निश्चितपण केली जाईल. सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. त्यांनी सांगितले की, जलाशलाच्या बाहेरील जी जमीन आहे, त्यावर खरेदी विक्रीचे बंधन आहे. सदरहू जमीन लाभक्षेत्राच्या बाहेरील असल्यामुळे पुनर्वसन कायद्याच्या कलम 11 (1) व 12 (1) अन्वये निर्बंध लागू झालेले आहेत. परंतु ती जमीन लाभक्षेत्राच्या बाहेरील असल्याचा दाखला जलसंपदा विभागाकडून देण्यात आला तर त्या जमिनीवरील निर्बंध उठवता येतील. तेव्हा या संदर्भात सखोल माहिती घेऊन तसा प्रकारचा दाखला देण्याचा प्रयत्न जलसंपदा विभागाच्या माध्यमातून येत्या 8-15 दिवसांत केला जाईल. त्यानंतर पुनर्वसन कायद्यातील तरतुदीच्या अनुषंगाने निर्बंध उठविता येत असतील तर त्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती या विभागातील पेढी, उमा, घुंगशी, काटेपुर्णा व पुर्णा बॅरेज-2 (नेरधामणा), शिवणगाव या बॅरेजकरिता अर्थसंकल्पात तरतूद करण्याबाबत

(6) * 25251 डॉ.रणजित पाटील , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.भगवान साळुंखे : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती या विभागातील पेढी, उमा, घुंगशी, काटेपूर्णा व पूर्णा बॅरेज-2 (नेरधामणा), शिवणगाव या बॅरेजकरिता माहे मार्च, 2012 च्या अर्थसंकल्पात भरीव तरतूद करण्याबाबत स्थानिक वि.प.स. यांनी मा.वित्तमंत्री, जलसंपदा मंत्री, जलसंपदा सचिव, वित्त सचिव, यांच्याकडे दिनांक 21 डिसेंबर, 2011 रोजी मागणी केली, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(3) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(4) अद्याप निर्णय घेतला नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुनील तटकरे : (1) होय.

(2), (3) व (4) राज्याची अर्थोपायाची स्थिती व मा.राज्यपाल महोदयांचे निदेश विचारात घेवून सदर प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, अवर्षणग्रस्त सहा जिल्ह्यापैकी अमरावती विभागातील सिंचनाचा प्रश्न आहे. अमरावती जिल्ह्यामध्ये सिंचनाचा अनुशेष 85 टक्के आहे. 2010-2011 पर्यंत टप्प्या टप्प्याने सिंचनाचा अनुशेष भरुन काढण्याचे प्रस्तावित होते. या संदर्भात माननीय राज्यपालांनी तसे निर्देश आणि सुधारित निर्देश सुध्दा दिलेले आहेत. अमरावतील विभागातील पूर्णा खोऱ्यातील खारपाण पट्ट्यातील हा प्रश्न आहे. त्या ठिकाणी 200 ते 250 कोटी रुपयांच्या छोट्या छोट्या बॅरेजेस काम प्रगतीपथावर आहे. पण गेल्या आर्थिक वर्षात हे काम मंद गतीने सुरु आहे. सरकारचा हा महत्वाकांक्षी प्रोजेक्ट आहे. त्या परिसरातील पाण्यात मोठ्या प्रमाणावर क्षार असल्यामुळे ते पाणी सिंचनाच्या आणि पिण्याच्या दृष्टीने देखील योग्य नाही. माझा प्रश्न आहे की, सन 2011-12 ला अनुदानित केल्या प्रमाणे पूर्ण निधी वितरित करण्यात आला काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? हा प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण होण्यासाठी सन 2012-13 आणि 2013-14 मध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात येईल काय ? ..7.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25251...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, अमरावती विभागातील पेढी, उमा, घुंगशी, काटेपूर्णा व पूर्णा बॅरेज आणि शिवणगाव ता.तिवसा या ठिकाणी प्रकल्पाची कामे घेण्यात आलेली आहेत. मागील तीन-चार वर्षापासून ही कामे सुरु आहेत. माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार या प्रकल्पांसाठी अधिकाधिक निधी उपलब्ध करुन देण्याचा आम्ही प्रयत्न करीत असतो. गेल्या वर्षी किती निधी उपलब्ध करुन दिला याची आकडेवारी माझ्याकडे आहे. पेढी प्रकल्पाची एकूण किंमत 62 कोटी रुपये आहे. सन 2011-2012 साठी 20 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली होती. गेल्या वर्षी या प्रकल्पावर 10 कोटी रुपये खर्च झाले. उमा बॅरेजेससाठी मार्च 2011 पर्यंत जवळपास 85 कोटी रुपये खर्च झालेले आहेत. गेल्या वर्षी 25 कोटी रुपयांचा नियतव्यय उपलब्ध होता. तरी सुध्दा त्यामध्ये अधिकचा नियतव्यय उपलब्ध करुन त्या कामावर 110 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी ही कामे विशिष्ट वेळेत पूर्ण होतील काय व ही सर्व कामे खारपाणपट्टयातील असल्यामुळे विशिष्ट वेळेत पूर्ण करण्याच्या दृष्टीकोनातून अधिकाधिक निधी मिळावा अशी भावना व्यक्त केलेली आहे. त्या बाबत सांगू इच्छितो की, जेवढा नियतव्यय उपलब्ध होत आहे त्यातून ही कामे पूर्ण करण्याच्या दृष्टीने आणि अधिक निधी देण्या बाबत निश्चितपणे सहानुभूतीपूर्वक विचार केला जाईल.

यानंतर कु.थोरात..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या ठिकाणी विचारण्यात आलेला प्रश्न अतिशय महत्वाचा आहे. विदर्भातील अनुशेषग्रस्त भागातील जास्त अनुशेष असलेला हा अकोला जिल्हा आहे. या जिल्हयामधून पूर्णा नदी वाहते आणि या पूर्णा नदवीर हा बॅरेज बांधण्यात येत आहे. हा बॅरेज शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. लेखी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "राज्याची अर्थोपायाची स्थिती व माननीय राज्यपाल महोदयांचे निदेश विचारात घेवून सदर प्रकल्पांना निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे". हे बरोबर आहे. परंतु पूर्णा बॅरेज-2 (नेरधामणा)चे काम गेल्या सहा महिन्यापासून निधी अभावी बंद आहे हे खरे आहे का आणि यासाठी किती निधी देण्यात येणार आहे, हे काम निधी अभावी बंद पडलेले आहे की, इतर टेक्निकल बाबींमुळे बंद पडलेले आहे, जर निधी अभावी बंद पडले असेल तर यासाठी या वर्षामध्ये एकूण किती निधी उपलब्ध झालेला आहे आणि तो कधी वितरित होईल?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पूर्णा बॅरेज-2 (नेरधामणा) संबंधीचा प्रश्न विचारलेला आहे. या पूर्णा बॅरेजच्या कामाला दिनांक 20-10-2008 रोजी 181 कोटी रुपयाची प्रशासकीय मान्यता मिळाली. तदनंतर 738 कोटी रुपयाची सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाली. या पूर्णा बॅरेज-2 मधून 6954 हेक्टर इतकी सिंचन क्षमता निर्माण होणार आहे. आतापर्यंत या प्रकल्पावर 191 कोटी रुपये खर्च झालेला आहे. या वर्षी सुध्दा 33.89 कोटी म्हणजे जवळपास 34 कोटी रुपये खर्च झालेला आहे. 2011-2012 या आर्थिक वर्षात याच्यासाठी 45.49 कोटी रुपये अनुदान उपलब्ध होते. त्यामुळे एका विशिष्ट कालावधीमध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून निश्चितपणाने तजवीज करण्यात येत आहे. सन 2015-2016 पर्यंत हा प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन विभागाने केलेले आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय,अमरावती विभागातील पेढी,उमा,घुंगशी, काटेपूर्णा व पूर्णा बॅरेज-2 (नेरधामणा), शिवणगाव या बॅरेजेसच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न विचारण्यात आलेला आहे. या बॅरेजेससाठी निधी कमी दिल्यामुळे त्या बॅरेजेसचा कालावधी दिवसेंदिवस वाढत आहे आणि कालावधी वाढल्यामुळे त्यांच्या किंमतीही वाढत आहेत म्हणून या संदर्भात एक टाईम बाऊण्ड कार्यक्रम ठरविण्यात यावा. या पूर्णा बॅरेजेसचे काम अमुक इतक्या दिवसात पूर्ण होईल या संबंधात शासनाचे काय धोरण आहे.? दर वर्षी निधी कमी दिला जातो त्यामुळे या बॅरेजेसचे काम

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर. . .

पुढे-पुढे जात आहे त्यामुळे पुन्हा त्याची किंमत वाढत आहे. किंमत वाढल्यामुळे पुन्हा या बॅरेजेसचे काम तसेच रखडत आहे. पैसा कमी दिल्यामुळे ही सर्व कामे रखडलेली आहेत विदर्भाचा बॅकलॉग लक्षात घेता आणि माननीय राज्यपालांनी दिलेले निर्देश लक्षात घेता या बॅरेजेसचे काम पूर्ण करण्यासाठी आत तरी जास्तीत जास्त निधी देण्यात येणार आहे का? शासन यासाठी अमुक एवढे पैसे देणार आहे आणि सन 2015-2016 मध्ये हा प्रकल्प पूर्ण करण्यात येणार आहे अशा प्रकारचे आश्वासन देऊन चालणार नाही. विदर्भाचा बॅकलॉग लक्षात घेऊन आणि माननीय राज्यपालांचे निर्देश लक्षात घेऊन शासन टाईम बाऊण्ड कार्यक्रम आखून या बॅरेजेसचे काम पूर्ण करण्याच्या दृष्टीने विचार करणार आहे काय, या सबंधी शासनाचे धोरण काय आणि जास्तीत जास्त पैसा उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिकोनातून या अंदाजपत्रकात काही तरतूद करण्यात येणार आहे काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, विदर्भातील अनुशेष दूर करण्याच्या दृष्टिकोनातून गेल्या दहा ते अकरा वर्षामध्ये शासनाने निश्चितपणे जाणीवपूर्वक प्रयत्न केलेले आहेत. राज्यपाल महोदयांनी दिलेल्या निर्देशाच्या अधीन राहूनच या विभागाला निधी उपलब्ध होत असतो प्रादेशिक विभागामध्ये जी काही सिंचन विकास महामंडळे तयार केलेली आहेत. त्यापैकी विदर्भ सिचंन विकास महामंडळाला गेल्या सात ते आठ वर्षामध्ये निश्चितपणे सर्वाधिक निधी उपलब्ध झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी विशिष्ट कालावधीमध्ये काही प्रकल्प पूर्ण होण्याची आवश्यकता आहे असे सांगितले आहे.

सभापती महोदय, शासनाने गेल्या वर्षीपासून या बाबतीत नियोजन करण्याचा प्रयत्न केलेला आहे. आज जे प्रकल्प जवळपास 50 टक्क्यापेक्षा जास्त पूर्ण झालेले आहेत, 75 टक्के, 80 टक्के आणि 90 टक्क्याच्या आसपास पूर्णत्वास गेलेले आहेत असे प्रकल्प एका विशिष्ट आर्थिक वर्षात पूर्ण करुन सिंचनाचे लाभक्षेत्र किंवा पाण्याचा साठा कशा पध्दतीने तयार करता येईल यावर शासन निश्चितपणाने भर देत आहे. यासंदर्भात सन 2015 पर्यंतचे नियोजन करण्याचे ठरविलेले आहे. या सगळया कामांसाठी लागणाऱ्या निधीची आवश्यकता मोठया प्रमाणात आहे. विदर्भाच्या अनुशेषाच्या संदर्भात जे वेगवेगळे आठ जिल्हे आहेत या आठ जिल्ह्यांमध्ये असलेल्या कामांची अशा प्रकारची

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुनील तटकरे....

सद्य:स्थिती आहे. काही कामे प्रगतीपथावर आहेत. ही कामे निश्चित वेळेमध्ये पूर्ण करण्याच्या दृष्टिकोनातून योग्य ती तरतूद केली जाईल. ज्या प्रकल्पाच्या बाबतीत या ठिकाणी विचारण्यात आलेले आहे त्या प्रकल्पाला गेल्या वर्षी पेक्षा या वर्षी अधिक निधी नियोजित करण्याच्या दृष्टिकोनातून सहानुभूतीपूर्वक विचार निश्चितपणाने केला जाईल.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी सांगितले की, जेवढे अनुदान मिळालेले आहे त्याप्रमाणे ते वितरित करण्यात येईल. माझा प्रश्न घुंगशी आणि पूर्णा बॅरेजच्या संदर्भात आहे. मी घुंगशी गावचा रहिवाशी आहे. तेथे चालू असलेल्या कामाला मी स्वत: दर आठवडयाला भेट देतो. माझी माहिती अशी आहे सन 2011-2012 मध्ये जे अनुदान या बॅरेजेससाठी देण्यात आलेले आहे त्यापैकी साधारणत: 40 ते 45 टक्के निधी अद्याप वितरित करण्यात आलेला नाही. सदर निधी पुनर्विनियोजनात उपलब्ध करुन देण्यात येईल काय?

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, घुंगशी बॅरेजच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ. रणजित पाटील यांनी प्रश्न विचारलेला आहे. या बॅरेजसाठी या वर्षीचा नियतव्यय एकंदर 42 कोटी रुपये होता. वित्तविभागाकडून जेवढा निधी जलसंपदा विभागाला वितरित झालेला आहे तेवढया प्रमाणात हा निधी देण्यात आलेला आहे. या घुंगशी बॅरेजला 31 मार्च, 2012 पर्यंत 42 कोटी रुपयापर्यंत निधी उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले जातील.

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नाही

तिलारी कालवा विभाग चराठा सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) या प्रकल्पामध्ये झालेला गैरव्यवहार

(7) * 26493 श्री.राजन तेली , श्री.सुभाष चव्हाण , प्रा.सुरेश नवले , श्री.अमरनाथ राजूरकर : सन्माननीय **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) तिलारी कालवा विभाग चराठा सावंतवाडी (जि.सिंधुदुर्ग) तिलारी प्रकल्पाचे पाणी गोवा राज्याला तसेच दोडामार्ग तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा करण्यासाठी डाव्या उजव्या कालव्यांची कामे हाती घेण्यात आली मात्र यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करुन देखील अनेक ठिकाणी कालवे पाझरु लागले असल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, या संपूर्ण बांधकामात कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाला असून याची कसून चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्थानिक गावकऱ्यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(4) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप याबाबत कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सुनील तटकरे : (1) नाही.

(2) नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर असा प्रश्न आहे. 1980 ला या तिलारी प्रकल्पाला सुरुवात झाली आज त्या गोष्टीला जवळपास 25 वर्षे पूर्ण झालेली आहेत. या प्रकल्पाची सुरुवातीची किंमत 45 कोटी रुपये होती आता या प्रकल्पाची किंमत 1651 कोटी 95 लाख रुपये झालेली आहे. या प्रकल्पाच्या कामामध्ये अधिकाऱ्यांनी आणि कॉन्ट्रॅक्टरने प्रचंड भ्रष्टाचार केलेला आहे. आतापर्यंत ठराविक ठेकेदारच त्या ठिकाणी आहेत. श्री. कोन्नारेड्डी , श्री. शिवान्ना आणि मुसा के.पी. हेच त्या ठिकाणी सातत्याने ठेकदार आहेत. आंबेली या गावातील संरक्षण भिंत कोसळलेली आहे. त्याचप्रमाणे चराठा सावंतवाडी या अंतर्गत येणारा बांद्याचा कालवा कोसळलेला आहे. त्या कालव्याचे काम करतांना लिड लांबचे कसालचे, आंबोलीचे दाखवितात आणि तोच खर्च सातत्याने या प्रिमियर कन्स्ट्रक्शन कंपनीने केलेला आहे. या सर्व गोष्टींची चौकशी करण्यात येणार आहे का? यात जे दोषी अधिकारी आहेत तेच वर्षानुवर्षे या ठिकाणी भ्रष्टाचार करतात. वर्षानुवर्षे तेच ठेकेदार आहेत. तेव्हा या सर्व कामाची चौकशी करुन त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल का? तसेच तिलारीच्या बाबतीत मागच्या 25 वर्षात गोंधळ झालेला आहे

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26493.....

श्री. राजन तेली. . . .

त्याबाबतीत स्वतंत्र चौकशी करणार का? या प्रकल्पाच्या बांधकामाला सुरुवात होऊन 25 वर्षे पूर्ण झालेली आहेत आजही जवळ जवळ 892 कोटी रुपये या प्रकल्पाला लागणार आहेत. हा प्रकल्प प्रत्यक्षात केव्हा पूर्ण होणार आहे? 50 वर्षा नंतर तरी हा प्रकल्प पूर्ण होईल की नाही याबाबत माझ्या मनात शंका आहे. तेव्हा याबाबतचे समर्पक उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यासंदर्भात मार्च 1979 साली 45.20 कोटी रुपयाच्या कामाला मान्यता मिळालेली आहे. केंद्रीय जल आयोगाच्या सन 2008-2009 च्या दर सूचीनुसार नोव्हेंबर, 2009 मध्ये 1612 कोटी रुपयांच्या प्रकल्पाला मान्यता मिळाली. त्यानंतर महाराष्ट्र आणि गोवा यांच्यामध्ये आंतरराज्य करार करण्यात आला. तिलारी प्रकल्प हा महाराष्ट्र आणि गोवा या दोन राज्यांचा एक संयुक्त प्रकल्प आहे. या करारानुसार प्रकल्पाच्या खर्चाची रक्कम 76.30 टक्के ही गोवा राज्य देते आणि महाराष्ट्र शासनाचा या संबंध प्रकल्पाच्या खर्चामध्ये असलेला सहभाग हा 26.70 टक्के आहे. गोवा राज्याने जी कालव्याची कामे करावयाची आहेत ती कामे गोवा राज्य करणार आहे. जी कामे समाईकपणे करावयाची आहेत त्यासंबंधीची माहिती माझ्याकडे आहे. प्रकल्पाचे काम मोठया प्रमाणावर पूर्ण झालेले आहे. कालव्याच्या कामाची माहिती माझ्याकडे आहे. मुख्य धरण आणि सांडव्याचे काम सन 2009 मध्ये 100 टक्के पूर्ण झालेले आहे. 462.17 दश लक्ष घन मीटर म्हणजे 100 टक्के पाणीसाठा झालेला आहे. तेरवण, वेडे-उन्नई बंधारा बांधावयाचा होता आता त्याचेही काम 100 टक्के पूर्ण होऊन वीज निर्मितीच्या प्रकल्पासाठी सदरचा बंधारा महाराष्ट्र राज्य वीज महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आलेला आहे. गोवा राज्याकडे जाणारा जो कालवा आहे त्या कालव्याचे काम पूर्ण झालेले आहे. एआयबीपी अंतर्गत सदर प्रकल्पास 2005-2006 पासून अर्थसहाय्य प्राप्त झालेले आहे. या प्रकल्पासाठी 2005 ते 2012 पर्यंत जवळपास 89.33 लक्ष रुपये केंद्रीय सहाय्य उपलब्ध झालेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

अनुशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या प्रकल्पावर राज्याचा हिस्सा 215 कोटी रुपयांचा दिलेला आहे. या संदर्भामध्ये गोवा राज्याकडून काही रक्कम सुध्दा आपल्याला प्राप्त व्हावयाची आहे. ती रक्कम मिळण्याच्या दृष्टीने सुध्दा आपण गोवा सरकारकडे पत्रव्यवहार करीत आहोत. पुनर्वसनाचे सुध्दा काही काम हातामध्ये घेण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी काही विशिष्ट कामांच्या बाबतीत चौकशी करण्याची मागणी केली. त्या कामांची चौकशी निश्चितपणे करण्यात येईल आणि काही कामांच्या बाबतीत गैरव्यवहार झाले असतील, काही गैरप्रकार झाले असतील तर त्या अधिकाऱ्यांवर सुध्दा कठोर कारवाई करण्यात येईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या ठिकाणी अनेक वेळा मी या कालव्याबाबत प्रश्न उपस्थित केलेला आहे. गेल्या दोन अधिवेशनांपूर्वी बांदा येथील कालवा टेस्टिंग करताना वाहून गेला त्या बाबतचा प्रश्न मी या ठिकाणी उपस्थित केला होता. त्यावेळी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते की, याची चौकशी करुन नंतर कारवाई करण्यात येईल. परंतु त्यावर कोणतीही कारवाई झालेली नाही. या ठिकाणी उत्तर देताना गुणनियंत्रण चाचण्या करुन सर्व केले जाईल असे सांगितले जाते. या ठिकाणी वेगळ्या विभागामार्फत गुणनियंत्रण चाचणी केली जाईल का, या सर्व कालव्यांची चौकशी करुन ते कालवे योग्य रीतीचे आहेत का याची पाहणी केली जाईल का ? दुसरा प्रश्न असा की, या तिलारीची मालमत्ता लिलाव करीत असताना संशय निर्माण झाला म्हणून काही लोकांनी उपोषण केले होते आणि काही लोकांनी आंदोलने केली होती त्याची चौकशी माननीय मंत्री महोदय करणार आहेत का ? सभापती महोदय, माझ्या प्रश्नाकडे माननीय मंत्री महोदयांचे लक्ष नाही. माननीय मंत्री महोदय प्रश्न ऐकत नाहीत.

सभापती : माननीय मंत्री महोदयांचे आपल्याकडे लक्ष आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, मी माझा प्रश्न पुन्हा विचारतो. बांदा येथील कालवा टेस्टिंग करताना दोन वेळा फुटला. त्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात चौकशी करुन अशा प्रकारचे आश्वासन सातत्याने दिले होते. त्याचबरोबर गुणनियंत्रण चाचणी करुन कारवाई करु असे सांगितले होते. गुणनियंत्रण चाचणी करणारे यांच्याच विभागाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असल्यामुळे सगळे साटेलोटे असते. त्यामुळे त्या ठिकाणी वेगळ्या विभागामार्फत चाचणी करणार का ? दुसरा प्रश्न असा की, तिलारीच्या मालमत्तेचा लिलाव करताना जो संशय निर्माण झालेला आहे त्या बाबतीत त्या ठिकाणी ग्रामस्थांनी उपोषण केले, आंदोलने केली त्याची चौकशी शासन करणार का ? त्या ठिकाणी चुकीचा लिलाव केलेला आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, तिलारीच्या कोणत्या मालमत्तेच्या विक्रीच्या बाबतीत संशय निर्माण झाला याची माहिती सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी दिली तर त्याची निश्चितपणे चौकशी करण्यात येईल. बांदा कालवा किलोमीटर 10 मध्ये फुटला होता त्याची गुणनियंत्रण विभागामार्फत वेगळी चौकशी करण्यात आलेली आहे. त्या ठिकाणी भूस्खलन झाल्यामुळे तो कालवा त्या ठिकाणी फुटलेला होता. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली असतील, सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर असतील त्यांना या संदर्भामध्ये एकत्रितपणे बोलवून अधिकारीवर्ग आणि या सर्वांची एकत्रित बैठक घेऊन त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जाईल. याहीउपर काही कामांची चौकशी करावी असे जर चर्चेअती आढळून आले तर त्याही बाबतीत निश्चितपणे चौकशी केली जाईल.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, प्रश्न काल का समय समाप्त हो गया है. लेकिन मेरा कहना है कि प्रश्न 8 और 9 दोनों ही प्रश्न कुपोषण की वजह से होने वाली बाल मृत्यु से संबंधित महत्वपूर्ण प्रश्न हैं. ये प्रश्न आदिवासी क्षेत्र से संबंधित हैं. मेरा आपसे अनुरोध है कि इन प्रश्नों पर चर्चा के लिए आप प्रश्नोत्तर काल 10 मिनट के लिए और बढ़ा दें या आप अपने चेंबर में इस बारे में एक मीटिंग ले लें.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदय त्यांच्या दालनामध्ये याबाबत बैठक घेतील.

प्रा. वर्षा गायकवाड : सभापती महोदय, बैठक घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लेखी उत्तरे

मु.शी. : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सह सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अतारांकित प्रश्नोत्तरांची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी, सहावी, सातवी, आठवी, नववी व दहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेल्या याद्या छापाव्यात)

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2011-2012 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : महाराष्ट्राची आर्थिक पाहणी सन 2011-2012 सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

श्री. अजित पवार : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राजकोषीय उत्तरदायित्व व अर्थसंकल्पीय व्यवस्थापन (सुधारणा) नियम, 2012 प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक तेविआ 1010/प्र.क्र.74/2010/वित्त आयोग कक्ष, दिनांकित 19 मार्च, 2012 सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : अधिसूचना सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

...5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "ठाणे जिल्ह्यातील मौजे कोंडगाव, ता. विक्रमगड येथील शाळेला पंचतत्व सेवा संस्था बोईसर या संस्थेने शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या असतानाही शाळेला मान्यता दिली जात नसल्यामुळे सुमारे 400 आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकडे शासनाने केलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "मुंबई विद्यापीठाच्या दिनांक 21 मार्च, 2012 रोजी असलेली तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांची परीक्षा केंद्रे अचानक बदलल्यामुळे सुमारे 1800 विद्यार्थ्यांना परीक्षा देता न आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सावंतवाडी येथील गोवा-आंगोली-बेळगाव-कोल्हापूर या आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी जवळचा ठरणाऱ्या आंबोली घाटावर सातत्याने दरड कोसळल्याच्या घटना घडल्याने त्या भागाची सुरक्षा राखण्यास संबंधित विभागास आलेले अपयश" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "केंद्राकडून अनाथांच्या बालगृहांची छाननी केली असता त्यामध्ये बनावट पटसंख्या दाखवून महाराष्ट्र राज्यात 100 कोटीहून अधिक रक्कम लाटण्याचे दिनांक 18.9.2011 रोजी निदर्शनास आल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. या बाबतचा प्रश्न आज प्रश्नोत्तराच्या तासामध्ये चर्चेला आला होता त्यामुळे मी या सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील दगडखाण कामगारांनी दिनांक 21 मार्च, 2012 पासून आझाद मैदान, मुंबई येथे प्रलंबित मागण्यांसाठी केलेले बेमुदत उपोषण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "मुंबईतील विस्थापन, पुनर्वसन आणि स्थलांतर यामुळे उपनगरातील शाळांमध्ये वाढलेली विद्यार्थी संख्या आणि वाढलेल्या तुकड्या यांची समायोजनाची मागणी पूर्ण न झाल्यामुळे सुमारे 60 हजार विद्यार्थी आणि वाढीव तुकड्यांवर कार्यरत असलेले दीड हजार शिक्षक यांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान होत असल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभा फडणवीस यांनी "स्वस्त धान्य दुकानातील धान्य पुरवठ्यामध्ये वारंवार होणाऱ्या गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी केलेल्या दक्षता समित्यांचे गठन करुन अन्न व नागरीपुरवठा विभागाच्या तातडीने प्रत्येक महिन्याला समितीच्या बैठका बोलविण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेवरील निवेदनाबाबत कामकाज सल्लागार समितीमध्ये सुध्दा आपण चर्चा केली तसेच आधी सुध्दा चर्चा केली होती की, या ठिकाणी निदेश दिल्यानंतर 5 दिवसात निवेदन सभागृहामध्ये आले पाहिजे. पहिल्या आठवड्यात आम्ही नियम 93 अन्वये सूचना दिलेल्या होत्या. आज हा आठवडा संपत आहे तरी निवेदने आलेली नाही. माझी अशी विनंती आहे.

सभापती : सोमवारी निवेदने कशी येतील या दृष्टीने मी सूचना देईन.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : ज्या खात्यांची निवेदने आली नाहीत त्या खात्याच्या सचिवांना आणि माननीय मंत्री महोदयांना आपण बोलवून ताकीद दिली पाहिजे. नाही तर आपण नियम 93 च्या सूचना बंद करुन टाकाव्यात.

सभापती : आपण जे सांगत आहात त्याकडे गांभीर्याने पाहण्याच्या दृष्टीने विधिमंडळामार्फत संबंधित विभागांना आम्ही सूचना दिलेल्या आहेत आणि कामकाज सल्लागार समितीमध्ये सुध्दा आपण या बाबतीत चर्चा केलेली आहे.

यानंतर श्री. कांबळे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

ही निवेदने तातडीने कशी येतील, या दृष्टीने मी स्वत: संबंधित सचिवांना बोलावून सूचना देईन.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मुख्य सचिवांना देखील या संदर्भात सूचना द्याव्यात.

सभापती : ठीक आहे. आज गुरुवार असला तरी देखील उद्या सभागृहाचे कामकाज होणार नसल्यामुळे औचित्याचे मुद्दे आज घेण्यात येत आहेत.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, आठवड्यातील शेवटच्या दिवशी अशासकीय कामकाज घेण्यात येते. परंतु, आज ते देखील कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेले नाही.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, गेल्या 2 दिवसांपासून नवी मुंबईमध्ये रिक्षाचालकांचा संप सुरु आहे. महाराष्ट्रात सर्वदूर विशेषत: वाढते नागरिकरण असलेल्या शहरात म्हणजे मुंबई, ठाणे, रायगड या भागांत वेळोवेळी असे प्रकार घडत आहेत. रिक्षाचालकांचा संप सुरु होऊन 48 तास होऊन गेले आहेत. दहावी, बारावी इयत्तांची परीक्षा सुरु आहे. रिक्षाचालकांच्या संपामुळे अनेक लाकांना त्रास होत आहे. रिक्षा चालविणारे चालक प्रवाशांना त्रास देत आहेत, त्यांची अडवणूक करीत आहेत. काही ठिकाणी तर रिक्षाचालकांकडून प्रवाशांना मारहाण झालेली बघायला मिळाली आहे. रिक्षाचालकांच्या मुजोरीमुळे सामान्य प्रवाशी अत्यंत त्रासलेला आहे, संतप्त झालेला आहे. मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाचे याकडे लक्ष वेधत आहे. आपण हा संप तातडीने मिटण्याच्या संदर्भात उपाययोजना करण्याची गरज आहे. रिक्षा चालक "हम करे सो कायदा" अशा पध्दतीने वागत आहेत आणि सामान्य प्रवाशांना वेठीस धरत आहेत. शासनाने त्यामुळे तातडीने उपाययोजना करण्याची गरज आहे. मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करतो की, शासनाने या विषयामध्ये तातडीने लक्ष घालावे.

सभापती : मी माननीय संसदीय कार्य राज्यमंत्री यांना सांगू इच्छितो की, आपण संसदीय कार्य राज्यमंत्री या नात्याने या संदर्भातील टिप्पण घ्यावे. रिक्षाचालक करीत असलेल्या मुजोरीच्या दृष्टीने आपण या विषयामध्ये जरुर लक्ष घालावे.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, राज्य स्तरावर पोलीस अधिकाऱ्यांना 26 जानेवारीला वेगवेगळी पदके बहाल केली जातात. पदके बहाल करण्याबरोबर त्यांना वेतनश्रेणीमध्ये एखादी-दुसरी वेतनश्रेणी वाढ दिली गेली पाहिजे, अशी मागणी गेले बरेच दिवस पोलीस दलाकडून होत आहे. मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, पदके देऊन जसा सन्मान केला जातो, तसा एखादी वेतनश्रेणी वाढ देऊन सन्मान केला तर त्यांना अधिक प्रोत्साहन मिळेल.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी खालील सार्वजनिक महत्त्वाच्या व निकडीच्या बाबीवर औचित्याचा मुद्दा देत आहे.

"मुंबई लेप्रसी प्रोजेक्ट (बीएलपी) संस्थेने नुकत्याच केलेल्या पाहणीत कुष्ठरोगाची लागण होण्याचे प्रमाण झपाट्याने वाढत राहणे, तसेच, गत पाच वर्षांच्या तुलनेत यावर्षी हे प्रमाण वाढणे, सर्वेक्षणाच्या माहितीनुसार राज्यातील ग्रामीण भागात 13 टक्के तर शहरी भागात 16.60 टक्के प्रमाण वाढल्याचे उघडकीस येणे, याशिवाय ठाणे, कल्याण, डोंबिवली, मिरा-भाईंदर येथे महारोगाचे प्रमाण सातत्याने वाढत असल्याचे उघडकीस येणे, त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा झालेला गंभीर व चिंतेचा प्रश्न, याबाबत राज्यात कुष्ठरोग निर्मूलन योजना अधिक प्रभावीपणे राबविण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता."

सभापती महोदय, 19 जिल्ह्यांतील 173 तालुक्यांमध्ये कसून केलेल्या पाहणीमध्ये 2440 नव्या कुष्ठरोग्यांची नोंद झालली आहे. 30 जानेवारी ते 13 फेब्रुवारी या कालावधीत झालेल्या सर्वेक्षणात 18082 केसेस नोंदविलेल्या आहेत व त्यातील 14993 नमुन्यांची तपासणी केल्यानंतर 681 कुष्ठरोगी असल्याचे आढळून आले आहे. पूर्वी असलेल्या पध्दतीप्रमाणे, घरोघरी जाऊन कुष्ठरोग्यांचे प्रमाण आपण पाहत होतो. पुन्हा त्याच पध्दतीने या संदर्भातील कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे.

सभापती : माननीय संसदीय कार्य राज्यमंत्री, हा अत्यंत महत्वाचा औचित्याचा मुद्दा आहे. राज्यामध्ये कुष्ठरोग्यांचे प्रमाण वाढायला लागले आहे. आपण या संदर्भात आरोग्य विभागाशी संपर्क साधावा.

श्री. भास्कर जाधव : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मुंबई विद्यापीठाने ऑनलाईन ॲडमिशनप्रमाणे ऑनलाईन हॉल तिकिट देण्याचा निर्णय घेतला आहे. महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशनच्या माध्यमातून सदर काम करण्यात आले आहे. कालपासून टी.वाय.बी.कॉम.ची परीक्षा सुरु झाली आहे. विद्यार्थ्यांची प्रचंड प्रमाणात धावपळ होत आहे. सेंटर ऐनवेळी बदलल्यामुळे गोंधळ होतो. या विषयवर म.वि.स. नियम 93 ची सूचना, लक्षवेधी सूचना दिली असती तर ती येण्यास आठवडा लागला असता. म्हणून मी घाईने औचित्याचा मुद्दा मांडत आहे. शासनाने याबाबत काय झाले हे पहावे आणि विद्यापीठाशी चर्चा करुन काय करण्यात येऊ शकते, हे ठरवावे. ही परीक्षा अतिशय संवेदनशील असते. मालाडहून दहिसरला 20 मिनिटांत जाणे शक्य नाही. विद्यार्थी व पालकांनी त्यांचे अनुभव सांगितले आहेत. चुका कोणामुळे होतात, त्या संदर्भात काय कार्यवाही करायची आहे, हे शासनाने पहावे. विद्यार्थी चुकून जुन्या सेंटरवर बसले असतील तर त्याच्या नंतरच्या सेंटरला गृहीत धरण्या संदर्भात शासनाने नोंद घ्यावी.

श्री. भास्कर जाधव : होय.

सभापती : सन्माननीय सदस्य श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा औचित्याचा मुद्दा आहे, तो त्यांनी मांडावा.

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, मी माझा औचित्याचा मुद्दा सोमवारी मांडेन.

सभापती : ठीक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. मी आपल्या अनुमतीने हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

महोदय, सध्या सर्व शाळा शैक्षणिक वर्ष सन 2011-12 च्या अंतिम टप्प्यावर आहेत. दहावी बारावीच्या परीक्षा सुरू झालेल्या आहेत. बोर्डाच्या परीक्षा सुरू असताना, शिक्षक त्या कामात व्यस्त आहेत. आता बोर्डाच्या परीक्षा झाल्यामुळे बोर्डाचे पेपर तपासण्याचे काम शिक्षकांकडे आले आहे. मात्र, याच वेळी वेगवेगळ्या प्रशिक्षणासाठी शासनाकडून शिक्षकांच्या सेवा अधिग्रहित करण्यात येत आहेत. अनेक प्रकारची प्रशिक्षणे सुरू आहेत. आयसीटीचे प्रशिक्षण सुरू आहे, माझी समृध्द शाळा प्रशिक्षण सुरू आहे, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन भाग-3 चे प्रशिक्षण सुरू आहे, शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उपक्रमांचे प्रशिक्षण सुरू आहे, शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने प्रशिक्षण सुरू आहे, जनगणना सुरू आहे, मतदार याद्या तपासण्याचे काम सुरू आहे. परिणामी, शाळांचे कामकाज पूर्ण ठप्प पडले आहे. आता विद्यार्थ्यांच्या वार्षिक परीक्षा आल्या आहेत. विद्यार्थ्याचे नुकसान होऊ नये, असे आम्हाला वाटते. शिक्षकांना त्यांचे शालेय कामकाज करता यावे म्हणून किमान 15 एप्रिलपर्यंत तरी त्यांना प्रशिक्षणासाठी पाठवू नये. प्रशिक्षणासाठी पाठविण्यास आमचा काही नकार नाही. आम्ही सर्व प्रकारचे प्रशिक्षण घेण्यास तयार आहोत. परंतु, 15 एप्रिलपर्यंत दैनंदिन शालेय कामकाजाव्यतिरिक्त शिक्षकांना कोणत्याही प्रकारचे प्रशिक्षण देण्यात येऊ नये किंवा अन्य कामांसाठी त्यांच्या सेवा घेण्यात येऊ नयेत, अशा प्रकारचे निर्देश शालेय शिक्षण विभागाला तातडीने देण्याची आवश्यकता आहे. शासनाकडून तसे आदेश देण्यात यावेत, अशी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, 22 मार्च हा आजचा दिवस आंतरराष्ट्रीय जलदिन म्हणून साजरा केला जातो. या निमित्ताने पाणी व अन्न सुरक्षा असे या वर्षाचे घोषवाक्य आंतराष्ट्रीय पातळीवर जाहीर करण्यात आले आहे. कालचा दिवस आपल्या सगळ्याच्या आठवणीत असेलच. काल सर्व मुंबईभर धुळीचे एक आवरण पसरलेले होते. सस्पेंडेड पर्टिक्युलेट मॅटर म्हणजे एसपीएम लेव्हल ही धुळीच्या कणांची असते, ती मुंबईच्या परिसरात ॲव्हरेजली 200 असली पाहिजे, पण ती कालच्या तपासणीत 1200 पर्यंत गेली होती. हे कशामुळे झाले, याची शास्त्रीय मीमांसा काय आहे ? आपण त्यापुढे किती हतबल होतो, हे आपण पाहिले पाहिजे. ही धडा घेण्यासारखी गोष्ट आहे. पाणी व अन्न सुरक्षा हा आपल्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. कारण आपल्याकडे फुड सिक्युरिटी बाबत प्राधान्याने विचार करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांपासून असे म्हटले जात आहे की, पुढील काळात तिसरे महायुध्द झाले तर ते पाण्यासाठी होण्याची शक्यता आहे.

(नंतरी श्री.भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले.....

इतका हा प्रश्न गंभीर आहे. निसर्गाने दिलेल्या या देणगीचे संरक्षण करण्यासाठी आपण हतबल पडत असू तर त्या निमित्ताने माझी विनंती आहे की, पर्यावरण खाते, जलसंपदा खाते या सर्वांची एकत्रित अशी चर्चा या विषयावर घडवून आणावी. कारण हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. 5 मार्च रोजी आयसीआर मध्ये बैठक झाली. यंदा पाण्याच्या उपलब्धतेनुसार सगळ्यात विक्रमी उत्पादन केले म्हणून भारताच्या शेतकऱ्यांचे आणि विशेषत: कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचे आंतरराष्ट्रीय पातळीवर स्वागत करण्यात आले. ते केवळ पाण्यामुळे शक्य होते. तेव्हा या दिनाचे महत्त्व लक्षात घेऊन आपण या संदर्भात शासनाला सूचना करावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

सभापती : माननीय मंत्रिमहोदय श्री.भास्कर जाधव यांनी या बाबी कडे लक्ष द्यावे.

श्री.भास्कर जाधव : होय.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबई शहर व उपनगरामध्ये असंख्य क्लव व जिमखाने आहेत. वेलिंग्टन क्लब, रेडिओ क्लब, एम.आय.जी.क्लब, एम.सी.ए.क्लब असे अद्ययावत क्लब शासनाच्या भूखंडावर आहेत. शासनाने त्यांना भूखंड वितरित केलेले आहेत. त्याचे सभासदत्व मिळविण्यासाठी वेलिंग्टन क्लब सारख्या क्लबना सुमारे एक एक कोटीची रक्कम अदा करावी लागते. आयएएस अधिकारी व आयपीएस अधिकारी बदली करून आला की त्यांना मानसन्मानाने सभासदत्व बहाल केले जाते. विधान मंडळातील सन्माननीय सदस्यांना या क्लबचे सभासदत्व मिळावे म्हणून गेली चार वर्षे प्रत्येक अधिवेशनात मी हा मुद्दा प्रामुख्याने मांडीत आहे.

सभापती महोदय, यापूर्वी आपण या संबंधी तत्कालीन माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित असताना वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत व मंत्र्यांनाही वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत. परंतु, या संबंधी शासनाकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही झालेली नाही.

शासनाच्या जागेत उभ्या असलेल्या ह्या क्लबचे व जिमखान्याचे सभासदत्व विधान मंडळ सदस्यांना मिळावे ही माझी आग्रही विनंती आहे. यासंबंधी मी हे शेवटचे निवेदन करीत आहे. सभापती महोदय कृपया हा प्रश्न आपण सोडवू शकता म्हणून संबंधित मंत्री, क्लबचे प्रतिनिधी, विधान मंडळाचे निवडक प्रतिनिधी यांची एक विशेष बैठक आपल्या दालनात अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा अशी मी विनंती करीत आहे. धन्यवाद.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : श्री.भास्करराव जाधव आपण स्वत: नगरविकास विभागाचे माननीय मंत्री आहात. नगरविकास विभागच हे सर्व काम बघतो. महानगरपालिका देखभाल करीत असते. क्लबचे सदस्यत्व मिळावे अशी भावना दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांची आहे. आता आपण फक्त विधान परिषद सदस्यांच्या सदस्यत्वाबद्दल विचार करीत आहोत. मुंबईमध्ये अनेक क्लबज् आहेत. सरकारी अधिकाऱ्यांना तात्पुरत्या किंवा अन्य माध्यमातून सेवा सुविधा मिळण्याची तरतूद आहे. मात्र विधान परिषद सदस्यांसाठी अशी काही व्यवस्था नाही. त्यामुळे आपण त्यात स्वत: लक्ष घालावे. याबाबत आपण सन्माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी. आवश्यकता भासली तर तुम्ही आणि आम्ही माझ्या दालनात चर्चेसाठी बसू या.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण हा विषय सातत्याने सर्वांकरिता मांडत आहेत. हा प्रश्न ते व्यक्तिगत मांडत नाहीत. ह्या मध्ये नगरविकास विभागाचा भाग आहे तशाच पद्धतीने क्रीडा विभागाचा देखील संबंध येतो. कारण काही ग्राऊंडस ही क्रीडा विभागाच्या अखत्यारित आहेत. या संबंधातील एकत्रित माहिती आपण गोळा केलेली आहे. ती माहिती मी देतो. या विषय धसास लावण्यासाठी मी सुद्धा व्यक्तिगतरित्या प्रयत्न करीत आहे.

.....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी दोन औचित्याचे मुद्दे दिलेले आहेत. त्यापैकी त्यांनी एक औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, माझा दुसरा औचित्याचा मुद्दा मी उद्या मांडेन.

..4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

विधान मंडळातील सन्माननीय सदस्यांना पूर्वी ग्रामीण भागात औषध पुरवठा होत होता. आता औषधे सेंट जॉर्जेस रूग्णालयातून घ्यावी लागत आहेत. सेंट जॉर्जेस रूग्णालयात डॉक्टरांनी लिहून दिलेली काही औषधे उपलब्ध नसतात. त्यामुळे औषधे बाहेरून खरेदी करावी लागतात. बाहेरून औषधे खरेदी करण्याची मर्यादा एक हजार रूपयांपर्यंत ठेवलेली आहे. एक हजार रूपयांमध्ये आठ दिवसांची देखील औषधे खरेदी करता येत नाहीत. त्यामुळे औषधे खरेदी करण्यासाठी सदर मर्यादा शासनाने शिथिल केली पाहिजे. डॉक्टर जी औषधे लिहून देतात ती सेंट जॉर्जेस रूग्णालय येथून उपलब्ध करून दिली पाहिजेत. खाजगी मेडिकल दुकानामध्ये मिळणारी औषधे आमदारांना उपलब्ध करून देण्याकरिता मी औचित्याचा मुद्दा मांडत आहे. त्याकडे शासनाने लक्ष घालून विधान मंडळातील सर्व सन्माननीय सदस्यांना योग्य पद्धतीने, योग्य रितीने आणि एक महिन्याच्या कालावधीची औषधे उपलब्ध करून द्यावीत. ग्रामीण भागात राहणारे सदस्य मुंबईच्या सेंट जॉर्जेस रूग्णालयातून औषध घेत असतात. हा प्रश्न सर्वच आजी माजी सदस्यांना देखील भेडसावत आहे. त्याबाबत आपण जातीने लक्ष घालून संबंधित मंत्र्यांना आदेश द्यावेत अशी मी विनंती करीत आहे.

सभापती : माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, हा सन्माननीय सदस्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. या संबंधात मी माझ्या दालनात बैठक घेतो. माननीय आरोग्य मंत्री आणि आपण सर्वजण बसून हा प्रश्न कसा सुटेल हे बघू या.

श्री.भास्कर जाधव : होय.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अनिल भोसले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. पुणे शहरात मार्च 2012 च्या पहिल्या आठवड्यात स्वाईन फ्ल्यूच्या जीवघेण्या रोगाचा एक रूग्ण आढळणे, त्यानंतर पुणे महानगरपालिका तसेच राज्य शासनाच्या सार्वजनिक आरोग्य खात्याने या घटनेकडे केलेल्या दुर्लक्षामुळे शहरात स्वाईन फ्ल्यूची लागण 20ते 25 व्यक्तींना होणे, त्यामध्ये दिनांक 16 मार्च 2012 रोजी 2 रूग्ण विविध इस्पितळात दगावणे, त्यामध्ये एका लहान मुलीचा समावेश असणे, 2-3 वर्षापूर्वी राज्यात सर्वात प्रथम स्वाईन फ्ल्यूची सुरूवात पुणे शहरापासूनच होणे, ही साथ जीवघेणी असून साथीचा प्रसार अत्यंत वेगाने होत असल्याने पुणेकर नागरिकांच्या मनात निर्माण झालेली भय व भीती, शाळा कॉलेजमध्ये परीक्षा सुरू असल्याने ही साथ शाळा, कॉलेजद्वारे पसरण्याची जास्त शक्यता असल्याने ती आटोक्यात आणण्याकरिता शासनाने तातडीने कार्यवाही करावी.

सभापती : माननीय मंत्री श्री.भास्कर जाधव आपण याची नोंद घ्यावी.

श्री.भास्कर जाधव : होय.

.....

...6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यांनी औचित्याचा मुद्याच्या दोन सूचना दिल्या आहेत. त्यातील एका विषयासंबंधातील सूचना सन्माननीय सदस्य श्री.अनिल भोसले यांनी मांडली आहे. त्यामुळे दुसरी सूचना सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

काल सभागृहामध्ये उल्लेख करण्यात आला होता. कुठलेही वर्तमानपत्र उघडले की, आपल्याला जाहिरात दिसते. एवढेच नव्हे तर वाहिन्यांवर कुठल्याही वेळेत, म्हणजे सकाळ, दुपार, संध्याकाळी काही आजारासंबंधातील 30 मिनिटांच्या जाहिराती सातत्याने दाखविल्या जातात. त्यामध्ये मिस्टर ली असे चायनिज पात्र दाखविले जाते. त्याच्या डोक्यावर केस नसताना 20 दिवसांमध्ये केस येतात अशा प्रकारची जाहिरात असते. या मिस्टर ली चे डोके वारंवार दाखवत असतात. सर्व वाहिन्यांवर ही जाहिरात दाखविली जाते. एशियन टेलिशॉप या नावाने संपूर्ण भारतभर एक टेलिफोन नंबर देखील दाखवला जातो. अशा प्रकारच्या जाहिराती अस्थिरोग, मधुमेह, अस्थमा अशा दुर्धर आजारांसाठी देखील सातत्याने दाखविल्या जात असतात.

मला औचित्याच्या मुद्यांद्वारे दोन कायद्यांकडे लक्ष वेधावयाचे आहे. मॅजिकल रेमेडिज ॲक्ट आहे. कॉस्मेटिकमुळे शरिरावर परिणाम होतो. त्यासंबंधातील कायदा अस्तित्त्वात आहे. या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी विधी व न्याय विभागाकडे आहे. तसेच अन्न व औषध प्रशासन विभागाची देखील जबाबदारी आहे. पण हे विभाग स्वत:हून या जाहिरातीची दखल का घेत नाही. ह्या जाहिराती बघून सामान्य माणसाची दिशाभूल होण्याची शक्यता आहे. अस्थमा, मधुमेह या आजारांवर वर्तमानपत्रामध्ये दोन दोन पाने जाहिराती येतात. त्यात मधुमेह पूर्ण बरा होतो असे म्हटलेले असते. त्यामुळे लोक चुकीचे औषध घेऊन त्यांच्या शरीरावर दुष्परिणाम होऊ शकतात. त्यामुळे अन्न व औषध प्रशासन विभाग त्यांचे स्वत:चे कायदे असून देखील काहीच का बघत नाही. त्यामुळे माझी औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी आहे की, ह्या जाहिराती ताबडतोब थांबविल्या पाहिजेत. तसेच हे उत्पादन करणारे मालक आहेत त्यांनी कोणावर प्रयोग करून पाहिले व काय पाहणी आहे, हे सांगितले पाहिजे. प्रत्यक्षात त्यांच्या उत्पादनाचा काहीच उपयोग होत नाही,अशी वस्तुस्थिती आहे. म्हणून त्यांच्यावर कारवाई करून या सगळ्या गोष्टींवर बंदी आणली

...7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे .....

पाहिजे. अधिवेशन सुरू असताना या गोष्टीची आपण गांभीर्याने दखल घेतली नाही तर प्रत्यक्षात सरकार अस्तित्त्वात आहे याची जाणीव कशी होणार हा प्रश्न पडतो. म्हणून मी औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधित आहे.

सभापती : माननीय मंत्री श्री.भास्करराव जाधव सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी मांडलेला मुद्दा तपासून घेऊन संबंधित विभागाला सूचना देण्याची व्यवस्था करावी.

श्री.भास्कर जाधव : होय.

.....

यानंतर श्री.भोगले.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत :सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, सध्या महाराष्ट्र शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभागातर्फे एक जाहिरात दूरदर्शनवर दाखविली जात आहे. घराघरामध्ये शौचालय असावे असा जाहिरातीचा आशय असला तरी याचे चित्रीकरण अतिशय घाणेरड्या पध्दतीने केलेले आहे. या जाहिरातीतील काही वाक्ये अतिशय आक्षेपार्ह आहेत असे माझे मत आहे. अशा जाहिराती सर्वसाधारणपणे महाराष्ट्रामध्ये दाखविल्या जातात. परंतु ही जाहिरात संपूर्ण देशामध्ये आणि विदेशामध्ये सुध्दा दाखविली जाते. त्यामुळे महाराष्ट्राची प्रतिमा आणि महाराष्ट्रीय लोकांची मानसिकता यातून कळून येते. जाहिरात कोणत्या प्रकारे दाखवावी हा आक्षेपार्ह मुद्दा आहे. माणूस शौचालयामध्ये कसा जातो, कोणत्या पध्दतीने शौचाला बसतो याचे चित्रीकरण दाखविले जात आहे. या जाहिरातीमुळे महाराष्ट्राची प्रतिमा मलीन होत आहे. शौचालयाबाबत लोकजागृती होणे आवश्यक आहे. परंतु ही लोकजागृती कोणत्या माध्यमातून व्हावी, त्याचे चित्रीकरण कसे असावे आणि ते लोकांसमोर कसे प्रदर्शित करावे या संदर्भात काही नियम आहेत. या जाहिरातीच्या माध्यमातून महिलांबाबत, लोकांबाबत जे आक्षेपार्ह दृश्य दाखविले जात आहे ते कट करुन या जाहिरातीच्या प्रसिध्दीवर बंदी घालावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करीत आहे.

सभापती : माननीय राज्यमंत्री श्री.भास्कर जाधव यांनी या मुद्याची नोंद घ्यावी.

श्री.भास्कर जाधव : होय.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, परळीमध्ये थर्मल पॉवर स्टेशन संच क्रमांक-3 मधून मागील आठवड्यात अचानक राखेचा आणि धुराचा लोट उठण्यास सुरुवात झाली. संपूर्ण परळी शहर आणि आजूबाजूच्या ग्रामीण भाग धुक्याखाली गेला आणि अजूनही प्रभावाखाली आहे. दुसरी एक अडचण निर्माण झाली आहे ती म्हणजे संच क्रमांक 1 ते 5 च्या कार्यान्वयासाठी जे पाणी लागते ते पैठण धरणातून उपलब्ध करुन दिले जाते. त्या ठिकाणी जायकवाडी कार्यालय आहे, त्या कार्यालयाने 81 कोटीची थकबाकी आहे म्हणून आम्ही पाणीपुरवठा बंद करु अशा प्रकारची नोटीस दिली आहे. हा पाणी पुरवठा बंद झाला तर 5 संच परळी शहरातील बंद होतील आणि महाराष्ट्राच्या भारनियमनामध्ये मोठया प्रमाणात वाढ होईल. हा फार मोठा धोका निर्माण झाला आहे. या संदर्भात शासनाने ताबडतोब बैठक घेऊन थर्मल पॉवर स्टेशनचे पाणी तोडले जाणार नाही हे पहावे आणि संच क्रमांक-3 मधून धुराचा जो लोट उठला त्यामागे दोष कोणाचा आहे याची चौकशी करुन ठोस कारवाई करावी अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे विनंती करते.

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, कोल्हापूर येथील श्री शंकराचार्य करवीर पीठ या संस्थानाच्या हजारो एकर जमिनी नियमबाह्यरित्या हस्तांतरित केल्याप्रकरणी परभणी येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे सन 2010 मध्ये वा त्या सुमारास लेखी तक्रार करणे, नियमांचे उल्लंघन करुन जमिनी हस्तांतर केल्याप्रकरणी जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांनी सन 2009-2010 दरम्यान चौकशीचे आदेश देणे, राधानगरी, गडहिंग्लज व करवीर या तालुक्यात जमिनींचे बेकायदेशीर हस्तांतर झाल्याची बाब चौकशीत आढळून येणे, परंतु अद्याप तद्नुसार संस्थानास जमिनी परत देण्याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात न येणे, त्यानंतर विधानसभेत लक्षवेधी व तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून मुद्दा उपस्थित केला असता माननीय महसूल मंत्री यांनी निवेदन करुन खरेदी विक्री झालेल्या व्यवहाराबाबत तीन महिन्यात निर्णय घेण्याचे आदेश देऊ असे आश्वासन देऊनही अद्याप न झालेली कार्यवाही, सदर विषय सार्वजनिक हिताचा आहे. दुर्दैव असे की, विधानपरिषद व विधानसभेमध्ये वारंवार कायदेशीर कारवाई करतो असे सांगूनही अधिकारी कोणतीही कारवाई करीत नसतील तर या सभागृहाचा अवमान होतो. त्यामुळे या संदर्भात ताबडतोब कारवाई करुन त्यांच्या जमिनी त्यांना हस्तांतरित कराव्यात अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे मागणी करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : तोतलाडोह जलाशयामध्ये मासेमारी करणाऱ्या आदिवासी बांधवांवर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेला गोळीबार

मु. शी. : तोतलाडोह जलाशयामध्ये मासेमारी करणाऱ्या आदिवासी बांधवांवर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेला गोळीबार यासंबंधी सर्वश्री जयवंतराव जाधव, सतीश चव्हाण, अनिल भोसले, अरुण गुजराथी, ॲड.उषा दराडे, सर्वश्री विक्रम काळे, हेमंत टकले, रमेश शेंडगे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर जिल्हयातील रामटेक तालुक्यातील तोतलाडोह प्रकल्पाच्या तलावात मासेमारी करणाऱ्या आदिवासींवर वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिनांक 9 जानेवारी, 2012 रोजी वा त्यासुमारास केलेला गोळीबार, या गोळीबारात 18 आदिवासी जखमी होणे, त्यातील 4 आदिवासींची प्रकृती चिंताजनक असणे, गोळीबार करण्यापूर्वी वन विभागाच्या गस्ती पथकाकडून कोणताही इशारा देण्यात आला नसणे, या भागातील आदिवासी लोकांची उपजीविका मासेमारीवरच अवलंबून असणे, परंतु वन विभागाच्या गस्ती पथकाने कोणताच इशारा न देता गोळीबार केल्यामुळे संतप्त आदिवासींनी पोलीस ठाण्याला घातलेला घेराव, या सर्व प्रकरणाची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.भास्कर जाधव (वन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने निवेदनामध्ये दुरुस्ती करु इच्छितो. निवेदनातील पृष्ठ क्रमांक-2 वर चौथ्या ओळीतील "मासेमारी करणारे गुन्हेगार मागे सरकले व" या शब्दांनंतर "त्यानंतरही" या शब्दाचा समावेश करण्यात यावा.

लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी दुरुस्तीसह निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-1

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी निवेदनामध्ये दिलेली माहिती आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यामध्ये खूप तफावत आहे. तोतलाडोह जलाशयामध्ये सर्वसामान्य आदिवासी बांधवांनी अधिकाऱ्यांना घेरले आणि त्यांना नियोजनबध्द पध्दतीने ठार मारण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांच्यावर गोळीबार करण्याचा प्रयत्न झाला हे खरे नाही. मुळात गोळीबार करताना सक्षम अधिकाऱ्याकडून परवानगी घेणे आवश्यक असताना सुध्दा परवानगी न घेता आदिवासी बांधवांवर गोळीबार करण्यात आला आहे. वन हक्क कायद्यानुसार आदिवासी बांधवांना बांबू, मध, वनौषधी वगैरे गोळा करुन त्यांची वाहतूक करण्यास परवानगी दिलेली आहे. आदिवासी बांधवांचा मासेमारी करणे हा पारंपारिक व्यवसाय असताना संबंधित अधिकारी बाहेरुन आलेल्या व्यावसायिकांशी संबंध प्रस्थापित करुन त्यांना मासेमारी करु देतात हे उघडपणे निदर्शनास आले असताना आदिवासी बांधवांना पारंपारिक व्यवसायापासून वंचित ठेवून त्यांच्यावर गोळीबार करण्याचा प्रयत्न केला आहे. वन हक्क कायद्यानुसार संबंधित आदिवासी बांधवांना वन क्षेत्रातील वनउपज गोळा करुन बाहेर नेण्यास परवानगी असताना मासेमारी करण्यास बंदी का घालण्यात आली? वन हक्क कायद्यामध्ये यासाठी दुरुस्ती केली जाईल काय? मासेमारी करताना जे आदिवासी होते ते जंगलाकडे पसार होताना दिसले, परंतु त्या ठिकाणी कोणीही जखमी आढळून आलेले नाहीत असा पोलिसांचा अहवाल असून 17 लोक जखमी झाल्याचे निवेदनात म्हटले आहे. आदिवासी बांधव तेथे जखमी झाले हे खरे आहे काय? पोलिसांचा अहवाल योग्य आहे की वन विभागाच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे योग्य आहे?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सुरुवातीला सांगितले पाहिजे की, अशा प्रकारचा कोणताही गोळीबार झालेला नाही. प्रत्यक्षपणे बुलेटचा वापर करण्यात आलेला नाही. मासेमारी करणाऱ्यांना आदिवासी म्हणता येणार नाही, परंतु जे मासेमारी करीत होते त्यांना तेथून पळवून लावण्याकरिता स्वसंरक्षणार्थ छर्रे झाडण्यात आले. तोतलाडोह हा जलाशय राष्ट्रीय उद्यान अंतर्गत असल्यामुळे केंद्र सरकारच्या राष्ट्रीय उद्यान कायदा, 1980 च्या कलम 35(8) नुसार अशा प्रकारच्या डोहामध्ये मासेमारी करण्याचा कोणालाही अधिकार नाही. जंगलातून बांबू वगैरे नेण्यासाठी परवानगी आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले.राष्ट्रीय उद्यानामध्ये अशी परवानगी असण्याचे कारण नाही. अन्य ठिकाणी उद्यान आहे तेथे परवानगी असेल. हा प्रश्न तोतलाडोह

..6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

जलाशयाशी मर्यादित आहे. हे आदिवासी बांधव आहेत असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. तोतलाडोह जलाशय 77 चौ.कि.मी.चा असून त्यापैकी 56 चौ.कि.मी.क्षेत्र मध्यप्रदेशच्या हद्दीत असून 21 चौ.कि.मी.क्षेत्र महाराष्ट्राच्या हद्दीमध्ये आहे. जे 17 आदिवासी बांधव पोलीस स्टेशनमध्ये आले त्यांची नावे माझ्याकडे उपलब्ध आहेत. त्यापैकी सगळे आदिवासी आहेत असे म्हणता येणार नाही. 9 लोक आदिवासी असून 8 लोक बिगर आदिवासी आहेत. आवश्यकता असल्यास मी त्यांची नावे वाचून दाखविण्यास तयार आहे.

नंतर श्री.खर्चे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, ज्यांना स्वत:चे वन राखता येत नाही, जंगलातील वाघ मरतात त्यांच्याकडे लक्ष नाही, एक दिवस दोन शिकारी पकडले गेले त्यांच्यावर कारवाई करीत नाही ते मात्र मासेमारी करणाऱ्यांवर कारवाई करायला निघाले आहेत. अशा प्रकारे मासेमारी करणाऱ्या 17 लोकांवर गोळीबार झाल्याचा अहवाल असताना सभागृहात मात्र कोणत्याही प्रकारे फायरिंग झालेले नाही असे सांगितले जाते. म्हणून या प्रकरणाची फेर चौकशी शासन करणार काय, त्याचबरोबर मासेमारीचा धंदा आदिवासी लोक करतात आणि परंपरेने कोळी समाजाचे लोक सुध्दा करीत आले आहेत. हे लोक वर्षानुवर्षे तोतलाडोह मध्ये मासेमारीचा धंदा करीत आले आहेत. त्यांनी मासेमारी केल्यानंतर तलावाच्या काठावर आणून विकून त्यातून 10 टक्के मोबदला वन खात्याला दिला जात होता. असे असताना या लोकांच्या पोटावर मारुन शासनाचे अधिकारी स्वत:चे पाप झाकण्याचा प्रयत्न करीत आहेत. संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात एवढ्या मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले ते या शासनाला काढता येत नाही, गरिबांवर मात्र गुन्हे नोंदविले जातात. माझी अशी मागणी आहे की, या मच्छिमारांना या ठिकाणी मासेमारीची परवानगी द्यावी, ती शासन देणार काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, तोतलाडोह हे राष्ट्रीय उद्यान म्हणून सन 1975 मध्ये जाहीर झालेले आहे. त्या वर्षापासून असे कधीही झालेले नाही. तसेच मासेमारी करुन 10 टक्के मोबदला वन खात्याला दिला जात होता हेही खरे नाही. हा जरी भावनिक प्रश्न असला तरी सन्माननीय सदस्यांच्या मागणीनुसार अशा प्रकारची परवानगी देण्याचा विचार करता येणार नाही.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, जो घटना 7 जनवरी को घटी, वह बहुत ही गंभीर है. माननीय मंत्रीजी ने बताया कि वहां पर 18-19 लोगों को गोली नहीं लगी, बल्कि छर्रे लगे.

सभापति महोदय, आपकी अनुमति से मैं यह बात सदन को बताना चाहता हूं कि 7 तारीख को देवलापार में फायरिंग हुई. वह फायरिंग गोली की हुई या छर्रे की हुई, यह बात अलग है. लेकिन वहां पर फायरिंग जरुर हुई. मैं यह भी बताना चाहूंगा कि यह फायरिंग जिला अधिकारी या मजिस्ट्रेट की बिना अनुमति के हुई. वहां पर 8 तारीख तक किसी भी पुलिस अधिकारी ने उस फायरिंग की दखल नहीं ली. वे सब मच्छीमार 8 तारीख को इंदिरा गांधी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा...

मेडिकल कॉलेज में आए. हमारे एक साथी, जो कि डॉक्टर हैं, उन्होंने मुझे खबर दी और मैं वहां पर मेयो हॉस्पीटल में गया. वहां पर उनका सही ढंग से इलाज नहीं हो रहा था. वहां पर उनके लिए 30 घंटे तक खाने की भी कोई व्यवस्था सरकार की ओर से नहीं की गयी थी. यह बात सही है कि उन लोगों में से काफी लोग आदिवासी समाज के थे परन्तु ज्यादातर लोग मच्छीमार समाज के थे. वहां पर 14 तारीख को मच्छीमार और आदिवासी लोगों ने एक मोर्चा निकाला. उस मोर्चे का नेतृत्व मैंने किया था. उसके बाद मैंने जिला अधिकारी से एक मीटिंग की. उसके बाद उन्होंने एक महीने के अंदर उस घटना की जांच पूरी करने के लिनए एसडीओ अपाइंट किया. ऐसा कहा गया कि उसकी रिपोर्ट तीस दिन के अंदर आ जाएगी. लेकिन जनवरी से अब तक लगभग ढाई-तीन महीने का समय बीत जाने के बाद भी अभी तक उस जांच की रिपोर्ट नहीं आयी है.

उप सभापति : जमा जी आप जल्दी से एक सवाल पूछिए.

श्री एस. क्यू. जमा : मेरा कहना है कि जिला अधिकारी ने कहा कि किस-किस व्यक्ति को चोट लगी है तथा कितना नुकसान हुआ है, उसके अनुसार उनको सरकार की ओर से मुआवजा दिया जाएगा. मुझे पूछना है कि उस बारे में शासन ने क्या निर्णय लिया है ?

दूसरी बात मुझे कहनी है कि माननीय मंत्री महोदय ने कहा कि फॉरेस्ट राइट एक्ट के अंतर्गत वहां पर प्रतिबंध लगाया गया है. मेरा कहना है कि मच्छीमारों को मच्छी मारने का जो अधिकार है, उस अधिकार का हनन हो रहा है, उनके उस अधिकार को सरकार रि-स्टोर करेगी या नहीं ? एक बात मुझे यह भी पूछनी है कि मजिस्ट्रेट द्वारा की जाने वाली जांच की रिपोर्ट अभी आयी या नहीं आयी. यदि वह रिपोर्ट अभी तकि नहीं आयी तो वह रिपोर्ट कितने दिन में आएगी ?

श्री. भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी एकूण तीन प्रश्न विचारलेले आहेत. त्या अनुषंगाने मला अशी माहिती द्यावयाची आहे की, 7 तारखेला वन विभागाचे अधिकारी या भागात नेहमीप्रमाणे गस्त घालण्यासाठी गेले असता सुरुवातीला त्यांना तीन मासेमारी करणाऱ्या होड्या दिसल्या. त्यानंतर पुन्हा 6 होड्या दिसल्या. या अधिकाऱ्यांनी त्यांना थांबण्यास सांगितले असता त्यांनी दगडफेक करायला सुरुवात केली. त्यानंतर आजूबाजूच्या परिसरात लपून बसलेल्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जाधव...

लोकांनी सुध्दा दगडफेकीला सुरुवात केली. अधिकाऱ्यांनी वारंवार विनंती करुन देखील ते थांबले नाहीत तर उलट 8 होड्या एकत्र येऊन गस्तीच्या एका होडीला घेरले. त्यामुळे पहिल्यांदा दोन-दोन छर्रे असलेले फायरिंग केले, नंतर चार-चार छर्र्यांचे फायरिंग केले. तरी देखील ते थांबत नाही म्हणून 19 छर्र्यापर्यंत फायरिंग करुन अशा 43 फेऱ्या फायरिंग करण्यात आले. त्यानंतर काळोखाचा फायदा घेऊन हे सर्व लोक पळून गेले. शासनाच्या सन 2005-06 च्या निर्णयानुसार अशा प्रकारे वन विभागात कोणत्याही प्रकारची घटना घडली तर जिल्हा मॅजिस्ट्रेटची चौकशी नेमली जाते. त्यानुसार 15 मार्च रोजी अशी चौकशी एस.डी.ओ. च्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आली व त्या चौकशीचा अहवाल 4 महिन्यात येईल तेव्हा यासंबंधीची वस्तुस्थिती स्पष्ट होईल.

श्री. हेमंत टकले : महोदय, या लक्षवेधी सूचनेमुळे निर्माण झालेला हा प्रश्न असून मंत्री महोदयांनी दिलेले उत्तर हे सगळे आपल्यासमोर आले आहे. हे ऐकून आपण एखादी कादंबरी वाचतो की काय आणि त्यातला कुठला तरी प्रसंग उभा करुन सांगतो की काय असे चित्र सभागृहात निर्माण झालेले दिसून आले. एखादा माणूस मासेमारीला गेला असेल त्याला छर्र्यांचा धाक दाखवून पळवून लावण्याचा प्रयत्न अधिकारी करीत असतील आणि ते दाद देत नाहीत म्हणून कारवाई झाली व त्यात जे जखमी होतात अशी घटना जेव्हा घडते तेव्हा आपल्या विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तेथे जाऊन जखमींची विचारपूस तरी केली आहे काय, ज्यांची रोजीरोटी त्या धंद्यावर चालत असून त्यातून मिळणारे उत्पन्न अत्यंत कमी असते. म्हणून सरकार या लोकांना अन्य कोणताही व्यवसाय देण्याचा प्रयत्न करणार आहे काय, उत्तरात म्हटल्याप्रमाणे ही मासेमारी करण्यासाठी सन्माननीय सदस्यांनी आताच सांगितल्याप्रमाणे काही लोकांना परवानगी दिलेली आहे. स्थानिक लोकांना मात्र अशी परवानगी दिलेली नाही असा प्रकार आपल्या विभागामार्फत झालेला आहे काय, असल्यास त्यावर निर्बंध घातला जाणार आहे काय, तसेच या लोकांना पर्यायी रोजगार पुरविण्याचा विचार शासन करणार आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, पर्यायी रोजगाराच्या बाबतीत शासनाच्या विविध योजना आहेत. तसेच भावनिक आणि माणुसकीच्या दृष्टीने विचार करुन अशा प्रकारे कोणतीही परवानगी मासेमारी करण्यासाठी देता येणार नाही. तसेच स्थानिक मासेमारी करणाऱ्यांना अटकाव करुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जाधव.....

इतर लोकांशी हात मिळवणी करुन व्यावसायिकांना परवानगी दिली असेल तर त्यासंबंधीची चौकशी केली जाईल व त्यात तथ्य आढळून आले तर कठोर कारवाई केली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेसंबंधी</u>

श्री. दिवाकर रावते : महोदय, आपल्या राज्यात आज फार मोठी घटना घडलेली आहे. अर्थ खात्याचे मंत्री माननीय श्री. अजित पवार यांच्या विभागाचे अधिकारी श्री. प्रदीप व्यास आणि माजी प्रधान सचिव श्री. जयराज फाटक या दोन सनदी अधिकाऱ्यांना आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेतील गैरप्रकाराच्या पार्श्वभूमीवर शासनाने निलंबित केलेले आहे. वास्तविक एवढी महत्वाची घटना घडते तेव्हा त्यासंबंधीची घोषणा प्रथम सभागृहात होणे अपेक्षित असते. याबाबतीतील माहिती सभागृहात देण्यात यावी अशा प्रकारचे निदेश आपण शासनाला द्यावेत अशी माझी मागणी आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जो मुद्दा उपस्थित केला तो अशा अर्थाने महत्वाचा वाटतो की, काल याच सभागृहात माननीय मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली की, अशा प्रकारची प्रशासकीय कारवाई करण्यासाठी केंद्र शासनाची परवानगी आवश्यक असते त्यामुळे हे अवघड आहे. पण आताच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी माहिती दिल्यानुसार अचानक या लोकांना निलंबित केले आहे. मग एवढ्यात काय घडले की त्यांना ताबडतोबीने निलंबित करावे लागले. एरवी देखील श्री. प्रदीप व्यास यांना अटक झालेली होती आणि 48 तास जेलमध्ये राहिल्यानंतर आपोआपच सरकारी कर्मचारी निलंबित होतो, शासनाला तसेच करावे लागते.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अप्रमाणित प्रत / अप्रमाणित नाही

श्री. विनोद तावडे ....

त्यामुळे श्री.व्यास यांना सस्पेंड केले यामध्ये कौतुकाची काहीच बाब नाही, त्यांना तुम्हाला सस्पेंड करावेच लागले असते. आपल्या ॲडव्होकेट जनरल यांनी हायकोर्टात सांगितले आहे की, आम्ही श्री. व्यास आणि श्री. फाटक या दोघांनाही निलंबित करीत आहोत. ॲडव्होकेट जनरल यांना रात्रीतून नवीनच काही कळले होते की, माननीय मुख्यमंत्र्यांना यासंदर्भात काहीच माहिती नव्हती. आदर्श घोटाळयात अडकलेले 14 पैकी केवळ 2 अधिकारी कामावर आहेत या विषयाच्या संदर्भातील आम्ही सर्वांनी मागणी लावून धरली होती. मागे सुध्दा सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी या विषयाच्या संदर्भात सभागृहात मुद्दा उपस्थित केला होता परंतु यासंदर्भात कारवाई करण्यासाठी केंद्राची मान्यता लागते असे सांगून संबंधितांना निलंबित करण्यामध्ये शासनाने एक वर्ष काढले. काल सुध्दा हा विषय उपस्थित झाला होता त्यावेळेस माननीय मुख्यमंत्री म्हणाले होते की, असे आपल्याला करता येणार नाही, त्यासाठी केंद्राची परवानगी लागेल वगैरे वगैरे. मग रात्रीतून आयएएसचा सर्व्हीस ॲक्ट कसा काय बदलला, या अधिका-यांनी नवीन गुन्हा केला होता त्यामुळे या दोघांना रात्रीतून निलंबित करण्यात आले ? या अधिका-यांना अगोदर का निलंबित केले गेले नाही याची माहिती सभागृहाला मिळण्याची आवश्यकता आहे.

उप सभापती : हे प्रकरण न्याय प्रविष्ट असल्यामुळे ....मी तुमचे सर्व म्हणणे ऐकून घेतलेले आहे त्यामुळे मी काय म्हणतो ते आपण प्रथम ऐकून घ्या. तुम्ही सांगता ते मी ऐकून घ्यावयाचे व मी काय सांगतो ते तुम्ही ऐकून घ्यावयाचे नाही अशा प्रकारे सभागृहाचे कामकाज चालत नाही. तुम्हाला माझे सुध्दा ऐकावे लागेल.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित होईपर्यंत सभागृहाचे कामकाज स्थगित केले तर योग्य होईल.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

उप सभापती : सभागृहात माननीय मुख्यमंत्री किंवा माननीय उप मुख्यमंत्री आल्यानंतर यासंदर्भात आपण विचारणा केली तर ते निवेदन करतील. आता लक्षवेधी सूचनेवरील चर्चेला

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती ....

सुरुवात करतो व त्या दरम्यानच्या काळात माननीय मुख्यमंत्री महोदयांना बोलावण्याचा प्रयत्न केला जाईल. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात उपस्थित राहण्याच्या संदर्भात निरोप पाठवितो परंतु सभागृहाचे कामकाज थांबवा असे म्हणणे बरोबर नाही.

(विरोधी पक्षाचे सन्माननीय सदस्य उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

काही तरी मुद्दे काढून आपण मला सभागृहाचे कामकाज थांबवावयास सांगत आहात. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित होईपर्यंत काही वेळ लागेल की नाही ? त्यामुळे आपण सभागृहाचे कामकाज कसे काय थांबवू शकतो ?

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, आपण सांगितले आहे की, ही बाब न्याय प्रविष्ठ आहे. ही जशी न्याय प्रविष्ट बाब आहे तशीच ती प्रशासनीक बाब सुध्दा आहे. प्रशासनातील दोन अधिका-यांना अधिवेशन सुरु असतांना निलंबित केले जाते व त्याची माहिती सभागृहाला मिळत नाही त्यामुळे हा विषय अत्यंत गंभीर आहे. प्रशासनातील दोन महत्वाच्या पदावर असलेल्या अधिका-यांवर अधिवेशन सुरु असतांना निलंबनाची पाळी येते याचे कारण काय आहे हे जाणून घेणे आमचा हक्क आहे. परवा सभागृहात बजेट सादर केले जाणार असून त्यातील अर्थ खात्याचे सचिव जर निलंबित झाले असतील तर त्याची माहिती या सभागृहाला मिळालीच पाहिजे. हा न्यायालयीन विषय नसून हा प्रशासनीक विषय असल्यामुळे यासंदर्भात शासनाने निवेदन करावे असा निर्देश द्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मी या ठिकाणी खेदाने विषय व्यक्त करीत आहे. प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत सचिवांनी सांगावे व आपण ऐकावे, प्रत्येक वेळेस न्यायालयाने सांगावे व आपण ऐकावे हे काही योग्य नाही.

उप सभापती : सचिवांनी मला या विषयाच्या संदर्भात काहीही सांगितलेले नाही.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सचिवांनी आपल्याला सांगितले ते मी बघितले आहे. आपण आमच्यातलेच एक सदस्य असून आपण केवळ त्या पदावर विराजमान झालेले असल्यामुळे आम्हाला आपल्याकडून संरक्षण मागण्याचा अधिकार आहे. आपल्या माध्यमातूनच आम्ही सरकारला विचारत असतो. या प्रश्नामध्ये न्यायालयाचा काही एक प्रश्न आलेला नाही. दोन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री रावते....

अधिकारी आदर्शच्या घोटाळयात सस्पेंड झाले आहेत. एक वर्षापासून या अधिका-यांना सस्पेंड का केले जात नाही अशी आम्ही सातत्याने मागणी करीत होतो परंतु या दोन अधिका-यांना आज सस्पेंड करण्यात आले असून ही प्रशासकीय बाब असल्यामुळे यासंदर्भात सभागृहात निवेदन होणे गरजेचे आहे. हे दोन्ही अधिकारी शासकीय सेवेतील आहेत. मला आठवते की, माननीय विलासराव देशमुख मुख्यमंत्री होते त्यावेळेस महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्ताच्या संदर्भात सर्व माहिती येथे मांडली गेल्यानंतर माननीय विलासराव देशमुखांनी याच सभागृहात सांगितले होते की, "होय, त्यांच्यावर दोषारोप करता येतो परंतु आम्हाला त्यांना निलंबित करता येत नाही, निलंबित करण्यासाठी राष्ट्रपती पर्यंत जावे लागते" असे सांगून मला खाली बसवले गेले होते. या घटनेच्या संदर्भात दूरदर्शनवरुन आम्ही सर्व माहिती ऐकलेली आहे. परंतु या अधिका-यांना सस्पेंड करण्यासाठी राष्ट्रपतींपर्यंत जावे लागत नाही अशी माझी माहिती आहे. त्यामुळे या ठिकाणी निवेदन केले गेले तर प्रशासन चालविण्यासाठी एक चांगल्या प्रकारचे वातावरण निर्माण होईल. त्यामुळे दोन अधिका-यांचे निलंबन झालेले आहे त्यासंदर्भात सभागृहात घोषणा होण्याची आवश्यकता आहे. मंत्रीमहोदयांनी उठून यासंदर्भात माहिती सांगावी एवढेच मी म्हटले होते.

श्री. विनोद तावडे :सभापती महोदय, ..

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री. रावते यांनी जो मुद्दा मांडलेला आहे त्यासंदर्भात स्पष्टीकरण दिल्यानंतर मी आपल्याला बोलण्याची संधी देतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मी मुद्दा मांडल्यानंतर दोन्ही मुद्यांच्या संदर्भात एकत्रित स्पष्टीकरण दिले तर अधिक चांगले होईल.

आजच्या प्रश्नोत्तराच्या तासामध्ये अशाच प्रकारचा न्याय प्रविष्ट बाबीचा मुद्दा उपस्थित झाला होता तसाच न्याय प्रविष्ट बाबीचा मुद्दा आताही उपस्थित झालेला आहे. मी प्रॅक्टीस आणि प्रोसिजर मधील एक उतारा वाचतो त्यानंतर आपण निर्णय द्यावा अशी विनंती आहे. आपला निर्णय मला नेहमीच मान्य असतो.

"It is the absolute privilege of the Legislatures and members thereof to discuss and deliberate upon all matters pertaining to the governance of the

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

country and its people. Freedom of speech on the floor of the House is the essence of Parliamentary democracy. Certain restrictions on this freedom have, to a limited degree, been self-imposed. One such restriction is that discussions on matters pending adjudication before courts of law should be avoided on the floor of the House, so that the courts function uninfluenced by anything said outside the ambit of trial, in dealing with such matters."

सभापती महोदय, कोर्टाचे यासंदर्भात काय चालले आहे याबाबत आम्ही येथे बोलत नाही तर ॲडव्होकेट जनरल यांनी जे सांगितले त्या बाबत हा विषय प्रशासनिक बाबीच्या संदर्भातील असल्यामुळे या विषयाची आम्ही माहिती मागत आहोत. आपण मघाशी म्हणाला की, ही बाब न्याय प्रविष्ट आहे त्यामुळे यासंदर्भात माझी विनंती एवढीच आहे की, प्रशासनातील दोन अधिका-यांचे जे निलंबन झालेले आहे त्यांच्या संदर्भात शासनाने माहिती द्यावी.

श्री. एस.क्यू.ज़मा : सभापति महोदय, मेरा पाइंट ऑफ आर्डर है. मुझे पूछना है कि क्या माननीय सभापति महोदय की बात सुनने की तैयारी अपोजीशन पार्टी के माननीय सदस्यों की है या नहीं है?

मेरा दूसरा पाइंट ऑफ आर्डर यह है कि यह बात सही है कि उनको प्रश्न पूछने का पूरा अधिकार है. अपोजीशन के माननीय सदस्यों को अपनी बात जस्टीफाय करने का पूरा अधिकार है. लेकिन मैं पूछना चाहता हूं कि यह बात पूछने के लिए उन्होंने किस रुल के अंतर्गत आपको नोटिस दी है. माननीय सदस्य यहां पर पार्लमेंट प्रोसीजर को कोट कर रहे हैं. यह मॅटर न्याय प्रविष्ट है या नहीं तथा दूसरी जानकारी भी माननीय सदस्य पूछ सकते हैं. लेकिन मेरा कहना है कि माननीय सदस्य ने यहां पर न तो औचित्य का मुद्दा उठाया है और न ही माननीय सदस्य ने यहां पर दूसरे किसी रुल के अंतर्गत कोई नोटिस दी है. (गोंधळ) यहां पर माननीय सदस्य अपनी आवाज ऊंची करके हमको दबाना चाहेंगे तो वह ठीक नहीं है. मेरा कहना है कि माननीय सदस्य को हमारी बात भी सुननी पड़ेगी.

श्री दिवाकर रावते : आप हमको अपनी बात सुना तो रहे हैं.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापति : जमा जी, आप अपनी बात बोलिए.

श्री एस. क्यू. जमा : यह घटना आपको भी मालूम है और हमको भी मालूम है.(गोंधळ) सभापति महोदय, इस संबंध में हम आपकी रुलिंग चाहते हैं

उप सभापति : यदि आप सबकी बात पूरी हो गयी हो तो मैं बोलूं....

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात आपण सांगितले आहे की, आपल्याला जर माननीय मुख्यमंत्र्यांकडून निवेदन हवे असेल तर त्यांना सभागृहात उपस्थित राहण्याविषयी निरोप देण्यात येईल. विरोधी पक्षाला हा विषय उपस्थित करण्याचा पूर्ण हक्क आहे. या विषयाच्या संदर्भातील निवेदन सादर करण्यासाठी सभागृहाचे कामकाज थांबविण्याची मुळीच गरज नाही. माननीय मुख्यमंत्री सभागृहात येतील तेव्हा ते निवेदन करतील.

उप सभापती : दोन अधिका-यांच्या निलंबनाच्या संदर्भात विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी विचारणा केलेली आहे. या विषयाच्या संदर्भात केवळ माननीय मुख्यमंत्रीच निवेदन करतील असे मला वाटते.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती . . . .

मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांना निरोप देतो. मी कोणाचाही अपमान करीत नाही. मी माझ्या माहितीप्रमाणे तुम्हाला सांगतो.याबाबत बोलण्याचा अधिकार सन्माननीय मुख्यमंत्र्यांचा आहे आणि ते याठिकाणी येऊन सांगतील.पण जेव्हा आय.ए.एस. किंवा आय.पी.एस. दर्जाच्या अधिकाऱ्यांना आपण निलंबित करतो, तेव्हा त्यांच्या निलंबनाला केंद्र शासनाकडून 30 दिवसामध्ये कन्फर्मेशन यावे लागते आणि या सगळया बाबींचा ते खुलासा करतील. त्यामुळे मला असे वाटते की, माननीय मुख्यमंत्री येईपर्यंत आपण सभागृहापुढील कामकाज सुरु ठेऊ या.

. . . .एम-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : टाळंबा (जि.सिंधुदुर्ग) धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने जनतेमध्ये निर्माण झालेली नाराजी

मु.शी. : टाळंबा (जि.सिंधुदुर्ग) धरणाचे काम निकृष्ट दर्जाचे होत असल्याने जनतेमध्ये निर्माण झालेली नाराजी या संबंधी सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पुनर्वसन व मदतकार्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"टाळंबा (जि.सिंधुदुर्ग) धरणाला सन 1981 साली प्रशासकीय मान्यता देणे, पुनर्वसनाच्या तरतुदीसुध्दा सन 1981 मध्ये लागू करणे, प्रकल्पात नेरुर, नारु, उपवडे, साकिर्डे, वसोली, पुळास, चाफेली व अंशत: अंजिवडे या गावातील 1700 हेक्टर क्षेत्र बुडीत क्षेत्रात जाऊन सुमारे 3500 कुटुंबे विस्थापित होणे, विस्थापितांनी वेळोवेळी केलेल्या मागण्या मान्य न होणे, मात्र धरणाचे काम सुरु असून ते निकृष्ट दर्जाचे होत असल्याबद्दल जनतेकडून नाराजी व्यक्त होणे, या बाबत शासनाने केलेली कारवाई वा करावयाची उपाययोजना"

श्री.प्रकाश सोळंके (पुनर्वसन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .एम-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, या धरणाचा बांध फुटल्यामुळे पुनर्वसनाच्या कामा मध्ये बऱ्याच अडचणी आल्या. श्री.पी.बी.पाटील जे जलसंपदा विभागाचे मुख्य अभियंता आहेत, त्यांनी याची पहाणी केल्यानंतर बांधाचे काम आणि मातीची क्वॉलिटी बरोबर नव्हती असेही सांगितल होते ही गोष्ट खरी आहे काय? तसेच पुनर्वसनाच्या बाबतीत प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना संपादित क्षेत्राचा 2 कोटी मोबदला केव्हा देण्यात आला आणि त्यासाठी विलंब का झाला? यामुळे प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे ही गोष्ट खरी आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी खरीप पेरणीच्या बाबतीत प्रश्न उपस्थित केलेला आहे. 2010 मध्ये साधारणत: पर्जन्यमान हे सरासरीपेक्षा 23 टक्क्यांनी जास्त होते आणि त्याठिकाणी अतिवृष्टी झाली होती. त्यामुळे 10 ठिकाणी माती कामाला घळी पडलेल्या होत्या. परंतु सदरहू घळी वाहून गेल्यानंतर जे भरावाचे काम आहे ते निविदा शर्तीनंतर त्याच गुत्तेदाराकडून करुन घेण्यात आलेले आहे आणि त्याच गुत्तेदाराकडून ते काम करुन घेतल्या मुळे यासाठी शासनाचा काही पैसा खर्च झालेला नाही. तेथील ज्या घळी वाहून गेल्या होत्या, त्यावेळी निश्चितपणे सदरहू काम पूर्ण करुन घेता आले नाही. याबाबतीत क्षेत्रीय स्तरावर ज्या गुण नियंत्रण चाचण्या केल्या जातात, त्या सुध्दा वेळोवेळी संबंधित विभागाकडून करण्यात आलेल्या आहेत. याबाबतीत केलेल्या चाचण्यांच्या निष्कर्षानुसार दबाई केलेल्या भरावाची घनता योग्य असून त्यांनी स्पेसिफीकेशननुसार दबाई केल्याचे तसेच मातीकाम योग्य प्रकारचे साहित्य वापरुन केल्याचे निष्कर्षामध्ये स्पष्ट करण्यात आलेले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,संबंधित ठेकेदाराचे नाव काय आहे? तसेच जर हा अपघात आणखी मोठ्या प्रमाणात झाला असता तर त्याठिकाणी ज्या लोकांचे पुनर्वसन करण्यात आले होते, त्यांची वस्ती संपूर्णपणे मातीच्या ढिगाऱ्याखाली आली असती. त्यामुळे जर संबंधितांनी बरोबर काम केले नसेल तर त्या ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करण्यात येणार आहे काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सदरहू ठेकेदाराचे नाव मेसर्स आर.एन.शेट्टी असून तो हुबळी येथे राहणारा आहे. मी आताच सांगितले की, याठिकाणी निविदेतील ज्या शर्ती आहेत, त्यानुसार तेथील घळी भरण्याचे काम करुन घेण्यात आले आहे. तसेच त्याबाबतीत गुण नियंत्रण चाचण्या आणि त्याचे निष्कर्ष याचे कामही व्यवस्थित करुन घेण्यात आल्यामुळे कॉन्ट्रॅक्टरला ब्लॅक लिस्ट करण्याचा प्रश्न येत नाही.

पृ.शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग व राज्य

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

महामार्ग व इतर मार्गाच्या दुर्दशेमुळे रस्ते अपघाताचे वाढत असलेले प्रमाण

मु.शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग व राज्य महामार्ग व इतर मार्गाच्या दुर्दशेमुळे रस्ते अपघाताचे वाढत असलेले प्रमाण यासंबंधी सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली, वि.प.स.यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.राजन तेली (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय,मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यात मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच राज्य महामार्ग व इतर मार्गाच्या दुर्दशेमुळे रस्ते अपघाताचे वाढत असलेले प्रमाण, सदर रस्त्यावरील अपघातात गेल्या वर्षाच्या तुलनेत विशेषत: मुंबई-गोवा महामार्गावरील खारेपाटण ते बांदा-पत्रादेवी पर्यंत 18.05 टक्के झालेली वाढ, सन 2011-2012 मध्ये अशा अपघातांमध्ये सुमारे 80 व्यक्तींचा झालेला मृत्यू व सुमारे 580 व्यक्ती जखमी होणे, महामार्गावरील धोकादायक वळणे व रस्त्यांची दुरवस्था हे अशा अपघातांचे असलेले प्रमुख कारण, यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेले भीतीचे वातावरण, याबाबतीत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना, कारवाई आणि शासनाची प्रतिक्रिया."

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .एम-5

22-03-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) M-5

APR/KT/D/ 13:00

श्री.राजन तेली : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग असेल किंवा कोकणातील इतर रस्ते असतील, मग त्यात राज्य मार्ग असेल किंवा जल मार्ग असेल या सर्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रस्त्यांची लांबी पाहिल्यानंतर या रस्त्यांच्या कामांसाठी त्या प्रमाणात निधी मिळत नाही त्यामुळे तेथील अपघातांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. आज या लक्षवेधी सूचनेच्या बाबतीत शासनामार्फत माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर उत्तर दिलेले आहे. कोकणामध्ये सातत्याने जास्त पडणाऱ्या पावसामुळे तेथील रस्ते नेहमी खराब होतात. या जिल्ह्यातील राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांचे जे प्रमाण आहे, त्याची देखील माहिती दिलेली आहे. त्याची जी कारणे आहेत त्याबाबत सांगावयाचे तर तेथील मोऱ्या रुंद करणे किंवा रस्त्यांचे रुंदीकरण करणे देखील गरजेचे आहे इ.अनेक गोष्टी सुचविलेल्या आहेत.

सभापती महोदय, मला या माध्यमातून एकच मागणी करावयाची आहे की, याठिकाणी जवळ जवळ 4347 कि.मी.चा ग्रामीण मार्ग आहे आणि किमान 719 कि.मी.चा राज्य मार्ग आहे. त्यावेळी मात्र या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी अत्यल्प निधी मिळतो आणि त्यातून 4347 कि.मी.पैकी जवळजवळ 60 ते 70 कि.मी.रस्त्यांची दुरुस्ती होते. खरे म्हणजे या रस्त्यांची 5 वर्षांनी दुरुस्ती व्हावयास पाहिजे. माझे असे म्हणणे आहे की, शासन जिल्हा परिषदेला रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी वाढवून देणार आहात काय ? तसेच या रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी होण्याच्या दृष्टीकोनातून चौपदरीकरण करण्याच्या बाबतीत प्रयत्न सुरु आहेत. एकतर झाराप-पात्रादेवी रस्ता दोन वर्षापासून बंद आहे. परंतु उर्वरित जो रस्ता आहे, त्याचे काम त्वरित सुरु करणार आहात काय ? तसेच राहिलेला जो राष्ट्रीय महामार्ग आहे त्याच्यासाठी आपण प्रयत्न करीत आहातच. पण त्याचे काम लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीकोनातून आणि पुढचा टप्पा हाती घेण्याच्या दृष्टीकोनातून देखील प्रयत्न करणार आहात काय ? तसेच सिंधुदुर्ग जिल्हा हा पर्यटन जिल्हा आहे. अशा वेळी झाराप कडून मुंबईकडे येणाऱ्या रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी आपल्या विभागाकडून लवकरात लवकर प्रयत्न होतील काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मला एक माहिती विचारावयाची आहे.पावसाळी अधिवेशनामध्ये या विषयाच्या अनुषंगाने जे उत्तर देण्यात आलेले होते, त्याचीच आज डुप्लीकेट कॉपी आली आहे काय असा माझ्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. कारण त्यातील शब्द अन् शब्द तसेच यातील स्वल्पविराम वगैरे तेच आहे.त्यामुळे माझ्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे.

उप सभापती : तुमच्याकडे कॉपी असेल तर संभ्रम होणार नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मागील अधिवेशनामधील उत्तर चुकून आताही वाटण्यात आले आहे काय याबाबत खात्री करुन घेण्यात यावी.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, कधी-कधी प्रश्न सुध्दा तेच-तेच असतात. मात्र येथील कामामध्ये जी ठोस प्रगती झालेली आहे, त्याबाबतीत मी आपल्याला माहिती देतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, जर प्रश्न सुटले नाहीत तर परत तेच प्रश्न उपस्थित होतात, नाहीतर सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांना ते पुन्हा कशाला मांडावे लागले असते?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, ठीक आहे. या विषयाच्या संबंधात मागच्या अधिवेशनामध्ये दिलेले उत्तर आणि आता याठिकाणी दिलेले उत्तर यामध्ये मी कम्पॅरिझन करु शकलो नाही. परंतु माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे मी याबाबतीत काय झाले आहे ते पहातो.सन्माननीय सदस्यांनी 3-4 प्रश्न उपस्थित केलेले आहेत. एक महत्वाचा मुद्दा म्हणजे केंद्र शासनाच्या बजेटच्या माध्यमातून झाराप-पात्रादेवी रस्त्यांचे काम सुरु होते, त्यानंतर जी मागणी आली त्यानुसार केंद्रीय मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी अंडर पासेस, स्ट्रीट रुट, रिटेनिंग वॉल ही कामे वाढविली होती. त्यामुळे 183 कोटी रुपयांचे काम 274 कोटी रुपयापर्यंत गेले होते. हे सर्व त्या अधिकाऱ्यांनी सांगितल्यानंतर, काम झाल्यानंतर ते वाढीव काम मंजूर करण्यास केंद्र शासनाकडून बरेच दिवस नकार देण्यात येत होता. शेवटी केंद्रीय मंत्री महोदयांबरोबर माननीय मुख्यमंत्र्यांची बैठक झाली आणि मला आताच समजले आहे की, केंद्र शासनाने या कामाला पूर्णपणे मंजुरी दिलेली आहे अणि ही सुधारित मान्यता आठ दिवसामध्ये आपल्याकडे येईल आणि त्यानंतर हे काम ताबडतोब सुरु होईल.

सभापती महोदय, तसेच सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला की, इंदापूर ते झाराप पर्यंतचे चौपदरीकरणाचे बाकीचे काम आहे, त्या बाबतीत मागच्या वेळी जे उत्तर दिलेले आहे, तेच आज मला येथे द्यावयाचे आहे की, आम्ही या कामाचे चार पॅकेजेस केंद्र शासनाकडे दिलेले आहेत. ही कामे एन.एच.डी.एफ.-4 मध्ये घ्यावीत म्हणून आम्हाला प्रयत्न करावे लागले. याचे कारण असे आहे की, एन.एच.डी.एफ-4 मध्ये समाविष्ट नसेल तर त्याच्यासाठी कराव्या लागणाऱ्या जमीन संपादनाचे पैसे केंद्र शासन देत नाही. अशा वेळी जमीन संपादनाचे जवळजवळ 750 ते 800 कोटी रुपये राज्य शासनाला भरावे लागले असते.केंद्रीय मंत्री महोदयांकडून आता एन.एच.डी.बी.-4 मध्ये ते पैसे सुध्दा समाविष्ट करुन घेतले. त्यामुळे आता आपल्याला जमीन .....

श्री.छगन भुजबळ . . . .

संपादनासाठी 750 कोटी रुपये हे केंद्र शासनाच्या बजेट मधून मिळू शकतील. हे सर्व जे काही आहे त्याबाबतीत तूर्तास मी एवढेच सांगेन की, केंद्र शासनाने हे प्रकल्प एन.एच.डी.एफ-4 मध्ये घेतल्यामुळे राज्य शासनाचा जमीन संपादनाच्या संबंधातील निधीचा जो प्रश्न आहे, तो आता सुटलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तसेच आम्ही बाकीचे सुसाध्यता अहवाल देखील केंद्रीय परिवहन मंत्रालयाकडे दिलेले असून त्यांच्याकडून सदरहू अहवालाच्या मंजुरीबाबत आम्ही प्रतिक्षा करीत आहोत.याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हे खरे आहे की, राज्य क्षेत्र आणि स्थानिक क्षेत्र याबाबतीत पाहिले तर या जिल्ह्यामध्ये जवळजवळ 1 हजार 37 कि.मी.रस्ते हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत.

यांनंतर श्री.अ.शिगम . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

4 हजार 974 कि.मी.चे रस्ते इतर संस्थांकडे म्हणजे जिल्हापरिषद वगैरे यांच्याकडे आहेत. या वर्षी सार्वजनिक बांधकाम विभागाने रस्त्यांच्या कामांसाठी 16.5 कोटी रुपये, स्थानिक क्षेत्रासाठी 4 कोटी रुपये, 13 व्या वित्त आयोगाचे 9 कोटी रुपये व इतर असे एकूण 40 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. राज्य क्षेत्रातील 65 कि.मी.रस्त्यांचे नुतनीकरण केलेले आहे. सन्माननीय सदस्यांच्या स्थानिक क्षेत्रात 62 कि.मी.रस्त्यांचे नुतनीकरण केलेले आहे. विशेष दुरुस्ती अंतर्गत राज्य क्षेत्रामध्ये 200 कि.मी. तर स्थानिक क्षेत्रामध्ये 70 कि.मी. रस्त्यांची दुरुस्ती केलेली आहे. अशी सातत्याने कामे सुरु आहेत. आपल्याला जसा जसा निधी उपलब्ध होतो त्याप्रमाणे आपण कामे घेत असतो.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मागील वेळेला सुध्दा 2012 मध्ये काम पूर्ण होईल असे उत्तर दिले होते. आता देखील तसेच उत्तर दिलेले आहे. गेल्या महिन्यात या विभागाचे सचिव श्री.मुखर्जी आले होते. त्यांनी मुलाखत देताना हे काम 2013 पर्यंत पूर्ण होईल असे सांगितले हे खरे आहे काय ? तसेच त्या ठिकाणची वाहतूक थांबविण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यां बरोबर बैठक घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते. तेव्हा तेथील वाहतूक थांबविण्याकरिता प्रयत्न करणार आहात काय ? दुसरे म्हणजे गेल्या वर्षी ऐन गणपतीच्या सणात कशेडी घाटात दरड कोसळल्यामुळे चाकरमान्यांची मोठ्या प्रमाणावर गैरसोय झाली होती. तेव्हा या पावसाळ्यात कशेडी घाटात दरड कोसळू नये म्हणून कोणती उपाययोजना करण्यात आलेली आहे, तसेच तेथील वाहतूक सुरळीत चालण्यासाठी कोणत्या प्रकारची उपाय योजना केली जाणार आहे ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, विभागाच्या सचिवांनी सांगितल्याप्रमाणे वेळेत काम पूर्ण होईल आणि मी हे अगोदर सांगितलेले आहे. या संदर्भातील फाईल आताच क्लिअर झालेली आहे. तेव्हा आपणास वाढीव पैशास लवकर मान्यता मिळेल आणि ते काम लवकरात लवकर पूर्ण होईल. सन्माननीय सदस्यांनी कशेडी घाटाचा उल्लेख केला. त्याबाबत सांगू इच्छितो की, हा भाग आपणास चौपदरी करावयाचा आहे, परंतु ते काम पुढच्या टप्प्यात आहे. ते काम अजून सुरु झालेले नाही. त्याबाबत सुसाध्यता अहवाल काय येतो ते पहावे लागेल. त्या ठिकाणी टनेल काढावे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ....

लागेल किंवा कसे या बाबत चर्चा सुरु आहे. तोपर्यंत या रस्त्याची डागडुजी करण्याचे काम चालू आहे. नातू-विन्हेरे हा रस्ता सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न करीत आहोत कारण हाच पर्यायी मार्ग आहे. डिसेंबर 2012 पर्यंत झाराप ते पत्रादेवी रस्त्याचे काम पूर्ण होईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मुंबई-गोवा ररस्त्यावरील पळस्पे ते इंदापूर रस्त्याचे काम सुरु आहे. त्या ठिकाणी रस्त्यावर पडलेले जे खड्डे भरण्यात आलेले आहेत त्याचा दर्जा पाहता येत्या पावसाळ्यात मागील वेळेसारखी परिस्थिती उद्भवणार आहे. त्याशिवाय या रस्त्याच्या बाजूला जे काम सुरु होणार आहे त्यामुळे वाहतुकीला अडथळा होणार आहे, याची दक्षता शासन घेणार आहे काय ? या रस्त्यास पर्यायी रस्ता म्हणजे जो अरोंदा ब्रीज केलेला आहे त्याचा शेवटचा स्लॅब अजून टाकायचा आहे. हे काम ठेकेदार अजून करीत नाही. तेव्हा हे काम शासन आपल्या विभागामार्फत करुन तो रस्ता वाहतुकीस सुरु करेल काय ? माननीय मंत्री महोदयांनी गेल्या वर्षी भेट दिली असता हे काम चार महिन्यात सुरु होईल असे सांगितले होते परंतु दीड वर्षापासून हे काम सुरु झालेले नाही. ठेकेदाराने हे काम जाणूनबुजून अडविलेले आहे तेव्हा शासन त्या ठेकेदारवर कारवाई करणार काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, पनवेल- इंदापूर रस्त्याचा पहिला फेज सुरु झालेला आहे त्याचे काम ठेकेदाराकडे दिलेले असून त्या रस्त्यावरील खड्डे बुजविलेले आहेत. पुन्हा खड्डे पडू नयेत याची काळजी घेण्याबाबत ठेकेदाराला सांगण्यात आलेले आहे आणि त्याची ती जबाबदारी आहे. ते काम त्यांच्याकडून निश्चितपणे करुन घेण्यात येईल. त्यासाठी वारंवार परिरक्षण केले जाईल. अरोंदा ब्रीज रस्त्याचे काम या आठवड्यात सुरु होऊन ते दोन महिन्यात पूर्ण करण्यात येईल असा रिपोर्ट आहे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, तांत्रिक स्वरुपाचा हा प्रश्न आहे. वाढती वाहने आणि भरधाव धावणारी वाहने याचे विवरण दिलेले आहे. त्यामध्ये राष्ट्रीय महामार्गावर 80 कि.मी. प्रतितास गतिमर्यादा आवश्यक आहे. 80 कि.मी.प्रति तासाची मर्यादा ठेवण्यासाठी गाडीचा वेग किती ठेवावा लागेल ? कारण अपघाताचे प्रमाण वाढलेले आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, वेगाची मर्यादा 80 कि.मी. प्रति तास ठेवावी लागेल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, कशेडी घाटाची अतिशय भयंकर दुर्दशा झालेली आहे. आपण गोव्याकडे जाण्यास निघालो की वडखळ येथे एक रस्ता अलिबागकडे जातो आणि दुसरा रस्ता गोव्याकडे जातो. परंतु वडखळला जाईपर्यंत भरपूर वाहतुकीची कोंडी होत असते. तेव्हा वडखळपर्यंत रस्ता रुंद करणे आवश्यक आहे.त्या ठिकाणी अपघाताचे प्रमाण सुध्दा जास्त आहे. हा वडखळपर्यंतचा रस्ता रुंद करणार काय ?

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, वडखळ नाक्यावर अनेक दुकाने पुढे आली होती. ते अतिक्रमण मागील वर्षी हटविलेले असून तो रस्ता मोठा करण्याचा प्रयत्न केलेला आहे. परंतु एकूणच आपण नवीन काम करताना वडखळच्या बाहेरुनच बायपास रस्ता करण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यासाठी आपण चार गावांचे भूसंपादनाचे काम सुरु केलेले आहे.

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : फळपीक विमा योजनेअंतर्गत हवामानातील बदल मोजणारी यंत्रणा सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग व सावंतवाडी तालुक्यात उभारणे

व देवगड, वेंगुर्ले कणकवली तालुक्यातील काजू पिकाला फळपीक विमा लागू करणे

मु. शी. : फळपीक विमा योजनेअंतर्गत हवामानातील बदल मोजणारी यंत्रणा सिंधुदुर्ग जिल्हयातील दोडामार्ग व सावंतवाडी तालुक्यात उभारणे व देवगड, वेंगुर्ले कणकवली तालुक्यातील काजू पिकाला फळपीक विमा लागू करणे यासंबंधी श्री.परशुराम उपरकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय फलोत्पादन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" फळपीक विमा योजनेअंतर्गत हवामानात होणारा बदल मोजणारी यंत्रणाच दोडामार्ग व सावंतवाडी (सिंधुदुर्ग) तालुक्यात नसल्याने या तालुक्यामधील शेतक-यांना हवामानातील नोंदीसाठी वेंगुर्ले येथील फळ संशोधन केंद्रातील हवामानाची नोंद घेणा-या यंत्रणेवर अवलंबून रहावे लागणे, मात्र सदरहू दोन्ही तालुके सह्याद्रीपट्टयात येत असल्याने समुद्रकिनारी असणारे तापमान आणि सह्याद्रीपट्टयातील तापमान यात मोठी तफावत असणे, यामुळे दरवर्षी शेतक-यांचे होत असलेले नुकसान, कुडाळ व मालवण या दोनच तालुक्यात काजू पिकाला विमा योजना लागू असणे, मात्र देवगड, वेंगुर्ले, कणकवली या तालुक्यातील काजू पिकाला फळपीक विमा योजनेतून वगळण्यात येणे, परिणामी शेतक-यांमध्ये याबाबत निर्माण झालेली तीव्र नाराजी, या बाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका "

डॉ. विजयकुमार गावित (वैद्यकीय शिक्षण व फलोत्पादन मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) ..5..

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, राज्य शासनाने आंबा आणि काजू हे पीक विमा योजनेखाली आणल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. कोकणात प्रामुख्याने आंबा आणि काजू ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पिके घेतली जातात. शासनाने पायलट तत्वावर पाच तालुक्यात आंबा पिकासाठी आणि दोन तालुक्यांमध्ये काजू पिकासाठी विमा योजना लागू केलेली आहे. काजूसाठी मालवण व कुडाळ तालुक्यांचा समावेश केलेला आहे. सावंतवाडीमध्ये 14 हजार 700 हेक्टरवर काजूची लागवड होते. तर कणकवलीमध्ये 11 हजार 500 हेक्टरवर काजूची लागवड होते. असे असताना पीक विमा योजनेतून हे दोन तालुके वगळलेले आहेत. आंबा पीक विमा योजनेमध्ये पाच तालुक्यांचा समावेश केलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की,आपण संपूर्ण जिल्हा या पीक विमा योजनेमध्ये घेणार आहात काय ? 39 ठिकाणी हवामानाची नोंद घेणारी यंत्रे बसविण्यात आलेली आहेत. परंतु या संदर्भातील माहिती नेमक्या कोणत्या ठिकाणी मिळणार याची अजून शेतकऱ्यांना माहिती नाही. तेव्हा ही माहिती शेतकऱ्यांना सांगण्यात येईल काय ? तसेच ज्या ठिकाणी ही विमा योजना लागू केलेली आहे त्या सह्याद्रीच्या पट्टयातील तापमानाचा अंदाज आणि समुद्र किनारी असणारे तापमान नोंदण्यासाठी फक्त वेंगुर्ले येथील फळ संशोधन केंद्राकडे असलेल्या वेधशाळेतील यंत्रावरुन त्याचे मोजमाप करण्यात येते. त्या प्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येते. तेव्हा याबाबत आपण कोणती उपाययोजना करणार आहात ?

डॉ.विजयकुमार गावित : सभापती महोदय, हवामानावर आधारित फळबाग विमा योजना लागू केलेली आहे. आपण ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरु केली असून या योजनेमध्ये सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोन तालुक्यांचा यामध्ये समावेश केलेला आहे. या योजनेचा कालावधी संपलेला आहे. ही योजना यापुढे लागू करावयाची किंवा नाही या बाबत अंतिम निर्णय होईल तेव्हा सन्माननीय सदस्यांनी सुचविलेले तालुके त्यामध्ये घेण्यात येतील. हवामान केंद्रे सर्कलवाईज बसविण्यात आलेली आहेत. मालवणमध्ये 7 आणि कुडाळमध्ये 5 अशा दोन तालुक्यांमध्ये ही यंत्रे बसविलेली आहेत.

यानंतर कु.थोरात..

अशुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित.....

सदर हवामान यंत्रे सर्कलवाईज बसविलेली आहेत ती त्रयस्थ कंपनीमार्फत बसविली जातात. नॅशनल कोलॅटरल सर्व्हिसेस मॅनेजमेंट लिमिटेड यांनी ही हवामान यंत्रे बसविलेली आहेत. शासनाने महाराष्ट्रामध्ये या कंपनीच्या माध्यमातूनच हवामान यंत्रे बसविलेली आहेत. ही स्वंयचलित असल्यामुळे याची माहिती हैद्राबाद येथे एक-एक तासाने गोळा केली जाते त्यानंतर त्या ठिकाणावरुन आपल्याला ती माहिती मिळू शकते.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, हवामानामुळे झालेल्या आंब्याच्या नुकसान भरपाईच्या संदर्भातील माझ्या औचित्याच्या मुद्याला मागच्या वेळी मंत्री महोदयांनी लेखी उत्तर पाठविले होते. त्यामध्ये गेल्या वर्षीची आंबा नुकसान भरपाई शासनाच्या विचाराधीन आहे असे म्हटले होते शासनाचा हा विचार कधी पूर्ण होईल आणि शेतकऱ्यांना कधी पैसे मिळतील.

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, हा प्रश्न काजूशी संबंधित आहे. तरी देखील या बाबत मंत्री मंडळासमोर जाऊन विचार केला जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी हवामानातील बदल मोजणाऱ्या यंत्रणेचा या ठिकाणी उल्लेख केलेला आहे. हे एक यंत्र वेंगुर्ला येथे बसविण्यात आले आहे. वेंगुर्ला हा समुद्रकिनाऱ्याचा पट्टा आहे तर दोडामार्ग आणि सावंतवाडी हा डोंगरकपारीचा पट्टा आहे. त्यामुळे वेंगुर्ला येथील हवामान मोजून तो निकष दोडामार्ग येथे लावला तर ते प्रॉक्टिकल होणार नाही. एक सहयाद्रीचा पायथा आहे अणि दुसरा समुद्र किनारा आहे. दोन्ही ठिकाणी एकाच वेळी हवामान आणि तापमान वेगवेगळे असते. तेव्हा दोडामार्ग येथील हवामानाचे मोजपाम करण्यासाठी वेगळी व्यवस्था करण्यात येणार आहे का? ती केली तरच त्या भागातील शेतकऱ्यांना त्याचा उपयोग होईल. वेंगुर्ल्याचे तापमान डोंगरकपारीत लावले तर त्याचा उपयोग होणार नाही अशी तेथील शेतकऱ्यांनी लेखी तक्रार केलेली आहे याबाबत शासन काय कार्यवाही करणार आहे?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, सर्वसाधरणपणे ज्यावेळी स्वंयचलित हवामान यंत्रे त्या ठिकाणी बसविण्यात येतात त्यावेळी ती सर्कलवाईज बसविण्यात येतात. आंबा पिकाचे जे तालुके घेतलेले आहेत त्या तालुक्यांमध्ये सर्कलवाईज हवामान यंत्रे बसविण्यात आलेली आहेत. वेंगुर्ला तालुक्यात 6, कणकवली येथे 6, सावंतवाडी येथे 7, देवगड येथे 6, मालवण येथे 7 आणि

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित....

कुडाळ येथे 5 अशा प्रकारे हवामान यंत्रे बसविण्यात आलेली आहेत. ही यंत्रे जाहीर करण्यात येत नाहीत याचे कारण असे की, त्यामध्ये बिघाड करणे किंवा अन्य काही अडचणी घडू शकतात. या स्वंयचलित यंत्राचे हैद्राबाद येथे ॲटोमॅटिक रेकॉर्डिंग होत असते आणि तेथून ती महिती पाहिजे त्यांना पुरविली जाते.

श्री. विनोद तावडे : हवामन यंत्र दोडामार्ग येथे बसविण्यात येणार आहे का?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, दोडामार्ग हे फळपीक विमा योजनेत घेतले असेल तर त्या ठिकाणी निश्चितपणाने बसविले जाईल. परंतु ते फळपीक योजनेत घेतले नसेल तर तेथील पालक मंत्र्यांना याबाबत सांगितले जाईल. लोकांची मागणी असेल तर डी.पी.डी.सी. मधून हवामान यंत्र बसविण्याचे आदेश दिलेले आहेत त्याप्रमाणे ते लावले जातील.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, आज आंब्याची परिस्थिती काय आहे हे मंत्री महोदयांना माहीत नसेल तर त्यांनी ही माहिती घ्यावी. या वर्षी देखील आंबा व काजूचे पीक धोक्यात आहे हे लक्षात घेऊन आंबा व काजू उत्पादक बागायतदारांना किंवा शेतकऱ्यांना मदत देण्याचे प्रस्तावित करण्यात येणार आहे का? या वर्षी आंब्याचा आकार लहान झालेला असल्यामुळे त्याला भाव मिळणार नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी या ठिकाणी विचारलेला प्रश्न महत्वाचा आहे. दोडामार्ग हे काजूसाठी प्रमुख स्थान आहे. तेथील हवामान वेगळे आहे त्यामुळे याबाबत फेर विचार करुन दोडामार्ग येथे हवामान मोजण्याचे स्वयंचलित यंत्र बसविण्यात येईल काय?

डॉ. विजयकुमार गावित :सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितलेले आहे की, फळपीक योजनेमध्ये जे तालुके घेतलेले आहेत त्याच ठिकाणी विमा कंपनीच्या मार्फत ही स्वयंचलित यंत्रे बसविली जातात. फळपीक योजनेमध्ये दोडामार्ग घेतलेले नाही. परंतु सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांनी नियोजन मंडळाच्या बैठका ज्या-ज्या ठिकाणी घेतल्या त्या-त्या ठिकाणी त्यांनी असे सांगितले होते की, डी.पी.डी.सी. मधून हे यंत्र घ्ेऊन पाहिजे असेल त्या ठिकाणी ते बसविले पाहिजे. दोडामार्ग येथे लोकांची मागणी असेल तर या बाबतीत येथील पालकमंत्र्यांकडे मागणी केली जाईल. तसेच आंब्याच्या बाबतीत माहिती घेऊन निश्चितपणाने योग्य असा मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, मागच्यावेळी मंत्री महोदयांनी माझ्या पत्राला उत्तर दिले होते त्यामध्ये आंबा आणि काजू राष्ट्रीय फळपीक योजनेमध्ये घेण्यात येणार आहेत असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर...

सांगितले होते. त्याप्रमाणे आंबा आणि काजू प्रायोगिक तत्वावर घेतलेले आहे. या संबंधीच्या जी.आर.मध्ये जिल्हे आणि तालुके दिलेले आहेत. या जी.आर.मध्ये पुन्हा सुधारणा करण्यात येणार आहे का? कारण या जी.आर.मध्ये ठाणे जिल्ह्यातील तीनच तालुके घेतलेले आहेत. ठाणे जिल्ह्यातील बाकीचे तालुके घेणे आवश्यक आहे. रत्नागिरी जिल्हह्यातील पाच तालुके घेतलेले आहेत उर्वरित तालुके सुध्दा घेण्याची आवश्यकता आहे. दोडामार्ग हा सर्वात जास्त काजू पिकविणारा तालुका आहे. परंतु यामध्ये दोडामार्ग तालुक्याचा उल्लेख केलेला नाही त्यामुळे यामध्ये पुन्हा उर्वरित तालुके घेण्यात येणार आहेत का? फळपीक योजना निर्माण केल्यामुळे शेतकऱ्यांना आनंद वाटला पण आंबा आणि काजू उत्पादक शेतकऱ्यांना परवेडल अशा पध्दतीने विम्याचा हप्ता लावला पाहिजे. शेतकऱ्यांना हा विमा हप्ता परवडला नाही तर दर वेळेला आम्ही या ठिकाणी नुकसान भरपाई मागत राहणार, दरवेळेला अवेळी हवामानाचा व थंडीचा आंब्याच्या पिकावर परिणाम होणार आहे त्यामुळे शेतकऱ्यांचा फायदा होईल या दृष्टीने विचार करणार का?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, विम्याचे हप्ते ठरवित असताना विद्यापीठातील शास्त्रज्ञ तसेच आंबा आणि काजू पिकविणारे जे शेतकरी संघ आहेत त्या संघातील लोक आणि अधिकारी मिळून हवामान, तापमान किंवा इतर कुठल्या गोष्टींमुळे या फळांवर बाधा होऊ शकते याचा विचार करुन विम्याचा हप्ता ठरवितात त्याप्रमाणे हा हप्ता ठरविण्यात आलेला आहे. हे प्रायोगिक तत्वावर सुरु केलेले आहे. याचा अभ्यास करुन यामध्ये आणखी काय सुधारणा केली पाहिजे याचा निश्चितपणे विचार करण्यात येईल आणि ज्यावेळी पुन्हा हवामानावर आधारित फळपीक योजना सुरु करण्यात येईल त्यावेळी या ठिकाणी सांगण्यात आलेल्या सर्व गोष्टींचा निश्चित पणाने विचार करण्यात येईल.

श्री. संजय केळकर : अभ्यास किती दिवसात पूर्ण होईल?

डॉ. विजयकुमार गावित : पुढच्या वर्षी ही योजना लागू करण्याच्या अगोदर या संबंधीचा अभ्यास पूर्ण होईल.

श्री. एस.क्यू ज़मा : सभापति महोदय, यह कोंकण के बारे में प्रश्न है. फलों की खेती को प्रतिकूल हवामान से संरक्षण देने के लिए पूरे राज्य में सेन्ट्रल एग्रीकल्चर इन्श्योरेन्स कम्पनी लिमिटेड के माध्यम से इन्श्योरेन्स की स्कीम लागू की गई है. मेरा प्रश्न यह है कि यह

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस. क्यू. जमा...

इन्श्योरेन्स की स्कीम सन्तरा उत्पादकों के लिए लागू है या नहीं और अगर लागू नहीं है तो क्या इन्श्योरेन्स कम्पनी के साथ टाइ-अप करके यह स्कीम सन्तरा उत्पादकों के लिए लागू करेंगे ?

डॉ. विजयकुमार गावित : सभापती महोदय, ही योजना ऑलरेडी लागू आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : गोंदिया जिल्ह्यात पाणी प्रदुषणाचे वाढलेले प्रमाण.

मु. शी. : गोंदिया जिल्हयात पाणी प्रदुषणाचे वाढलेले प्रमाण यासंबंधी सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर,नागो पुंडलिक गाणार, डॉ. रणजित पाटील वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"गोंदिया जिल्ह्यातील मागील तीन वर्षातील पाणी प्रदुषणाची टक्केवारी पाहिली असता सन 2009-10 मध्ये 15 टक्के, सन 2010-11 मध्ये 14 टक्के व सन 2011 मध्ये 29 टक्के पाणी दूषित असल्याची बाब प्रयोगशाळेत पिण्याच्या पाण्याचे नमुने तपासणीअंती स्पष्ट होणे, अशाप्रकारे जिल्ह्यातील तब्बल 147 गावांतील पाणी दूषित असल्याचे निदर्शनास येणे, त्यामध्ये गोंदिया तालुक्यातील 49 गावांतील 91 नमुने, आमगांव तालुक्यातील 26 गावांतील 32 नमुने, अर्जुनी/मोर तालुक्यातील 44 गावांतील 71 नमुने, देवरी तालुक्यातील 17 गावांतील 20 नमुने, गोरेगांव तालुक्यातील 23 गावांतील 32 नमुने, तिरोडा तालुक्यातील 60 गावांतील 119 नमुने, सालेकसा तालुक्यातील 25 गावांतील 43 पाण्याचे नमुने व सडक/अर्जुनी तालुक्यातील 36 गावांतील 47 पाण्याच्या नमुने दूषित असल्याचे निष्पन्न होणे, या दूषित पाण्यामध्ये क्लोरोफार्म, बॅक्टेरीया, थॅयरोटोलम नायट्रेड, फ्लोराईड व अन्य घटकांचे प्रमाण अधिक असणे, हे घटक मानवी आरोग्यास अपायकारक असल्यामुळे अनेक नागरिकांमध्ये दुर्धर साथीच्या रोगांची लागण होण्याची दाट शक्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई, उपाययोजना."

प्रा. लक्ष्मण ढोबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, गोंदिया जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न अत्यंत आवश्यक आणि अत्यंत महत्वाचा आहे. गोंदिया जिल्ह्यातील दूषित पाण्याचे नमुने तपासण्यात आलेले आहेत त्यामध्ये सन 2009-10 मध्ये 17 टक्के आणि सन 2010-2011 मध्ये 19 टक्के पाणी दूषित असल्याचे आढळून आलेले आहे म्हणजे दर वर्षी दूषित पाण्याच्या टक्केवारीमध्ये वाढ होत आहे. माझ्या माहिती प्रमाणे गोंदिया जिल्हयामध्ये या वर्षी 29 टक्के पाणी दूषित असल्याचे आढळलेले आहे. या संबंधीची आकडेवारी फार मोठी आहे पण मी ती या ठिकाणी मांडणार नाही. गोंदिया जिल्हयातील आठही तालुक्यात दूषित पाण्याचे नमुने आढळलेले आहेत. 290 गावांमध्ये 445 ठिकाणी दूषित पाण्याचे नमुने आढलेले आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर ....

त्या ठिकाणी जिल्हा परिषद आणि नगरपरिषदेच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा होतो. या ठिकाणी त्या भागातील आम्ही दोन आमदार आहोत. सन्माननीय सदस्य श्री. राजेंद्र जैन यांच्या गोंदिया नगरपरिषदेमध्ये जो पाणीपुरवठा केला गेला त्यामुळे त्यांना 7 दिवस दूषित पाणी प्यावे लागले. मी स्वत: आमगाव येथे राहतो. अनेकदा ग्रामपंचायतींकडे तक्रारी केलेल्या आहेत.

उप सभापती : आपला प्रश्न म्हणजे जवळपास व्याख्यानच झालेले आहे.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, हे व्याख्यान नाही. मी वस्तुस्थिती सांगत आहे. माझ्या घरी मी फिल्टर लावलेला आहे पण आठ दिवसामध्ये कँडल बदलावी लागते. पाण्याच्या बाबतीत इतकी वाईट परिस्थिती आमच्या जिल्ह्यात झालेली आहे. आपण महाराष्ट्रातील 11 जिल्ह्यांना न्याय दिलेला आहे. उर्वरित जिल्ह्यांना आपण न्याय दिलेला नाही. म्हणून या संबंधात माझे काही स्पेसिफिक प्रश्न आहेत. गोंदिया जिल्ह्यातील किती दूषित स्त्रोत बंद केले आहेत? प्रशिक्षित कर्मचाऱ्याचे नाव काय आणि त्याचे पद कोणते आहे? गोंदिया जिल्ह्यातील दूषित पाण्याचा प्रश्न मोठा असल्यामुळे रासायनिक तपासणीसाठी उपकरणे खरेदी करण्यासाठी शासन परवानगी देणार का ? उपकरणे खरेदी करण्यासाठी शासन निधी वितरित करणार का? गोंदिया जिल्ह्याला शुद्ध पाणी मिळण्यासाठी विशेष बाब म्हणून शासन काही उपाययोजना करणार आहे का?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, सन 2009 मध्ये एकूण 3189 पाण्याचे नमुने तपासले होते त्यामध्ये 539 नमुने दूषित आढळून आले. त्याची टक्केवारी 16.9 आहे. 2009-2010 मध्ये 10827 पाण्याचे नमुने तपासले. त्यामध्ये 1855 नमुने दूषित आढळून आले. त्याची टक्केवारी 17 टक्के आहे. 2010-2011 मध्ये 14,358 पाणी नमुने तपासले त्यापैकी 2780 नमुने दूषित आढळून आले. 2011-2012 मध्ये 14,864 पाणी नमुने तपासले त्यापैकी 3088 नमुने दूषित आढळून आले आणि त्याची टक्केवारी 30 टक्के आहे. ती वस्तुस्थिती विचारात घेता प्राथमिक आरोग्य केंद्र असो किंवा जिल्हा परिषद असो अगर त्या गावामध्ये नेमलेला पाण्याचा जलदूत असो, त्यांना पाण्याचे नमुने तपासण्याबद्दल आदेश दिलेले आहेत. त्याचबरोबर ज्या ठिकाणी पाणी दूषित आढळून आले त्या ठिकाणी रेड लेबल लावून हे पाणी पिऊ नये अशा प्रकारच्या सूचना त्या ठिकाणी देण्यात आलेल्या आहेत. त्या सूचना देत असताना ते पाणी दूषित असले तर त्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS

प्रा. लक्ष्मण ढोबळे ....

ठिकाणचा पाण्याचा स्त्रोत बंद करुन पाण्याचे इतर स्त्रोत जे शुद्ध पाण्याचे किंवा चांगल्या पाण्याचे, स्वच्छ पाण्याचे आहेत असे पाण्याचे स्त्रोत देखील लोकांना उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, मी स्पेसिफिक चार प्रश्न विचारले त्यापैकी एकाही प्रश्नाला उत्तर मिळालेले नाही. आपण मला न्याय द्यावा. गोंदिया जिल्ह्यात किती स्त्रोत बंद केले आहेत, प्रशिक्षित कर्मचाऱ्याचे नाव काय आणि त्याचे पद काय, आपण 11 जिल्हे निवडले आहेत त्यामध्ये गोंदिया बारावा जिल्हा घेऊन उपकरण खरेदी करण्यासाठी पैसे देणार का आणि विशेष उपाययोजना करणार का ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, उपकरणासाठी पैसे देण्यात येतील. संबंधित कर्मचाऱ्याचे जे नाव विचारले त्याची माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, 2009-2010 पासून या विभागामध्ये 30 टक्के पाणी दूषित आहे हे शासनाने मान्यच केले आहे. असे असताना जिल्हा परिषदेने ग्रामपंचायतींना कळविले, वारंवार शुद्धिकरणाच्या लेखी सूचना दिल्या हे सगळे जरी केले असले तरी किती नमुने शुद्धिकरणामध्ये यशस्वी झाले ? त्या ठिकाणी एवढी गंभीर परिस्थिती असताना आपण 1 मार्च, 2012 ते 30 जून, 2012 पर्यंत या 11 जिल्ह्यांचे काम केल्याशिवाय तुम्हाला आम्ही देणार नाही अशा पध्दतीचे जे उत्तर दिलेले आहे ते योग्य नाही. त्या ठिकाणी फ्लोराईडयुक्त पाणी आहे. त्यामुळे माणसाच्या शरीरातील हाडांवर परिणाम होतो. त्यामुळे दात खराब होणे, हाडे कमजोर होणे असे परिणाम होत असताना ही बाब शासनाला गंभीर वाटत नाही. अकरा जिल्हे झाल्यानंतर जेव्हा तुमचा बारावा नंबर येईल तेव्हा देऊ असे म्हणणे म्हणजे त्या जिल्ह्यावर अन्याय आहे. गेल्या तीन वर्षापासून त्या ठिकाणी 30 टक्के नमुने दूषित आहेत हे माहीत असून सुध्दा सर्वप्रथम त्या ठिकाणी हे नमुने शुद्ध करण्याची कार्यवाही करण्याचे सोडून बाकीच्या जिल्ह्यांची नावे सांगून जखमेवर मीठ चोळण्याचे काम शासन करीत आहे. म्हणून माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. अकरा जिल्हे नंतर करा पण अगोदर गोंदिया जिल्हा करा. आपण दिलेल्या उत्तराप्रमाणे या जिल्ह्यातील 30 टक्के पाणी दूषित आहे ते ताबडतोब दुरुस्त करण्याचे काम करावे. जिल्हाधिकाऱ्यांनी, जिल्हा परिषदेच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

अधिकाऱ्यांनी निरोप पाठविले म्हणून ग्रामपंचायत शुद्धिकरणाचे काम करणार का ? हे शुद्धिकरणाचे काम शासनाचे आहे, जिल्हा परिषदेचे आहे. आपल्याकडून या सर्व गोष्टी व्हावयास पाहिजेत. म्हणून या जिल्ह्याला प्रथम प्राधान्य देऊन पहिल्यांदा या जिल्ह्यामध्ये पाणी शुद्धिकरणाचे काम करणार का ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, 1777 पाण्याचे नमुने तपासले त्यापैकी 455 नमुने या जिल्ह्यात दूषित आढळून आले. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी या ठिकाणी जो विषय मांडलेला आहे तो गंभीर आहे. 11 जिल्ह्यांच्या कामाला सुरुवात करीत असताना देखील गोंदियाला अधिक प्राधान्य देऊन आम्ही त्या ठिकाणची व्यवस्था दुरुस्त करु.

श्री. राजेन्द्र जैन : सभापति महोदय, गोंदिया जिले में प्रति वर्ष दूषित पानी का प्रमाण बढ़ रहा है. माननीय मंत्री महोदय ने यह मान्य किया है कि वर्ष 2009, 2010 और 2011 में दूषित पानी का प्रमाण बढ़ा है. लेकिन विदर्भ के ऊपर अन्याय के साथ साथ गोंदिया जिले पर भी हर प्रकार से अन्याय होता है. जैसा कि मंत्री महोदय ने बताया कि पानी शुद्धि के प्रशिक्षण के लिए प्रत्येक ग्राम पंचायत में 1 कर्मचारी की नियुक्ति की गई है, लेकिन मेरी जानकारी के मुताबिक अभी तक किसी भी प्रशिक्षित कर्मचारी की गोंदिया जिले में नियुक्ति नहीं की गई है. शुद्ध पानी का वितरण करने के लिए किसी भी प्रकार का कोई विशेष ध्यान नहीं दिया गया है. गोंदिया जिले के जिस भाग में हम रहते हैं, वहां पर नलों में पूरे 15 दिनों तक काला पानी आया. मेरा सरकार से आग्रह है कि ऐसी शिकायत होने पर हमारा, किसी जन-प्रतिनिधि या किसी अन्य व्यक्ति का पत्र जाने पर इस शिकायत का त्वरित निवारण होना चाहिए. गोंदिया जिले में दिन-प्रतिदिन दूषित पानी का प्रमाण बढ़ रहा है. सरकार ने 11 जिलों का चयन किया है और गोंदिया जिले का चयन नहीं किया है. गोंदिया जिले में ग्राम पंचायत स्तर पर कितने ग्राम पंचायत के कर्मचारी प्रशिक्षित कर उनकी नियुक्ति की गई है, क्या मंत्री महोदय इस बारे में सभागृह में जानकारी देंगे ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, जर सन्माननीय सदस्यांनी त्या गावांची माहिती दिली तर त्या सबंधी निश्चितपणे तशा प्रकारच्या दुरुस्त्या करण्याबाबत सूचना देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ. शी./मु. शी. : विद्या मंदिर उच्च प्राथमिक विद्यालय व विद्या मंदिर हायस्कुल, कामठी कॉलरी,ता.पारसिवनी,जि.नागपूर या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नियमित वेतन न मिळणे याबाबत श्री. नागो पुंडलिक गाणार वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. नागो पुंडलिक गाणार (विदर्भ विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"ब्लॅक डायमंड एज्युकेशन सोसायटी, कामठी कॉलरी , नागपूर व्दारा संचलित विद्या मंदिर उच्च प्राथमिक विद्यालय व विद्या मंदिर हायस्कुल, कामठी, कॉलरी, ता. पारसिवनी, जि. नागपूर या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी, 2010 पासून नियमित वेतन अदा केले गेले नाही. ते आत्महत्या करण्याच्या मन:स्थितीत आले आहेत. त्यांनी वारंवार केलेल्या तक्रारीची दखल शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) जि.प.नागपूर, तसेच शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग यांनी घेतली नाही. या अधिकाऱ्यांचे लक्ष फक्त पैसे गोळा करण्याकडे असून शिक्षकांच्या समस्यांकडे तसेच तक्रारीकडे दुर्लक्ष करण्याकडे आहे."

सभापती महोदय, ब्लॅक डायमंड एज्युकेशन सोसायटी, कामठी कॉलरी , नागपूर व्दारा संचलित विद्या मंदिर उच्च प्राथमिक विद्यालय व विद्या मंदिर हायस्कुल, कामठी, कॉलरी, ता. पारसिवनी, जि. नागपूर या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना माहे जानेवारी, 2010 पासून नियमित वेतन अदा केले गेले नाही. त्यांनी वारंवार शिक्षणाधिकारी (प्राथमिक), शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे तक्रारी केल्या. त्यांनी तक्रारींची दखल घेतलेली नाही. मी स्वत: प्रतिनिधी म्हणून तक्रारी केल्या. माझ्या तक्रारीची सुध्दा दखल घेण्यात आली नाही. आजच्या स्थितीमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी आत्महत्या करण्याच्या मन:स्थितीत आलेले आहेत. या संदर्भात शासनाने तातडीची उपाययोजना करावी व शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांविरुध्द कारवाई करावी अशी मी या विशेष उल्लेखाव्दारे मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. विनायक मेटे)

पृ. शी./मु. शी. : महाड तालुक्यातील हिरकणीवाडी येथील जनतेवर आलेल्या आपत्तीकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष याबाबत श्री. संजय केळकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"28 जून, 1994 रोजी मौजे पारमाची (माझेरी) ता. महाड, जि. रायगड या गावात दरड कोसळून 13 जण मातीच्या ढिगाऱ्याखाली जिवंत गाडले गेले. त्यावेळी शासनाच्या वतीने भूगर्भ शास्त्रज्ञांकडून तालुक्याची भौगोलिक पाहणी केली. त्यानुसार संपूर्ण महाड तालुकाच दरड रेषेत असल्याचा अहवाल शासनास सादर केला गेला. शासनाने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर 25 जुलै, 2005 रोजी तालुक्यातील रोहन, जुई, दासगांव, कोंडीवते या गावावर प्रचंड दरडी कोसळून त्याखाली शासकीय आकडेवारीनुसार 315 जणांना जीव गमवावा लागला, त्यामुळे महाड तालुका पावसाळ्यात दरडग्रस्त संवेदनशील म्हणून गणला जाऊ लागला. त्यानंतर 4 जुलै, 2006 रोजी अतिवृष्टीमुळे हिरकणीवाडी (गावठाण) लगत असलेल्या भातशेतीमध्ये भेगा पडल्या तेव्हापासून तेथील जनता केव्हा दरड कोसळेल या भीतीच्या सावटाखाली जगत आहे. किल्ले रायगडावर पडणाऱ्या पावसाचे पाणी या हिरकणीवाडीच्या कपारीतून जमिनीत शिरत आहे. या ठिकाणी अतिवृष्टीमुळे जमिनीत पाणी शिरण्याचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणात असल्याने हिरकणीवाडीवर आपत्तीची टांगती तलवार असून शासनाचे त्याकडे दुर्लक्ष झाल्याने तेथील जनता भीतीच्या सावटाखाली आहे. तेथील जनतेस धीर देण्यासाठी प्राधान्यक्रमाने उपाययोजना कराव्यात यासाठी सदर विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात उपस्थित करीत आहे, तरी कार्यवाही व्हावी ही विनंती."

यानंतर श्री. कांबळे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : तुरुंगातील 60 वर्षांवरील महिला व पुरुष कैद्यांच्या आरोग्यविषयक समस्या व आहार याकडे लक्ष देणे याबाबत श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. हेमंत टकले (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्याच्या विविध तुरुंगामधील 60 वर्षांवरील महिला व पुरूष कैद्यांच्या संख्येत गेल्या काही वर्षात प्रचंड वाढ झाली आहे. गुन्हेगार म्हणून शिक्षा भोगत असतानासुध्दा, मानवतेच्या दृष्टीकोनातून अशा वयोवृध्द बंदीवानांसाठी वेगळा विचार करण्याची आता गरज आहे. त्यांना सक्तमजुरीची शिक्षा झाली असेल तर वयोमानाप्रमाणे त्यांना द्यावयाची कामे तसेच त्यांच्या आरोग्यविषयक समस्या व योग्य आहार या कडेही लक्ष देणे आवश्यक आहे. राज्याच्या गृह विभागाने यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमावी व योग्य त्या सुधारणा जेल मॅन्युअलच्या आधारे तातडीने करण्यात याव्यात, अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : उच्च व तंत्र शिक्षण विभागाने नेट परीक्षेसंबंधी केलेल्या बदलाची पुस्तिका तयार करणे याबाबत श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

वरिष्ठ महाविद्यालयांत प्राध्यापक होण्यासाठी महत्त्वाच्या असलेल्या नेट परीक्षांच्या पॅटर्न संदर्भात विद्यापीठ अनुदान आयोगाने म्हणजेच युजीसीने महत्वपूर्ण वदन केले आहे. राज्यात दरवर्षी नेट व सेट या परीक्षा घेतल्या जातात. राज्यातून हजारो विद्यार्थी त्या परीक्षा देतात. परंतु, परीक्षांमध्ये उत्तीर्ण होण्याची टक्केवारी अतिशय अल्प आहे. सदर परीक्षांची गुणपत्रिका मिळायची नाही. उत्तरपत्रिका पहावयास मिळायची नाही. आपण नापास का झालो, या विवंचनेत अनेक विद्यार्थी पुन्हा पास होण्यासाठी वारंवार परीक्षा देत असत आणि सध्याही देत आहेत. परंतु, विद्यापीठ अनुदान आयोगाने नुकताच निर्णय घेऊन नेट परीक्षेमध्ये महत्वपूर्ण बदल घडवून आणले आहेत व त्याची अंमलबजावणी जून, 2012 पासून करण्याचे ठरविले आहे. यामुळे नेट परीक्षा देणाऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्य शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने तातडीने या नेट परीक्षामध्ये जे बदल झालेले आहेत, त्या सर्व बदलांचे एकत्रिकरण करुन छोटी पुस्तिका काढून सर्व महाविद्यालय व विद्यापीठांना तातडीने पाठविण्याची व्यवस्था केली पाहिजे, ही विनंती मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून विभागाला करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : मुंबई व नवी मुंबई येथील वाहतुकीचे प्रश्न सोडविण्यासाठी जल वाहतूक करण्याची नितांत आवश्यकता याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि.प.स. यानी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मुंबई व नवी मुंबई येथे मोठ्या प्रमाणात वाढत असलेला वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने बोरीवली ते नरिमन पॉईंट व भाऊचा धक्का ते नेरुळ-मांडवा ही जल वाहतूक करण्याची नितांत आवश्यकता आहे. ही जल वाहतूक सुरू केल्यास, मुंबई व नवी मुंबई येथे वाढत असलेल्या वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यासाठी मोठी मदत होईल. साधारणत: 25 वर्षांपूर्वी भाऊचा धक्का ते रत्नागिरी-मालवण-वेंगुर्ला-गोव्यापर्यंत कोकण जलवाहतूक सुरू होती. ते कोकणचे वैभव होते. चाकरमानी मजेत येत होते. भारत सरकारच्या पर्यावरण विभागाची मान्यता घेऊन ती वाहतूक पुनश्च सुरु करण्यात यावी. ही जलवाहतूक पूर्वीप्रमाणेच मोठ्या प्रमाणात सुरू करण्याचे शासनाने दिलेले आदेश सिडको व राज्य विकास महामंडळाने अंमलात आणून या जल वाहतुकीस मुंबई प्रदेश विकास प्राधिकरण व सिडको यांनी निधी द्यावा. तसेच, जेटी नौकानयन व इतर पायाभूत सुविधा देण्यात याव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सिंधुदुर्ग जिल्ह्यात हत्तींमुळे होत असलेल्या शेतीच्या नुकसानीच्या संदर्भात उपाययोजना करणे याबाबत श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. परशुराम उपरकर (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यात गेली 7-8 वर्षे हत्तींचा उपद्रव सुरू आहे. हत्तींच्या उपद्रवामुळे अनेक शेतकऱ्यांच्या बागायती शेतीचे नुकसान झाले आहे. गेल्या 2 वर्षांपूर्वी शासनाने सौर कुंपण आणि चर काढण्याचे काम करुन हत्तींना रोखण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या उपाययोजना युध्द पातळीवर केल्या व त्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले. आता परत उकाडा सुरू झाल्यानंतर कर्नाटकातील तलारीच्या भागामध्ये 5 हत्ती फिरु लागले आहेत. त्या ठिकाणी ते मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या बागायती शेतींचे नुकसान करीत आहेत. गेल्या 2 वर्षांपूर्वी हत्ती दोडामार्गवरून सावंतवाडी, वेंगुर्ला, कुडाळ आणि कणकवलीपर्यंत पोहचले होते. आता हे हत्ती दोडामार्ग पर्यंत आले आहेत. हे हत्ती रोखून परत कर्नाटकामध्ये पाठविण्यासाठी शासनाने ठोस भूमिका घेऊन यावर उपाययोजना करण्याची गरज आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : पुणे शहरात चुकीच्या वाहतुकीमुळे अपघात होणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

सभापती महोदय, पुणे शहरात सन 2010-11 मध्ये चुकीच्या वाहतुकीमुळे 439 जणांचे बळी गेले आहेत आणि 549 जण जखमी झाले आहेत. शहराचा वाहतूक आराखडा करणे गरजेचे आहे. राज्य शासनाकडे शेकडो वेगवगळ्या सूचना केल्या आहेत. पुणे स्टेशन परिसरातील स्थानकांवर मोठ्या प्रमाणात हलगर्जीपणा झालेला दिसतो. अनेक सिग्नल्स बंद आहे. अनेक ठिकाणी असलेले रस्त्यावरील स्पीड ब्रेकर्स प्रचंड उंच असल्यामुळे वाहने आपटून अनेक अपघात झाले आहेत. पीएमपीएलच्या बसेसचे अनेक अपघात झाले आहेत. वाहतूक सुधारणा प्रकल्प, 2011 ची आवश्यकता आहे. पुणे महानगरपालिकेने हा प्रस्ताव राज्य शासनाकडे दिलेला आहे. परंतु, अद्याप त्याला मान्यता मिळालेली नाही. पुणे महानगरपालिकेच्या अंतर्गत विविध प्रकारच्या प्रवासाच्या योजना आहेत, मग त्यामध्ये मेट्रो रेल असेल, मोनो रेल असेल, वेगवेगळ्या प्रकारचे फ्लायओव्हर असतील. सदर बाबतीत नेमके काय धोरण असावे, यासाठी अंतर्गत कन्सल्टंट नेमण्याची व्यवस्था असणे गरजेचे आहे. परंतु, याबद्दल राज्य शासनाकडून परवानगी न मिळाल्यामुळे आणि हा वाहतूक सुधारणा प्रकल्प प्रलंबित राहिल्यामुळे पुणेकरांच्या जीवनावर सातत्याने संकट ओढवत आहे. सुधारणा प्रकल्प त्वरित मंजूर करावा, अशी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून राज्य शासनाला विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सावरगाव गावाला तीर्थक्षेत्राचा दर्जा देणे याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. धनंजय मुंडे (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, समता, शांतता अध्यात्म, शिक्षण व वारकरी संप्रदायाची शिकवणूक देणारे संत श्रेष्ठ भगवानबाबा यांचे पाटोदा तालुक्यातील सावरगाव हे जन्मस्थळ अनेक वर्षांपासून विकासापासून वंचित आहे. या गावात दर्शनासाठी असंख्य भाविक येतात. सर्व गावाला पिण्याच्या पाण्याच्या, रस्त्यांच्या अनेक समस्यांनी ग्रासले आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, या गावाला तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन तीर्थक्षेत्र योजनेतून या गावाचा संपूर्ण विकास शासनाच्या मार्फत व्हावा.

..7

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये महिलांना स्वच्छतागृहे नसणे याबाबत श्री. सतीश चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, सन 1982 मध्ये औरंगाबाद नगरपालिकेचे महानगरपालिकेत रुपांतर झाले. 29 वर्षांच्या कालावधीत अनेकदा महापौरपद उपभोगले गेले. परंतु, तरीही औरंगाबाद महानगरपालिका हद्दीमध्ये महिलांसाठी स्वच्छतागृहे नाहीत. परिणामी, कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या महिलांची कुंचबणा होते. महानगरपालिकेने महिलांसाठी प्रभागनिहाय स्वच्छतागृहे उभारण्याची आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

(पुढे सुरु ....

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

महोदय, मी सदर औचित्याच्या मुद्याद्वारे सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर प्रकाश टाकतो. बीड जिल्ह्यात सन 2010-11 या शैक्षणिक वर्षात मॅट्रिकपूर्व अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजनेंतर्गत 15389 विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर झाली आहे. मात्र आजपर्यंत फक्त 11235 विद्यार्थ्यांचे बँकेत खाते उघडण्यात आले आहेत, उर्वरित 4000 विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित आहेत. जिल्ह्यातील राष्ट्रीयकृत बँका व संबंधित शाळांच्या मुख्याध्यापक यांच्या उदासीनतेमुळे 4000 विद्यार्थी अल्पसंख्यांक शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहिले आहेत. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष संपत आले आहे. 4000 विद्यार्थ्यांना तत्काळ शिष्यवृत्ती मिळण्यासाठी तातडीने बँकेमध्ये खाते उघडण्याबाबत संबंधित शाळांच्या मुख्यध्यापकांना व बँकांना निर्देश देण्याची आवश्यकता आहे. हा विषय गंभीर व विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा आहे.

(नंतर श्री.भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.विनायकराव मेटे) : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.45 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.50 ते 2.45 वाजेपर्यंत मध्यंतरासाठी स्थगित झाली)

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

पृ.शी./मु.शी.: सन 2011-2012 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

उप सभापती : सन्माननीय सदस्यांना हे माहीतच असेल की, पूरक मागण्यांवरील चर्चेचा आजचा दुसरा व शेवटचा दिवस आहे. आज कार्यक्रम पत्रिकेवर दाखविलेल्या मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होणार आहे. पूरक मागण्या आणि त्याखालील बाबी यासंबंधीची माहिती सदस्यांना पत्रक भाग दोन द्वारे वेगळी प्रसृत करण्यात आली आहे. प्रत्येक सदस्याने भाषण करताना बाब क्रमांक आणि पूरक विवरण पत्राचा पृष्ठ क्रमांक सांगण्याची कृपा करावी. ही चर्चा मंत्रिनिहाय होत असल्याने संबंधित मंत्र्यांच्या सर्व विभागांबाबत सदस्यांनी बोलावे. त्यानंतर मंत्री महोदयांना एकदम उत्तर देणे सुलभ होईल. चर्चा संबंधित बाबी पुरतीच मर्यादित असून मूळ मागणीवर चर्चा करता येणार नाही, हे सदस्यांना सांगावयास नकोच.

कार्यक्रम पत्रिकेवर दर्शविलेल्या मंत्र्यांच्या पूरक मागण्यांवरील चर्चा व उत्तर शक्यतोवर आजच पूर्ण करावयाची आहे, हे सदस्यांनी कृपया ध्यानात घ्यावे. तसेच काल दि. 21 मार्च, 2012 रोजी चर्चा झालेले पण उत्तर बाकी असलेल्या मंत्री महोदयांचे विभाग एक म्हणजे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री आणि दुसरा विभाग अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री या दोन्ही मंत्र्यांच्या विभागांवरील चर्चेचे उत्तरही आजच घेण्यात येईल.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

शीर्षक : विविध मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या

उप सभापती : खालील मंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या एकत्रितपणे चर्चेस घेण्यात येतील.

1. मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या म्हणजे मागणी क्र.ए-1, ए-3, ए-4, बी-3, एफ-1, एफ-2, एफ-3, जे-1, क्यू-1, क्यू-2, क्यू-3
2. उप मुख्यमंत्र्यांच्या विभागांच्या पूरक मागण्या म्हणजे मागणी क्र. जी-1, जी-5, जी-6, के-1, के-6, के-11, ओ-7, ओ-9, ओ-16, ओ-17, ओ-18, ओ-19, ओ-20, ओ-21, ओ-22, ओ-23, ओ-24, ओ-25, ओ-26, ओ-27, ओ-28 व ओ-29
3. उद्योग, बंदरे आणि रोजगार व स्वयंरोजगार मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. के-3 व के-7
4. सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) आणि पर्यटन मंत्री यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. एच-4, एच-6, एच-7 व एच-8
5. वने, पुनर्वन व मदतकार्य आणि भूकंप पुनर्वसन मंत्री यांच्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्र.सी-5, सी-6 व सी-7
6. सहकार व संसदीय कार्य विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. पी-1 व व्ही-2
7. महसूल व खार जमीन विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. सी-1 व सी-5
8. जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्र्यांच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. आय-3
9. उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांच्या विभागांच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. डब्ल्यू-2, डब्ल्यू-3, डब्ल्यू-4 व डब्ल्यू-6
10. शालेय शिक्षण मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. ई-1 व ई-2
11. वस्त्रोद्योग, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. झेडई-1
12. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण, राजशिष्टाचार मंत्र्यांच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. आर-1

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती.....

13. कामगार आणि विशेष सहाय्य मंत्र्यांच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. के-4
14. पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय मंत्र्यांच्या मागण्या म्हणजे मागणी क्र.डी-1
15. क्रीडा व बाल विकास मंत्र्यांच्या विभागाची मागणी क्र. ई-3
16. महिला व बाल विकास मंत्री यांच्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. एक्स-1
17. पर्यावरण व सांस्कृतिक कार्य मंत्र्यांच्या विभागाच्या मागण्या म्हणजे मागणी क्र. यू-1 व झ ेडडी-2 या मागण्या चर्चेला घेण्यात येतील.

आता सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी आपले भाषण सुरु करावे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : महोदय, बाब क्र. 2, पृ.क्र. 3 - सामान्य प्रशासन विभागाच्या अनुषंगाने मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, शासनाच्या सेवेतून निवृत्त होणारे सनदी अधिकारी विशेष करुन आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी आपली सेवा संपल्यानंतर किंवा स्वेच्छा निवृत्ती घेऊन खाजगी कंपन्यांना आपले सेवा देतात तसेच शासनाकडून निवृत्ती वेतन देखील घेत असतात. हे अधिकारी त्या त्या कंपन्यांमध्ये गेल्यानंतर त्या कंपन्यांची कामे मंत्रालयातून करुन घेत असतात. मी एकदा एका विभागाच्या सचिवांकडे कामाच्या निमित्ताने गेलो असता त्या सचिवांसोबत माझी चर्चा सुरु होती. त्याच वेळेस या राज्याचे माजी मुख्य सचिव सुध्दा त्या सचिवांकडे आले. आमची चर्चा सुरु असताना हे माजी मुख्य सचिव आल्यामुळे चर्चा अर्धवट सोडून ते सचिव उभे राहिले व त्यांचे स्वागत करुन मला "दोन मिनिटे थांबा" असे ते म्हणाले व त्या माजी मुख्य सचिवांना घेऊन बाजूला बसले. हा प्रकार योग्य नाही. माझ्यासारखा खट आमदार या सचिवांशी सार्वजनिक कामासंबंधीची, जनतेच्या कामांसबंधीची चर्चा करीत असताना हे निवृत्त सनदी अधिकारी मध्येच येतात तरी देखील त्यांच्याबद्दल एवढा आदर दाखविला जातो. वास्तविक ते त्यांच्या कंपनीमार्फत काम करुन घेण्यासाठी तेथे आले होते. अशा परिस्थितीत कोणत्या कामाला व कोणाला प्रायॉरिटी दिली पाहिजे याचा विचार होणे देखील गरजेचे आहे. हे अधिकारी रिलायन्स किंवा बिरला सारख्या लिडींगच्या कंपन्यांमध्ये जातात आणि पुन्हा आपल्याकडेच येऊन प्राधान्याने कामे करुन घेतात. या गोष्टींना कायद्याने बंदी केली पाहिजे. त्यात जे सनदी अधिकारी विशेषत: आय.ए.एस. दर्जाचे अधिकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर किंवा अर्धवट सोडून जातात त्यांना इतर ठिकाणी जाण्यास बंदी घातली पाहिजे. वास्तविक यांना जनतेच्या पैशातूनच प्रशिक्षण दिले जाते. आमचाच पैसा खर्च करुन घेतलेले शिक्षण भांडवलदार कंपन्यांना विकतात यावर बंधन घातले पाहिजे. त्यांच्या ज्ञानाचा फायदा जनतेला मिळेल अशी अपेक्षा असते म्हणून याला कायद्याने बंदी घालणे आवश्यक आहे. तसेच असा कायदा बनविण्यात आपले राज्य हे देशाच्या पातळीवर पहिलेच राज्य होईल असा निर्णय शासनाने घ्यावा. त्यानुसार सरकारी नोकरी पत्करल्यानंतर त्यांना मध्येच सोडून खाजगी कंपन्यांमध्ये नोकरीसाठी जाता येणार नाही किंवा इतर ठिकाणी काम देखील करता येणार नाही असे बंधन घातले पाहिजे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात अनेक सेक्रेटरी शासकीय सेवा सोडून गेले होते. मध्यंतरीच्या काळात सेक्रेटरी श्री.जयंत कावळे हे सुध्दा शासकीय सेवा सोडून गेले होते. ते एकदा मला भेटले होते त्यावेळेस मी त्यांना सांगितले की, तुमच्या सारख्या बुद्धिमान लोकांची शासनाला गरज आहे त्यामुळे तुम्ही शासकीय सेवा सोडून जाऊ नका. त्यावेळेस श्री. कावळे मला म्हणाले की, शासकीय सेवेत मला महिन्याला 40 हजार रुपये पगार मिळतो परंतु मला आता महिन्याला 40 लाख रुपये पगार मिळत असल्यामुळे शासकीय सेवेत कसे काय काम करु ? त्यामुळे यासंदर्भात शासनाने विचार करावा अशी माझी सूचना आहे.

सभापती महोदय, प्रशासन हे नेहमी स्वच्छ राहिले पाहिजे. जेट एअर लाईन्स कंपनी आर्थिक दृष्टया डबघाईस आलेली आहे. प्रवाशांना विमान तिकिटाचे पैसे सुध्दा परत दिले जात नाही. परंतु जेट एअर लाईन्स कंपनीचे मालक सांगतात की, माझी कंपनी बुडाल्यामुळे मी पैसे देऊ शकत नाही. केंद्र शासनाने टॅक्सच्या रुपाने तसेच डिझेल व पेट्रोलचे पैसे माझ्याकडून ॲडव्हान्स घेतलेले आहेत त्यामुळे मी प्रवाशांना पैसे देऊ शकत नाही.

सभापती महोदय, ग्राहक संरक्षण कायदा आपल्या राज्यात असल्यामुळे या कायद्याच्या अनुषंगाने जेट एअर लाईन्सवर ॲक्शन घेतली पाहिजे. जेट एअर लाईन्सच्या मालकाच्या वेगवेगळया कंपन्या आहेत. अलिबाग येथे विजय मल्ल्याचा 25 एकरावर बंगला असून त्याच्याकडे 400 कर्मचारी व 500 गाडया आहेत. असे असतांना विजय मल्ल्या सांगतो की, पैसे परत देणार नाही तर त्यांच्यावर ग्राहक संरक्षण कायद्याखाली कारवाई करण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, छोटया उद्योगावाल्यांकडे ग्राहकांचे पैसे राहिले तर त्यांच्यावर ग्राहक संरक्षण कायद्याखाली कारवाई केली जाते. मी रायगडमध्ये डिपार्टमेंटल स्टोअर चालवतो परंतु आमच्यावर 2-3 तरी केसेस ग्राहक संरक्षण कायद्याखाली असतात तर विजय मल्ल्यावर ग्राहक संरक्षण कायद्याखाली केसेस का चालवल्या जात नाहीत.

सभापती महोदय, शेतक-यांना पैसे द्या म्हणून मागणी केली तर सरकार सांगते की, आर्थिक अडचण आहे. परंतु विजय मल्ल्याकडे हजारो कोटी रुपयांची संपत्ती असतांना ते सांगतात की, आम्ही प्रवाशांचे पैसे परत करु शकत नाही उलट केंद्रशासनाने आम्हाला 5 हजार कोटी रुपये दिले तरच मी जेट एअर कंपनी चालवू शकतो. त्यामुळे विजय मल्ल्यावर ग्राहकांची फसवणूक केल्याबद्दल कारवाई झाली पाहिजे अशी पूरक मागण्याच्या निमित्ताने मागणी करतो...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र.पाटील ....

सभापती महोदय, बाब क्रमांक 33, पृष्ठ क्रमांक 33 च्या संदर्भात मी विचार मांडणार आहे. सचिन तेंडूलकराचे अभिनंदन केले त्याबद्दल मला आनंदच झालेला आहे. परंतु आपल्या राज्याचा मुख्य खेळ कबड्डी होता स्व.बुवा साळवी यांनी खरे म्हणजे महाराष्ट्रातील कबड्डीला संपूर्ण भारतात नेले. कबड्डीला मी ऑलम्पिक खेळात घेऊन जाईन असे बुवा साळवी यांचे स्वप्न होते. त्यावेळेस माझे वडील कबड्डीचे उपाध्यक्ष होते. देशाचे कृषीमंत्री कबड्डीचे असोसिएशनच अध्यक्ष होते.

सभापती महोदय, हिंदुस्थानच्या महिला कबड्डी पटुंनी जागतिक पातळीवर क्रमांक एकचे पद मिळवल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. परंतु या महिला कबड्डी पटुंचे क्रीडा खात्याने विमान तळावर स्वागत करण्यासाठी जावयास पाहिजे होते परंतु ते गेले नाही. कबड्डी हा खेळ मूलतः: कोकणातील आहे. आपल्या कबड्डीला युरोप, चायना व अमेरिकावाले त्यांच्या देशात घेऊन गेल्याशिवाय राहणार नाही.

यानंतर श्री. भारवि...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

सभापती महोदय, क्रीडा विभागाच्या पुरवणी मागण्यांबाबत बोलत असताना सदनामध्ये माननीय मंत्री महोदय उपस्थित असल्याचे दिसत नाही. मात्र राज्य शासनाने याबाबत खऱ्या अर्थाने वेगळी तरतूद, वेगळे धोरण जाहीर केले पाहिजे की, आपले जे देशी खेळ आहेत, त्यांना प्रोत्साहन देऊन ते ऑलींपीकच्या पातळीवर कसे जातील आणि तेथही आपले खेळाडू नावीन्यपूर्ण कशा प्रकारे कामगिरी करतील यादृष्टीकोनातून विचार करण्याची आवश्यकता आहे.मी निश्चितपणे सांगू इच्छितो की, आता माजी केंद्रीय मंत्री श्री.सुरेश कलमाडी यांच्यामुळे क्रीडा खात्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन निश्चितपणे बदललेला आहे. आम्हाला असे वाटत होते की, माजी केंद्रीय मंत्री श्री.सुरेश कलमाडी हे चांगल्या प्रकारे काम करीत होते. पण प्रत्यक्षात त्यांनी जी कामगिरी केली, त्यामुळे आपल्या राज्याला मान खाली घालावी लागली. माजी केंद्रीय मंत्री श्री.सुरेश कलमाडी यांची क्रीडा क्षेत्रामधील कारकीर्द काळीकुट्ट म्हणावी लागेल.राज्य शासनाने बालेवाडी निर्माण करण्यासाठी जागा दिली, त्यासाठी निधी दिला तसेच राज्य शासनाने तेथे झालेल्या सर्व खेळांच्या स्पर्धेसाठी करोडो रुपये दिलेले आहेत आणि अशा वेळी तेथे जे प्रकार घडले,ज्या पध्दतीने ते करण्यात आले ते अतिशय वाईट आहे. या गोष्टींची पुनरावृत्ती होता कामा नये याची दक्षता राज्य शासनाने खऱ्या अर्थाने घ्यावयास पहिजे.

सभापती महोदय, बाब क्र.42, पान क्र.42 ही वित्त विभागाच्या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांचा कारभार पारदर्शक आहे.सगळेजण त्यांच्या कारभाराचे कौतुक करतात. आम्ही देखील त्यांच्याकडे वेगळ्या नजरेने पहातो की, याठिकाणी ते एक चांगले प्रशासन देत आहेत. परंतु पुरवणी मागण्या म्हणजे काय? याबाबतीत मला असे वाटते की, सन्माननीय मुख्यमंत्री यांनी अर्थ खात्याकडे लक्ष द्यावयास पाहिजे. आपल्या राज्याचा मूळ अर्थसंकल्प हा 1 लाख 54 हजार कोटी रुपयांचा असून जुलै महिन्यामध्ये ज्या 3035 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडण्यात आल्या. तसेच डिसेंबर मध्ये 6032 कोटी रुपयांच्या आणि मार्च महिन्यामध्ये 4066 कोटी रुपयांच्या मांडण्यात आल्या. पूर्वी मी लहान असताना माझ्या वडिलांबरोबर, काकांच्या बरोबर येथे येत असे. त्यावेळी पुरवणी मागण्या या 200-300 किंवा 400 कोटी रुपयांच्या असावयाच्या. पण आता पुरवणी मागण्या म्हणजे पर्यायी बजेटच झालेले आहे आणि ही बाब शोभनीय आहे असे मला वाटत नाही. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी पुरवणी मागण्यांच्या बाबतीत कंट्रोल आणावयास पाहिजे. मार्च मध्ये जो अर्थसंकल्प मांडला जातो, त्यावेळी याबाबत काय करावयाचे किंवा काय करावयाचे नाही हे सांगावे म्हणून मी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील . . . .

पुरवणी मागण्यांच्या बाबतीत निश्चितपणे खेदाने बोलू इच्छितो की, या पुरवणी मागण्यांचा आकडा हा दिवसेंदिवस जशी वर्षे वाढत चालली आहेत, त्याप्रमाणे वाढत आहे. मला देखील एक सदस्य म्हणून 12 वर्षे झाली आहेत आणि ती रक्कम देखील वाढत चालली आहेत. एक वेळ अशी येईल की, बजेटमध्ये जेवढया रकमेची मागणी केलेली असते, त्याच्या पेक्षा जास्त रकमेसाठी पुरवणी मागण्यांना मान्यता देण्यासाठी शासन भाग पाडेल. मात्र तशी वेळ येऊ नये आणि आपल्या कारकिर्दीमध्ये ही परंपरा तुटली पाहिजे अशी माझी यानिमित्ताने अपेक्षा आहे.

सभापती महोदय, बाब क्र.43, पान क्र.46 सावर्जनिक बांधकाम विभागाच्या संदर्भात मी सदनामध्ये सांगितले होते की, कोल्हापूर मधील मंडळी वेगळी आहेत आणि त्या शहरामध्ये टोल लावू नका. तेथे कोणी श्रावण बाळ आहेत, कोणी राजे आहेत, कोणी महाराजे आहेत, सगळे आहेत. आमचे माननीय मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांना तेथे श्रावण बाळ म्हटले जाते. त्यांना श्रावण बाळ असे म्हटले की, आम्हाला बरे वाटते. एका मुस्लिम व्यक्तीला श्रावण बाळ म्हटले की आम्हाला एकदम मजा वाटते., आम्ही वेगळ्या नजरेने पहातो. तसेच मी कोल्हापूरला केवळ पांढरा रस्सा खाण्यासाठी जातो. कोल्हापूरचे जेवण हा माझा वीक पॉईंट आहे. परंतु माननीय मंत्री महोदयांनी कोल्हापूर मध्ये 250 कोटी रुपयांची रस्त्यांची कामे केली आहेत आणि कोल्हापूर हे शहर असले तरी सोलापूर हे खेडेगावासारखे आहे. कोल्हापूर महापालिकेच्या परिसरामध्ये शेती देखील होत आहे. अजूनही महापालिका क्षेत्रामध्ये ऊस पिकविला जातो आणि तसेच सन्माननीय सदस्य श्री.संपतबापूंच्या गावामध्येही शेती केली जाते. तसेच रंकाळा तलावाच्या पलीकडच्या भागामध्ये सुध्दा शेती केली जाते.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील....

त्या ठिकाणी राज्य सरकारने शहरामध्ये टोल वसूल करण्याची यंत्रणा बसवू नये. आज जेथे 250 कोटी रुपयांचा टोल वसूल करायचा आहे तेथे आंदोलन झाले. कोल्हापूरवाले दणकट आहेत, त्यांचे राज्य शासनामध्ये वजन आहे. या प्रश्नासंबंधी त्यांनी सर्वपक्षीय आघाडी केली. उद्या मुंबई-गोवा रस्त्याचे काम पूर्ण झाल्यावर टोलचे पैसे राज्य शासनाने भरावे यासाठी आम्ही आंदोलन करु. तेव्हा अशा प्रकरणाबाबत आपण ठोस धोरण ठरविले पाहिजे असे मला वाटते.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 57, बाब क्रमांक 49- जल संपदा विभाग- जोपर्यंत अपूर्ण प्रकल्प पूर्ण होत नाहीत तोपर्यंत कोणतेही नवीन प्रकल्प घेऊ नका असे माननीय राज्यपालांनी सरकारला सांगितलेले आहे. ज्येष्ठ सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख साहेब यांच्या नेतृत्वाखाली अनुशेषाबाबत चर्चा करण्यासाठी आम्ही माननीय राज्यपालांकडे गेलो होतो त्यावेळी त्यांनी हे सांगितले होते. या संदर्भातील सर्व प्रकरणे घेऊन मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना भेटणार आहे. वन विभागामध्ये प्रकल्प येत असला तरी नवीन धरण प्रकल्प घ्यायचा आणि त्याचे टेंडर काढायचे. जर 400 कोटी रुपयांचे टेंडर असेल तर कायद्याप्रमाणे ठेकेदाराला 10 टक्के प्रमाणे 40 कोटी रुपये मोबिलायझेशन ॲडव्हान्स द्यावा लागतो. मग शेतकऱ्यांच्या शेतीचे पैसे मिळाले नाहीत म्हणून शेतकऱ्यांना काम बंद पाडावयास लावणार. ठेकेदार आपली मोडकी-तोडकी मशिनरी आणून प्रकल्पाच्या ठिकाणी ठेवणार आणि माझे काम बंद पडले म्हणून शासनाकडे त्याबाबत जादाचा क्लेम करणार अशा प्रकारे शासनाकडून पैसे वसूल करणार. मी आपणाकडे अशा प्रकल्पांची नावे देईन. वेळ कमी असल्यामुळे मी ही सर्व आकडेवारी आता मांडत नाही. परंतु विधेयकाच्या वेळी मी ही सर्व आकडेवारी येथे देईन. माझी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्र्याकडे मागणी आहे की, त्यांनी नवीन कामे होणार नाहीत असे येथे सांगावे. ठेकेदारास 10 टक्के मोबिलायझेशन ॲडव्हान्स, 5 टक्के तुमच्या खिशात, 2 टक्के अधिकाऱ्यांच्या खिशात असे जाहीररीत्या वाटप सुरु आहे. हे कुठेतरी थांबले पाहिजे.

सभापती महोदय, मी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्री महोदयांना एका प्रकल्पाचे उदाहरण देतो. त्याची त्यांनी चौकशी करावी अशी माझी विनंती आहे. कर्जतमध्ये कोंढे धरण आहे. त्या धरणाच्या कामासाठी सुरुवातीला 40 कोटी रुपयांचे टेंडर काढण्यात आले. त्या कामाची वर्क

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील..

ऑर्डर दिली. नंतर अधिकाऱ्यांना वाटले की या धरणाची उंची वाढविली पाहिजे. त्यानुसार कामाचे अंदाजपत्रक 450 कोटी रुपयांवर गेले. म्हणजे 40 कोटी रुपयांचे टेंडर 450 कोटी रुपयांवर नेण्याचा विक्रम जलसंपदा विभागाने केलेला आहे. हे सर्व रेकॉर्डवर आहे. हे सर्व काय चालले आहे ? एकीकडे सांगितले जाते की आमच्याकडे निधी नाही आणि दुसरीकडे 40 कोटी रुपयांचे टेंडर 450 कोटी रुपयांवर जात आहे. 10 टक्के प्रमाणे 400 कोटी रुपयांचे 40 कोटी रुपये मिळतात. आपण सर्वत्र पैसे वाटता, आम्ही कशाला निवडून येतो. पैशातून सत्ता आणि सत्तेतून पुन्हा पैसा हे आपले सूत्र सुरु आहे. माननीय मुख्यमंत्री महोदय, हे तुमचे आणि आमचे काम नाही. आपण शेकापच्या कुळातून आलेला आहात. तुम्हा आम्हाला हे जमणार नाही. तेव्हा आपण हे कुठेतरी थांबवावे अशी माझी अपेक्षा आहे. आपण या प्रकरणाची स्वत: चौकशी करावी. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मला वेळ दिल्यास मी आपणास भेटेन. आपण हे कुठेतरी थांबवून आपल्या कारकिर्दीमध्ये एक रेकॉर्ड करावा. बाहेर चर्चा आहे की, माननीय मुख्यमंत्री किती दिवस राहणार आहेत ? परंतु मला माहीत आहे की, आपण आपला पाच वर्षाचा कार्यकाळ पूर्ण करणार आहात. आपण हे कुठेतरी थांबवावे. या राज्याची लूट थांबली पाहिजे असे मला मनापासून वाटते.

माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी एकदा भेटलो होतो. एका मामलेदाराची बदली करण्यासाठी मी आपणास भेटलो होतो. रॉयल्टी संदर्भातील तो प्रश्न होता. परंतु आपण ताबडतोब तीन महिन्यात त्यांची बदली केली. माझे काम होईल असे मला त्यावेळी वाटले नव्हते. परंतु आपण माझे काम केल्याबद्दल आपले आभार मानतो. त्यानंतर मी आपणास भेटलो नाही.

यानंतर कु.थोरात..

अनुधावित प्रत/ शीघ्रलिपीकाची नाही

SMT/ प्रथम श्री. अजित..... 15:05

श्री. जयंत प्र. पाटील.....

मला असे वाटते की मी एक आमदार आहे. बाकीचे वेगवेगळया क्षेत्रातील लोक माननीय मुख्यमंत्र्यांना भेटावयाला येतात. बऱ्याचवेळा तेच तेच लोक भेटत असतात. एके दिवशी सकळाच मी आणि सन्माननीय सदस्या श्रीमती मिनाक्षीताई पाटील माननीय मुख्यमंत्र्यांना भेटण्यासाठी त्यांच्या बंगल्यावर गेलो होतो तेव्हा त्या ठिकाणी एकही एंजट नव्हता की एकही माणूस नव्हता. माननीय मुख्यमंत्र्यांचा बंगला पहिल्यांदाच असा रिकामा दिसला. माननीय मुख्यमंत्री बंगल्यावर आहेत की नाही हे सुध्दा आम्हाला कळत नव्हते. माननीय मुख्यमंत्री आहेत का असे मला विचारावे लागले तेव्हा माननीय मुख्यमंत्री असल्याचे आम्हाला सांगण्यात आले. त्यानंतर माननीय मुख्यमंत्री दहा मिनिटात बाहेर आले आणि आम्हाला भेटले त्यानंतर आम्ही लगेच तेथून निघून गेलो आम्ही गेल्यानंतर माननीय मुख्यमंत्री त्यांच्या गाडीत बसून निघून गेले. सांगण्याचे तात्पर्य असे की, आम्हाला माननीय मुख्यमंत्र्या बद्दल एक वेगळा आदर वाटतो. त्यांची काम करण्याची एक विशिष्ट पध्दती आहे. सभापती महोदय, बोलण्यासारखे बरेच मुद्दे आहेत पण मी जास्त वेळ बोलणार नाही.

सभापती महोदय, बाब क्रमांक 59 पान क्रमांक 67 उद्योग या विषयावर मी बोलणार आहे. इंडिया बुल्स या कंपनीचे अलिबाग तालुक्यातील रिझर्व्हेशन उठलेले आहे पण त्यासंबंधीची फायनल ऑर्डर निघालेली नाही त्यामुळे शेतकऱ्यांना त्या ठिकाणी नवीन बांधकाम करता येत नाही. घर बांधता येत नाहीत. इंडिया बुल्सने तो प्रोजेक्ट रद्द केलेला आहे. त्या नोटिफिकेशनवर सचिवांची अंतिम सही सहा महिन्यापासून होत नाही. याकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय,बाब क्रमांक 121 पान क्रमांक 121 सार्वजनिक आरोग्याच्या संदर्भात मी या ठिकाणी बोलणार आहे. डॉ. शिंदे यांच्या सेवानिवृत्तीच्या संदर्भात मी या सभागृहात अनेक वेळा मुद्दा मांडलेला आहे तसेच यासंदर्भात राज्य मंत्री महोदयांना तसेच कॅबिनेट मंत्री महोदयांना भेटलो आहे. डॉ. शिंदे सीमा भागातील आहेत. त्यांचे सासरे सीमा भागातील आमदार होते म्हणून सीमा भागातील लोकांनी हे काम झाले पाहिजे असे मला सांगितले होते. मागच्या अधिवेशनात या संदर्भातील कार्यवाही पुढील एका महिन्यात होईल असे सांगण्यात आले होते पण ती कार्यवाही अद्याप झालेली नाही ती कार्यवाही लवकरात लवकर व्हावी याकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधू इच्छितो.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील.....

सभापती महोदय, शेवटच्या बाबीवर बोलून मी माझे विचार संपवणार आहे. बाब क्रमांक 136 पान क्रमांक 141 सहकार विभागातील महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या निवडणुकीबद्दल मी बोलणार आहे. मी पंधरा ते वीस वर्षे या ठिकाणी काम केलेले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेची आजची कामकाज पध्दती बघितल्यानंतर ही संस्था टिकविण्यासाठी ती लोकप्रतिनिधींच्या ताब्यात असली पाहिजे असे मला वाटते. या बँकेची आताची जी बॅलन्शीट आहे ती सुधारलेली आहे. मी देखील आमच्या जिल्ह्यातील बँकेमार्फत अनेक कारखानान्यांना जॉईंट व्हेन्चरमध्ये पैसे दिलेले आहेत. उदाहरणार्थ गडहिंग्लजच्या कारखान्याला दहा कोटी रुपये दिलेले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांच्या बँकेने आणि आमच्या बँकेने जॉईन्ट व्हेन्चेरमध्ये पैसे दिलेले आहेत आणि आम्ही त्यामध्ये अडचणीत आलेलो आहोत. या बँकेचे जे प्रशासक आहेत त्यांना यातील ज्ञान किंवा आवड नाही. शासनाने या संदर्भात केलेल्या कारवाई बद्दल मी बोलणार नाही. आम्ही याच भूमिकेतून या ठिकाणी पंधरा ते वीस वर्षे काम केलेले आहे. परंतु ही निवडणूक लवकर झाली पाहिजे यासाठी प्रयत्न करण्यात यावेत अशी माझी अपेक्षा आहे मी माझ्या भाषणाचा समारोप करताना पुरवणी मागण्यांची डिमांड वाढत आहे ती कमी होईल अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करतो आणि माझे विचार संपवितो.

....3...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भात अधिकाऱ्यांना निलंबित करणे.

मु.शी.: आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भात अधिकाऱ्यांना निलंबित करण्यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन.

श्री. पृथ्वीराज चव्हाण (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

आदर्श सहकारी गृहनिर्माण संस्था, कुलाबा यासंदर्भात सी.बी.आय.ने फौजदारी प्रकरण दाखल केले होते. फौजदारी प्रकरणाशी संबंधित चौकशीच्या अनुषंगाने सी.बी.आय.ने दिनांक 14 मार्च, 2012 रोजी शासनाकडे पत्र पाठविले. त्या पत्राला अनुसरुन राज्य शासनाने दिनांक 15 मार्च, 2012 व दिनांक 21 मार्च, 2012 च्या पत्रान्वये सी.बी.आय.कडून अधिक माहिती मागविली. त्यास अनुसरुन सी.बी.आय. ने त्यांच्या दिनांक 21 मार्च, 2012 रोजी पाठविलेल्या पत्रातील वस्तुस्थिती विचारात घेऊन भारतीय प्रशासन सेवेतील कार्यरत अधिकारी श्री. जे.एम. फाटक, सध्या सदस्य सचिव, उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास मंडळ, मुंबई व श्री. प्रदीप व्यास, सध्या सचिव (व्यय), वित्त विभाग यांना आज दिनांक 22 मार्च, 2012 पासून सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. या संबंधीची माहिती निलंबनाच्या कारवाईसह नियमाप्रमाणे केंद्र शासनाच्या (DOPT) खात्यास कळविण्यात येत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय आपल्याला आणि माननीय मुख्यमंत्र्यांना धन्यवाद देतो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : सन 2011-2012 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा

(चर्चा पुढे सुरु)

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, प्रथम मी बाब क्रमांक 3 च्या संदर्भात बोलणार आहे. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी काल या ठिकाणी जे निवेदन केले ते महाराष्ट्राच्या दृष्टीने आणि आमच्या दृष्टीने फार महत्वाचे होते. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी असा आक्षेप घेतला की, माननीय मुख्यमंत्री दर शनिवार-रविवारी दिल्लीला का जातात ? ते दिल्लीला का जातात या बाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, मी महाराष्ट्राच्या कामाकरिता जातो आणि जेव्हा जेव्हा जातो तेव्हा तेव्हा महाराष्ट्राच्या प्रश्नाचा निकाल लावून येतो. ही फार अभिमानाची बाब आहे. त्याचा दुसरा अर्थ असा आहे की, इतर मुख्यमंत्री का जातात याचे चिंतन आता प्रत्येकाला करावे लागत आहे. उद्योगाच्या संदर्भात बोलताना या महाराष्ट्रामधील उद्योजकांच्या त्यांनी काही बैठका घेतल्या, उद्योजकांची मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक आणली आणि या महाराष्ट्रातील उद्योजकाला किती प्रमाणात पुढे नेण्याचे काम केले याबाबत सांगितले. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांना धन्यवाद देतो. या महाराष्ट्राचे उद्योग मंत्री निरुद्योगी असताना आपण त्यांचे सर्व उद्योग सांभाळता हे आपण सांगितले त्याबद्दल धन्यवाद. आपल्या निवेदनातून ते आले म्हणून आम्हाला कळले नाही तर आम्हाला काही माहीत नव्हते. हे सर्व लक्षात घेऊन मी सांगू इच्छितो की, ऑल इंडिया मेडिकल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सच्या धर्तीवर सध्या जी मोठी सुपर स्पेशालिटी रुग्णालये आहेत ती दिल्ली आणि पंजाबमध्ये आहेत. केंद्र सरकारने 1 हजार कोटी रुपये अशा सुपर स्पेशालिटी रुग्णालयाकरिता प्रत्येक राज्याला देण्याचे ठरविलेले आहे पण ज्या 7 राज्यांना ते हा निधी देत आहेत त्यामध्ये महाराष्ट्राचा समावेश नाही. त्यामध्ये तामीळनाडू, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार इत्यादी राज्यांचा समावेश आहे. त्यामध्ये महाराष्ट्राला ताबडतोब समाविष्ट करुन सुपर स्पेशालिटी रुग्णालय बनविण्याकरिता 1 हजार कोटी रुपये 44 हजार कोटी रुपयांचा महसूल देणाऱ्या मुंबई आणि

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. दिवाकर रावते ....

महाराष्ट्राला मिळवून द्यावेत. आपण काल जे सांगितले तेव्हा पासून आमच्या ज्या अपेक्षा उंचावलेल्या आहेत त्या अपेक्षा आपण पूर्ण कराव्यात अशी विनंती करतो.

सभापती महोदय, परवा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलत असताना मी ज्या गोष्टीचा उल्लेख केला होता त्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांच्या भाषणात उल्लेख आला नाही. जे कोणी मंत्र्यांकडे नसलेले अधिकारी फलक लावून बसलेले आहेत आणि जे अधिकारी जीएडीच्या यादीप्रमाणे असावयास पाहिजे ते गायब झालेले आहेत. मी परवा सर्व नावे वाचून दाखविलेली आहेत. आज ती नावे परत वाचून सभागृहाचा वेळ घेत नाही. सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून ही यादी आदरणीय मुख्यमंत्र्यांकडे त्यांच्या कार्यालयाच्या फोटोसह पाठवित आहे. त्यांनी तातडीने या संदर्भात प्रशासकीय बाबतीत योग्य ती कारवाई करावी अशी मी विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांकडे मराठी विभाग आहे. त्या विभागावर मी आता जास्त बोलणार नाही. ज्यावेळी त्या संदर्भात स्वतंत्र चर्चा होईल त्यावेळी बोलेन. परंतु या विधिमंडळाचे कामकाज मराठीमध्ये चालले पाहिजे असा मी आग्रह धरतो. शासनामध्ये मराठीमध्ये कामकाज असले पाहिजे असा आग्रह आहेच आणि त्याप्रमाणे बऱ्याच ठिकाणी सुधारणा होत आहेत. वर्तमानपत्रातील जाहिराती मात्र मराठी वर्तमानपत्रामध्ये इंग्रजी भाषेतून येत असतात ते आपल्या नियमाला धरुन नाही. पण त्याकडेही दुर्लक्ष होत आहे. आता माझ्या हातामध्ये विधिमंडळाचे एक कुपन आहे. जेवणाकरिता आपण जे कुपन देतो ते पूर्ण इंग्रजीमध्ये आहे. माझ्याकडे आजचे कुपन आहे. त्यामध्ये असा उल्लेख केला आहे की,

Maharashtra Legislature Secretariat
Vidhan Bhavan, Mumbai
Date :

To,
The Manager,
Vidhan Bhavan,
Mumbai.

Sir,

Please serve meals of refreshment to the extent of Rs.30.00 to Shri/Smt. ..... Designation ..... of this Secretariat and

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB

श्री. दिवाकर रावते .....

present this slip with relevant Bill to this Secretariat for receiving payment for the same.

Under Secretary,
Maharashtra Legislature Secretariat

म्हणजे शासनामध्ये मराठीकरण झाले पाहिजे असे सांगत असताना आमच्या विधिमंडळामध्ये मराठीचा वापर होत नाही त्यामुळे माननीय मुख्यमंत्र्यांना बोलण्यापूर्वी आपण याकडे लक्ष दिले पाहिजे. हे कुपन सुध्दा मी आपल्याकडे पाठवितो. आपण संबंधित सचिवांना योग्य ते निर्देश द्याल याची मला खात्री आहे.

सभापती महोदय, यानंतर मी माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक 60 संदर्भात बोलणार आहे. त्यापूर्वी मी माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार आणि आपले मुख्य सचिव श्री. रत्नाकर गायकवाड यांचे मनापासून अभिनंदन करणार आहे.

यानंतर श्री. कांबळे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

या सदनातच त्यांनी जे.जे. रुग्णालयाच्या विस्तारीकरणाच्या नवीन प्रकल्पाबाबत सूतोवाच केले होते. आमच्या माननीय पालकमंत्र्यांनी तेथे आमच्या सर्वांची बैठक देखील घेतली होती. नवीन जे.जे. रुग्णालय कसे उभे राहील, याचा विचार करण्यात आला होता. निधीची तरतूद देखील केली होती. मुख्य सचिवांनी खास लक्ष देऊन या संदर्भात बैठका घेतल्या आणि प्रकल्प मार्गी लावला. त्यासाठी जवळपास 50 लाखांची तरतूद आहे. बांधकाम खात्याच्या हातामध्ये एखादी गोष्ट गेली की ती सुधारण्याऐवजी नासते कशी, याचा त्यांना अनुभव आला असावा. त्यामुळे त्यांनी आता रुग्णालयाचे काम बांधकाम खात्याच्या हातातून काढून घेतले आहे आणि ग्लोबल टेंडर काढून जागतिक पातळीवर काम देऊन उत्कृष्ट असे रुग्णालय मुंबई शहरात जे.जे. च्या रुपाने उभे करणार आहेत, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून अभिनंदन करतो.

सभापती महोदय, आमच्याकडे एक पुस्तिका आली असून ती पुस्तिका मुळा-प्रवरा वीज सहकारी संस्थेच्या बाबतची आहे. मला ती पुस्तिका वाचल्यानंतर खेद झाला. खेद एवढ्याकरिता झाला की, या पुस्तिकेत मुळा-प्रवराला बदनाम करण्याकरिता कसे षडयंत्र रचले गेले, ते सांगितले आहे. मुळातच मुळा-प्रवरा ही शेतकऱ्यांसाठी कशी राबत होती, याचे पूर्ण स्पष्टीकरण त्यामध्ये आहे. 2200 कोटी रुपयांचा घोटाळा केला, या नावाखाली वीज मंडळाकडून महाराष्ट्र शासनाने ती ताब्यात घेतली. हा प्रकार एकाच सरकारमधील दोन माननीय मंत्री महोदयांच्या बाबतीत झाला. 2200 कोटी रुपयांचा घोटाळा करणारा मंत्री बसला आहे, असे जाहीरपणे सांगितले जाते. हे सरकार कोणत्या वृत्तीचे आहे, हेच समजत नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी वर्णन केले की, एका तळ्यात होती बदके सुरेख सात. आता आम्हाला वाटायला लागले आहे की, एक राजहंस या बदकांच्या तळ्यात सापडला आहे का ? तुमच्या वर्णनानुसार असे आम्हाला खरेच वाटायला लागले आहे. एका माननीय मंत्र्यांनी 2200 कोटी रुपयांचा घोटाळा केला. स्पष्टीकरण आल्यानंतर आम्हाला कळले. अहमदनगर जिल्ह्यातील मुळा-प्रवरा वीज सहकारी संस्था ही सहकारी तत्वावर वीज वितरण करणारी राज्यातील एकमेव संस्था आहे, असे त्यांनी पुस्तिकेत म्हटले आहे. पुढे असे

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

म्हटले आहे की, केवळ मुळा-प्रवरा वीज सहकारी संस्था ही विखे कुटुंबीयांची आहे. याकरिता तिला बदनाम करण्याचे षडयंत्र रचले गेले आहे. आपणा सर्वांकडे ही पुस्तिका आली आहे. पुस्तिकेमध्ये पुढे असे म्हटले आहे की, "वास्तविक वीज खरेदी विक्री दरातील तफावतीमुळेच संस्थेवर आर्थिक आरिष्ट आले. या संदर्भात राज्याच्या विधिमंडळात सातत्याने चर्चा झाल्यानंतरही संस्थेच्या संदर्भात मंत्रिमंडळाने काही धोरणात्मक निर्णय घेतले. झालेल्या निर्णयांची अंमलबजावणी न झाल्यामुळे संस्थेला आर्थिक संकटाला सामोरे जावे लागले. आर्थिक संतुलनालाच थकबाकी समजून या राज्यात अनेक वेळा आमची बदनामी करण्याचे कारस्थान करण्यात आले. पुढे असे म्हटले आहे की, असलेली वस्तुस्थिती माध्यमांमधूनही समोर येणे गरजेचे होते. परंतु, माध्यमांनीही संस्थेविषयी एकतर्फी चित्रच पुढे आणून संस्थेबाबत सातत्याने विपर्यस्त माहिती समाजापुढे आणली. म्हणून ही सत्यप्रत देत आहे. आपला विश्वासू, राधाकृष्ण ए. विखे पाटील म्हणजेच आपले माननीय कृषी मंत्री, महाराष्ट्र राज्य." महाराष्ट्रात एक मंत्री सर्वांना सांगतो की, मी दोषी नसताना शासनाकडून दोषी ठरविण्यात येत आहे. त्यावेळी आम्हाला विचार करावा लागतो. सरकार नेमके कुठे चालले आहे ? मी सगळे वाचणार नाही. प्रत्येकाने पुस्तिका वाचून घ्यावी.

सभापती महोदय, शेतकऱ्यांना ज्या दरात वीज देण्यात येत होती, त्या दरामध्ये वाढ करण्यात आली. त्यामुळे 2200 कोटी रुपयांची तफावत दिसू लागली. युती शासन असताना माननीय मंत्री श्री. विखे पाटील आमच्या सरकारात मंत्री होते. मला योगायोगाने असे सांगावेसे वाटते की, जिथे आयुष्य काढले, त्या पक्षाने कधी पिता-पुत्रांना सन्मानित केले नाही. फक्त एकमेव आदरणीय शिवसेना प्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांनी केंद्रामध्ये ज्येष्ठ विखे पाटील यांना आणि आमच्या सरकारात कनिष्ठ विखे पाटील यांना मंत्री पद दिले होते. वर्षानुवर्षे काँग्रसेची सेवा करणाऱ्या श्री. विखे-पाटील यांना मंत्रिमंडळ काय असते हे युती शासनात आल्यावर समजले. आपण परंपरा पुढे चालू ठेवली हे अभिनंदनीय आहे का, माहीत नाही. हे अभिनंदनीय नाही, असे दिसायला लागले आहे. सभापती महोदय, त्यांनी असे लिहिले आहे की, "युती शासनामध्ये तत्कालीन सचिव श्री. अशोक बसाक यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून सन

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनायक मेटे)

श्री. दिवाकर रावते ....

1977 ते सन 1999 पर्यंत जादा आकारलेली रक्कम रुपये 541.80 कोटी मंत्रिमंडळाने ठराव करुन निर्लेखित केली होती. एवढे पैसे वळविले होते. फरक आल्याने संस्थेच्या माध्यमातून सातत्याने 2200 कोटी रुपयांच्या थकबाकीचे एकतर्फी चित्र निर्माण करण्यात आले.

(नंतर श्री.भारवि ....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते..

वर उल्लेख केल्याप्रमाणे संस्थेवर आयोगाकडून 7 वेळा वीज खरेदी दरात मनमानी दराने वाढ करण्यात आली. त्यामुळेच मुळा प्रवराची वीज खरेदीची किंमत वाढली. मात्र संस्थेला आपल्या ग्राहकांकरिता वीज विक्रीचे दर वाढविण्यास परवानगी देण्यात आली नाही. यामुळेच खरेदी विक्री दरात तफावत येण्यास सुरूवात झाली. डिसेंबर 2010 अखेर रूपये 1268 कोटी इतकी थकबाकी व 1050 कोटी रूपये विलंब आकार व व्याज अशी एकूण 2318 कोटी रक्कम दर्शविली गेली आहे. रक्कम संस्थेत कधीच जमा झाली नाही. संस्थेने लोकांकडून घेतली नाही. तरीही या रकमेचा अपहार केल्याचा आभास निर्माण करून मुळा प्रवरा ताब्यात घेण्याचे षडयंत्र रचले" अशा प्रकारचा खुलासा या शासनाच्या मंत्रिमंडळातील एका मंत्र्याने त्यांच्यावर गैरसमजूतीने केलेल्या कारवाईमुळे केलेला आहे. त्यामुळे ज्यावेळी अशा प्रकारच्या पुरवणी मागण्या आमच्या समोर येतात तेव्हा आम्हाला प्रश्न पडतो की, खरोखर कोणत्या पद्धतीने कारवाई चालली आहे. यापेक्षा जास्त काही बोलावेसे मला वाटत नाही. धन्यवाद.

.....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी सामान्य प्रशासन विभागाच्या बाब क्र.1 पान क्र.3 वर माझे विचार मांडणार आहे. जुनी वाहने निर्लेखित करून नवीन वाहने घेण्याचे प्रयोजन केले आहे. आपण वारंवार अनेक शासकीय कार्यालयात जात असतो. अनेक शासकीय कार्यालयांमध्ये शासकीय जुनी वाहने वर्षानुवर्षे तेथे पडलेली असतात. सर्व शासकीय कार्यालयातील जुनी वाहने एकत्रित करून तिथल्या तिथे निर्लेखित केली तर कोट्यवधी रूपये शासनाच्या तिजोरीत जमा होतील. तेव्हा मी शासनाला विनंती करणार आहे की, प्रत्येक विभागातील बाद झालेली वाहने एकत्रित करून त्यांची तत्काळ विल्हेवाट लावण्याची कार्यवाही करावी.

यानंतर मी गृह विभागाच्या बाब क्र.9, पान क्रमांक 9 वर बोलणार आहे. मोटार वाहनांची दुरूस्ती करण्यासाठी मागणी केली आहे. आज श्री.आर.आर.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील जनतेच्या कल्याणासाठी गृह विभाग अतिशय कार्यक्षमपणे काम करीत आहे. त्यामुळे पोलिसांना अत्याधुनिक अशी चांगल्या प्रकारची वाहने दिली पाहिजेत अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

आता मी महसूल विभागाच्या बाब क्र.19, पान क्र.18 वर बोलणार आहे. आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना सहाय्य करण्यासाठी मागणी करण्यात आली आहे. नागपूरसह प्रत्येक अधिवेशनामध्ये विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचा प्रश्न येतो. विदर्भासह इतरही भागात काही प्रमाणात शेतकऱ्यांच्या आत्महत्या झालेल्या आहेत. ज्या शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यांच्या वारसांना तातडीने मदत घोषित केली पाहिजे. आपण मदत घोषित करतो पण ती प्रत्यक्षात शेतकऱ्यांपर्यंत पोहचणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे त्यांना आपण त्वरित मदत केली पाहिजे. आपण अशी मागणी केल्यामुळे आमच्या सारख्या शेतकऱ्याच्या सुपुत्राला आनंद झालेला आहे. त्याबद्दल मी सरकारचे येथे अभिनंदन करतो.

यानंतर बाब क्र.22, पान क्र.18 वर बोलणार आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे कापूस, भात, सोयाबीन इत्यादी पिकांना शासनाच्या वतीने नुकसान भरपाई दिली जाते. शाहू-फुले-आंबेडकराचे पुरोगामी राज्य असे आपण नेहमी म्हणतो. आघाडी सरकार म्हणून आपण सर्वजण काम करता म्हणून मी सर्व मंत्रिमंडळाचे अभिनंदन करतो. जेव्हा केव्हा शेतकरी अडचणीत येतो तेव्हा त्यांना मदत करण्याची भूमिका शासनाने सातत्याने घेतली आहे, याचा आनंद आम्हाला वाटतो. ..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे...

आज सुद्धा कांद्याचे पीक धोक्यात आले आहे. यासंबंधी राज्यात आंदोलने सुरू आहेत. याची दखल तातडीने शासनाने घेतली पाहिजे. आता माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांना मी विनंती करतो की, त्यांनी तातडीने कांदा उत्पादक शेतकऱ्याची दखल घ्यावी व त्यांना मदत करण्याची भूमिका घ्यावी.

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

सभापती महोदय, आज या ठिकाणी कृषी विभागाच्या वतीने बाब क्र.28 पृ.क्र.27 वर राज्यातील चारही कृषी विद्यापीठांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी पूरक मागणी सादर करण्यात आली आहे. भारत हा कृषीप्रधान देश आहे. महाराष्ट्रात शेतकऱ्यांना आधुनिक पध्दतीने शेती कशी करावी याचे तंत्रज्ञान व माहिती कृषी विद्यापीठाच्या माध्यमातून दिली जाते. नवनवीन बियाणे तयार करण्यासाठी संशोधन करण्याचे काम कृषी विद्यापीठातील तज्ज्ञ प्राध्यापक मंडळी करतात याचा शिक्षक आमदार या नात्याने मला अभिमान वाटतो. आज या निमित्ताने मी एक मागणी करतो, राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांकडे शेकडो एकर जमीन उपलब्ध आहे, त्या जमिनीमधून चांगल्या प्रकारचे उत्पादन निघाले पाहिजे या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे. कृषीमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. शासनाने या सर्व कृषी विद्यापीठाकडे किती एकर जमीन आहे याबाबत आढावा घेतला पाहिजे. शेतकऱ्यांना संशोधन करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. त्याच धर्तीवर कृषी विद्यापीठाकडून कोणते उत्पादन केले जाते, किती प्रमाणात उत्पादन केले जाते याचा सुध्दा परामर्श घेणे गरजेचे आहे. मी कृषीमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी राज्यातील सर्व कृषी विद्यापीठांच्या जमिनीचा आढावा घ्यावा.

सभापती महोदय, बाब क्र.34, पृष्ठ क्र.33 वर शालेय शिक्षण विभागाची पूरक मागणी सादर केली आहे. राज्यातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची कारणे शोधण्यासाठी होणाऱ्या खर्चाकरिता शिक्षणमंत्र्यांनी पूरक मागणी सादर केली आहे. मी माननीय शिक्षणमंत्र्यांचे त्रिवार अभिनंदन करतो. ते अतिशय संवेदनशील मनाचे आहेत. राज्यात होत असलेल्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचा विषय आम्ही सभागृहात उपस्थित केल्यानंतर त्याची तत्परतेने दखल घेण्याचे काम शिक्षणमंत्र्यांनी केले आहे. आज सभागृहात माननीय मुख्यमंत्री उपस्थित आहेत. मंत्रीमंडळात फेरबदल करण्यात येणार असल्याच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द होत आहेत. परंतु माननीय शिक्षणमंत्री श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकडील खाते काढून घेऊ नये अशी माझी त्यांना विनंती आहे. जी मागणी शिक्षण विभागाने सादर केली आहे त्याबद्दल मी सरकारचे आणि मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो आणि तातडीने हे काम पूर्ण करावे अशी विनंती करतो. यापुढे एकही विद्यार्थी आत्महत्या करणार नाही या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना सरकारकडून केली जाईल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे.....

सभापती महोदय, बाब क्र.35, पृष्ठ क्र.34 वर माध्यमिक स्तरावरील एकात्मिक अपंग शिक्षक योजना राबविण्यासाठी पूरक मागणी सादर केली आहे. आज केंद्र सरकारची योजना राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असली तरी एकात्मिक अपंग योजनेत जे कंत्राटी बांधव काम करीत आहेत त्यांचा सहानुभूतीने विचार केला पाहिजे. त्यांना शासन सेवेत ठेवणार आहे की नाही? ग्रामीण भागात अपंगांना सेवा देण्याचे काम ते करीत आहेत. याचा गांभीर्याने विचार करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, एका गोष्टीबद्दल मला खेद व्यक्त करावयाचा आहे. कारण ज्या तुकड्या अनुदानावर येतात, टप्प्याटप्प्याने अनुदानास पात्र ठरतात, अशा तुकड्या अनुदानास पात्र ठरताना त्यांच्या वेतनाची तरतूद करणारी मागणी या पूरक मागणीमध्ये अंतर्भूत झालेली नाही. कदाचित अधिकाऱ्यांकडून मागणी अंतर्भूत करण्याचे राहून गेले आहे का याची माहिती घेण्यात यावी. जर नजरचुकीने मागणी अंतर्भूत करण्याचे राहून गेले असेल तर उचित कारवाई करावी, जेणेकरुन पुढील वेळी अशी चूक होणार नाही यादृष्टीने दक्षता घेतली जाईल.

नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र. 48 व पृ.क्र. 49 संबंधी मी बोलणार आहे. या मागणीच्या अनुषंगाने शासनाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून सामाजिक न्याय विभागाअंतर्गत मागासवर्गीय मुलांसाठी वसतिगृहे बांधण्याचे काम केले आहे. आम्हाला आनंद आहे की, राज्यात प्रत्येक जिल्हा व तालुक्याच्या ठिकाणी सुसज्ज असे वसतिगृह असावे. ज्याच्याकडे पाहिल्यानंतर ओळखता येईल की हे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मॉडेल प्लॅन नुसार बांधलेले वसतिगृह आहे. त्याबद्दल मी मंत्री महोदयांचे अभिनंदन करतो कारण या माध्यमातून एक नवी दिशा देण्याचे काम झालेले आहे. अशाच प्रकारे रेस्ट हाऊसेस देखील मॉडेल प्लॅनप्रमाणे झाली पाहिजेत. जेणेकरुन तालुक्याच्या किंवा जिल्ह्याच्या ठिकाणी गेल्यानंतर आपल्या शासनाचे रेस्ट हाऊस असल्याचे लक्षात येईल. आपण दौऱ्यानिमित्त संपूर्ण राज्यातील विश्राम गृहांमध्ये जात असतो. पण नांदेड येथे जे रेस्ट हाऊस बांधलेले आहे ते उत्तम प्रकारचे असून 7 स्टार स्वरुपाचेच हॉटेलच असल्याचा भास होतो. ते खाजगीकरणातून बांधलेले आहे की कसे याची माहिती मला नाही पण तेथे उत्तम प्रकारची सेवा देखील दिली जाते. अशाच प्रकारची सेवा संपूर्ण राज्यातील विश्राम गृहांमध्ये दिली जावी, कारण आपण एवढा खर्च करतो मग सेवा पुरविण्याचे काम सुध्दा झ ाले पाहिजे याचा विचार करणे आवश्यक आहे.

महोदय, बाब क्र. 137, पृ.क्र. 141 - सहकार विभागाची ही मागणी असून डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेसाठी ही तरतूद केली आहे. या राज्यात पहिल्यांदा शेतकऱ्यांसाठी हा क्रांतिकारक निर्णय घेतलेला आहे. माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री यांच्या काळात हा सोनेरी अक्षरांनी लिहून ठेवण्यासारखा निर्णय झालेला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना शून्य टक्के दराने कर्जपुरवठा आजपर्यंत कधीच करण्यात आला नव्हता तो या शासनाने सुरु केलेला आहे. पण खाली वाटप करणाऱ्या ज्या बँका आहेत त्या मात्र शेवटपर्यंत, शेतकऱ्यांना ही सवलत मिळू देत नाहीत, त्यात वेगवेगळ्या अडचणी निर्माण करीत असतात. म्हणून या योजनेचा दोन चार महिन्यातून एकदा तरी मंत्री महोदयांनी आढावा घेऊन शेतकऱ्यांना याचा फायदा मिळतो की नाही हे पहावे, अशी माझी विनंती आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या मंत्री महोदयांकडे पाहिल्यानंतर खरोखरच भास होतो की, पॉझिटीव्हली निर्णय घेणारे कार्यक्षम मंत्री आहेत. त्यांच्या विभागाच्या बाब क्र. 143 वर मी बोलणार आहे. मान्यताप्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांची देखभाल करण्यासाठी ही मागणी करण्यात आलेली आहे. सार्वजनिक ग्रंथालयांच्या बाबतीतील अनुदान वाढविण्याचे काम मंत्री महोदयांनी केले आहे, त्याबद्दल त्यांचे मी अभिनंदन करतो. शेवटी असे म्हणतात की, "वाचेल तो वाचेल" जो पुस्तक वाचतो तो कोणापुढे नतमस्तक होत नाही असे विचारवंतांनी म्हटले आहे. यासाठी ग्रामीण भागातून वाचनालये निर्माण केली पाहिजेत असे उदात्त धोरण शासनाने घेतले पण खेद या गोष्टीचा वाटतो की, या ग्रंथालयात काम करणारे कर्मचारी आज त्यांच्या मागण्यांसाठी आझाद मैदानावर उपोषणाला बसलेले आहेत. कदाचित मंत्री महोदयांनी त्यांच्याशी चर्चा केली असावी. त्यांच्या मागण्यांचा विचार करावा अशी मी विनंती करतो.

महोदय, बाब क्र. 144, पृ.क्र. 147 - विविध शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये कंत्राटी स्वरुपात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत ही मागणी करण्यात आली आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विक्रम काळे .....

परंतु जी औद्योगिक शिक्षण केंद्रे तसेच पॉलिटेक्नीक शासनाच्या वतीने चालविले जातात त्या ठिकाणी शिक्षक मिळत नसल्यामुळे कंत्राटी निदेशक, कंत्राटी शिक्षक काम करीत असतात परंतु संख्येअभावी ते अभ्यासक्रम पूर्ण करु शकत नाहीत. यासंदर्भात आम्ही सातत्त्याने पाठपुरवा करीत आहोत. परंतु आम्हाला सांगितले जाते की, माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे फाईल गेलेली आहे. त्यामुळे औद्योगिक तंत्रनिकेतनामध्ये किंवा पॉलिटेक्नीक मध्ये जे कंत्राटी शिक्षक व निदेशक आहेत त्यांना सेवेत नियमित करण्यात यावे अशी मागणी या निमित्ताने करतो. माननीय मुख्यमंत्री महोदय हे तंत्रज्ञान व माहितीची कास धरणारे असल्यामुळे तसेच त्यांनी केंद्र शासनात यासंदर्भात कार्यभार केलेला असल्यामुळे ते यासंदर्भातील फाईल क्लिअर करतील अशी अपेक्षा करतो व आपण मला संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानून दोन शब्द पूर्ण करतो.

धन्यवाद.

...2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, बाब क्रमांक 24, पृष्ठ क्रमांक 21, मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील पर्यावरणाभिमुख विकास योजना याबाबत मी माझे विचार व्यक्त करणार आहे. सातारा,रत्नागिरी जिल्हयात शासनाने चांदोली अभयारण्य आरक्षित केलेले आहे. नुकत्याच झालेल्या प्राणीगणनेनुसार चांदोली परिसरात मोठया प्रमाणात जंगली प्राणी असल्याचे निष्पन्न झालेले आहे. या प्राण्यांना नैसर्गिक वातावरण मिळावे, त्यांना मानवी वस्तीचा त्रास होऊ नये यासाठी आतापासूनच योग्य नियोजन करण्याची गरज आहे. या अभयारण्यातील बफर झोनमधील गावांचा पर्यावरणीय विकास करण्यास प्राधान्य देण्यात यावे अशी मी मागणी करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 53, पृष्ठ क्रमांक 61, जिल्हा व सत्र न्यायाधिशाच्या कार्यालयीन खर्चाच्या संदर्भात मी विचार व्यक्त करणार आहे. तालुक्यापासून ते वरच्या कोर्टापर्यंत अनेक खटले प्रलंबित असतात. अनेक न्यायालयांच्या इमारतींची अवस्था फार दयनीय आहे. न्यायाधीश कशा पध्दतीत तेथे काम करीत आहेत हे मी न्यायालयांना भेटी देऊन पाहणी केली व त्यासंदर्भात वेळोवेळी या सभागृहात तेथील परिस्थिती मांडलेली आहे. मी कल्याणच्या कोर्टाला भेट दिली होती त्यावेळेस तेथे अक्षरश: पाणी गळत होते, काळोख होता, न्यायाधीशांना मुख्य दरवाजातूनच यावे लागत होते व त्याच दालनातून न्यायाधिशांना बाहेर जावे लागत होते. शेवटी कोर्टाचे दोन मिनिटे काम थांबवून त्यांनी यासंदर्भात कैफियत मांडली होती. शासन निर्णयांची अंमलबजावणी करीत नाही त्यामुळे रिट पिटीशन आणि निरनिराळया केसेसच्या द्वारे लोकांना न्यायालयाकडे धाव घ्यावी लागते. त्यामुळे न्यायालयांची अवस्था काय आहे, इमारतींची अवस्था काय आहे हे जाणून घेण्याची आवश्यकता आहे. न्याधीशांची रिक्त पदे तसेच त्या ठिकाणची कर्मचा-यांची पदे भरली गेली पाहिजेत. तसेच न्यायालयांच्या इमारतीची डागडुजी तातडीने झाली पाहिजे. अनेक न्यायालयाच्या इमारतीमध्ये कोणतीही व्यवस्था नाही, स्वच्छता गृहे नाहीत अशी परिस्थिती आहे. अनेक न्यायालयात वकीलांची तसेच महिला वकिलांची संख्या वाढलेली आहे. त्यांना ज्या किमान सोयी सुविधा पाहिजे त्या मिळण्याची आवश्यकता असून त्यासाठी निधी खर्च करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 137, पान क्रमांक 141 वरील सहकारच्या संदर्भात मी..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री संजय केळकर .....

विचार व्यक्त करणार आहे. हे वर्ष आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष आहे. पत संस्थांच्या संदर्भातच मी विचार व्यक्त करणार आहे. राज्यातील निरनिराळ्या पतसंस्थाची माझ्याकडे माहिती आहे. पत संस्थांना शासनाच्या नियमा प्रमाणे 15 दिवसात बंध पत्र देणे बंधनकारक आहे. 80 टक्के पतसंस्थांनी बंध पत्र दिलेले नाही. कोणी जरी पतसंस्थेच्या संदर्भात तक्रार केली की, पत संस्थामध्ये पुन्हा नव्याने निवडणूक घेणे बंधनकारक असते. त्यामुळे पत संस्थांची बंध पत्राची 15 दिवसाची जी मुदत आहे ती वाढविण्याची आवश्यकता आहे अशी मी मागणी करीत आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

सभापती महोदय, बाब क्र.143, पान क्र.146 मध्ये ग्रंथालयाच्या बाबतीत असून आजच आझाद मैदानामध्ये या विषयाच्या अनुषंगाने धरणे आंदोलन सुरु आहे. मी सर्वप्रथम माननीय मंत्री श्री.राजेश टोपे साहेबांना धन्यवाद देतो. कारण त्यांनी बऱ्याच वर्षानंतर ग्रंथालयांना देण्यात येणाऱ्या अनुदानाच्या संबंधात 100 टक्के नाही परंतु 50 टक्के वाढ केलेली आहे अणि ती लागूही करण्यात येत आहे. परंतु त्यांची वेतनश्रेणी आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणी संबंधातील पत्की समितीचा जो अहवाल आहे त्या अनुषंगाने देखील विचार करण्यात यावा अशा प्रकारे त्यांच्या ज्या अनेक मागण्या आहेत, त्या पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे असे मला वाटते. राज्यामध्ये ग्रंथालये टिकली पाहिजे, वाचन संस्कृती टिकली पाहिजे असे म्हणत असताना याबाबतीत ज्या जाचक अटी आहेत, त्या देखील दूर करण्याबाबत मागणी करण्यात येत असून त्या अटी आणि शर्ती दूर करुन संबंधितांना दिलासा द्यावा आणि ग्रंथालयांचे अनुदान 20 टक्क्यांनी वाढविण्यात यावे जेणेकरुन ग्रंथालय चळवळीला प्रोत्साहन मिळू शकेल अशी या चर्चेच्या निमित्ताने मला शासनाला विनंती करावयाची आहे.

सभापती महोदय, बाब क्र.34, पान क्र.33 याबाबत सांगावयाचे तर राज्यातील आत्महत्येस प्रवृत्त होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आपण सुधारणात्मक उपाययोजना दिलेली आहे.राज्यामध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची अनेक कारणे आहेत. एका बाजूला जीवघेणी स्पर्धा असेल तर दुसऱ्या बाजूला अति श्रीमंत अशा उच्च विचारसरणीच्या शाळा असतील आणि दुसरीकडे गरिबांसाठी मोडकळीस आलेल्या, निरनिराळ्या व्यवस्था नसलेल्या शाळा असतील, संस्काराचा विषय असेल, पण याबाबतीत मला असे सुचवावेसे वाटते की, जर आपण प्रत्येक शाळेमध्ये ई.क्यु चा म्हणजे इमोशनल क्वोशण्टचा अभ्यासक्रम सुरु केला पाहिजे. याबाबतीत माननीय मंत्री श्री.राजेश टोपे साहेबांना माहिती आहे आणि आम्ही त्यांना त्याचे डेमॉन्स्ट्रेशन देखील दाखविले होते म्हणजे एका बाजूला विद्यार्थ्यांचा आय.क्यू म्हणजे बुध्यांक आहे तसा त्याचा इमोशनल क्वोशण्ट देखील वाढणे आवश्यक आहे. जर त्या विद्यार्थ्याकडे या दोन्ही गोष्टी असतील तर तो कोणत्याही परिस्थितीला सामोरा जाऊ शकतो. त्यामुळे ई.क्यु म्हणजे भावनांक हा जो विषय आहे, तो वाढीस लागण्यासाठी निरनिराळय प्रकारची सिलॅबस् देखील तयार आहेत.महाराष्ट्रात असे अनेक तज्ज्ञ आहेत की, ज्यांच्याकडे ही सिलॅबस् आहेत.माननीय मंत्री महोदयांनी याबाबत मागणी केली तर मी स्वत: त्याचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर . . . .

डेमॉन्स्ट्रेशन देखील देऊ शकतो आणि त्याचा फार मोठ्या प्रमाणात चांगला परिणाम होतो. त्यामुळे शासनाकडून जर या गोष्टीला प्रोत्साहन देण्यात आले तर निश्चित पणे विद्यार्थ्यांना त्याचा निश्चितपणे उपयोग होईल.

सभापती महोदय, बाब क्र.157, पान क्र.167 याबाबत सांगावयाचे तर सध्या महाराष्ट्रामध्ये नाटक आणि इतर सांस्कृतिक गोष्टींना चांगले दिवस आल्यासारखे वाटत आहे. कारण नवीन-नवीन नाटके तसेच नवीन-नवीन मराठी चित्रपट देखील येत आहेत.तसेच मराठी चित्रपटांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर बक्षिसे मिळविली आहेत. त्यामुळे त्यांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे असे मला वाटते. तसेच नाटक निर्मात्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानासाठी शासनाकडे पुरेशी तरतूद केली नसल्यामुळे कपात करण्यात आली होती. त्यामुळे शासनाने हा बॅकलॉग भरुन काढण्यासाठी अतिरिक्त तरतूद करण्याची आवश्यकता आहे.म्हणून नाटक निर्मात्यांना अनुदान म्हणून प्रत्येकी 15 हजार रुपये इतकी रक्कम देण्यात येते, त्यामध्ये वाढ करुन त्यांना 25 हजार रुपये इतके अनुदान द्यावे अशा प्रकारची या निमित्ताने मी मागणी करीत आहे. तसेच आता मराठी चित्रपटांची मोठया प्रमाणात निर्मिती होत असून,त्यासाठी देखील मोठ्या प्रमाणात थिएटर उपलब्ध होत आहेत.सध्या चित्रपटासाठी 15 ते 20 लाख रुपयांचे अनुदान देण्यात येते, त्यामध्ये वाढ करुन ते 35 लाख रुपये देण्यात यावे अशी माझी मागणी आहे.तसेच साहित्य संमेलनासाठी आणि नाट्य संमेलनासाठी अनेक वर्षापासून 25 लाख रुपयांचे अनुदान दिले जाते, परंतु ते पुरेसे होत नाही. तसेच सध्या वाढलेली महागाई लक्षात घेता यामध्ये देखील वाढ करण्याची गरज असल्याने हे अनुदान 50 लाख रुपयापर्यंत देण्यात यावे अशी मी या निमित्ताने मागणी करीत आहे.

सभापती महोदय, माझा शेवटचा मुद्दा आहे. बाब क्र.59, पान क्र.67 मध्ये औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या उद्योगांना अर्थसहाय्य याच्यामध्ये डिकी, सूक्ष्म, लघु व मध्यम दलित उद्योजकांना तसेच त्यांना उद्योगाची संधी उपलब्ध करुन उपयुक्त माहिती व ज्ञान देऊन सक्षम करीत आहेत. डी.आय.सी.आय.ई. या संस्थेच्या माध्यमातून 100 हून अधिक उद्योजक, व्यावसायिक त्याचे सदस्य झालेले आहेत.

यानंतर श्री.अ.शिगम . . . . .

अनुवादित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष श्री.अहलुवालिया यांनी देखील डिकीच्या कार्याची प्रशंसा केलेली आहे, कौतुक केलेले आहे. सी-2 आणि सीसीआय प्रमाणे डिकीचे चार प्रतिनिधी नियोजन आयोगावर सदस्य आहेत. स्पेशल परपझ व्हेन्चर स्थापन करुन सुमारे 500 कोटी रुपयांचा दलित व्हेन्चर कॅपिटल फंड निर्माण करण्याचा डिक्कीचा मानस आहे. मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश तसेच कर्नाटक राज्यामध्ये भूखंडासाठी एस.सी आणि एस.टी.उमेदवारांना आरक्षण दिलेले आहे. फुले-शाहू-आंबेडकरांच्या राज्यात दलित उद्योजकांना आधारभूत ठरेल किंवा प्रेरणादायी ठरेल अशा प्रकारचे धोरण अस्तित्वात नाही. तेव्हा शासनाने असे धोरण अस्तित्वात आणावे अशी विनंती आहे. त्यांच्या दोन मागण्या आहेत. राज्यातील प्रत्येक अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये स्कील आणि ऑन्त्रप्रनॉरशीप डेव्हलपमेंट प्रोग्रामचा अभ्यासक्रम चालू करण्यात यावा. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महामंडळ आणि महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाकडे सातत्याने निधीचा अभाव आहे. महामंडळाकडे असंख्य अर्जदारांचे कर्जासाठीचे अर्ज प्रलंबित आहेत. त्याच प्रमाणे प्रादेशिक कार्यालयातील अनेक पदे रिक्त आहेत. तेव्हा याबाबत देखील कार्यवाही व्हावी अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2011-12च्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 41, बाब क्रमांक 41- सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सकाळी या विषयाला वाचा फोडलेली आहे. वाचा फोडावी असा हा विषय आहे. मी आपणास स्पष्टीकरण देतो त्यानंतर आपल्या लक्षात येईल. जिल्हा नियोजन मंडळाच्या कारभाराला वळण लावण्याची आवश्यकता आहे. या मंडळाला शिस्त लावण्याची गरज आहे. बीड जिल्हा नियोजन मंडळात अजब कारभार सुरु आहे. टी.व्ही.वरील राखी सावंतच्या कार्यक्रमाची आठवण व्हावी असा हा कारभार सुरु आहे. "अजब घर की गजब कहाणी" हा राखी सावंतचा कार्यक्रम आहे. त्या कार्यक्रमाप्रमाणे आमच्या बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री महोदयांचा कारभार आहे. हे अतिशय दुर्दैवी आहे. आर्थिक शिस्त बिघडवणारा कारभार आहे.जे जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य नाहीत अशा लोकांना निधी दिलेला आहे. मी कॉंग्रेस पक्षाचा सदस्य आहे. मी विधानपरिषदेचा सदस्य आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ ऑर्डर आहे. माझे मित्र सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले हे मंत्री महोदयांवर सरळ सरळ आरोप करीत आहेत. बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असा उल्लेख करुन ते आरोप करीत आहेत. या संदर्भात नियम आहे. कोणत्याही सन्माननीय सदस्यांना कोणाही मंत्री महोदयांवर आरोप करायचा असेल तर त्या संदर्भात अगोदर आपणाकडे नोटीस द्यावी लागते. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी अशा प्रकारची नोटीस दिलेली आहे काय ?

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी तशी नोटीस माझ्याकडे दिलेली नाही ही वस्तुस्थिती आहे. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी नामोल्लेख टाळून वक्तव्य करावे.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, ते महाराष्ट्र शासनाचे पद आहे...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मला या संदर्भात आपणाकडून मार्गदर्शन झाले पाहिजे. सन्माननीय सदस्यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असा उल्लेख केलेला आहे. महाराष्ट्रातले काही पालकमंत्री असे ते म्हणाले असते तर आम्ही समजू शकतो...

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव ...

सन्माननीय सदस्यांनी बीड जिल्ह्याचे पालक मंत्री असा स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. त्यामुळे त्यांचे वेगळे नाव घेण्याची आवश्यकता नाही म्हणून सन्माननीय सदस्यांनी तशी नोटिस दिली नसेल तर त्यांना अशा पध्दतीने आरोप करता येणार नाही असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलतात)

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, मी आरोप केलेला नसून घडलेल्या वस्तुस्थितीची माहिती देत आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, या ठिकाणी ज्या पध्दतीने पालक मंत्री असा उल्लेख करण्यात आलेला आहे तो निश्चितपणे या सभागृहाच्या नियमात बसत नाही. यासाठी जी नोटिस द्यावी लागते ती देणे आवश्यक आहे. अशा पध्दतीने या ठिकाणी उल्लेख करण्यात येत असेल तर तो थांबविण्यात यावा अशी माझी विनंती आहे.

श्री. जयंत प्र. पटील : सभापती महोदय, आज सकाळपासून या सभागृहात काय चालले आहे? हे मला कळत नाही. आज सकाळी या ठिकाणी एक प्रकरण कोर्टात आहे असे सांगण्यात आले त्यामुळे आम्ही त्यावर प्रश्न विचारले नाहीत. सभापती महोदय, या सभागृहात आम्ही कशावर बोलावयाचे? या सभागृहात वाटेल ते निर्णय घेण्यात येतात. 40 कोटी रुपयांचे टेंडर 400 कोटी रुपयांचे करण्यात येते, असे असताना या ठिकाणी कोणा मंत्री महोदयांबद्दल बोलावयाचे नाही का? (अडथळा) या सभागृहात जेव्हा आम्ही एखाद्या विभागा विषयी बोलतो तेव्हा संबंधित मंत्री महोदयांबद्दलच बोलत असतो. सभापती महोदय, कालच या सभागृहात सामुदायिक जबाबदारीची जाणीव करुन दिलेली आहे. जेव्हा मंत्री महोदय, सामुदायिक जबाबदारीतून बोलत असतात तेव्हा त्यांना व्यक्तिगत बोलता येत नाही, ते शासनाच्या वतीने बोलत असतात. सभापती महोदय, आमदार म्हणून आमचा देखील प्रोटोकॉल आहे. आमदार म्हणून आम्हाला जे अधिकार आहेत ते डावलून जर कोणी मंत्री महोदय काम करत असतील तर कुठलाही कायदा आणि कुठलाही नियम असा नाही... म्हणून सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले जे बोलत आहेत ते बरोबर आहे त्यांना बोलू दिले पाहिजे. त्यांचे बोलणे अद्याप पूर्ण झालेले नाही, असे असताना त्यांच्या भाषणात अशा प्रकारचे अडथळे आणण्यात येऊ नयेत.सभापती महोदय, आपण देखील बीड जिल्ह्यातील आहात. आपल्याला सगळया वस्तुस्थितीची माहिती आहे. तेव्हा अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांच्या भाषणात अडथळे आणण्यात येऊ नयेत. ..2...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, पुरवणी मागण्यांवरील चर्चेमध्ये राखी सावंत कुठे येते? अशा प्रकारे विनाकारण सभागृहाचा वेळ घेण्यात येऊ नये.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, राखी सावंत या विषयावर या सभागृहात बोलण्यास बंदी आहे का? राखी सावंत यांच्या बद्दल या ठिकाणी असंसदीय बोलता येणार नाही पण या विषयावर या सभागृहात बोलण्यास बंदी आहे का ? याचा निर्णय आपण द्यावा.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी या ठिकाणी मुद्दा उपस्थित केलेला आहे. परंतु प्रा. सुरेश नवले यांनी तुलना म्हणून राखी सावंत यांच्या 'शो'चा उल्लेख केलेला आहे. अशा प्रकारची तुलना सुध्दा अयोग्य आहे. अशा पध्दतीचा उल्लेख करणे हे सभागृहाच्या नियमात बसत नाही.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, सदर उल्लेख रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावा.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : विधान परिषद नियम 35 अनुसार सन्माननीय सदस्यांना कोणावर आरोप करायचे असतील तर त्या संदर्भात अगोदर नोटिस द्यावी लागते हे सर्व सन्माननीय सदस्यांना माहीत आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी नाव न घेता बोलावे. पण नाव घेऊन बोलावयाचे असेल तर तशी नोटिस द्यावी लागेल. तसेच राखी सावंत यांच्या विषयीचा उल्लेख अयोग्य असेल तर तो रेकॉर्डवरुन काढण्यात येईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या सभागृहात राखी सावंत यांचा उल्लेख करावयाचा असेल तर नोटिस कोणाला द्यावयाची?

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी त्यांच्या भाषणाला सुरुवात करावी.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, एक गोष्ट स्पष्ट करतो की, मी कोणाचाही नामोल्लेख केलेला नाही. राखी सावंत यांच्या त्या कार्यक्रमाची आठवण व्हावी अशा प्रकारचे दृश्य किंवा कृत्य जर..

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, हे काय चालले आहे ?

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : राखी सावंत यांच्या ऐवजी सन्माननीय सदस्यांनी पुरवणी मागण्यांवर बोलावे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, एखादे काम केले तर काय ढाण्या वाघासारखे काम केले असे सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब म्हणत नाहीत का ? हा वर्णनाचा प्रकार आहे. सन्माननीय सदस्य हे साहित्य क्षेत्रातील आहेत. त्यांना मी हे कसे काय सांगणार ?

(काही सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

तालिका सभापती : सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण लवकर संपवावे.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, मला अजून बोलूच दिलेले नाही. मला राखीवरच थांबविले आहे. सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाच्या वतीने एक गोष्ट स्पष्ट होणे आवश्यक आहे. जिल्हा नियोजन मंडळ ही प्रायव्हेट लिमिटेड कंपनी नाही. जिल्हा नियोजन मंडळ ही वडिलोपार्जित प्रॉपर्टी नाही. जिल्हा नियोजन मंडळ ही कोणाची खाजगी संपत्ती नाही. या जिल्हा नियोजन मंडळाचे जे सदस्य असतील आणि विशेषत: विधान परिषदेचे सदस्य जे ज्येष्ठ आहेत, त्यांच्याकडे अनुभवसंपन्न म्हणून पाहिले जाते, अशा सदस्यांना जर डावलले जात असेल ते सर्वथा चुकीचे आहे. या ठिकाणी सहाय्यक पालकमंत्री श्री. प्रकाश सोळंके उपस्थित आहेत. ही गोष्ट मला निदर्शनास आणून द्यावयाची आहे. जिल्हा नियोजन मंडळाच्या बैठकीमध्ये रस्ते विकासासाठी 35 कोटी रुपये होते.

श्री. भास्कर जाधव : आपण कोणत्या बाबीवर बोलत आहात ?

प्रा. सुरेश नवले : मी वित्त विभागाच्या पृष्ठ क्रमांक 41 वरील बाब क्रमांक 41 बाबत बोलत आहे. मी सुध्दा मंत्री होतो. माननीय राज्यमंत्र्यांच्या पूर्वी मी राज्यमंत्री होतो. सभापती महोदय, माझ्याकडे आकडेवारी आहे. मी सगळी माहिती आपल्याकडे पाठवितो आणि आपल्या मार्फत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

शासनाकडे पाठवितो. जिल्हा नियोजन मंडळाचे सदस्य नसताना निधी देता येतो का हा प्रश्न आहे. मग निधी कशा प्रकारे दिला, काय व्यवहार झाला, हा सगळा संशोधनाचा विषय आहे. याचा शोध माननीय वित्त मंत्र्यांनी घ्यावा आणि या जिल्हा नियोजन मंडळाच्या एकूण कारभाराला शिस्त लावावी अशा प्रकारची विनंती मी या निमित्ताने करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी हक्काचा प्रश्न आहे. पुन्हा सन्माननीय सदस्या विद्याताई चव्हाण म्हणतील की, नाव का घेतले ? म्हणून मी नाव घेत नाही. काही पालकमंत्री खाजगीत असे म्हणतात की, विधान परिषदेचे सदस्य म्हणजे शेळीचे शेपूट आहे. शेपूट म्हणून सांगता येत नाही, माशी हलविता येत नाही. विधान परिषदेच्या सदस्यांबाबतचे हे त्यांचे खाजगीतील शब्द आहेत. ही बाब अतिशय दुर्दैवी आहे. आमच्या हक्काचा प्रश्न निर्माण झालेला आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, हे काय चालले आहे. हे शब्द कामकाजातून काढून टाकावेत. खाजगीमध्ये काय बोलले जाते हे सभागृहात सांगण्याचे कारण नाही.

यानंतर श्री. कांबळे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य सभागृहाचे सदस्य आहेत, त्यांच्याबद्दल काहीही चुकीची टिकाटिप्पणी रेकॉर्डवर येता कामा नये. त्यामुळे शेपूट किंवा अन्य काही शब्द असतील तर ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येतील.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, तोच तर विषय आहे. कनिष्ठ सभागृहातील सन्माननीय सदस्यांकडून आमच्याबद्दल अत्यंत आदर बाळगला गेला पाहिजे. हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. मी आदरणीय मुख्यमंत्री व आदरणीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, आपण या सगळ्या गोष्टींकडे लक्ष द्यावे.

सभापती महोदय, शिक्षण व क्रीडा विभाग, पृष्ठ क्रमांक 33, बाब क्रमांक 35 संदर्भात मी बोलणार आहे. शासनाने उत्कृष्ट काम करणाऱ्या खेळाडूंचा अत्यंत उत्तमप्रकारे गौरव केलेला आहे. मी आदरणीय मुख्यमंत्री व आदरणीय उप मुख्यमंत्री याचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. कारण कबड्डीतील खेळाडूंना त्यांनी 1 कोटी रुपये बक्षीस म्हणून दिले आहेत. महाराष्ट्रात सर्वदूर खेड्यापाड्यांपर्यंत हा संदेश जाणार आहे. मी देखील कबड्डी खेळाचा राष्ट्रीय खेळाडू आहे. मी विद्यापीठामध्ये देखील खेळलो आहे. मी काही माजी खेळाडूंसाठी मागणी करीत नाही. माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री दूरदर्शीपणे कारभार करीत आहेत. तसेच, माननीय क्रीडा मंत्री देखील चांगला कारभार करीत आहेत. ते अतिशय तडफदार आहेत, कार्यक्षम आहेत, त्यांच्याकडे कार्यबाहुल्य आहे. खेळाडूंना एक वेगळी दिशा देण्याचा प्रयत्न ते करीत आहेत, त्यामुळे त्यांचेही मन:पूर्वक अभिनंदन. माननीय राज्यमंत्री श्री. भास्कर जाधव यांना मला एक विनंती करावयाची आहे की, आपण कायद्याप्रमाणे जिल्हा नियोजन मंडळाचा कारभार केला पाहिजे. आपल्याकडून तशी अपेक्षा आहे. हा काही तुघलकी कारभार नाही, अशाप्रकारे कारभार होता कामा नये, नियमाने बध्द कार्यक्रम असावा, एवढी भावना व्यक्त करतो आणि माझे भाषण थांबवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई (नामनियुक्त) : सभापती महोदय, आपण मला बोलण्यास वेळ दिल्याबद्दल मी आपले आभार मानते. सन 2011-12 च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा करण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, मी आता कामगार व सेवायोजन, पृष्ठ क्रमांक 37, बाब क्रमांक 38 वर बोलणार आहे. सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनांकरिता आपण काही रक्कम वर्ग केली आहे. त्या योजनेंतर्गत शहरी बेरोजगारांना कामधंदे देणार आहात, याबद्दल दुमत नाही. मी आपणासमोर 2-3 मुद्दे मांडण्याचा प्रयत्न करणार आहे. मुंबई शहरच नव्हे तर संपूर्ण महाराष्ट्रात बेसुमार वाढ होत आहे. आपण नगरपालिकांना अनुदान देतो, महानगरपालिकांना अनुदान देतो किंवा बाकीच्या ठिकाणी देखील अनुदान देतो. मी मुंबई शहरातून आलेली लोकप्रतिनिधी आहे. आपण मुंबई शहर जगाच्या नकाशावर आणण्यास आतुर झालो आहोत.

(नंतर श्री.भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

आज मुंबई शहरात 40 ते 50 मजल्यांच्या इमारतींचे बांधकाम होत असताना सगळीकडे पहायला मिळते. मी मध्यंतरी माननीय मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिले होते. बांधकाम होण्याविषयी माझ्या सारख्या व्यक्तिच्या मनामध्ये शंका नाही. पण त्यासाठी काही तरी उपाययोजना हवी. मी इन्फ्रास्ट्रक्चर हा शब्द वापरणार नाही. कारण सन्माननीय सदस्य श्री.दिवाकरजी रावते माझ्यावर रागवतील. या सर्व कामांसाठी आपल्याकडे आज पाण्याचे काही नियोजन आहे काय ? आज मुंबई शहर पाणी पाणी म्हणत आहे. मी परवा पाण्यासाठी काढलेला एक मोर्चा बघितला. आज मुंबई शहरामध्ये पाणी नाही. आपण किती म्हटले की, आम्ही मुंबई शहरासाठी 24 पाणी देऊ पण आज वस्तुस्थिती तशी नाही. गिरगाव, परळ, लालबाग सारख्या भागामध्ये आपण जावे. तेथे पाणी नाही. कदाचित दादरला भरपूर पाणी असेल. कारण तेथे लिडर राहतात. आज मुंबईतील कित्येक भागांना केवळ एकच तास पाणी येते. तेव्हा यासाठी नगरविकास विभागाने काही तरतूद केली आहे काय ? त्या पत्रामध्ये मी जो मुद्दा लिहिला होता तो मी पुन्हा हायलाईट करते. एखाद्या इमारतीच्या 15 व्या, 18 व्या, 20 व्या मजल्याला आग लागली तर ती नियंत्रित करण्यासाठी त्या क्षमतेचे बंब आहेत काय, आग विझविण्याची यंत्र सामुग्री आहे काय ? असा प्रश्न विचारला असता मला त्यास 'नाही' असे उत्तर आलेले आहे. तेव्हा याचे नियोजन आपण केव्हा करणार आहात, हे देखील आम्हाला येथे समजणे आवश्यक आहे. तसे झाले नाही तर आपण ज्या रस्त्याने जाण्याचा प्रयत्न करीत आहोत तो रस्ता बंद झाल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, मी आणखी एक मुद्दा मांडणार आहे. मी मुंबईत हौसिंग बोर्डाच्या इमारतीत राहते. दारिद्र्य रेषेखालील लोकांना राजीव गांधी योजने अंतर्गत महाराष्ट्र व मुंबईत घरे देणार आहात. त्याबद्दल आपले अभिनंदन आहे. या घरांची किंमत फार कमी आहे. पण त्याच बरोबरीने आपल्या ज्या हौसिंगच्या योजना आहेत त्यासाठी आपण काय करणार आहात ? याचे देखील उत्तर आपल्या सर्वांना शोधावे लागेल. माझा सारखा पत्रव्यवहार सुरू असतो.

सभापती महोदय, म्हाडामध्ये निगरगट्ट अधिकारी आहेत. आज म्हाडामध्ये 17 दलालांच्या चौकशीचे काम सुरू आहे. पण त्या चौकशीला प्रतिसाद द्यायचा नाही, पोलिसांना मदत करायची नाही, सामान्य माणसाचे काम करायचे नाही असे धोरण म्हाडातील अधिकाऱ्यांनी स्वीकारले आहे. अशाच प्रकारे म्हाडातील सर्व यंत्रणा आज काम करीत आहेत. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई....

मुंबई शहरामध्ये म्हाडाच्या 54 वसाहती आहेत. महाराष्ट्रात कोकण, नागपूर, पुणे अशा प्रकारची वेगवेगळी हौसिंग बोर्ड आहेत. या बोर्डांच्या माध्यमातून आपण लोकांना स्वस्त घरे देणार आहोत की नाही ? सगळ्याच लोकांना कोटीच्याकोटी उड्डाणे घेत येत नाहीत. सामान्य लोकांना घर मिळाले पाहिजे असे आपल्या सरकारचे धोरण आहे. दारिद्रय रेषेखालील लोकांसाठी राजीव गांधी आवास योजना केल्याबद्दल आम्ही आपले अभिनंदन केले. म्हणजे बाकीची काही माणसे नाहीत काय ? त्यांना घर नको आहे काय ? यात मला नाही असे उत्तर सापडत आहे. नाही म्हणून उत्तर सापडत असेल तर आपण या अधिकाऱ्यां बरोबर वावरणार आहोत काय, याचे देखील उत्तर आपल्याला शोधावे लागेल. मला आपल्याला सांगायला खेद वाटतो की, बांधकामासाठी हौसिंग बोर्डाची परवानगी मिळावी म्हणून लोकांनी 15-15 वर्षापूर्वी 10-10 कोटी रूपये सरकारकडे, हौसिंग बोर्डाकडे भरलेले आहेत.

यानंतर श्री.भोगले.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

15-15 वर्षे त्यांचे पैसे म्हाडाकडे पडून आहेत. सचिव, गृहनिर्माण हे या लोकांच्या बाजूने आहेत त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. परंतु म्हाडातील अधिकारी त्यांचे प्रस्ताव कसे रेंगाळतील याच प्रयत्नात आहेत. रिपेअर बोर्डाचे मुख्याधिकारी त्यांचे प्रस्ताव कसे प्रलंबित राहतील याच प्रयत्नात असतात. जेणेकरुन लोकांना वारंवार म्हाडामध्ये खेटे घालावे लागतील. त्यामुळे आज सर्वसामान्य माणसे घरे मिळण्यापासून वंचित राहिलेली आहेत. त्यांची कुतरओढ सुरु आहे. इमारती कधी कोसळतील याचा भरवसा नाही. अशा जर्जर झालेल्या इमारती कोसळून ढिगाऱ्याखाली माणसे गाडली जातील याचीच हे अधिकारी वाट पहात आहेत का याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. अशा अधिकाऱ्यांवर योग्य ती कारवाई होणे गरजेचे आहे. आता मुंबई दुरुस्ती मंडळामध्ये नवीन मुख्याधिकारी नियुक्त झालेले आहेत. सध्या कोकण बोर्डाच्या मुख्याधिकाऱ्यांकडे चार्ज देण्यात आला आहे. अगोदरचे जे मुख्याधिकारी होते ते हाताखालच्या अधिकाऱ्यांना बोलावून आपल्याला योग्य वाटतील तीच कामे करुन घेण्याचा प्रयत्न करीत होते. हे प्रकार थांबले पाहिजेत.

सभापती महोदय, मुंबई शहरात अनेक इमारतींची दुर्दशा झालेली आहे. अशा इमारती पाडल्यानंतर तेथे राहणाऱ्या रहिवाशांना सरकारच्या कायद्यानुसार पर्यायी जागा उपलब्ध करुन दिली जाते. आज मी ज्या परिसरात राहते त्या मुलुंडमध्ये 25 वर्षापूर्वी ज्यांना पर्यायी जागा देण्यात आली ते आजही त्याच ठिकाणी खितपत पडलेले आहेत. त्यांना मुंबई शहरात उभारल्या जाणाऱ्या इमारतीमध्ये जागा दिली गेली पाहिजे. अधिकारी सांगतात की, तुमची दोन घरे असली तरी तुम्हाला दोन घरे न मिळता एकच घर दिले जाईल. जणू काही या अधिकाऱ्यांच्या स्वखर्चानेच त्यांना घरे दिली जाणार आहेत. दलालांमार्फत घुसखोरांना राजरोसपणे आश्रय दिला जातो. परंतु 25-25 वर्षे ट्रान्झिट कॅम्पमध्ये राहणाऱ्यांना त्यांच्या मूळ जागेवर उभ्या राहिलेल्या इमारतीमध्ये जागा दिली जात नाही.

सभापती महोदय, आज म्हाडाच्या अनेक इमारतींमध्ये अधिकाऱ्यांच्या माध्यमातून पेपर तयार करुन सदनिका मिळविलेले जे भाडेकरु रहात आहेत, त्यांच्याकडून अधिकृतपणे भाडे वसूल केले जात आहे. अशा लोकांना घर मिळाले पाहिजे अशी मी मागणी करते. जर शासन झोपडपट्टीतील लोकांना मोफत घर देत असेल तर जे लोक 25-25 वर्षे तीन-तीन हजार रुपये म्हाडाकडे भाडे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती अलका देसाई.....

भरतात त्यांच्या नावावर घर हस्तांतर होणे आवश्यक आहे अशी मी या निमित्ताने मागणी करते आणि अनेक वर्षापासून मी या मागणीचा पाठपुरावा देखील करीत आहे. परंतु दलालांच्या हस्तक्षेपामुळे म्हाडाच्या एका चांगल्या योजनेची दुर्दशा झालेली आहे. असे असताना आपण मूग मिळून बसणार आहोत का? असेच प्रकार सुरु राहिले तर सर्वसामान्य माणसांना घर देता येणार नाही. सर्वसामान्य माणसांना घर कसे मिळेल याची तजवीज शासनाने करावी एवढे बोलून माझे भाषण संपविते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व भारताचे माजी उप पंतप्रधान स्वर्गीय श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या प्रदर्शनाचा कालावधी वाढविण्यासंबंधीची घोषणा

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व भारताचे माजी उप पंतप्रधान स्वर्गीय श्री.यशवंतराव चव्हाण यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त मनोरा आमदार निवास येथे एक प्रदर्शन भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा कालावधी दिनांक 15 ते 25 मार्च, 2012 पर्यंत निश्चित केलेला होता. या प्रदर्शनाला भरीव प्रतिसाद मिळत असल्यामुळे याचा कालावधी सोमवार, दिनांक 26 ते शुक्रवार, दिनांक 30 मार्च, 2012 पर्यंत पुढे वाढविण्यात आला आहे. याची कृपया सर्व माननीय सदस्यांनी नोंद घ्यावी आणि या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: सन 2011-12 च्या खर्चाच्या पूरक विवरणपत्रावर चर्चा.

(चर्चा पुढे चालू .....

डॉ. दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : महोदय, बाब क्र. 121, पृ.क्र. 121-सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात मी मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, आरोग्य विभागाची परिस्थिती अत्यंत वाईट आहे. कारण या राज्यात सन 2005 पासून एकही प्राथमिक आरोग्य केंद्राची निर्मिती झालेली नाही. 2627 चे लक्ष्य असताना गेल्या 7 वर्षात फक्त 161 उपकेंद्रे उभारली गेली. 7755 उपकेंद्रांमध्ये आजच्या परिस्थितीत एएनएम नाहीत मग ती चालतात कशी अशी काळजी वाटते. 2740 उपकेंद्रांमध्ये पाणीपुरवठाच नाही तर जवळपास 2800 केंद्रांना वीज पुरवठा नाही. प्राथमिक आरोग्य केंद्रांची परिस्थिती पाहिली तर एकूण पीएचसी पेक्षा 14 टक्के पीएचसी मध्ये प्रसूती गृहेच नाहीत, 276 पीएचसी मध्ये ओ.टी., लेप्रोस्कोपी सर्जरीची व्यवसथा नाही. 436 केंद्रांमध्ये लॅब टेक्निशियन्स नाहीत 202 केंद्रामध्ये फार्मासिस्ट नाहीत. मला वाटले होते की, या पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून तरतूद करण्यात येईल व हा प्रश्न मार्गी लागेल पण तसे दुर्दैवाने झालेले दिसत नाही. सार्वजनिक आरोग्य विभागाने लॅबोरेटरी, एमआरआय आणि सी.टी. स्कॅन जे मोजक्या ठिकाणी कार्यरत आहेत ते देखील खाजगीकरणाकडे देण्याचा विचार सुरु केला आहे. त्यासाठी या खाजगी लोकांना कमी भावात जागा, पाणी व विजेचा पुरवठा देण्यात येईल व त्या बदल्यात शासनाच्या फक्त 30 टक्के गरीब लोकांना ते सेवा पुरवतील. वास्तविक त्यांचे फक्त मशिन्स आणि स्टाफ असून संपूर्ण व्यवस्था आपलीच आहे. तरी देखील 70 टक्के रुग्णांना ते खाजगीरित्या चार्जेस आकारुन सेवा देतील व पैसा कमावतील, याचाही विचार होणे आवश्यक आहे. अशा प्रकारे खाजगी लोकांच्या हातात ही सेवा दिली तर आपल्या राज्यातील विद्यार्थी कोठे शिकतील व त्यातून एम.डी. रेडिऑलॉजिस्ट कसे तयार होतील हा प्रश्न आहे, म्हणून शासनाने याचा फेरविचार करावा.

त्याचबरोबर राज्यात एड्सचा प्रचंड पैसा मिळत आहे. त्याचा वापर होत नाही फक्त दोन चार एनजीओज रॅली काढून टी-शर्ट्सचे वाटप करतात व कुठे तरी कंडोम्सचे वितरण करतात, एवढे केल्यानंतर संपले, पुढे काहीच करीत नाही. त्यानंतर हा संपूर्ण पैसा मलेरियासाठी वापरला जातो. हा पैसा तिकडे वळविण्याचे कारण सुध्दा मीच सांगतो. कारण गेल्या चार वर्षात केंद्र सरकारकडून हिवताप निर्मूलनासाठी आलेला पैसा कमी कमी होत गेला आणि त्याचे मुख्य कारण म्हणजे आपण मागणीच केली नाही. जो पैसा आला त्याचा सन 2006 पासून वापर न होत

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

गेल्यामुळे दरवर्षी ती रक्कम कमी होत गेली आणि आता तर हा पैसा मलेरियासाठी वापरला जात आहे. अशा प्रकारे कोणत्याही योजनेचा पैसा कोणत्याही योजनेसाठी वळविण्याची या शासनाची नीती आहे. पण निदान औषधांच्या बाबतीत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या बाबतीत तरी असे करु नये अशी माझी सूचना आहे. आपल्या राज्यातील एड्स निर्मूलनाचे काम अद्याप संपलेले नाही. मघाशी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी जे.जे. हॉस्पिटलचे पुनरुज्जीवन करुन अत्याधुनिक बनविण्याचा निर्णय घेतल्याबद्दल शासनाचे अभिनंदन केले. तसेच सेंट जॉर्जेस हॉस्पिटलमध्ये गेला तर दिसून येईल की, या हॉस्पिटलच्या बाजूलाच युतीच्या काळात 17 मजली इमारत बांधून तयार आहे पण तिचा वापर अद्याप केला जात नाही याची जाणीव मंत्री महोदयांना आहे की नाही याची मला कल्पना नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

या 17 माळयाच्या इमारतीमध्ये आता कबूतरे राहतात. या इमारतीच्या दरवाजे तसेच खिडक्याही तुटलेल्या आहेत. आता पुन्हा 560 कोटी रुपयाची नवीन इमारत बांधली जाणार आहे. आज सकाळी माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे की, आम्ही सेन्ट जॉर्जेस हॉस्पिटलच्या आवारात अजून एक इमारत बांधणार आहोत. त्यामुळे यासंदर्भात अर्थमंत्र्यांनी विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 48, पृष्ठ क्रमांक 48 मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृहच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. मागासवर्गीय आश्रमशाळेची काय परिस्थिती आहे याची मी आपल्याला थोडक्यात माहिती देणार आहे. दाभोसे आश्रमशाळेसाठी 4 वर्षापूर्वी पैसे दिले गेले होते. परंतु सावंत नावाच्या ठेकेदाराने या आश्रमशाळेचे आजपर्यंत काम न केल्यामुळे या ठिकाणचे मागासवर्गीय विद्यार्थी खुराडयामध्ये राहत आहेत. न्याहाळे गावाच्या आश्रमशाळेची सुध्दा अशीच परिस्थिती आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाने मोखाडयाच्या उपविभागामध्ये जवळजवळ 207.80 लक्ष रुपये खर्च करुन रस्ते केले. परंतु हे रस्ते केवळ कागदावरच तयार करण्यात आलेले आहेत. पालघर ते वाडा देवगाव हा रस्ता 70 कि.मी. ते 120 कि.मी. लांबीचा असून या रस्त्यावरील खड्डे भरण्यासाठी 77 लक्ष रुपये, गटारीसाठी 10 लक्ष रुपये, भरावासाठी 10 लक्ष रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. मोखाडा खोडाळा-विगाव रस्ता अतिशय चांगला आहे परंतु तरी देखील या रस्त्यावरील खड्डयासाठी 85 लक्ष रुपये, गटारीसाठी 5 लक्ष रुपये व भरावासाठी 5 लक्ष रुपये खर्च करण्यात आलेले आहेत. विगाव बेलपाडा-घाटणदेवी रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी 15 लक्ष रुपये खर्च करण्यात आलेले आहे. हे जे रस्ते आहेत ते फार चांगले असून या रस्त्यावर कोणत्याही प्रकारची डागडुजी करण्याची गरज नसतांना काम न करता पैसे खर्च झालेले आहेत. खरे म्हणजे या ठिकाणी रस्तेच झालेले नाही परंतु या विभागातील उपअभियंता रंजन जाधव,ज्युनियर इंजिनिअर श्री.पाटील व श्री. देशमुख सांगतात की, हे रस्ते तयार केले गेले आहेत. हे रस्ते कधी तयार करण्यात आलेले आहे याबाबत पत्र लिहून विचारणा केली आहे परंतु अद्यापही त्यांच्याकडून उत्तर आलेले नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत...

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 159, बाब क्रमांक 155 वरील रोजगार स्वयंरोजगार विभागाच्या संदर्भात विचार व्यक्त करणार आहे. 21 लाख बेरोजगारांना नोक-या देण्यात येतील असे शासनातर्फे सांगण्यात आलेले आहे. परंतु या नोक-या कशा येणार आहेत, कोणत्या माध्यमातून येणार आहेत, कोणत्या कंपन्यांमध्ये नोक-या मिळणार आहेत, नोकरीच्या कॅटेगरीज काय आहेत याची काही सुध्दा माहिती मिळत नाही. केवळ रोजगार मेळावे भरवावयाचे व बक्षीसे मिळवायचे काम सुरु आहे. यासंदर्भातील पाहणी अहवालाचा जो रिपोर्ट आहे त्यामध्ये हे बेरोजगार मेळावे किती बोगस आहेत याची माहिती देण्यात आलेली आहे. सन 2009-2010 मध्ये 144 व सन 2010-2011 मध्ये 190 बेरोजगार मेळावे भरविण्यात आले आहेत. परंतु या मेळाव्याला एकही उद्योजक उपस्थित नव्हता. तरी सुध्दा सन 2009-2010 मध्ये 10994 व सन 2010-2011 मध्ये 20,908 बेरोजरांना नोक-या उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत अशी माहिती देण्यात आलेली आहे. जर उद्योजक उपस्थित नव्हते तर नोक-या कशा काय मिळाल्या ? रोजगार मेळाव्यासाठी निधी आहे म्हणून रोजगार मेळावे भरवावयाचे आणि पैसे वापरावयाचे का ?

सभापती महोदय, बाब क्रमांक 148 , पृष्ठ क्रमांक 151 वरील महिला बाल विकासाच्या संदर्भातील देवदासींच्या पुनर्विकासासाठी निधीची तरतूद करण्यात आलेली आहे. आपल्या सर्वांना माहिती आहे की, टेक होम रेशनचे काम बचत गटांकडे देण्यात आलेले आहे. टेक होम रेशन योजना सद्या बंद करण्यात आलेली आहे. या योजनेच्या संदर्भात कोर्टाने स्टे दिलेला आहे असे सांगितले जाते. कुपोषित बालकांसाठी ही योजना फार महत्वाची आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

टेक-होम रेशन योजनेचे नेमके काय झाले? आज ही योजना कुठे आहे? ही संकल्पना या सदनामध्ये खूप भांडण करुन मान्य करुन घेण्यात आली होती आणि महिला गटावर आक्षेप घेण्यात आला होता,त्या योजनेचे नेमके काय झाले,ही योजना आज कोणत्या स्थितीमध्ये आहे याची माहिती मिळावयास पाहिजे.

सभापती महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्र.141, पान क्र.146 यामध्ये अशासकीय कला विद्यालय वाणिज्य खात्याला अनुदान देण्याविषयी मागणी करण्यात आली आहे. तंत्र व उच्च शिक्षण खात्याच्या अखत्यारित मुंबई विद्यापीठ येते आणि ते स्वायत्त आहे हे मला माहिती आहे. पण तरीदेखील आपला मुंबई विद्यापीठावर काहीतरी कंट्रोल असेल. आपल्याला चिंता करण्यासारखी गोष्ट आहे. या मुंबई विद्यापीठामध्ये गेल्या वर्षी जेवढ्या ॲडमिशन झाल्या त्यामध्ये आणि यावर्षी झालेल्या ॲडमिशनमध्ये 14 हजार विद्यार्थ्यांची तफावत आहे म्हणजे ही संख्या कमी झाली आहे. सन्माननीय मंत्री श्री.पतंगराव कदमसाहेब,आपण विद्यापीठाचा कारभार चालवित आहात. ज्यावेळी विद्यापीठ लोकांना प्रॉडक्टीव्ह देत नाही त्यावेळी विद्यापीठाकडे येणाऱ्या विद्यार्थ्यांचा कल कधी घसरतो तर मग हे विद्यार्थी कुठे गेले ? 2008-2009 मध्ये 1 लक्ष 99 हजार 548 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. 2009-2010 मध्ये 2 लाख 30 हजार 148 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. 2010-2011 मध्ये 2 लक्ष 15,859 विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला म्हणजे जवळजवळ 14 हजार विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला नाही, याची कारणे शासन शोधणार आहे की नाही? तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये देखील हा प्रश्न होता. पण तो चर्चेला आला नाही. याठिकाणी असे उत्तर दिलेले आहे की, असे शक्य नाही, प्रश्न उद्भवत नाही, प्रश्न उद्भवत नाही, प्रश्न उद्भवत नाही अशी उत्तरे दिली तरी देखील प्रश्न तसाच आहे.मग विद्यार्थ्यांची संख्या का कमी झाली हे पुरवणी मागण्यांवरील चर्चेच्या निमित्ताने तरी आम्हाला सांगावे.

सभापती महोदय, मुंबई विद्यापीठाला अजूनपर्यंत नॅकचा दर्जा मिळाला आहे की नाही? काल-परवा पर्यंत इन्स्पेक्शन झाले होते. त्याचे काय झाले ? आज मुंबई विद्यापीठाला नॅकचा दर्जा मिळावयास हवा होता,तो मिळाला की नाही?अशी किती महाविद्यालये आहेत की ज्यांना नॅकचा दर्जा मिळालेला नाही आणि याबाबतीत आपण कुठे आहोत ? नॅकचा दर्जा कसा मिळणार आहे? कारण एकंदर 620 महाविद्यालयांपैकी 319 महाविद्यालयांमध्ये प्राचार्यांची पदे रिक्त आहेत. माननीय मंत्री महोदय हे प्राचार्य कधी येणार?ज्या बोटीला कॅप्टनच नाही,ती बोट कशी पुढे जाणार

असुधारित प्रत/प्रसिध्दीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . . .

आहे आणि महविद्यालयाला कसा दर्जा मिळणार? आजपर्यंत याचा लेखा-जोखा झालेला नाही. तसेच मुंबई विद्यापीठाचा जो अकाऊंटन्सी विभाग आहे, तो आज कॅपेबल नाही. कारण जमा-खर्चाचाच ताळेबंद देण्यात आलेला नाही. तसा तो झाला आहे की नाही हे आपण उत्तराच्या भाषणामध्ये सांगावे. माननीय मंत्री महोदय, रोज नवीन-नवीन गोष्टी करीत आहेत, प्रयोग करीत आहेत.सन्माननीय मंत्री श्री.राजेश टोपे साहेब सांगतात की, आम्ही माहिती ऑन लाईन करु, हे करु, ते करु, पण प्रत्यक्षात काहीही होत नाही. एकेकाळी मुंबई विद्यापीठ प्रतिष्ठेचे मानले जात होते. आज आपण तेथे कोणते कोर्सेस सुरु करीत आहोत. आज लोकांना रोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने काय प्रयत्न करीत आहोत? केवळ वडिलोपार्जित म्हणजे कॉमर्स्, सायन्स आणि आर्टस् हे कोर्सेस सुरु आहेत.इतर विद्यापीठे कसे काम करीत आहेत ते पहावे,मी माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्याकडे बोट दाखवूनच सांगत आहे की, विद्यापीठ कसे चालवावयाचे याबाबतीत आपण त्यांच्या कडून थोडा सल्ला घ्यावा.

डॉ.पतंगराव कदम (खाली बसून) : नॅकचा ॲडव्हाईस घ्यावा. आम्ही ए+ आहोत.

डॉ.दीपक सावंत : तुमचे खाजगी विद्यापीठ आहे, डीम्ड युनिव्हर्सिटी आहे. तुम्ही विद्यार्थ्यां कडून जास्त पैसे घेता आणि स्वत:च व्हाईस चान्सलर आहात. माझा माननीय मंत्री महोदयांना प्रश्न आहे की, मुंबई विद्यापीठाच्या बाबतीत आपण काय करणार आहात? कारण सदनामध्ये लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून या विषयावर बरीच चर्चा झाली होती, त्यानुसार मुंबई विद्यापीठामध्ये व्यवसायनुरुप अभ्यासक्रम सुरु करणार आहात काय असा प्रश्न उपस्थित करुन मी माझे दोन शब्द संपवितो. जय हिंद जय महराष्ट्र.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अनुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 18, बाब क्रमांक 21-महसूल व वन विभाग - मुंबईत झालेल्या बॉम्बस्फोटात जखमी झालेल्यांना सहाय्य देण्याबाबत मागणी केलेली आहे. बॉम्बस्फोटात जखमी झालेल्यांना आर्थिक सहाय्य करण्यात येते परंतु ती मदत सर्वच जखमींना मिळते किंवा कसे याबाबत आढावा घेणे आवश्यक आहे. वरळी, शेअर मार्केट, रेल्वेतील बॉम्बस्फोट, गेट वे ऑफ इंडिया इत्यादी ठिकाणी झालेल्या बॉम्बस्फोटामध्ये अनेकजण मृत्युमुखी पडले होते तर अनेकजण जखमी झाले होते. बॉम्बस्फोटामध्ये जखमी झालेल्यांची अनेक महिन्यांपासून तक्रार आहे की,त्यांना अजून उपचार घ्यावे लागत आहेत. परंतु त्याबाबत शासनाकडून कोणतीही मदत मिळत नाही. जर मदत देण्यासाठी निधी कमी पडत असेल तर तो शासनाने वाढवून दिला पाहिजे. ज्या रुग्णालयात ते उपचार घेऊ इच्छितात तेथे त्यांना उपचार मिळाले पाहिजेत. तेव्हा याबाबत शासनाकडून मदत मिळणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, रेल्वे अपघातात दरवर्षी साधारणत: चार ते पाच हजार लोकांचा मृत्यू होत आहे. तेव्हा त्यांना शासनाकडून काही आर्थिक मदत मिळणे आवश्यक आहे. कारण त्यांच्याकडे रेल्वे मंत्रालय लक्ष देत नाही, महानगरपालिका लक्ष देत नाही, महाराष्ट्र शासन लक्ष देत नाही. आज रेल्वेने प्रवास करणाऱ्यांचा केव्हा बळी जाईल हे सांगता येत नाही. रेल्वे बॉम्बस्फोटामध्ये काही जणांनी आपले हातपाय गमावलेले आहेत. रेल्वे अपघात झाल्यास जखमींना तातडीने ॲम्ब्युलन्सने हॉस्पीटलला पोहोचविले तर त्यांचा जीव वाचू शकतो. याकडे दुर्लक्ष झालेले आहे. तेव्हा यासाठी शासनाने तरतूद करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 20 बाब क्रमांक 24 - वन विभाग- सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार परिरक्षणाचे काम पूर्ण करण्यासाठी मागणी केलेली आहे. आम्ही मागील 12 वर्षापासून मागणी करीत असताना देखील मालाड, बोरिवली, कांदिवली, दहिसर, मुलुंड, या महसूल भूमी अभिलेखनाचे काम पूर्ण केलेले नाही. ते काम अजून प्रलंबित आहे. तेव्हा त्यासाठी खास निधी देऊन ती कामे कशी तातडीने पूर्ण् करता येतील हे पाहणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 33 बाब क्रमांक 35-समाजकल्याण विभाग - अपंगाकरिता माध्यमिक स्तरावरील एकात्मिक शिक्षण योजना (आयईडीएसएस) याकरिता मागणी केलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

सभापती महोदय, अंध विद्यार्थ्यांना ब्रेल लिपी शिकण्यासाठी त्यांना आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 118, बाब क्रमांक 120-गृह निर्माण विभाग -दारिद्र्य रेषेखाली राहणा-या बेघर व्यक्तींसाठी 68 हजार 600 इतके प्रति गाळा सानुग्रह अनुदान देण्यासाठी मागणी केलेली आहे. या वर्षी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या 8517 लाभार्थ्यांची निवड करण्यात आलेली आहे. त्यासाठी चालू वित्तीय वर्षात तरतूद केलेली आहे. परंतु ही तरतूद अतिशय अपुरी आहे. विदर्भ, मराठवाडा आणि कोकणामध्ये अत्यंत गरिबीच्या आणि हलाखीच्या अवस्थेमध्ये हे लोक राहात आहेत आणि ही संख्या खूप मोठी आहे. लाभार्थ्यांचा 8517 हा आकडा खूपच कमी आहे. विदर्भामध्ये अजूनही काही लोक मातीच्या घरामध्ये राहात आहेत. या योजनेंतर्गत जास्तीत जास्त लाभार्थ्यांना कशी घरे मिळतील याचा विचार करावा व त्यासाठी तरतूद करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 147, बाब क्रमांक 145 - कला व संस्कृती- जे जे स्कूल ऑफ आर्टस् ही महाराष्ट्रातील सर्वात नावाजलेली शासकीय संस्था आहे. परंतु गेल्या काही वर्षापासून या संस्थेकडे दुर्लक्ष झाल्यामुळे ती डबघाईस आलेली आहे. या संस्थेने अनेक कलावंतांना नावलौकिक मिळवून दिलेला आहे. अनेक कलावंत घडविले आहेत. या संस्थेस गत वैभव प्राप्त करुन देण्यासाठी विशेष तरतूद केली पाहिजे.

यानंतर कु.थोरात...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण...

सिने कलाकार, नाटक कलाकार, गायक किंवा इतर क्षेत्रातील अनेक कलाकारांना प्रसिध्दी मिळते किंवा शासनाकडून अर्थ सहाय्य मिळते परंतु एखाद्या चित्रकाराला, शिल्पकाराला किंवा एखाद्या पेंटरला आपल्या कलेचे प्रदर्शन भरविण्यासाठी मुंबई किंवा पुण्या सारख्या मोठया शहरांमध्ये आर्ट गॅलरी मिळू शकत नाही, त्यामुळे खरे कलाकार दुर्लक्षित राहिलेले आहेत. म्हणून जे.जे. स्कूल ऑफ आर्टस् सारख्या ज्या तत्सम संस्था आहेत या संस्थामधील कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या कलाकृतींचे प्रदर्शन भरविण्यासाठी आणि त्यांना बक्षिसे देऊन उत्तेजन देण्यासाठी शासनाने जे.जे. स्कूल ऑफ आर्टस् या संस्थेचा दर्जा सुधारण्यासाठी काही निधीची तरतूद करणे आवश्यक आहे.

सभापती महोदय,पान क्र. 151 बाब क्रमांक 149 महिला व बाल कल्याण या विभागावर मी बोल इच्छिते. सभापती महोदय, महिला व बाल कल्याण विभाग महापालिकेकडे सुध्दा आहे तसेच राज्य शासनाचा सुध्दा महिला व बाल कल्याण विभाग आहे. परंतु खेदाने नमूद करावेसे वाटते की, या विभागाकडून महिलांना किंवा बालकांना कुठलीही मदत मिळत नाही. मुंबई महापालिकेतील या विभागातील अधिकारी दर वर्षी विमानाने इतर राज्यात आठ-आठ दिवस जातात आणि तेथील महिला व बालकल्याण विभागाच्या कामकाजाची पाहणी करतात. पण या विभागाकडे मदत मागितली तर आम्हाला राज्य शासनाकडून कोणतेही अर्थसहाय्य मिळलेले नाही असे सांगण्यात येते. माविमच्या माध्यमातून राज्य शासनाचे अनेक चांगले उपक्रम राबविले जातात. परंतु त्या संबंधीचा निधी महाराष्ट्र राज्यातील कुठल्याही महिलांपर्यंत पोहचत नाही. दरवर्षी, वर्षा अखेरीस मार्च महिन्यात काही एनजीओंज्ना बोलावून मिटिंग घेण्यात येते आणि सांगण्यात येते की, तुम्ही काही महिलांना प्रशिक्षण दिले असेल, काही संस्थांकडून काम केले असेल तर त्या संबधीचे फोटो आम्हाला द्या. म्हणजे हा विभाग आम्ही महिलांना प्रशिक्षण देऊन तयार करीत आहोत, मुलांना सहाय्य करीत आहोत यासंबंधीची आकडेवारी कागदोपत्री दाखविण्यासाठीच आहे की काय? सभापती महोदय, मला या ठिकाणी सांगण्यास खेद वाटतो परंतु ही वस्तुस्थिती आहे की, महिला व बाल कल्याण या विभागाकडून कुठल्याही महिलांना किंवा लहान मुलांना कुठलेही सहाय्य मिळत नाही म्हणून महिला व बाल कल्याण विभागासाठी निधीची तरतूद करण्यात यावी व महिलांना व बालकांना सहाय्य देण्यात यावे अशी मी विनंती करते.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण.....

सभापती महोदय,मुंबई आणि पुण्या सारख्या मोठया शहरांमध्ये महिला बचत गटाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रातील महिला चांगल्या प्रकारचे उत्पादन करीत आहेत. काही बचतगट चांगल्या कलावस्तू तयार करीत आहेत तर काही बचतगट खाण्याचे पदार्थ तयार करीत आहेत. परंतु त्यांनी तयार कलेल्या वस्तुंना बाजारपेठ मिळत नाही. मुंबई, पुण्या सारख्या शहरांमध्ये अनेक मोठया बाजारपेठा आहेत. मॉल्स आहेत. अशा ठिकाणी त्यांना विक्री केंद्रे उपलब्ध करुन देण्यासाठी महिला व बालकल्याण विभागाकडून तरतूद झाली पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, पान क्रमांक 48, बाब क्रमांक 48 सार्वजनिक बांधकाम विभागावर मी बोलू इच्छिते. चेंबूर-मानखुर्द येथे मूकबधीर, अनाथ व मतीमंद मुलांची व्यवस्था आहे. यापूर्वी या ठिकाणी असलेल्या वास्तूमध्ये जवळ जवळ अडीच ते तीन हजार मुले रहात होती. आज आम्ही त्या वास्तूला भेट दिली असता ती वास्तू ओस पडलेली दिसली. त्या ठिकाणी 200 मुले सुध्दा नाहीत. शासन ते बंद करण्याच्या मार्गावर आहे. म्हणून मला या ठिकाणी सूचना करावयाची आहे की, मुंबई शहरामध्ये साडेचार लाख अनाथ मुले आहेत. त्यांना आधाराची आवश्यकता आहे, निवाऱ्याची आवशकयता आहे, त्यांच्या पालनपोषणाची आवशकयता आहे. बालमजूर नको असे शासन सांगत असते परंतु या बालकांनी जगावयाचे कसे? ते कुठेतरी हॉटेलमध्ये काम करतात किंवा रस्त्यावर भीक मागत असतात इतकी त्यांची वाईट अवस्था आहे. त्यामुळे महिला व बालकल्याण विभागाने यामध्ये लक्ष घालावे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने जर तेथे विस्तारित इमारती बांधल्या तर साडेचार लाख मुलांचे नाही पण बऱ्यापैकी मुलांचे शिक्षण, प्रशिक्षण व पालनपोषण करुन त्यांना मदत करता येईल. म्हणून या ठिकाणी असलेल्या रिकाम्या जमिनीवर या मुलांसाठी आवश्यक असलेल्या विस्तारित इमारतींचे बांधकाम करण्यासाठी निधीची तरतूद करण्यात यावी, अशी मी विनंती करते.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण .....

सभापती महोदय, यानंतर मी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 121 वरील बाब क्रमांक 121 बाबत बोलणार आहे. बंद आरोग्य केंद्रांच्या बाबतीत मला सांगावयाचे आहे. मुंबई शहरामध्ये महानगरपालिकेचे 227 वॉर्ड आहेत आणि त्या प्रत्येक वॉर्डात आरोग्य केंद्रे आहेत. मुंबईच्या अनेक रुग्णालयांमध्ये जर आपण पाहिले तर केईएम रुग्णालय, सायन रुग्णालय, भगवती रुग्णालय किंवा जे.जे. रुग्णालय असेल त्या ठिकाणी एवढा ताण आहे की, लॉबीमध्ये गाद्या टाकून रुग्णांना झोपविण्यात येते. त्यांच्याकडे लक्ष नसते. त्यांना वैद्यकीय मदत सुध्दा मिळू शकत नाही. परंतु आपण ही छोटी छोटी आरोग्य केंद्रे जर सुधारली आणि त्या ठिकाणी पॅथॉलॉजी लॅब सुरु करुन दिली तर मलेरिया, डेंग्यू, टायफाईड या सारख्या आजाराच्या रुग्णांना उपचार घेता येतील आणि मोठ्या रुग्णालयांवरील ताण कमी होईल. मघाशी सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी सेंट जॉर्जेस रुग्णालयाचा उल्लेख केला. ते हॉस्पिटल सुध्दा अतिशय मोक्याच्या जागी आहे. कॅन्सरच्या बाबतीत मुंबईमध्ये टाटा रुग्णालय सोडले तर दुसरी जास्त रुग्णालये नाहीत. सेंट जॉर्जेस रुग्णालयामध्ये जर कॅन्सरच्या रुग्णांसाठी सेवा सुरु करु शकलो तर शासनाकडून ते एक खूप मोठे काम होईल. त्यासाठी जी आर्थिक तरतूद लागेल ती शासनाने अवश्य करुन दिली पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मला पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 167 वरील बाब क्रमांक 157 बाबत बोलावयाचे आहे. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्म शताब्दी वर्ष आपण साजरे करीत आहोत. त्यासाठी आपण 2 कोटी रुपये देणार आहोत. राज्य नृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव या संदर्भातील उपक्रम आपण साजरे करणार आहोत. मला असे वाटते की, छोट्या छोट्या गल्ल्यांमध्ये पथनाट्य करणारे जे कलाकार आहेत अशा कलाकारांच्या माध्यमातून आपण संपूर्ण महाराष्ट्रभर स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जीवनावर जर पथनाट्य सादर केले आणि ते सबंध महाराष्ट्रभर दाखविले तर ते जास्त संयुक्तिक होईल आणि जास्त लोकांपर्यंत पोहचू शकेल असे मला वाटते. आपण नाट्य, नृत्य, तमाशा हे नेहमीच करतो. जर

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्रीमती विद्या चव्हाण .....

आपण पथनाट्याचा एक नवा उपक्रम या ठिकाणी सुरु केला तर स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या जीवनाचा पूर्ण परिचय महाराष्ट्रातील अकरा कोटी जनतेपर्यंत पोहचवू शकू. त्यांचाही विचार या ठिकाणी व्हावा, अशी विनंती करुन मी माझे भाषण संपविते.

यानंतर श्री. कांबळे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू ज़मा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, पूरक मांगों का समर्थन करते हुए मैं अपने विचार सदन के सामने पेश करना चाहता हूँ. हमारे युवा वित्त व नियोजन राज्य मंत्री यहां पर बैठे हुए हैं. मैं केवल 2-3 मुद्दों के बारे में अपनी बात कहना चाहता हूँ. मैंने केन्द्रीय सरकार और कुछ राज्यों का बजट किस तरह से बनता है, उसके बारे में जानकारी ली है. बजट बनाने का हमारा ट्रेडीशनल तरीका है और उसके बाद 3 बार पूरक मांगे पेश होती हैं. हम लोग स्टडी करेंगे तो हमें मालूम होगा कि जब बजट बनता है तो योजनओं के ऊपर होने वाले खर्चे का उसमें सही रिफलेक्शन नहीं होता है और बाद में हमें कई बार पूरक मांग पेश करनी पड़ती हैं. इस समय तो वर्ष 2012-13 का बजट बन गया है, लेकिन उसके आगे के लिए कोई कमेटी बनाकर, जांच करके सिस्टम में रेशनल चेंज होना चाहिए, ताकि पूरक मांगों में कम से कम राशि का प्रावधान किया जाए और उसमें केवल वही खर्च आना चाहिए जो हमें बजट बनाते समय मालूम न हो. हमारी सारी मांगें नियमित बजट में आनी चाहिए और हम जो 3 बार पूरक मांगें सभागृह में पेश करते हैं, वह नहीं होना चाहिए. हम केवल 2 दिन ही पूरक मांगों पर चर्चा के लिए रखते हैं. इस प्रकार से सारे विभागों के ऊपर चर्चा नहीं हो पाती है. हम नियमित बजट पर भी केवल 2 दिन की चर्चा रखते हैं, इसलिए इसमें रेडीकल चेंज होना चाहिए.

सभापति महोदय, बाब क्रमांक 1 से 4 सामान्य प्रशासन विभाग के बारे में हैं. महाराष्ट्र एक प्रगतिशील राज्य है. यहां पर पहले से अच्छे काम होते रहे हैं और अभी भी अच्छे काम हो रहे हैं, लेकिन कुछ राज्य हमसे एडमिनिस्ट्रेटिव रिफोर्म्स में आगे जा रहे हैं. हमारा डिलीवरी सिस्टम बहुत पुराना हो गया है, उसमें समय लगता है. बहुत सारी बातों का मल्टीलेयरिंग हो गया है. एक छोटे से काम के लिए पेपर नागपुर से पुणे जाएगा, पुणे से मुंबई आएगा और फिर मुंबई से नागपुर जाएगा. यह जो मल्टी डिपार्टमेंट में पेपर घूमते हैं, इसको दुरुस्त करने के लिए, डिलीवरी सिस्टम को इम्प्रूव करने के लिए एक एडमिनिस्ट्रेटिव रिफोर्म्स कमीशन बनना चाहिए. हमें एडमिनिस्ट्रेशन को कैसे रेशनलाइज करना है, कैसे एफिसिएंट बनाना है, इस बारे में इस कमीशन को विचार करना चाहिए. अभी कम्प्यूटर का जमाना है, ई.मेल का जमाना है, हमने महाराष्ट्र में बजट डिस्ट्रीब्यूशन सिस्टम चालू किया है. मैं माननीय राज्य मंत्री को बताना चाहता हूँ कि जब से यह सिस्टम शुरु किया है, तब से आधे से अधिक

....2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

. . . श्री. एस.क्यू. ज़मा

कर्मचारियों का, गरीब मजदूरों का समय से भुगतान नहीं होता है. भारत सरकार और हमने पेमेंट ऑफ वेजज एक्ट बनाया है, उसमें शिड्यूल है कि कामगार की पगार कब होनी चाहिए. जब से हमारे यहां पर बजट डिस्ट्रीब्यूशन सिस्टम आया है, उसमें समय पर पगार कभी होती ही नहीं है. बजट डिस्ट्रीब्युशन सिस्टम फास्ट होना चाहिए और इसमें ऑन-लाइन ट्रान्जेक्शन होना चाहिए. हमारे शिक्षक आमदार सदन में प्रश्न उठाते हैं कि दो-तीन महीने तक शिक्षकों की पगार नहीं होती है और कई महीने तक उन्हें ग्रान्ट नहीं दी जाती है.

(इसके बाद श्री देवदत्त...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा :

छात्रों को दी जाने वाली छात्रवृत्ति भी समय पर नहीं दी जाती है. ये सब काम अब हम ऑन लाइन शुरु कर रहे हैं. लेकिन ऑन लाइन शुरु करने के बाद भी ये सब काम समय पर नहीं हो पाते हैं. मेरा कहना है कि एक एडमिनिस्ट्रेटिव रिफार्म कमीशन बनाकर इन सब कामों में सुधार किया जाना चाहिए.

सभापति महोदय, मैं आपके माध्यम से वित्त राज्य मंत्री तथा नियोजन राज्य मंत्री जी से कहना चाहता हूँ कि महाराष्ट्र राज्य की इकॉनामि में वेस्टेज बहुत होता है. मैं एक उदाहरण कई बार दे चुका हूँ और अब फिर से यह उदाहरण देना चाहता हूँ कि सभी माननीय आमदारों को पगार लेने के लिए 6 फार्मों पर हस्ताक्षर करने पड़ते हैं और इन फार्मों पर 22 जगह हस्ताक्षर करने पड़ते हैं.

दूसरी जगहों पर मेडिकल ट्रीटमेंट भी ऑनलाईन किया जाता है. टेली कॉंफ्रेंसिग के माध्यम से अमेरिका के डॉक्टर से यहां पर ट्रीटमेंट कराया जा सकता है. लेकिन हमें यदि पगार लेना हो तो उसके लिए हमें 22 जगहों पर हस्ताक्षर करने पड़ते हैं.

सभापति महोदय, मेडिकल रिइम्बर्समेंट के बिल में जो लोग गड़बड़ी करते हैं मैं उनका पक्ष नहीं लेना चाहता. लेकिन मेरा कहना यही है कि यहाँ पर होने वाले सभी काम तेज गति से होने चाहिए. हमारे यहां पर 289 माननीय सदस्य विधान सभा में हैं और 78 माननीय सदस्य विधान परिषद में हैं. इस प्रकार हम अंदाज लगा सकते हैं कि माननीय सदस्यों से इतने ज्यादा साईन कराकर और इतने ज्यादा फार्म भराने की वजह से कितने टन कागज हम एक साल में बर्बाद करते हैं, इसका अंदाज आसानी से लगाया जा सकता है. मेरा कहना है कि इस तरह से बर्बाद होने वाले पैसे और कागज को हमें बचाना चाहिए. जब आप ऑन लाइन की बात करते हैं तो हमारा पगार भी ऑन लाइन ही होना चाहिए. यह सब काम अच्छी तरह से ऑन लाइन कैसे किया जा सकता है, इसकी जानकारी आप एक कमीशन बैठाकर कर सकते हैं.

दूसरी बात मैं कहना चाहूंगा कि इस तरह का नियम है कि हर कारपोरेशन की रिपोर्ट सदन में रखी जानी चाहिए. उन कारपोरेशन्स की 10-15 या 20 साल पुरानी रिपोर्ट आप

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

सदस्यों को देते हैं. लेकिन वे रिपोर्ट बहुत पुरानी होने की वजह से तथा वे रिपोर्ट बहुत बड़ी- बड़ी होने की वजह से हम आसानी से अंदाज लगा सकते हैं कि कितने माननीय सदस्य उन रिपोर्टों को अपने साथ लेकर जाते होंगे. इस प्रकार हम देख सकते हैं कि कितने टन पेपर्स की बेवजह बर्बादी हम करते हैं. इसकी वजह से हमारा पैसा बेवजह व्यर्थ चला जाता है. इसलिए ये सब रिपोर्ट माननीय सदस्यों को ऑन लाइन दी जानी चाहिए.

मेरा कहना है कि यहां के सब रुल्स हमने बनाए हैं. इसलिए जिन कानूनों की या नियमों की आवश्यकता नहीं है या जिन नियमों को बदला जाना जरुरी है, उनमें जल्द से जल्द बदल किया जाना चाहिए. जिस माननीय सदस्य को जिस विभाग की वार्षिक आम सभी की रिपोर्ट चाहिए, वह रिपोर्ट माननीय सदस्य ऑन लाइन ले सकें, इस तरह की व्यवस्था की जानी चाहिए. मैं यही बताना चाहता हूँ कि हमारे यहां पर वेस्टेज बहुत होता है, इसको रोका जाना बहुत जरुरी है. इसलिए यदि कोई एडमिनिस्ट्रेटिव रिफार्म कमीशन बनाया जाता है तो हमारे अनेक माननीय सदस्य अपने सुझाव उस कमीशन के सामने रख सकते हैं.

एक बात मैं अल्पसंख्यको के बारे में कहना चाहूंगा यहाँ पर हमारे अल्पसंख्यक विभाग के राज्य मंत्री तथा माननीय वित्त राज्य मंत्री महोदय भी यहां पर बैठे हैं. मैं कहना चाहूँगा कि यहाँ पर वक्फ के बारे में सिर्फ एक ही डिमांड आयी है. वक्फ बारे में और हज कमेटी के बारे में हम जनरल बजट की चर्चा के समय अपने विचार रखेंगे .

एक बात मैं यह कहना चाहूँगा कि नागपुर हमारे राज्य की उप राजधानी है और हमारे नागपुर शहर का अन्तर्राष्ट्रीय महत्व भी है. वहाँ पर अब कार्गो हब आ रहा है. इसलिए मेरा कहना है कि वहाँ पर अन्तर्राष्ट्रीय स्तर का एक इस्लॉमिक रिसर्च सेंटर बनाया जाना चाहिए. इस तरह का रिसर्च सेंटर माननीय इंदिरा गांधी जी के समय में दिल्ली में बना था. इस तरह का रिसर्च सेंटर यदि हम नागपुर में बनाते हैं तो उससे सेंट्रल इंडिया के बहुत बड़े हिस्से को लाभ होगा. नागपुर के आस-पास के बहुत सारे राज्य उस इस्लॉमिक रिसर्च सेंटर से कवर हो जाएंगे. पिछली बार माननीय मंत्री महोदय ने उस रिसर्च सेंटर के लिए बजट में प्रावधान करने की बात कही थी. लेकिन उसका प्रावधान उस समय बजट में नहीं हो पाया. यहाँ पर उपस्थित दोनों

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री जमा....

माननीय मंत्री महोदय से मैं अनुरोध करुंगा कि नागपुर में इंटरनेशनल लेवल का एक इस्लॉमिक रिसर्च सेंटर बनाया जाना चाहिए. जिस तरह का रिसर्च सेंटर दिल्ली में है, उसी तरह का रिसर्च सेंटर नागपुर में बनाने का प्रावधान इस साल के बजट में किया जाना चाहिए.

मुझे पूरी उम्मीद है कि माननीय मंत्री महोदय इस रिसर्च सेंटर का प्रावधान इस साल के बजट में अवश्य करेंगे. इतना ही मुझे कहना है. धन्यवाद.

--0--

इसके बाद श्री भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, आपण मला बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपले आभार मानतो आणि माझे विचार व्यक्त करतो.

मी बाब क्रमांक 141, पान क्र.146 वर माझे विचार व्यक्त करणार आहे. या बाबी अंतर्गत उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी 39 कोटी रूपयांची सुधारित मागणी ठेवली आहे. ही मागणी जास्त असायला पाहिजे होती. परंतु, ती कमी आहे. यासंबंधी मी मंत्रिमहोदयांचे तीन मुद्यांकडे लक्ष वेधत आहे.

प्रत्येक कॉलेजमध्ये तासिकेवर काम करणाऱ्या प्राध्यापकांची संख्या 50 टक्क्यांच्यावर आहे. तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना आपण अत्यंत तोकडे वेतन देतो, मेहनताना देतो. त्यांना व्हिजिटींग प्राध्यापकांचे मानधन देण्याचे मान्य केले. पण अद्याप तरतूद केलेली नाही व ती अदाही झालेली नाही. गेले वर्षभर हा प्रश्न रखडलेला आहे. म्हणून त्यांना व्हिजिटींग प्राध्यापकांचे वेतन सुधारित दराने देण्यासाठी तरतूद व्हायला पाहिजे.

त्याच बरोबर एप्रिल 2011 पासून 29 जानेवारी 2012 पर्यंत राज्यातील 10 अकृषिक विद्यापीठांशी संलग्न असलेल्या महाविद्यालयांमध्ये युजीसीच्या निर्णयामुळे माननीय कुलगुरूंनी निवड समित्या गठित केल्या. त्या निवड समितीवर माननीय शिक्षण उप संचालक किंवा त्यांचे प्रतिनिधी घेण्याची आवश्यकता नाही असे निर्देश देण्यात आलेले होते. त्यानुसार कुलगुरूंनी व्यवहार केला. निवड समिती गठित झाल्या आणि महाविद्यालयांमध्ये नेमणुका झाल्या. राज्यात साधारणपणे एक हजारच्या घरात ह्या नेमणुका झाल्या आहेत. त्या नेमणुकांना मान्यता देण्याचे काम माननीय शिक्षण उप संचाकांनी करायला पाहिजे होते. शासनाचा प्रतिनिधी नाही ही त्रुटी काढून एक हजार पी.एच.डी.,नेट, सेट धारक प्राध्यापक आहेत त्यांना वेतन मिळालेले नाही. हे सर्व नवीन पिढीतील प्राध्यापक आहेत. गेल्या 30 जानेवारी रोजी शासनाने शिक्षण सह संचालकांचा प्रतिनिधी असावा असा सुधारित जी.आर.काढला. आमची अशी मागणी आहे की, जो सुधारित जी.आर.निघाला तिथून पुढे नवीन नियुक्त करीत असताना जरूर ती अट असावी. पण गेल्या 7-8 महिन्यांमध्ये ज्य नियुक्त्या झालेल्या आहेत त्या मात्र नियमित केल्या गेल्या पाहिजेत. त्यांच्यासाठीही आर्थिक तरतूद करून त्यांना वेतन अदा झाले पाहिजे अशा प्रकारची मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.....

यानंतर मी बाब क्रमांक 142 आणि पृष्ठ क्रमांक 146 वर बोलणार आहे. येथे आपण 59कोटी रूपयांची जादा मागणी केली आहे. 1991 पासून साधारण 2000 पर्यंतच्या बिगर नेटसेट प्राध्यापकांची प्लेसमेंट करण्याचे निर्देश युजीसीने दिलेले आहेत. 80 टक्के भारत सरकारचे फंडींग असेल आणि 20 टक्के राज्य सरकारचे फंडींग असेल तर या प्राध्यपकांना प्लेसमेंट देण्यामध्ये कोणतीही अडचण नाही. म्हणून मी शासनाला विनंती करणार आहे. राज्यामध्ये बिगर नेटसेट प्राध्यापकांची मोठी समस्या गेली अनेक वर्षे प्रलंबित आहे. आता युजीसीने स्पष्ट आदेश दिलेले आहेत. आतापर्यंत आपण सर्वजण युजीसीकडे अंगुलीनिर्देश करीत होतो. तसे करणे आता बंद करावे. त्यांच्यासाठी तरतूद करून त्यांचेही वेतन अदा करावे अशी मागणी मी या निमित्ताने करतो.

याननंतर मी पुन्हा बाब क्रमांक 143, पान क्र.146 वर बोलणार आहे. मान्यता प्राप्त सार्वजनिक ग्रंथालयांची देखभाल करण्यासाठी 3 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. आजच मी आझाद मैदानावर जाऊन ग्रंथालय संघाच्या सर्व पदाधिकाऱ्यांना भेटून आलो. त्यांच्या देखील 2-3 महत्त्वाच्या मागण्या आहेत. यासंबंधी अनेक वेळा सदनामध्ये चर्चा झाली, आपल्या दालनात बैठका देखील झाल्या. या चर्चेच्या वेळी मी देखील उपस्थित होतो. बॅन्केमार्फत जे काही द्यायचे ते देण्याचे मान्य केले आहे. पण अजून व्यवहार मात्र पूर्ण झालेला नाही. ग्रंथालयांना दुप्पट अनुदान देण्याचे मान्य केले आहे. सुधारित जी.आर.देखील काढला. पण त्यात जाचक अटी घातल्या आहेत. त्यामुळे त्या ग्रंथालयांचे अस्तित्त्व धोक्यात यायला लागले आहे. त्यामुळे जी.आर.मध्ये घातलेल्या अटी काढून त्यांचे मानधन दुप्पट करण्याची आवश्यकता आहे. तसेच सेवकांच्या सेवा-शर्तीबद्दल चर्चा झालेली आहे. पण अजून जी.आर.निघालेला नाही. तो ही जी.आर.आपण काढला पाहिजे, अशा प्रकारची मी अपेक्षा व्यक्ता करतो.

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.....

सभापती महोदय, बाब क्रमांक 144, पृष्ठ क्रमांक 147. राज्य शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये कंत्राटी पध्दतीच्या सेवेसाठी अतिरिक्त तरतूद म्हणून 11 कोटी रुपयांची मागणी सादर केली आहे. वास्तविक हा एक वेगळा प्रयोग महाराष्ट्रामध्ये आपण करीत आहोत. नवीन ट्रेड शिकविण्यासाठी माणूस नेमला हे आम्ही समजू शकतो. परंतु महाराष्ट्रातील सर्व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये 25 ते 30 टक्के जागा रिक्त आहेत. त्या जागा भरण्याऐवजी कंत्राटी पध्दतीने नेमणुका केल्यामुळे शासनाच्या तिजोरीमध्ये काही प्रमाणात बचत होईल. परंतु औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून बाहेर पडणारे जे कुशल कारागीर आहेत त्या प्रक्रियेला ब्रेक लागला आहे. तेथे असलेल्या प्राध्यापकांना कंत्राटी सेवेवर नेमणूक करण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. कंत्राटी उमेदवार मिळत नाहीत. कारण वेतन फार कमी मिळते. आज ज्या काही कंत्राटी नेमणुका केलेल्या आहेत त्यांना सेवेत नियमित कसे करता येईल यासाठी प्रयत्न झाला पाहिजे. महाराष्ट्रात जेवढया औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत तेथील रिक्त जागा ताबडतोब भरल्या पाहिजेत. तेथे शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना चांगल्या पध्दतीचे प्रशिक्षण कसे देता येईल यादृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 33, पृष्ठ क्रमांक 33. शालेय शिक्षण विभागाने 13 कोटी रुपयांची पूरक मागणी सभागृहासमोर सादर केली आहे. त्या मागणीमध्ये आणखी काही मुद्यांचा समावेश होणे आवश्यक होते. गेल्या वर्षी म्हणजे 2010-2011 मध्ये शिल्लक राहिलेल्या 110 तुकड्यांमधील शिक्षकवर्गाला दररोज मंत्रालयात खेटे घालावे लागत आहेत. कारण त्यांची यादी घोषित केली, परंतु या तुकड्यांवरील शिक्षकांना गेल्या वर्षी आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली नाही किंवा पूरक मागणीमध्ये देखील समावेश झाला नाही. निदान आज सादर झालेल्या पूरक मागणीमध्ये त्यांचा समावेश होणे अपेक्षित होते. त्यांच्या वेतनासाठी तरतूद करण्याची गरज आहे. तेथील शिक्षकवर्ग गेली 10 वर्षे उपाशीपोटी राबतो आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 2003 पासून वेतनेतर अनुदान दिलेले नाही. महाराष्ट्रातील काही संस्था वगळता बहुतेक सर्व शाळांमध्ये खडू फळा, लेखन साहित्य, शैक्षणिक साहित्य, खेळाचे साहित्य याची वानवा आहे. वेळोवेळी झालेल्या चर्चेमध्ये वेतनेतर अनुदान देण्याचे मान्य केले. माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या मंत्रीमंडळ उप

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवान साळुंखे.....

समितीने 5 टक्के वेतनेतर अनुदान देण्याची शिफारस केली होती, ती शिफारस शासनाने मान्य केली आहे. परंतु अद्याप त्या शिफारशीची अंमलबजावणी झालेली नाही. तदर्थ म्हणून मागणी पुढे आली असती तर बरे झाले असते. वेतनेतर अनुदानासाठी तरतूद करणे आवश्यक असताना तरतूद करण्यात आल्याचे दिसत नाही. ती तरतूद करण्यात यावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, 2007 पासून प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक वाढीव तुकड्या आणि पदभार यामध्ये फार तफावत आहे. अनेक पदे रिक्त आहेत. पटपडताळणीच्या निमित्ताने हे काम रोखले असले तरी त्यासाठी तरतूद होऊन निधी उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता आहे. तेथे शिक्षकवर्ग गेली 7-8 वर्षे उपाशीपोटी राबतो आहे. यासाठी तरतूद व्हावी एवढे बोलून माझे भाषण संपवितो.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी याठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 49, पृष्ठ क्रमांक 57 वर जलसंपदा विभागाची मागणी सादर करण्यात आली आहे. यापूर्वी डिसेंबर, 2011 च्या हिवाळी अधिवेशनात मी गावतलाव व पाझर तलावांच्या दुरुस्तीबाबत निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केली होती. तो निधी राज्य शासन व केंद्र शासनाच्या निधीतून उपलब्ध करुन दिला जाईल असे आश्वासन दिले होते. परंतु आजपर्यंत निधी उपलब्ध करुन दिलेला नाही. या कामासाठी निधी उपलब्ध करुन दिला तर गावतलाव व पाझर तलावांची दुरुस्ती होऊन ग्रामीण भागात पाण्याची उपलब्धता होऊ शकते.

सभापती महोदय, बाब क्रमांक 34, पृष्ठ क्रमांक 33 वर क्रीडा विभागाची मागणी सादर केलेली आहे. महाराष्ट्र शासनातर्फे जिल्हा पातळीवर क्रीडा संकुल उभारण्यासाठी निधी दिला जातो. क्रीडा संकुल बांधण्यासाठी तालुका पातळीवर आणि ग्रामपंचायत पातळीपर्यंत निधी दिला तर क्रीडा संकुलाचा उद्देश साध्य झाला असे होईल.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

केवळ अशी संकुले देऊन चालणार नाही तर त्यासाठी आवश्यक असलेले साहित्य सुध्दा देणे आवश्यक आहे. सांगली जिल्ह्यातील कवठे-महांकाळ तालुक्यातील 28 ग्राम पंचायतींना एक-एक लाख रुपये क्रीडा साहित्यासाठी अनुदान देणार असल्याची पत्रे मिळाली पण त्यासंबंधी अद्यापही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, याबाबत मंत्री महोदयांनी निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

महोदय, बाब क्र. 22, पृ.क्र.11-पुनर्वसनाच्या संदर्भात मला असे निदर्शनास आणावयाचे आहे की, काही दिवसापूर्वी राज्य शासनाने एक जी.आर. निर्गमित केला आहे की जे भाग टंचाईग्रस्त आहेत त्या गावांमध्ये चाऱ्याचा पुरवठा करण्यात येईल. ही घोषणा सहा महिन्यांपूर्वी केलेली असताना त्याचा फायदा मात्र अद्यापही या टंचाईग्रस्त भागातील लोकांना होत नाही. त्यात अशा अटी टाकलेल्या आहेत की, रोजगार हमी योजनेच्या कामावर जाणारे तसेच बीपीएल धारक असतील त्यांनाच या योजनेचा फायदा देण्यात येईल. दुभत्या जनावरांना हा चारा मिळणार नाही. कवठे-महांकाळ तालुक्यातील एका गावचे लोक या निर्णयाच्या विरोधात चार दिवस उपोषणाला बसले होते. त्या गावात आज सुध्दा टँकरने पाणी पुरवठा करावा लागतो. तसेच दुष्काळी परिस्थिती असल्यामुळे शेतीसाठी पाणी नाही आणि जी.आर. च्या माध्यमातून या चार हजार लोकवस्तीच्या गावात फक्त तीनच लोक या योजनेसाठी पात्र ठरलेले आहेत, अन्य कोणत्याही व्यक्तिला फायदा मिळाला नाही, म्हणून हा जी.आर. शासनाने त्वरित बदलणे आवश्यक आहे. तसेच ज्या सहकारी संस्थांना चाऱ्याचा पुरवठा करण्याबाबत म्हटले आहे पण अशा कोणत्याही सहकारी संस्था या कामासाठी पुढे आलेल्या नाहीत. तसेच ज्या गावातील लोकांनी चार दिवस उपोषण केले होते त्यांच्या उपोषणाला कोणताही प्रतिसाद मिळाला नाही याबाबत शासनाने उचित निर्णय घ्यावा अशी माझी विनंती आहे.

बाब क्र. 58, पृ.क्र.67-उर्जा विभागाच्या अनुषंगाने माझी अशी विनंती आहे की, टंचाईग्रस्त गावांमध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असलेल्या गावांतील लोकांनी 31 मार्चपर्यंत विजेची बिले भरली नाहीत तर त्यांचे वीज कनेक्शन्स रद्द करण्यात येतील अशा प्रकारची पुकारणी प्रत्येक गावात गाडीवर स्पीकर लावून वीज मंडळाचे अधिकारी करीत आहेत. त्यामुळे शेतकरी चिंताग्रस्त झालेला आहे. माझी विनंती आहे की, अशा प्रकारची 30 टक्के सवलत दिलेली रक्कम किंवा

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे .....

बाकीच्या टंचाईग्रस्त गावांतील कनेक्शन्स रद्द करु नयेत. ग्रामीण भागात सिंगल फेजिंगच्या माध्यमातून जो वीज पुरवठा होतो तो फक्त सहा तास होतो. आता परीक्षा सुरु असल्यामुळे हा वीज पुरवठा 12 तास द्यावा अशी माझी विनंती आहे.

बाब क्र. 45, पृ.क्र. 46-सार्वजनिक बांधकाम विभाग व एस.आर. साठी जी कामे ठेवली आहेत त्या अनुषंगाने मला असे सूचित करावयाचे आहे की, आमच्या जिल्ह्यात 50-60 कोटींची कामे मंजूर झालेली आहेत पण त्यासाठी केवळ 1 कोटी इतकाच निधी वर्ग झालेला आहे. माझी अशी विनंती आहे की, कामे मंजूर आहेत त्यासाठी सुध्दा त्वरित निधी देणे आवश्यक आहे. ग्रामीण भागात रस्त्यांची परिस्थिती बिकट असल्यामुळे खड्डे भरण्यासाठी जो निधी असतो तो त्या भागात काम करणाऱ्या मैल कुलींच्या पगारावर खर्च केला जातो. या मैल कुलींचे पगार सहा-सहा महिने होत नाहीत म्हणून त्यांच्या पगारासाठी हा निधी वर्ग करण्यात येतो, ही तफावत दूर करावी व हा निधी ताबडतोब देण्यात यावा अशी माझी सूचना आहे.

बाब क्र. 157, पृ.क्र. 167-पर्यटन विभागाच्या अनुषंगाने माझी अशी मागणी आहे की, आमच्या तालुक्यात विरोबा देवस्थान असून शासनाने या देवस्थानासाठी 4 कोटीचा निधी मंजूर केला होता. त्यापैकी दोन वर्षात फक्त 85 कोटी इतकाच निधी दिलेला आहे, उर्वरित निधी अद्याप मिळणे बाकी आहे. हा निधी दिल्याशिवाय पुढील आराखड्यानुसार काम करणे शक्य होत नाही याचाही विचार शासनाने करावा. या देशात काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंत पुण्यश्लोक अहिल्यादेवी यांचे नाव अजरामर आहे. त्यांच्या चौंढी या गावात त्यांचे स्मारक बांधण्याचे काम सुरु आहे. मी प्रत्येक अधिवेशनात त्यासाठी मागणी करीत असतो की या स्मारकासाठी निधी अपुरा पडतो, तो शासनाने द्यावा. मागील वेळेस मी दोन कोटीची मागणी यासाठी केली होती तो निधी शासनाने दिला तर स्मारकाचे अर्धवट राहिलेले काम पूर्ण होण्यास मदत होईल.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ...

सभापती महोदय, बाब क्रमांक 24, पृष्ठ क्रमांक 20 वरील वन खात्यावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. पुढील वर्षामध्ये 100 कोटी झाडे लावली जाणार असल्यामुळे महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. मला वन मंत्र्यांना यांसदर्भात विनंती करावयाची आहे की, 100 कोटी झाडे लावत असतांना राज्यामध्ये पारंपारिक मेंढपाळ व्यवसाय करणारा जो वर्ग आहे, शेळया मेंढयाचा व्यवसाय करणारा जो माणूस आहे तो आपल्या शेळया मेंढयाना चारण्यासाठी जंगलामध्ये घेऊन जात असतो. ज्यावेळेस आपण 100 कोटी झाडे लावाल त्यावेळेला चराऊ कुरणांचा वापर शेळया मेढया राखणा-यांनाही करता येईल एवढी खबरदारी घ्यावी अन्यथा शेळी-मेंढी पालनाचा व्यवसाय राज्यातून नेस्तनाबूत होईल व या राज्यातून मेंढपाळांवर तसेच धनगर समाजावर मोठया प्रमाणात अन्याय होईल त्यामुळे हा अन्याय होणार नाही याची खबरदारी घ्यावी अशी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी-मेंढी महामंडळाचे कार्यालय पुणे येथे आहे. या महामंडळाकडे पुण्याची 400 एकर जागा होती. परंतु ही जागा नंतर वनखात्याकडे गेली. महामंडळाचे कार्यालय, प्रशिक्षण केंद्र, वसतिगृह तसेच कर्मचा-यांची वसाहत येथून काढून घेऊ नये म्हणून आम्ही वन खात्याला विनंती केली होती. शेळी-मेंढी विकास महामंडळाकडे असलेला भूखंड 4-6 वर्षापूर्वी काढून घेऊन तो बिल्डराला दिला गेला व त्या ठिकाणी मोठे टॉवर्स उभे राहिले गेले. शेळी-मेंढी विकास महामंडळाचे तसेच धनगर समाजाची अस्मिता असणारे महामंडळ भाडयाच्या जागेवर गेले. परंतु या निवडणुकीच्या वेळेस आपण सर्व व्यस्त असतांना वन खात्याने प्रशिक्षण केंद्र तसेच कर्मचा-यांची वसाहत बुलडोझर लावून जमीनदोस्त केली. असे काहीही होणार नाही असे आश्वासन आदरणीय वन मंत्र्यांनी दिले होते त्यामुळे यासंदर्भात मला खेद करावासा वाटतो. अशा प्रकारे मेंढपाळ समाजावर तसेच धनगर समाजावर जो अन्याय होत आहे तो त्वरित दूर करण्यात यावा अशी मागणी आपल्या माध्यमातून करीत आहे.

सभापती महोदय, बाब क्रमाक 121, पृष्ठ क्रमांक 121 वरील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या संदर्भात मी माझे विचार व्यक्त करणार आहे. अनेक अधिवेशनापासून मी कवठेमहांकाळ तालुक्यातील ढालगाव ग्रामीण रुग्णालयाच्या संदर्भात मागणी करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ...

हा प्रस्ताव मागील 10 वर्षापासून मंत्रालयात पडून आहे तसेच यासंदर्भात सातत्याने पाठपुरावा करुनही ग्रामीण रुग्णालय मंजूर झालेले नाही. त्यामुळे हे ग्रामीण रुग्णालय मंजूर केले तर या भागातील जनतेला चांगल्या प्रकारे वैद्यकीय सुविधा उपलब्ध होऊ शकतील.

सभापती महोदय, बाब क्रमाक 56, पृष्ठ क्रमांक 66, कामगार विभागाच्या संदर्भात मी आता विचार व्यक्त करणार आहे. सांगली जिल्हयामध्ये अपारंपारिक ऊर्जा, पवन चक्क्या मोठया प्रमाणात आहेत. पवन चक्क्यांच्या मालकांनी या ठिकाणच्या शेतक-यांच्या जमिनी अल्प दरात घेतलेल्या आहेत. शेतक-यांची काही मुले पवन चक्क्यांवर कामाला आहेत परंतु या पवन चक्क्ीच्या मालकांनी गेल्या 5-6 महिन्यांपासून या ठिकाणी काम करणा-या मुलांना पगार दिलेला नाही. त्यामुळे सांगली जिल्हयातील तासगाव, कवठेमहांकाळ, खानापूर तसेच जत तालुक्यांमधील पवन चक्की मालकांकडून अन्याय होऊ लागला आहे. त्यामुळे माझी शासनाला विनंती आहे की, या ठिकाणच्या पवन चक्की मालकांना बोलावून योग्य ती समज द्यावी व गोरगरीब जनतेचा पगार देण्यासाठी मदत करावी अशी विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमाक 32, पृष्ठ क्रमांक 28 पशुसंवर्धन विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. दुभत्या जनावरांना, गाई-म्हशी व शेळया-मेंढयांना चांगल्या प्रकारचा चारा देण्यासाठी न्युट्रीला गवताचा उपयोग होऊ शकतो त्यामुळे याबाबत प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, चांगल्या प्रतीच्या बोकडांचे वाटप करण्यासाठी महाराष्ट्रात आरकेवायच्या माध्यमातून केंद्र सरकारने 10 कोटी रुपये दिले होते. पशुसंवर्धन खात्यामार्फत संपूर्ण राज्यात मोफत बोकड वाटप योजना राबवली जात आहे. यासंदर्भात लाभार्थींची यादी तयार आहे परंतु आरकेवायचे पैसे आयुक्तांकडून महामंडळाकडे येत नसल्यामुळे बोकडांचा पुरवठा बंद झालेला असल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण व्हावयास लागला आहे. वारंवार पाठपुरावा करुन सुध्दा पैसे दिले जात नाही. यासंदर्भात दहा कोटी रुपये दिले होते परंतु हे पैसे परत घेतले असून हे पैसे आम्हाला पुन्हा उपलब्ध करुन द्यावेत अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे ...

पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेळी-मेंढी विकास महामंडळ हे पशुसंवर्धन खात्याअंतर्गत येत असते परंतु मला सांगण्यास खेद होत आहे की, 1978 पासून ते आतापर्यंत म्हणजे 32-33 वर्षामध्ये महामंडळाला केवळ 10 कोटी रुपयांचा निधी मिळालेला आहे. गेल्या 7-8 वर्षापासून यासंदर्भात मी मागणी करीत आहे. मेंढपाळांना शेळया-मेंढयांचे गट वाटप करण्यासाठी निधीची मागणी करीत आहे परंतु आजपर्यंत या कामासाठी ठाणमांड पध्दतीच्या वाटपासाठी शेळी-मेंढी महामंडळाला अद्यापि निधी मिळालेला नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपण महामंडळाचा विकास करण्यासाठी निधी देतो, पण त्याचा मेंढपाळ बांधवांना कोणत्याही प्रकारचा उपयोग होत नाही हे मला शासनाच्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला उद्योग या महत्वाच्या विभागाबाबत सांगावयाचे आहे. यातील बाब क्र.59, पान क्र.67 मध्ये कवठे महांकाळ तालुक्यामध्ये पंचताराकित एम.आय.डी.सी.मंजूर झाली आणि त्यासाठी 25 लाख रुपये वर्ग करण्यात आले आणि ते खर्च देखील झाले. पण गेल्या दोन-तीन वर्षापासून तेथील काम बंद आहे. म्हणून मी माननीय उद्योग मंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी याबाबतीत लक्ष घालावे अणि कवठे-महांकाळ येथील पंचताराकित एम.आय.डी.सी.त्वरित कशी सुरु करता येईल यादृष्टीने प्रयत्न करावा.

सभापती महोदय,माझा शेवटचा मुद्दा आहे.बाब क्र.42, पान क्र.42 वित्त विभागाच्या बाबतीत सांगावयाचे तर काही महिन्यापूर्वी मागासवर्गीय समाजाचा मेळावा घेतल्यानंतर तेथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामार्फत एक सनद सादर करण्यात आली होती.त्यावेळी आघाडी शासनाच्या माध्यमातून ज्या मागण्या करण्यात आल्या होत्या त्याबाबत आदरणीय उप मुख्यमंत्री आणि वित्त मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी या राज्यातील सर्व सामजिक महामंडळांना 300 कोटी रुपयांचा निधी जाहीर केला आणि त्यापैकी काही निधी वर्ग देखील करण्यात आलेला आहे.म्हणून मी मागासलेल्या, बहुजन आणि सर्व अल्पसंख्यांक समाजाच्या वतीने महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करीत आहे. त्याचप्रमाणे सामाजिक महामंडळांना 300 कोटी रुपयांचा निधी देत असतानाच, भटक्या विमुक्तांसाठी व धनगर समाजासाठी असलेल्या महामंडळाला सुध्दा निधी देण्यात यावा अशी मी आपल्याला विनंती करतो. धन्यवाद.

. . . .2 डब्ल्यू -2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, मला सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्र.48 बाबत बोलावयाचे आहे. याठिकाणी विद्यार्थ्यांच्या वसतीगृहाच्या दुरुस्तीसाठी 15 कोटी 25 लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे ही स्वागतार्ह बाब आहे.परंतु अनेक वेळा अशा प्रकारे तरतूद केल्याचा दावा केला जातो पण प्रत्यक्षात मात्र तरतुदीची अंमलबजावणी झाली नसल्याचे दिसून येते. म्हणून मी आपल्या समोर आणखी एक उदाहरण मांडू इच्छिते. बांद्रे-कुर्ला संकुलामध्ये अशाच पध्दतीने सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सायकल ट्रॅक बांधण्यात आल्याचा दावा करण्यात आला होता.परंतु त्याचा उपयोग केला जात नाही.याबाबतीत असे कारण सांगण्यात आले की, आम्ही त्याचे सर्वेक्षण केले नव्हते. परंतु माहितीच्या अधिकाराखाली एक कार्यकर्ता श्री.अनिल गलगली यांनी दैनिक सकाळ या वृत्तपत्रामध्ये ही बातमी प्रसिध्द केली असून आमच्याकडे तशा प्रकारचे पत्र देखील दिलेले आहे की, त्याठिकाणी जरी प्रत्यक्षात पैसे खर्च झालेले असले तरी सुध्दा सायकल ट्रॅक केलेलाच नाही. याचा अर्थ सार्वजनिक बांधकाम विभाग अनेक प्रकारची आश्वासने देते, परंतु त्या आश्वासनांची परिपूर्ती होत असल्याचे दिसत नाही किंवा प्रत्यक्षात ती कामे झालेली आहेत की नाही असा सर्वांना प्रश्न पडतो.सार्वजनिक बांधकाम विभागाकडे खास करुन मोठ्या प्रमाणामध्ये रस्त्यांच्या कामा संबंधात जबाबदारी आहे.आपण एका बाजूला म्हणतो की,कात्रणांच्या आधारे बोलवयाचे नाही.परंतु प्रत्यक्षात रस्त्यांवर होत असलेल्या अपघातांच्या अनुषंगाने बोलावयाचे झाले तर या कामांच्या बाबतीत सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कशा प्रकारे संनियंत्रण होत आहे याबद्दल मनामध्ये प्रश्न निर्माण होतो.

सभापती महोदय, त्याचप्रमाणे या विभागाच्या संबंधातील दुसरा जिव्हाळ्याचा मुद्दा असून त्याच्याबाबत पुरवणी मागण्यांमध्ये काही भूमिका मांडण्यात येईल असे अपेक्षित होते आणि हा मुद्दा म्हणजे वारंवार या दोन्ही सभागृहांमध्ये आश्वासन देण्यात आले होते की, जेथे शासकीय सेवेतील चतुर्थ श्रेणीचे कर्मचारी रहातात, त्यांनी "माझे घर" ही सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन केली होती. वांद्रे येथे जे चतुर्थश्रेणीचे कर्मचारी रहातात, त्यामध्ये विधान भवन मधील देखील अनेक कर्मचारी रहात आहेत.त्यांच्या बाबतीत सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.छगन भुजबळ यांनी आश्वासन दिले होते. तसा आश्वासन समितीचा अहवाल देखील आहे आणि त्यामध्ये यांना जागा उपलब्ध करुन देण्यात यावी असेही म्हटलेले आहे. मात्र जर आपण विधान भवन मध्ये काम करणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांचे म्हणणे देखील ऐकून घेत नसलो तर मग आपण राज्य स्तरावर कसे काम करणार याबद्दल मोठे प्रश्नचिन्ह वाटते. मला असे वाटते की, सन्माननीय राज्यमंत्री सदनामध्ये ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपस्थित नाहीत. सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाचे माननीय मंत्री महोदय आणि माननीय राज्यमंत्री देखील सभागृहामध्ये उपस्थित नाहीत

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या भाषणा-तील मुद्यांची नोंद करण्यात येत आहे. त्यामुळे त्यांनी आपले भाषण सुरु ठेवावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कालच सदनामध्ये या विषयावर बरीच चर्चा झाली.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांना त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांबाबत, प्रश्नांबाबत उत्तर मिळेल. त्यांनी आपले भाषण पुढे सुरु ठेवावे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, काल माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आणि आम्ही सर्व सन्माननीय सदस्यांनी आग्रह धरला होता. परंतु आता देखील याठिकाणी सार्वजनिक बांधकाम विभागाचे माननीय मंत्री महोदय आणि माननीय राज्यमंत्री महोदय दोघेही उपस्थित नाहीत. मघाशी सन्माननीय सदस्य प्रा.सुरेश नवले यांनी उल्लेख केला त्याप्रमाणे सामाजिक प्रतिष्ठा आहे पण राजकीय प्रतिष्ठा नाही अशी विधान परिषदेच्या सन्माननीय सदस्यांची परिस्थिती करणार आहात काय? ज्यांना असे काही बोलले की संताप येतो ते अशा अप्रतिष्ठेबाबत विचार करीत नाहीत.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे...

रोज मरे त्याला कोण रडे अशी या सदनाची परिस्थिती झालेली आहे. तेव्हा मृत्यूपेक्षा जिवंत कसे रहावे असा प्रश्न लोकांपुढे आहे. शासन अनेक योजना राबविते. त्यामध्ये असणाऱ्या त्रुटी निदर्शनास आणून दिल्यानंतरही पुन्हा त्याच त्याच चुका होत आहेत.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 33, बाब क्रमांक 34 - शालेय शिक्षण विभाग - राज्यातील आत्महत्येस प्रवृत्त होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुधारणात्मक उपाययोजना करणासाठी मागणी केलेली आहे. या सभागृहात आश्वासन देण्यात आले होते की, शिक्षण क्षेत्रामध्ये समुपदेशकाची नेमणूक करण्यात येईल. विद्यार्थी ज्या ताणतणावाखाली असतात त्यांना ते समुदेशन करतील. पण समुपदेशकांची नेमणूक करण्यात आली किंवा कसे याची आम्हाला माहिती नाही. तेव्हा याबाबत मंत्री महोदयांनी आम्हाला अवगत करावे. यासाठी आर्थिक तरतुदीची गरज असेल तर ती करणे क्रमप्राप्त आहे. आमची अपेक्षा आहे की, येणाऱ्या अर्थसंकल्पामध्ये याचा समावेश झालेला दिसून येईल.

सभापती महोदय, आपण शिक्षण शुल्क नियंत्रण विधेयक खूप मोठा गाजावाजा करुन मंजूर केले. परंतु ते विधेयक केंद्र सरकारकडे मंजुरीसाठी प्रलंबित आहे. विद्यार्थ्यांच्या परीक्षा होऊन नवीन प्रवेश प्रक्रिया सुरु झालेली आहे. त्यांच्याकडून पूर्वी प्रमाणेच डोनेशन घेण्यात येत आहे. तेव्हा शिक्षण शुल्क नियंत्रण विधेयक केंद्र सरकारकडून लवकर मंजूर करुन त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी करावी अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 148 , बाब क्रमांक 146- उच्च व तंत्र शिक्षण विभाग - महाराष्ट्र-कर्नाटक सीमा क्षेत्रामध्ये मराठी भाषेचे संवर्धन करण्यासाठी मागणी केलेली आहे. ही स्वागतार्ह बाब आहे. मराठी भाषेचे संवर्धन व्हावे यासाठी सुध्दा आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे ही महत्वाची गोष्ट आहे. बेळगाव भागातील सीमावासियांना दिलासा देण्याच्या दृष्टीकोनातून ही चांगली बाब आहे. परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत असेल तर त्यास आमच्या पक्षाचे देखील पूर्ण सहकार्य राहील. या कार्यक्रमासाठी तेथील स्थानिक संघटनांना बरोबर घेणे आवश्यक आहे. बेळगाव शहराच्या महापौर आणि उपमहापौर यांना देखील सामावून घ्यावे. त्यांचे सभासदत्व

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गो-हे...

राजद्रोहाखाली रद्द करण्यात आलेले आहे. परंतु मराठी संवर्धन कार्यक्रमाचे त्यांच्या हस्ते उद्घाटन करुन त्यांच्या मागे मराठी बांधव उभे आहेत अशा प्रकारचा दिलासा त्यांना सरकारने द्यावा अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये 6339 ग्रंथालये आहेत. त्यासाठी 3 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. तसेच त्यांच्या इमारतीच्या डागडुजीसाठी आणि सुधारणांसाठी तरतूद केलेली आहे. या गोष्टीस बराच विलंब झालेला आहे. मागील दोन वर्षाची तरतूद आपण या वर्षी एकदम केलेली आहे. माझी मागणी आहे की, दरवर्षी ही तरतूद करण्यात यावी त्यामध्ये खंड पडू नये. माजी सन्माननीय सदस्य श्री.गंगाधर पटणे हे या सदनाचे सदस्य होते. त्यांनी नांदेड जिल्ह्यामध्ये बरेच सामाजिक काम केलेले आहे. ते प्रत्येक वेळी ग्रंथालयाच्या दूरवस्थेबद्दल शासनाचे लक्ष वेधीत होते. दादर येथील सार्वजनिक ग्रंथालयास 75 वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्या ग्रंथालयास सुध्दा मदतीची अपेक्षा आहे. तेव्हा शासनाने त्यांना देखील चांगल्या प्रकारचा प्रतिसाद द्यावा अशी अपेक्षा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 66, बाब क्रमांक 55- कामगार विशेष सहाय्य विभाग- महाराष्ट्रामध्ये 10 लाख खाण कामगार आहेत. हे खाण कामगार दगडखाणीत काम करीत असताना तेथेच त्यांची निवासाची व्यवस्था असते. त्याच प्रमाणे बांधकाम क्षेत्रातील कंत्राटदारांकडे जे कामगार काम करतात त्यांची देखील राहण्याची व्यवस्था कामाच्या ठिकाणी केली जाते. या कंत्राटदारांवर काही बंधने घालण्याची आवश्यकता आहे. कारण त्या कामगारांच्या मूलभूत गरजा देखील तेथे पूर्ण होत नाहीत. तेव्हा या प्रकरणी मंत्री महोदयांनी लक्ष घालावे अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, पृष्ट क्रमांक 121, बाब क्रमांक 121- सार्वजनिक आरोग्य विभाग - पुण्यामध्ये स्वाईन फ्ल्यूचा पुन्हा एकदा प्रादूर्भाव झालेला आहे. आज दुपारी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी पुण्यातील आमदारांची त्या संदर्भात बैठक घेतली. तेथील हॉस्पीटल्समध्ये व्हेन्टीलेटर्सची आवश्यकता आहे. पुण्यातील नायडू आणि औंध हॉस्पीटल्समध्ये ग्रामीण भागातून रुग्ण औषधोपचारासाठी येतात. स्वाईन फ्ल्यूचे रुग्ण तेथे उपचारासाठी येतात. तेव्हा त्या ठिकाणी पुरेसे व्हेन्टीलेटर्स पुरविण्यात यावेत. पुण्यातील वातावरण थंड आहे. तेव्हा हा आजार रोखण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने वेळीच पावले उचलावीत.

यानंतर कु.थोरात..

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे. .. .

यामध्ये जास्त लक्ष घालणे गरजेचे आहे. विशेषत: ससून रुग्णालयाबद्दलचा मुद्दा आम्ही गेल्या दोन वर्षापासून या सभागृहात मांडीत आहोत. त्या ठिकाणची एमआरआय मशीन बंद आहे त्याचबरोबर ससून रुग्णालयाची अतिशय दूरवस्था झालेली आहे. पर्यावरण आणि सांस्कृतिक कार्य विभागाच्या माध्यमातून कै. यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करण्यात येत आहे. कै. यशवंतराव चव्हाण यांच्या नावाने पुणे महानगरपालिकेने कोथरुड येथे एक नाटयगृह बांधलेले आहे. परंतु पुणे महानगरपालिकेने त्याचे नियमितीकरण केलेले नाही त्यामुळे तेथील सर्व नाटय कलाकारांनी या नाट्यगृहाच्या तांत्रिक बाबींची पूर्तता करण्याच्या संदर्भात मागणी केलेली आहे याकडे मी शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे मला एका मुद्दाकडे लक्ष वेधावयाचे आहे. गेल्या वर्षी जोगवा या चित्रपटाला पुरस्कार मिळाला होता यावर्षी शाळा आणि देऊळ या चित्रपटांना मोठे पुरस्कार मिळालेले आहेत त्यांचा सन्मान शासनाने केला नसेल तर तो करावा अशी आमची अपेक्षा आहे. (अडथळा) मला असे वाटते की या विषयावर खूप चर्चा होऊ शकते पण योग्य त्या कलाकारांना अनुदान मिळाले तर ते त्याचा उपयोग करतील.

सभापती महोदय,महिला आणि बाल विकास मंत्र्यांचे मी लक्ष वेधू इच्छिते. महिला आर्थिक विकास महामंडळाला अनुदान देऊ केलेले आहे. महिला आर्थिक विकास महामंडळाला नोडल एजन्सी म्हणून जाहीर करणे गरजेचे आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ आणि राज्य महिला आयोग यांचे काम एकत्रितपणे उभे राहिले पाहिजे या दृष्टिकोनातून प्रयत्न व्हावेत अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, आजच्या पुरवणी मागण्यात वस्त्रोद्योग, अल्पसंख्याक आणि औकाफ विभागाच्या मागण्या नसल्या तरी मला या विभागाच्या मंत्र्याचे लक्ष वेधावयाचे आहे. मी नुकतीच कोल्हापूरला भेट दिलेली आहे. त्याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. राजे क्षीरसागर यांनी महिला बचत गटासाठी गार्मेंट पार्कचा प्रकल्प राबविला आहे. जवळ जवळ आठ ठिकाणी गार्मेंट पार्क राज्य शासनाच्या मदतीतून उभे केलेले आहेत.

श्री. मोहम्मद अरीफ (नसीम) खान : सन्माननीय सदस्यांनी बाब क्रमांक सांगावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, वस्त्रोद्योग आणि अल्पसंख्याकांच्या बाबतीतील बाब आजच्या पुरवणी मागण्यांमध्ये नाही पण या संदर्भातील मुद्दा मांडणे मला आवश्यक वाटते. अल्पसंख्याक विभागासाठी केंद्र शासनाचे जे पैसे आले होते त्याचा उपयोग राज्य शासनाने केलेला नाही याकडे मी लक्ष वेधू इच्छिते. मी या ठिकाणी 15 मुद्दे मांडलेले आहेत त्यापैकी प्रत्येक मुद्याच्या संदर्भातील बाब मी मांडली पण जी एक बाब अदृश्य आहे त्या एका बाबीकडे मी मंत्री महोदयांचे लक्ष वेधले. मंत्री महोदय, जाणीवपूर्वक माझे म्हणणे ऐकत आहेत या बद्दल मी त्यांचे अभिनंदन करते आणि माझे दोन शब्द संपवते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. मी गेल्या वेळी देखील मुद्दा उपस्थित केला होता की, काही सन्माननीय सदस्य अत्यंत अभ्यासपूर्वक आपले म्हणणे मांडतात. आताच सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले हे जिल्हा नियोजनावर अभ्यासपूर्ण बोलले आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी त्यांच्या भाषणात पुण्यात धनगर समाजाची 400 एकर जागा बिल्डर्सनी गिळंकृत केलेली आहे असा मुद्दा मांडलेला आहे त्याच बरोबर दर वेळेला त्यांच्या भाषणाचा समारोप शेळी-मेंढी महामंडळाचा उल्लेख केल्या शिवाय होत नाही. शेळी-मेंढी महामंडळाला आज तागायत एकही रुपया मिळालेला नाही. तेव्हा सन्माननीय सदस्यांच्या भाषणाच्या नोंदी घेतल्या गेल्या पाहिजेत. किमान त्याची पोह तरी देण्यात यावी अयस मी माझ्या मागील भाषणात उल्लेख केला होता.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : सर्व मंत्री महोदय, स्वत: नोटस लिहून घेत आहेत.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, गेल्या वेळी सुध्दा मी या संदर्भात ही विनंती केली होती. आज सुध्दा पुरवणी मागण्यांवरील माझे विचार मांडण्या आगोदर मी या ठिकाणी असे निवेदन करतो की, किमान "आपले म्हणणे ऐकले आहे" अशा प्रकारची पोच विभागाने दिली पाहिजे. विभागाचे अधिकारी येथे बसलेले असतात. तसेच वरती गॅलरीमध्ये काही कक्ष अधिकारी बसलेले असतात. तेव्हा संबंधित विभागाच्या राज्य मंत्री महोदयांनी पोहोच दिली पाहिजे. यापूर्वी यासंबंधीची लेखी पत्रे मोठया प्रमाणात येत होती.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

श्री. सुभाष चव्हाण .....

सभापती महोदय, यानंतर मी नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 95 वरील बाब क्रमांक 81 बाबत बोलणार आहे. रोजगार हमी योजनेच्या मजुरीच्या संदर्भात ही बाब आहे. आता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही नवीन योजना आलेली आहे. यापूर्वी कोणतीही योजना लागू करावयाची असेल तर त्या योजनेला आधी प्रदेश काँग्रेसच्या कार्यालयात मंजुरी मिळत होती. आपली रोजगार हमी योजना श्री. पागे साहेबांनी आधी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसच्या कार्यकारिणीत मंजूर केली आणि नंतर ती योजना लागू करण्यात आली. स्व. यशवंतरावजी चव्हाण यांनी सहकाराचा जो कायदा आणला तो सुध्दा आधी प्रदेश काँग्रेसमध्ये मंजूर झाला आणि नंतर तो कायदा राज्यात लागू करण्यात आला. श्री. पागे साहेबांनी आणलेली योजना आज भारत सरकारने महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना म्हणून कार्यान्वित केलेली आहे. कालच माननीय मुख्यमंत्र्यांनी अभिभाषणाच्या प्रस्तावाला उत्तर देत असताना सांगितले की, मूळ 300 कोटीची योजना होती ती 1 हजार कोटीची केली आणि मागासलेल्या भागाचा विकास करण्यासाठी ती योजना 2 हजार कोटी रुपयांपर्यंत नेणार आहोत. माननीय मुख्यमंत्री कराडचे आहेत. एक मोठी भाग्याची गोष्ट आहे की, स्व. यशवंतरावजी चव्हाण यांचे जन्म शताब्दी वर्ष साजरे करीत असताना हे सुपूत्र मुख्यमंत्री म्हणून लाभलेले आहेत. रोजगार हमी योजनेवरील मजुरांची रोजची मजुरी जी 127 रुपये आहे त्यामध्ये वाढ व्हावी अशी मी या निमित्ताने सूचना करतो.

सभापती महोदय, यानंतर मी नियोजन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 109 वरील बाब क्रमांक 110 बाबत बोलणार आहे. मागे सुध्दा मी असे म्हणालो होतो की, सिस्टिमध्ये बदल झाला पाहिजे. आमदार निधीच्या, खासदार निधीच्या कामाच्या संदर्भात आम्ही ताबडतोब एप्रिल महिन्यामध्ये पत्र देऊन सुरुवात करतो. त्यानंतर अंदाजपत्रक तयार करण्यास सुरुवात होते. वेगवेगळ्या यंत्रणांच्या बैठका होतात. वेगवेगळ्या यंत्रणांकडून अंदाजपत्रके तयार होण्यास बराच वेळ लागतो. जिल्हा नियोजन अधिकारी म्हणतात की, हा माझा निधी आहे. शेवटपर्यंत मंजुरीच मिळत नाही. हजारो

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

अडचणी येतात. लोकप्रतिनिधींना या अडचणी येऊ नयेत म्हणून सिस्टिमध्ये काही बदल करावा. त्यासाठी एक कालमर्यादा ठरवावी. जिल्हा नियोजन निधीचे मालक हे लोकप्रतिनिधी आहेत. या अनुषंगाने कालमर्यादा ठरवून तीन महिन्यात, सहा महिन्यात मंजुरी मिळाली पाहिजे असे काही तरी ठरविले पाहिजे. मंजुरी मिळाली नाही तर ते ताबडतोब बाजूला केले पाहिजे.

सभापती महोदय, यानंतर मी सामान्य प्रशासन विभागाच्या पृष्ठ क्रमांक 4 वरील बाब क्रमांक 3 बाबत बोलणार आहे. राजशिष्टाचाराच्या संदर्भातील ही बाब आहे. राज्याचे प्रमुख कार्यकर्ते म्हणजे जे लोकप्रतिनिधी आहेत त्यामध्ये आमदार असतील, खासदार असतील यांना कार्यक्रमाच्या काही तास आधी निमंत्रणे येतात. एखादा मोठा कार्यक्रम असेल, स्व. यशवंतरावजी चव्हाण यांच्या संदर्भातील कार्यक्रम असेल, 1 मे रोजीचा कार्यक्रम असेल, त्याचे निमंत्रण काही तास अगोदर येते. त्या बाबतीत सुध्दा राजशिष्टाचाराच्या अनुषंगाने विशेष प्राधान्य दिले पाहिजे. एका दुतामार्फत निमंत्रण पाठवून त्यांचा मान ठेवावा. त्यांच्यासाठी जी आसने आरक्षित ठेवलेली असतात त्या जागी अधिकारीच बसलेले असतात. सन्माननीय लोकसभा सदस्य, सन्माननीय आमदार यांच्या बाबतीत शासनाने दखल घ्यावी.

सभापती महोदय, यानंतर मी महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या पृष्ठ क्रमांक 163 वरील बाब क्रमांक 156 बाबत बोलणार आहे. दिल्लीच्या धर्तीवर विधिमंडळामध्ये अद्ययावत, सुंदर सेंट्रल हॉल असावा. त्या ठिकाणी आपल्याला विचारमंथन करता येईल. त्या ठिकाणी एक सुंदर लायब्ररी व्हावी. मी माननीय अध्यक्ष, माननीय सभापती यांच्याशी बोललो. त्यांनी सांगितले की, अशी योजना चालू आहे. त्याला चालना मिळावी. दिल्लीच्या सेंट्रल हॉलमध्ये जो जातो तो स्वत:ला भाग्यवान समजतो. त्या ठिकाणी मोठमोठे विचारवंत येतात. त्या ठिकाणी मोठे ग्रंथालय आहे. वाचनालय आहे. चांगले रेस्टॉरंट आहे. त्या ठिकाणी कॉफी पितो, आपले विचार मांडतो. त्या ठिकाणी राजकीय भाषणे होतात, राजकीय घडामोडी होतात. मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी आहे. या ठिकाणी विधिमंडळाची एवढी सुंदर इमारत आहे. या ठिकाणी सुध्दा सेंट्रल हॉलची स्थापना आपल्या वतीने करण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण .....

सभापती महोदय, यानंतर मी सांस्कृतिक कार्य विभागाच्या पृष्ठ क्रमांक 167 वरील 157 बाब क्रमांक बाबत बोलणार आहे. राज्य नृत्य, नाट्य, तमाशा व संगीत महोत्सव या संदर्भातील ही बाब आहे. आपण इतर कलाकारांना मानधन देतो. परंतु आपली जी दशावतारी नाटके आहेत ती आता कमी झालेली आहेत. आपण पूर्वी लहानपणी दशावतारी नाटक बघावयास जात होतो. त्याला अजूनही दहिकाले असा शब्द आहे. सांस्कृतिक कार्य विभागाने या दशावतारी नाटकातील जे जुने कलाकार आहेत, जे 80-85 वर्षाचे वृध्द झालेले कलाकार आहेत त्यांना जिवंत राहण्यासाठी, त्यांनी पूर्वी जी कला सादर केलेली आहे ती कला जतन करावी यासाठी अशा कलावंतांना मानधन देण्याचे शासनाने ठरवावे. त्यांना आपण मानधन देण्याचे ठरविलेले नाही. प्रत्येक वेळी आपण बोलतो. जे जुने तुटपुंजे मानधन आहे त्यामध्ये वाढ करावी. दशावतारी कलावंतांनाही मानधन देण्यात यावे अशी मी सूचना करतो.

यानंतर श्री. कांबळे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण ....

सभापती महोदय, मी आता सार्वजनिक बांधकाम विभाग, भांडवली खर्च, पृष्ठ क्रमांक 47 बाबत बोलणार आहे. आमचा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 17 आहे. आज त्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांची महत्त्वाची लक्षवेधी सूचना होती. आपण पनवेल ते इंदापूरपर्यंत 475 कि.मी. व सिंधुदुर्ग ते झाराप 108 कि.मी. मार्ग प्रस्तावित केला आहे. माननीय मंत्री महोदयांनी सकाळी आकडेवारी दिली की, तेथे 80 टक्के अपघात व 20 टक्के मृत्यू झाले आहेत. आपण त्यासाठी भरीव निधी देऊन कामाची त्वरित पूर्तता करावी. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो. धन्यवाद !

उप सभापती : मी सर्व सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सभागृहाची वेळ संध्याकाळी 6 वाजेपर्यंत असते. अद्याप बरेच सन्माननीय सदस्य बोलणार आहेत. प्रत्येकाने अत्यंत कमी वेळात मुद्दे मांडावेत. मला कोणालाही थांबवायला लावू नये.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल (महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा) : सभापती महोदय, मी सन 2011-12 च्या पुरवणी मागण्यांवर विचार व्यक्त करणार आहे. मी आता पृष्ठ क्रमांक 18 वरील बाब क्रमांक 22 बाबत बोलण्यासाठी उभा आहे. महाराष्ट्रातील शेतकरी, कापूस, सोयाबीन यामुळे गेल्या वेळचे संपूर्ण अधिवेशन गाजले. शासनाकडून शेतकऱ्यांसाठी 2000 कोटी रुपयांचे पॅकेज मंजूर करण्यात आले. माझ्या माहितीप्रमाणे, 15 मार्चपर्यंत 2000 कोटी रुपयांपैकी फक्त 120 कोटी रुपये वाटप झाले आहेत. कदाचित ती माहिती चुकीची असेल. अधिवेशनात मंजूर झालेल्या पॅकेजचे पैसे मिळाले का, असे मी माझ्या जिल्ह्यातील अधिकाऱ्यांना विचारले असता, ते म्हणाले की, अजून तालुकेच निवडले नाहीत तर पैसे देणे दूर राहिले. तालुके कधी निवडणार ते मला माहीत नाही. हे मॅच फिक्सिंगसारखे आहे का ? कोणत्या तालुक्याला निधी द्यायचा किंवा कोणत्या तालुक्याला निधी द्यायचा नाही, असे ठरले आहे का ? आपल्याकडून असे होत असेल तर ते वाईट आहे. आपण तसे करु नये. अन्याय झालेल्या शेतकऱ्यांना लवकरात लवकर व व्यवस्थितरित्या निधीचे वाटप करावे. आता पॅकेज मंजूर होऊन जवळपास 4 महिने होऊन गेले आहे. पावसाळ्याला 2 महिने शिल्लक आहेत. शेतकऱ्यांना पावसाळ्याच्या अगोदर निधीचे वाटप झाले पाहिजे, अशी माझी भावना आहे.

सभापती महोदय, आता मी पृष्ठ क्रमांक 67 वरील बाब क्रमांक 60 बाबत बोलणार आहे. मला उद्योगाबाबत बोलायचे नाही आणि ऊर्जेच्या बाबतीत न बोललेले बरे, अशी परिस्थिती आहे. आपण एकूण आवश्यक वीजनिर्मितीच्या फक्त 2 टक्के वीजनिर्मिती केली आहे. विजेची मागणी मात्र 10 टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. "वृध्दीच्या यंत्राला गती देणाऱ्यांना सलाम", "आयुष्यात क्रांती घडविणाऱ्यांच्या सन्मानार्थ", असे दैनिक "लोकमत" या वर्तमानपत्रामध्ये लिहिण्यात आले आहे. वीजनिर्मिती क्षेत्रातील सर्व सिस्टिमंना, चांगले काम करणाऱ्या संस्थाना सन्मान दिलेला आहे. पारितोषिक म्हणून सोन्याची ढाल आहे, चांदीची ढाल आहे, ब्राँझची ढाल आहे आणि उत्तेजनार्थ पारितोषिके आहेत. सन 2009-10, सन 2010-11 चे हे बक्षीस वितरण आदरणीय केंद्रीय ऊर्जा मंत्री श्री. सुशीलकुमार शिंदे साहेबांच्या हस्ते झाले आहे. महाराष्ट्र राज्याच्या वीज वितरण कंपनीचे नाव कुठे आहे का, हे पाहिले. परंतु, ते कुठेच नव्हते. सोन्याच्या ढालीत नव्हते, चांदीच्या ढालीत नव्हते किंवा ब्राँझच्या ढालीमध्ये देखील नव्हते. विरोधी पक्षाने आरोप करणे म्हणजे आरोप होत

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल ....

आहे. हे चित्र पाहिल्यामुळे तुमची नेमकी परिस्थिती काय आहे, हे माझ्या लक्षात आले. सदरची परिस्थिती सुधारण्यासाठी काही करता येते का, हे आपण पाहिले पाहिजे. मला मुंबई महानगरपालिकेचे कौतुक करायचे आहे. कारण मागील दोन्ही वर्षी त्यांनी पारितोषिक आणले आहे. परंतु, महाराष्ट्राच्या वीज वितरण कंपनीला हे काही शक्य झालेले नाही.

(नंतर श्री.भारवि ....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल..

यावरून कारभार कसा चालला आहे हे बघणे गरजेचे आहे.

यानंतर मी बाब क्रमांक 158, पान क्र.181 वर बोलणार आहे. एकाच पानामध्ये सगळे गुंडाळलेले आहे. या खात्यावर कोणीच बोलणार नाही म्हणून दोन्ही मंत्री उपस्थित आहेत. ही कौतुकास्पद गोष्ट आहे. मला या संबंधी 2-3 गोष्टी आपल्या समोर मांडावयाच्या आहेत. अल्पसंख्याकाला मुख्य प्रवाहामध्ये आणावयाचे आहे असे मी परवा ऐकले. म्हणजे अल्पसंख्याक मुख्य प्रवाहामध्ये नाहीत काय, असा माझा पहिला प्रश्न आहे. जर त्यांना मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर आपण काय करायला पाहिजे होते ? अल्पसंख्याकाची मुले शिकली पाहिजेत. त्याशिवाय ते शहाणे होणार नाहीत आणि शहाणे झाल्याशिवाय बाकीचे धंदे बंद करणार नाहीत. तुमच्या माझ्या सारखे चांगले होतील.

उप सभापती : आपण मुख्य प्रवाहात आहात असे आपणास वाटते काय ?

श्री.सय्यद पाशा पटेल : इकडे असल्यामुळे नाही वाटत. तिकडे येण्यासाठी अजून बरेच दिवस आहेत. बारावी नंतरच्या सर्व अभ्यासक्रमामध्ये 25 हजार रूपयांची शिष्यवृत्ती देण्याचा निर्णय घेतला आहे. पण ती काही परवडत नाही. मे 2009 मध्ये माजी मुख्यमंत्री श्री.अशोक चव्हाण साहेबांनी शिष्यवृत्ती रूपये 25 हजारावरून 50 हजार रूपये करण्याचा निर्णय घेतला होता. आज तेच सरकार आहे. फक्त माणूस बदलला आहे. त्यांनी घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यामध्ये तुम्हाला काय अडचण आहे ? 25 हजारात काहीच होत नाही. खरे तर सच्चर आयोगामध्ये सांगितले आहे की, दलितांपेक्षा गरिबीने जीवन जगणारे कोण असेल तर तो म्हणजे अल्पसंख्याक आहे. असे जर बोलले जात असेल तर मी मंत्रिमहोदयांना विनंती करणार आहे. दलितांच्या एवढ्याच मुलांनी शिकले पाहिजे, एवढ्याच मुलांना शिष्यवृत्ती दिली पाहिजे असे काही बंधन नाही. मग अल्पसंख्याकासाठी काम कशासाठी करीत आहात ? दलितांची मुले शिकावित, शहाणी व्हावीत म्हणून सरकारने दृष्टिकोन ठेवला आहे. कुठल्याही कॉलेजमध्ये दलित मुलाचा नंबर लागला तर कॉलेजमधील सगळीच्या सगळी फी देण्याची सोय आहे. अल्पसंख्याकाच्या मुलांसाठी मात्र 25 हजार रूपयांची सोय केली आहे. 50 हजार रूपये शिष्यवृत्ती करण्यासाठी मी पाठपुरावा करीत आहे. आता पर्यंत तीन अधिवेशने झालीत पण शासन काही बोलतच नाही. तेव्हा या संबंधी कंजुषी करू नये. जमले तर मुलांना शिकू द्यावे. ही काही फार वाईट गोष्ट नाही. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल.

मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्तीसाठी 14 लाख अर्ज आले असून त्यापैकी 4 लाख अर्ज मंजूर झाले आहेत असे मी ऐकले आहे. हे काही बरोबर नाही. शाळांमध्ये पायाभूत सोयी निर्माण करण्यासाठी 27 हजार प्रकरणे जिल्हाधिकारी यांनी मंजूर करून पाठविली आहेत. यापैकी फक्त 1200 प्रस्ताव मंजूर झाले आहेत असे मी ऐकले आहे.

अल्पसंख्याकाच्या मुलांसाठी पोलीस भरती पूर्व प्रशिक्षण केंद्र काढले. पण भरतीमध्ये त्यांची नावे काही दिसत नाहीत. मग हे नाटक करण्याची गरज आहे काय ? अल्पसंख्याकाची संख्या खरोखरच वाढवायची असेल तर ह्या गोष्टींकडे आपण बारकाईने लक्ष देण्याची गरज आहे.

नगरपालिकेच्या क्षेत्रीय विकास योजने अंतर्गत मंजूर कामावर खर्च न करता इतर कामांवर निधी खर्च करण्याच्या गोष्टी चालल्या आहेत. त्याकडे बघणे गरजेचे आहे.

अल्पसंख्याकाच्या सर्व विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची प्रकरणे आहेत त्याकडे लक्ष दिले पाहिजे. आता वर्ष संपले आहे. त्यांना अजून शिष्यवृत्ती मिळालेली नाही. आपण महाराष्ट्र बँकेला अधिकार दिले आहेत. त्या बँकेत खाते काढले की, तुमच्या लक्षात येते की, किती खातेदार आहेत. खाते उघडल्यानंतर आपल्याला पटकन पैसे द्यायला काहीच अडचण नव्हती. यात अनिश्चितता अशी आहे की, किती मुलांना शिष्यवृत्ती मिळेल हेच काही लक्षात येत नाही. म्हणून मला विनंती करावयाची आहे की, जेवढ्या मुलांचे अर्ज आले असतील तेवढ्या सर्वांचे अर्ज मंजूर करावे. तसेच मार्चच्या आधी हे पैसे मुलांना मिळायला पाहिजेत.

दुसरी एक गोष्ट मी ऐकली आहे. इतर मागासवर्गीय मुलांसाठी आर्थिक मर्यादा साडेचार लाख रूपये आहे. मात्र अल्पसंख्याक मुलांसाठी ती फक्त अडीच लाख आहे. असा भेदभाव करणे बरोबर नाही.

मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळाकडे 80 हजार कर्ज प्रकरणे गेल्या तीन वर्षांपासून पडून आहेत. त्यासाठी अनुदान नाही. मी शेवटच्या दोनच गोष्टी सांगणार आहे. राज्यात बहुतेक जिल्ह्यात मौलाना आझाद आर्थिक विकास मंडळाचे कार्यालय सुरू करण्याचा आपण निर्णय घेतला होता. आता पर्यंत किती कार्यालये सुरू झालीत हे मला माहीत नाही.

यानंतर श्री.भोगले....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल....

झालेलीच नाहीत. ती लवकरात लवकर कशी सुरु होतील यासाठी विचार करणे गरजेचे आहे. शेजारच्या कर्नाटक राज्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे सरकार सत्तेवर असताना त्या राज्याने 360 कोटी रुपये अल्पसंख्याकाच्या विकासासाठी उपलब्ध करुन दिले आहेत. परंतु महाराष्ट्र सरकार फक्त बोलते, त्यापेक्षा कमी निधी देते ही बाब खेदजनक आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारच्या निधीतून 4 जिल्हयांसाठी 60 कोटी रुपये देऊ केलेले होते. त्यापैकी 51 कोटी रुपयांचे प्रत्यक्ष अर्थसहाय्य राज्याला प्राप्त झाले. मात्र प्रत्यक्ष खर्च फक्त 15 कोटी रुपये झाला आहे. कदाचित या महिन्याभरात राज्य शासन कार्यक्षम झाले असेल तर मी शासनाचे अभिनंदन करतो. या गोष्टीकडे शासनाचे दुर्लक्ष होते असे वाटते.

सभापती महोदय, टेक्नीकल प्रोफेशनल कोर्सेसमध्ये कॅटरिंग कॉलेजमधील कोर्सचा समावेश होतो. तेथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळत नाही. ही बाब तपासून घेण्याची आवश्यकता आहे. प्रत्येक जिल्हयात मुलींसाठी वसतीगृह उभे करण्याची योजना होती. अनेक ठिकाणी जागा उपलब्ध होत नाही या सबबीखाली काम सुरु झालेले नाही. शासनाला जागा उपलब्ध होत नसेल तर हे काम सेवाभावी संस्थांकडे दिले तर चांगल्या पध्दतीने ही वसतीगृहाची योजना राबविली जाईल आणि मुलींच्या शिक्षणाची सोय होईल एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पूरक मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक-49, पृष्ठ क्रमांक 57. मांजरा खोऱ्याचे पाणी बीड जिल्हयाला मिळत नाही. यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करणे गरजेचे आहे. लघुसिंचन योजना बाभूळगाव, वंजारवाडी, कऱ्हेवाडी यांची ऊंची वाढविण्याची मागणी अनेक दिवसापासून होत आहे. मेंढा, हनुमानगढ, बुरेघाट येथे साठवण तलाव करणे गरजेचे आहे. सभापती महोदय, मध्यंतरी बीड येथे डॉ.केळकर समिती येऊन गेली. आम्ही त्यांच्यासमोर आमच्या मागण्या मांडल्या आहेत. मराठवाड्याचा भौतिक बॅकलॉग दूर करण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न झाले पाहिजेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 148, पृष्ठ क्रमांक 151. देवदासींच्या संदर्भात बिल प्रलंबित आहे. ते ताबडतोबीने सभागृहापुढे कसे येईल यासाठी प्रयत्न करावेत.

सभापती महोदय, बाब क्रमांक 149, पृष्ठ क्रमांक 151. मला अजून या प्रश्नाचे कोडे सुटलेले नाही. राज्य महिला आयोगाचे गठन करावे अशी दोन वर्षापासून आम्ही सातत्याने मागणी करीत आहोत. परंतु आयोगाचे गठन का केले जात नाही? महिला व बालकल्याण विभागाने जेंडर सेन्सिटिव्ह बजेट कसे येईल यादृष्टीने प्रयत्न करावेत, त्यासाठी वित्त खात्याबरोबर समन्वय साधावा.

सभापती महोदय, बाब क्रमांक 47, पृष्ठ क्रमांक 47. गेवराई-तलवाड रस्त्याचे काम शासनाकडून करण्यात आले. या कामावर 30 लाख रुपये खर्च झाले आहेत. परंतु काम अतिशय निकृष्ट झालेले आहे. येवता जिवाची वाडी येथील सोनीमोवा या गावाला दरवर्षी स्वच्छता पुरस्कार मिळतो. त्या गावाला जाणाऱ्या तरेगाव-धारुर रस्त्याची अत्यंत दुर्दशा झालेली आहे. त्या गावात जाणे कठीण झाले आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 121, पृष्ठ क्रमांक 121. तंबाखू उत्पादन कायदा, 2003 मधील कलम 4 नुसार सार्वजनिक ठिकाणी धुम्रपान करण्यास सक्त मनाई आहे. या कायद्याचे उल्लंघन केले गेले तर 200 रुपये दंडाची शिक्षा आहे. शाळा महाविद्यालय परिसरात 100 मीटरपर्यंत धूम्रपान व तंबाखूजन्य साहित्य विकण्यास बंदी आहे. या नियमाचे उल्लंघन झाले तर 100 रुपये दंडाची शिक्षा आहे. असे असताना सुध्दा या कायद्याची अंमलबजावणी केली जात नाही व सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान आणि तंबाखूजन्य पदार्थांची खूप मोठया प्रमाणात विक्री केली जाते.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे.....

सभापती महोदय, गेवराई तालुक्यातील कोल्हेरे येथील एक गर्भवती महिला वेळेवर उपचार न मिळाल्यामुळे शासकीय रुग्णालयाकडे जात असताना शिवाजी चौक, बीड येथे पडून तिच्या पोटातील बाळ दगावले. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य योजनेची या पध्दतीने अंमलबजावणी चालू असेल तर या प्रकरणाची चौकशी करण्यात यावी.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

जिल्ह्यात 145 गांवे कुपोषण मुक्त झाल्याचा उल्लेख आहे पण केवळ 145 गावांचाच विचार करुन चालणार नाही तर हा प्रश्न सार्वत्रिक रितीने विचारात घेण्याची गरज आहे. मुंबईत टीडीआर या रोगाचे 12 रुग्ण आढळून आले आणि त्या रोगावर कोणत्याही औषधाचा परिणाम होत नाही किंवा तो आजार कोणत्याही औषधांना रिस्पॉन्स देत नाही यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करावी. एनआरएचएम चा निधी बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अखर्चित राहिला असून तो खर्च करण्याच्या दृष्टीने विचार करावा व पुढे असा प्रकार होणार नाही याकडे लक्ष द्यावे.

महोदय, बाब क्र. 16, पृ.क्र. 17-महसूल विभागाच्या अनुषंगाने माझी अशी मागणी आहे की, वडवणी तालुक्यात मोठ्या प्रमाणात प्लॉटची खरेदी सुरु आहे. या ठिकाणी बॉंड पेपरची विक्री करणारे शेतकऱ्यांची लूट करीत आहेत. मग प्लॉट मध्यवर्ती ठिकाणावर असो की माळ रानावर असो त्याची किंमत भरमसाठ लावण्यात येते. 30 बाय 40 चा प्लॉट असेल तर त्याची किंमत 55 हजार लावून पावतीचे 600 रुपये, बॉंडचे 1100 रुपये झेरॉक्सचे 20 रुपये आणि लिखाणाचे 300 रुपये आकारले जातात पण त्यापेक्षा 5 ते 6 हजार जास्तीची आकारणी केली जाते. यासंदर्भात विचारणा केली असता दुय्यम निबंधक सांगतात की माझ्याकडे अशा प्रकारची तक्रार येत नाही, ही लूट थांबविण्यासाठी मंत्री महोदयांनी लक्ष देणे गरजेचे आहे. कुसापूर, ता. परभणी येथे सन 2006 च्या काळात नेमण्यात आलेल्या तलाठी व मंडळ निरीक्षकांनी खोटे दस्तऐवज तयार करुन शेतकऱ्यांना लुटण्याचा प्रयत्न केला आहे, याकडे लक्ष द्यावे अशी मी विनंती करते.

महोदय, बाब क्र. 33, पृ.क्र. 33 च्या अनुषंगाने मराठी भाषा फाऊंडेशन अंतर्गत जिल्ह्यातील उर्दु शाळांमध्ये मराठीचे बेसिक ज्ञान देण्यासाठी मानसेवी शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली. त्यांना दरमहा 3 हजार रुपये दिले जातात. पण मागील सहा महिने त्यांना हे अनुदान मिळाले नाही. मानधन अनुदानाचा अहवाल सादर करुन तीन महिने झाले तरी देखील हे अनुदान अद्याप मिळाले नाही, याकडे लक्ष द्यावे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे .....

बाब क्र. 33, पृ.क्र. 33-राज्यातील 2288 जिल्हा परिषदेच्या शाळांपैकी 366 शाळांमध्ये पिण्याचे पाणी नाही, 203 शाळांमध्ये शौचालयाची सोय नाही. राज्यातील सरकारी व निमसरकारी शिक्षक व शिक्षकेतर पात्र कर्मचाऱ्यांच्या सहावा वेतन आयोगातील त्रुटी निवारण समितीची मुदत दि. 3.1.2012 रोजी संपलेली आहे. यासंदर्भात मी असे विचारु इच्छितो की, शिक्षकेतर कर्मचारी व इतर संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या वेतन त्रुटीचे निराकरण करण्याचे कामकाज पूर्ण झालेले आहे काय, याकडे लक्ष दिले पाहिजे. तसे प्रस्ताव जर आपल्याकडे असतील तर त्यांचाही विचार करावा अशी मी विनंती करते. मघाशी सभागृहात औचित्याच्या मुद्याच्या अनुषंगाने परळी येथील औष्णिक वीज केंद्राच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित केलेला असल्याने पुन्हा तो मांडणार नाही. पण भुसावळ येथील दीपनगर औष्णिक वीज केंद्रातील राखेमुळे मौ. वेल्हाळे येथील पाटचाऱ्या पूर्णपणे भरल्या आहेत व त्यामुळे या लोकांना शेतीसाठी पाणी देण्यात अडचण निर्माण झाली आहे, या पाटचाऱ्या मोकळ्या करण्याचे काम शासनाने करावे अशी विनंती करते आणि मी मांडलेल्या मागण्यांवर मंत्री महोदयांनी विचार करावा अशी विनंती करते व रजा घेते.

.....3

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : महोदय, पुरवणी मागण्यांना पाठिंबा देत असताना मी दोन तीन बाबींवर माझे विचार मांडणार आहे.

महोदय, बाब क्र. 36, 37 व 38, पृ.क्र. 37-नगरविकास विभागाच्या बाबतीत मला असे सांगावयाचे आहे की, नगर परिषदांना सहाय्यक अनुदान देण्यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. खरे म्हणजे सभागृहात मी नेहमीच शिक्षकांच्याच मागण्या मांडतो असा समज झालेला असावा पण या मुद्याच्या अनुषंगाने मला असे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, 1 जानेवारी, 2006 पासून सहावा वेतन आयोग राज्यातील कर्मचाऱ्यांना लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे नगर विकास विभागाच्या अखत्यारित असलेल्या प्राथमिक शाळांनाही तो मिळाला आहे. मुंबई महापालिकेच्या शाळांनाही मिळाला व तसे जी.आर. सुध्दा निघाले आहेत. पण राज्यातील नगरपालिका आणि अन्य महापालिकेतील शासन मान्य अनुदानित माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना अद्यापही सहावा वेतन आयोग लागू झालेला नाही.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

त्यासाठी सातत्याने आम्ही प्रयत्न करीत आहोत. शालेय शिक्षण विभाग म्हणतो की, नगर विकास विभागाने जी.आर.काढला पाहिजे व नगर विकास विभाग म्हणतो की, शालेय शिक्षण विभागाने जी.आर. काढला पाहिजे. अशा प्रकारच्या टोलवा टोलवीमुळे सर्व शिक्षक वेतनापासून वंचित झालेले असल्यामुळे यासंदर्भात शासनाने उपाययोजना करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, बाब क्रमांक 38 मध्ये सुवर्ण जयंती शहर योजनेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. सुवर्ण जयंती योजना ही केंद्र शासनाची असून या योजनेला राज्य शासन मॅचिंग ग्रँट देत असते. या योजनेसाठी 51 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. या निमित्ताने मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो की, या योजनेवर मोठया प्रमाणात पैसे खर्च होत आहेत परंतु या योजनेचा खरोखर उपयोग होतो आहे की, नाही यासंदर्भात शासनाने आढावा घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, बाब क्रमाक 141, पृष्ठ क्रमांक 146, उच्च व तंत्रशिक्षण विभागावर मी माझे विचार व्यक्त करणार आहे. अशासकीय महाविद्यालयांना 38,81,47,000/रुपये देण्याच्या संदर्भातील हा विषय आहे. ग्रामीण व शहरी भागातील महाविद्यालयांना सहा वर्षापूर्वी 100 टक्के अनुदान मंजूर करण्यात आले होते. पण अद्यापही मंजूर केलेल्या अनुदानापैकी एक नया पैसा देखील महाविद्यालयांना मिळालेला नाही. कोकण विभागातील 10-11 कॉलेजेसला गेल्या पाच सहा वर्षापासून 100 टक्के अनुदान मिळालेले आहे परंतु अद्यापही त्यांना एक पैसा देखील मिळालेला नाही. या विषयाच्या संदर्भात मी गेल्या हिवाळी अधिवेशनात सन्माननीय मंत्री महोदयांना भेटलो होतो, त्यांनी यासंदर्भात तातडीने बैठक घेतली होती, संचालकांनाही सांगितले होते परंतु अद्याप यासंदर्भात कोणतीही हालचाल झालेली नाही. त्यामुळे या कॉलेजेसला मंजूर केलेले अनुदान मिळण्याच्या संदर्भात विचार व्हावा अशी विनंती आहे. विक्रमगडला आदिवासी भागात कॉलेज दिले परंतु हे कॉलेज आता बंद पडण्याच्या स्थितीत असून त्या ठिकाणच्या शिक्षकांना पगार देखील मिळत नाही त्यामुळे याकडेही शासनाने लक्ष देण्याची नितांत आवश्यकता आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते.....

सभापती महोदय, कोकण विभागाचे कार्यालय पनवेल येथे आहे परंतु हे कार्यालय बंद पडण्याच्या मार्गावर आहे. या ठिकाणी लोकांची कामे पेंडीग आहेत. ऑफिसला कुलूप लावले आहे, दप्तराला सील केलेले असून सर्व कामे ठप्प झालेली आहेत. एका महिला अधिकारी चक्क बाहेर बसून काम करीत आहे. यासंदर्भात त्यांनी महिला आयोगाकडे तक्रार केली आहे. त्यामुळे याचाही विचार होण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आपल्या माध्यमातून उच्च व तंत्रशिक्षण मंत्री महोदयांना विनंती करतो की, पदोन्नती नाकारली म्हणून आपण या लोकांना 28 हजार रुपयाच्या पगारावरुन 16 हजार रुपयांवर आणून ठेवले. खरे म्हणजे हे नियमबाहय आहे. या लोकांची अद्यापही वेतनातील कपात थांबवलेली नाही, त्यांना मूळ वेतनश्रेणी दिलेली नाही त्यामुळे यासंदर्भात तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, आयटीआय मध्ये मागासवर्गीय विद्यार्थी शिक्षण घेत असतात. या विद्यार्थ्यांना 1983 च्या जीआर नुसार 40 व 60 रुपये विद्या वेतन दिले जाते. ठाणे जिल्हयामध्ये 13 औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. या ठिकाणी गोरगरिबांची तसेच मागासवर्गीयांची मुले शिक्षण घेत आहेत. या विद्यार्थ्यांना हे अल्प विद्या वेतन सुध्दा दिले जात नाही. या विद्यार्थ्यांचे उत्पन्न 12 हजार रुपयांपेक्षा जास्त असल्यामुळे विद्या वेतन देता येणार नाही असे संबंधित अधिका-यांचे म्हणणे आहे. उत्पन्नाची मर्यादा आपण एक लाखापर्यंत वाढवलेली आहे तर ही मर्यादा मागासवर्गीयांना लागू झालेली नाही काय ? त्यामुळे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन दिले जावे अशी या माध्यमातून विनंती करतो.

सभापती महोदय, बाब क्रमाक 33,34 व 35, पृष्ठ क्रमांक 33, शालेय शिक्षण विभागाच्या तुकडयांच्या अनुदानासाठी तरतूद करण्यात आलेली आहे. शासनाने तुकडयांना अनुदानास पात्र ठरवले आहे. मागच्या अधिवेशनात तसेच या अधिवेशनातही तरतूद करण्यात आलेली नाही. त्यामुळे 171 तुकडयांच्या संदर्भात विचार होण्याची नितांत आवश्यकता आहे.

सभापती महोदय, मुंबईमध्ये 1 तारखेला राष्ट्रीयकृत बँकेमार्फत वेतन देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते .....

नांदेडला देखील निर्णय घेतला. या बाबतीत आम्ही सातत्याने विनंती करीत आहोत. माझ्या ठाणे जिल्ह्यामध्ये 7 महानगरपालिका आणि अनेक नगरपरिषदा आहेत, शहरी भाग मोठ्या प्रमाणावर आहे. लोकांना वेळेवर वेतन मिळण्यास त्रास होतो. म्हणून या देखील भागामध्ये राष्ट्रीयकृत बँकेच्या मार्फत पगाराची व्यवस्था करता येईल. अनेक प्रस्ताव आपणाकडे आलेले आहेत. मुंबईच्या बाबतीत जसा निर्णय घेतला तसा निर्णय आपण घ्यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती महोदय, एक बिनपैशाचा निर्णय शासनाला घ्यावयाचा आहे.भविष्य निर्वाह निधीतील पैसे धार्मिक यात्रेसाठी मिळण्यासाठी एक नोटिफिकेशन काढण्याबाबत मी शासनाला अनेक वेळा विनंती केलेली आहे. लोकांचे पैसे त्यांच्याच कामासाठी धार्मिक यात्रेसाठी काढता येण्याची सवलत त्यांना द्यावी. 20 वर्षे पूर्ण झाल्याशिवाय अशा प्रकारची सवलत दिली जात नाही. 2 वर्षापासून आम्ही माननीय मंत्री महोदयांकडे याबाबतीत पाठपुरावा करीत आहोत. लोक मला सारखे विचारत असतात की, या राज्याच्या शिक्षण राज्यमंत्री आदरणीय श्रीमती फौजिया खान यांना हज यात्रेचे महत्व कळत नाही का, त्यांनी फक्त आमचेच पैसे आम्हाला द्यायचे आहेत. नियमामध्ये "धार्मिक यात्रेसाठी" एवढीच तरतूद करावयाची आहे. हज यात्रेसाठी 2 लाख रुपये खर्च येतो.या हज यात्रेसाठी भविष्य निर्वाह निधीमधून ॲडव्हान्स म्हणून रक्कम देण्यास काय हरकत आहे? तेव्हा नियमामध्ये थोडीशी सुधारणा केली तर राज्यातील अल्पसंख्याक बंधू आणि भगिनींचा आपणास दुवा मिळेल. म्हणून हा निर्णय घ्यावा अशी माझी त्यांना विनंती आहे.

पृष्ठ क्रमांक 171 वरील बाब क्रमांक 158 बाबत बोलत असताना मी सांगू इच्छितो की, उर्दू शिक्षकांना 3 वर्षापासून मानधन मिळालेले नाही. मराठी फाऊंडेशनच्या शिक्षकांना 6-7 महिन्यापासून वेतन मिळालेले नाही. सर्वात महत्वाचे म्हणजे या राज्याच्या अल्पसंख्याक आयोगावर कार्यवाह अध्यक्ष यांची 2006 ला निवड केली. त्यानंतर आता एक वर्ष झाले, त्यांची निवड केलेली नाही. आता ती केली असेल तर मला माहीत नाही. परंतु अल्पसंख्याक आयोगाचे कार्यवाह अध्यक्ष आणि सचिवाची पदे भरलेली नाहीत. ही पदे तातडीने भरली तर कामाला गती येईल आणि अल्पसंख्याकांना न्याय मिळेल. तेव्हा ही पदे तातडीने भरावीत अशी मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करीत आहे.

सभापती महोदय, क्रीडा विषयक बाबीवर बोलत असताना मी सांगू इच्छितो की आपण शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या बाबतीत अन्याय केलेला आहे. प्रत्येक गोष्टीत आम्हाला कोर्टात

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

जायला लावू नका जे कोर्टात गेले त्यांना 1 जानेवारी 2006 पासून 6 वा वेतन आयोग लागू झाला.आम्ही सातत्याने त्यासाठी भांडतोय, मागणी करतोय, विनंती करतो. परंतु आपण ऐकत नाही. शारीरिक शिक्षण महाविद्यालयास 6 वा वेतन आयोग लागू करण्याच्या बाबतीत त्यांनी आपले काय घोडे मारलेले आहे की त्यांना आपण 1.1.2006 पासून लाभ देत नाही. याबाबतीत शासनाने विचार करावा.

सभापती महोदय, जिम्नॅस्टिकचे रिदमॅटिक आणि ॲक्रोबेटीक्स असे दोन प्रकार आहेत. "त्यांना शिवछत्रपती पुरस्कार देण्याचा आम्ही नक्की विचार करणार आहोत, त्यांना शिवछत्रपती पुरस्कार देणार आहेत," असे लेखी उत्तर माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे. तेव्हा माननीय मंत्री महोदयांनी दिलेल्या आश्वासनानुसार विचार करावा.

या ठिकाणी आदरणीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे बसलेले आहेत. त्यांचा मुक्तानंद विद्यालयाशी संबंध आहे. परवा कबड्डी पटूना आपण पुरस्कार दिले त्यावेळी सर्वसामान्य लोकांना, विद्यार्थ्यांना आणि पालकांना फार मोठा आनंद झाला. पुरस्कारप्राप्त कबड्डीपटू मधील एक विद्यार्थीनी मुक्तानंद विद्यालयाची आहे. तिला पुरस्कार मिळाल्यानंतर ती विद्यार्थीनी दुस-या दिवशी कुणाला भेटायला गेली असेल, तर ती तिच्या शिक्षिकेला भेटायला गेली. ज्या शिक्षिकेने तिला क्रीडापटू म्हणून तयार केले, तिला ती भेटायला गेली. त्या क्रीडापटूला आपण 1 कोटी रुपये दिले. या निमित्ताने माझी शासनाला विनंती आहे की, ज्या शिक्षिकेने किंवा शिक्षकाने आंतरराष्ट्रीय स्तरावरचे क्रीडापटू तयार केले त्यांची काही ना काही तरी दखल घेतली गेली पाहिजे, त्यांच्या गुणवत्तेची दखल घेतली गेली पाहिजे.कोचची दखल घेतली गेली. परंतु शाळास्तरावर ज्यांनी क्रीडापटूंची तयारी करुन घेतली, ज्यांच्या बद्दल विद्यार्थींनी कृतज्ञता व्यक्त करतात त्यांची शासनाने दखल घेणे आवश्यक आहे. त्यांना पैसे देऊ नका. परंतु त्यांना एखादी वेतनवाढ तरी द्याल की नाही, त्यांचा गौरव तरी कराल की नाही? या निमित्ताने त्यांची दखल घेण्याची आवश्यकता आहे अशी माझी मनापासून विनंती आहे. मला बोलण्यासाठी वेळ दिला त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

...नंतर श्री. अजित...

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखी नाही

उप सभापती : सभागृहाची वेळ सभागृहाचे कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2011-12 च्या पुरवणी मागण्यांवर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, पृष्ठ क्रमांक 61, बाब क्रमांक 50 - विधी व न्याय विभाग- मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापूर येथे व्हावे यासाठी गेली अनेक वर्षे आंदोलन सुरु आहे. या प्रश्ना संबंधी माननीय मुख्यमंत्री महोदयांना दोन वेळा शिष्टमंडळ भेटले होते आणि त्यांनी या संदर्भात काही तरी करु असे सांगितले, परंतु अजून पर्यंत काहीही झालेले नाही. तेव्हा या बाबीकडे शासनाने लक्ष द्यावे अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील वेगवेगळ्या मंदिरांचे व्यवस्थापन पश्चिम महाराष्ट्र देवस्थान समिती पाहते. मागील दोन वर्षापासून या समितीवर अध्यक्ष नाहीत. तेव्हा पश्चिम महाराष्ट्र समितीवर अध्यक्षांची नेमणूक लवकरात लवकर करावी अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सन 2005 पर्यंतच्या सर्व राजकीय केसेस काढून टाकण्यात येतील असे सरकारने अनेकवेळा सांगितले. परंतु अजून पर्यंत केसेस मागे घेतलेल्या नाहीत. तेव्हा या गोष्टीकडे देखील शासनाने लक्ष द्यावे अशी विनंती आहे.

पृष्ठ क्रमांक 33, बाब क्रमांक 33, शालेय शिक्षण विभाग - जिल्हा आंग्लभाषा केंद्र आस्थापना (डाएट) ही केंद्र सरकारची अतिशय चांगली योजना आहे. केंद्र सरकारने ही योजना बंद करण्याचे ठरविले आहे. तेव्हा शासनाने डायट योजना चालू ठेवण्याच्या दृष्टीने लक्ष घालावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, ग्रंथालयासाठी 3 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. वाचनालयाला मिळणारे अनुदान आम्ही दुप्पट करणार आहोत अशी घोषणा सरकारने अनेकवेळा केलेली आहे. या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये तशी तरतूद करावी आणि गावागावातील वाचनालयांना दुप्पट अनुदान द्यावे अशी विनंती करतो आणि वेळेअभावी माझ्या अन्य सूचना आपणाकडे लेखी स्वरुपात देतो. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो.

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. वेळ अपुरा असल्यामुळे मी फक्त मुद्दे मांडणार आहे.

सभापती महोदय,पृष्ठ क्रमांक 17, बाब क्रमांक 16 - पुनर्वसन विभाग - मागील अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये मी ठरावाद्वारे विषय उपस्थित केला होता की, प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना मिळणाऱ्या रकमेवर 10 टक्के टी.डी.एस. कापला जातो. हा टीडीएस कापू नये म्हणून शासनाने तशी शिफारस करावी, पण अद्याप शासनाने तशी शिफारस केलेली नाही. तेव्हा याबाबत मंत्री महोदयांनी आम्हाला अवगत करावे अशी मी पुन्हा एकदा विनंती करतो.

पृष्ठ क्रमांक 48, बाब क्रमांक 48- सार्वजनिक बांधकाम विभाग - मागील दोन पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर आंबोली घाटात दरड कोसळत आहे. आंबोली घाटातील एक कडा हा वन विभागाच्या अखत्यारित येतो. मागील दोन वर्षापासून तेथे पर्यायी रस्ता काढण्याचा विचार सुरु आहे. परंतु अजून त्या बाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. आंबोली येथे मोठ्या प्रमाणावर पर्यटक येत असतात. त्या ठिकाणी फक्त एकच रस्ता आहे. तेव्हा आंबोली येथे पर्यायी रस्ता काढण्याची आवश्यकता आहे. त्यादृष्टीने शासनाने उपाययोजना करावी अशी विनंती आहे.

पृष्ठ क्रमांक 41 बाब क्रमांक 26- कोकणातील भूविकास बँकेच्या कर्मचाऱ्यांना मागील सात महिन्यांपासून पगार मिळालेला नाही. सात कर्मचारी सेवा निवृत्त झालेले आहेत, अजून त्यांची देणी मिळालेली नाहीत. मुंबईतील भूविकास बँकेत काम करणाऱ्यांना पगार मिळत आहे. परंतु ग्रामीण भागातील भूविकास बँकेत काम करणा-या कर्मचाऱ्यांना पगार मिळत नाही. तेव्हा या कर्मचाऱ्यांना वेळच्या वेळी पगार मिळण्यासाठी सहकार विभागाने पुढाकार घ्यावा अशी विनंती आहे एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

अशुद्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान (सामान्य प्रशासन राज्यमंत्री) : सभापती महोदय, सामान्य प्रशासन विभागाच्या पुरवणी मागण्यावरील चर्चेत सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, दिवाकर रावते, विक्रम काळे यांनी भाग घेऊन चांगल्या सूचना केल्या. त्यांच्या सूचनांची दखल शासनाने घेतलेली आहे. तेव्हा सामान्य प्रशासन विभागाच्या मागण्या क्रमांक 1,2,3,4 सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी विनंती करते.

शालेय शिक्षण विभागाच्या मागण्या क्रमांक 33, 34 व 35, महिला बाल कल्याण विभागाच्या मागण्या क्रमांक 148 व 149, सार्वजनिक आरोग्य विभागाची मागणी क्रमांक 121, अल्पसंख्याक विभागाची मागणी क्रमांक 158 आणि सांस्कृतिक कार्य विभागाची मागणी क्रमांक 157, या सर्व मागण्यांवर ज्या सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडून काही सूचना केल्या त्याची दखल घेऊन त्यावर शासनामार्फत निश्चितपणे विचार होईल एवढे मी सांगू इच्छिते. या सर्व विभागाच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ (सार्वजनिक बांधकाम मंत्री) : सभापती महोदय, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पुरवणी मागण्यांवर अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले विचार मांडले त्याची नोंद आम्ही घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी कोल्हापूर शहराच्या रस्त्याच्या संदर्भात उल्लेख केला. त्या बाबत एवढेच सांगू इच्छितो की, एमएसआरडीसीमार्फत आयआरडीपीचे काम इ ालेले आहे.

सन्माननीय सदस्या ॲड.उषाताई दराडे यांनी गेवराई-तळवाडा रस्त्याबाबत सांगितले त्याबाबत चौकशी करुन कारवाई करण्यात येईल.

सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी सांगली जिल्हयातील राज्य आणि स्थानिक रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करुन देण्याची मागणी केलेली आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ. . .

त्यांच्या जिल्ह्यातील कामाची स्पिल कॉस्ट 61.54 कोटी रुपये आहे. त्यापैकी 31.17 कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करुन दिला आहे. इतर निधी प्राप्त झाल्यानंतर तो उपलब्ध करुन देण्यात येईल.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्समध्ये सायकल ट्रॅक झाल्याची माहिती मिळाली परंतु प्रत्यक्षात तो दिसून येत नाही. सदर बाब मी तपासून पाहीन विधान भवन आणि मंत्रालय येथील चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या गृहनिर्माण सोसायटीच्या संदर्भात त्यांनी जागेची मागणी केल्यास त्याबाबत विचार करु असे आश्वासन देण्यात आलेले आहे. सन्मानीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मोखाडा येथील आश्रमशाळेच्या बांधकामाचे पूर्वीचे कंत्राट रद्द करुन नवा कंत्राटदार नेमला आहे ते काम लवकर पूर्ण करण्याच्या संदर्भातील मुद्दा मांडलेला आहे ते काम लवकर पूर्ण होईल. न्याहळे येथील आश्रमशाळेचे बांधकाम पूर्ण झाले असून उपयोगासाठी ती तयार आहे. वसतिगृहे आणि विश्रामगृहे चांगल्या प्रकारची झालेली आहेत या बद्दल सन्माननीय सदस्य डॉ. विक्रम काळे यांनी अभिनंदनपर उल्लेख केलेला आहे तो निश्चितपणे उत्साहित करणारा आहे त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी मोखाडा तालुक्यातील भ्रष्टाचाराबद्दलचा मुद्दा मांडलेला आहे त्याबाबत दक्षता पथका मार्फत ताबडतोब चौकशी करण्यात येईल. सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी न्यायालयाच्या इमारतीची डागडुजी आणि सदर विभागाच्या इमारती सुस्थितीत ठेवण्याचा प्रयत्न करावा असे म्हटले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाचा नेहमीच तसा प्रयत्न असतो. त्यासाठी पुरेसे अनुदान उपलब्ध करुन घेण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग प्रयत्नशील आहे. या संबंधीचे अनुदान विधी व न्याय विभागाकडून येते. आंबोली घाटाच्या कामामध्ये सुध्दा जरुर लक्ष घालण्यात येईल. सर्व सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या बाब क्रमांक 43 ते 48 अशा एकूण 6 पुरवणी मागण्या एकूण 7 कोटी 5 लाख रुपयाच्या आहेत त्या मंजूर कराव्या अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र मुळक (वित्त राज्य मंत्री) : सभापती महोदय, सन 2011-2012 च्या पुरवणी मागण्यांच्या संदर्भात अनेक सन्माननीय सदस्यांनी वित्त विभाग,ऊर्जा विभाग, नियोजन विभाग, जलसंपदा व संसदीय कार्य विभागाच्या संदर्भात चर्चा केलेली आहे.

सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी जिल्हा नियोजन मंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात चर्चा केली आणि त्याला वेळेत मंजुरी मिळावी या संदर्भात आवश्यक ती कार्यवाही करण्याची विनंती केली असून निश्चित स्वरुपात त्या संदर्भात तशा प्रकारच्या सूचना दिल्या जातील. सन्माननीय सदस्य श्री. एस.क्यू. जमा यांनी बजेटसंबंधी आणि बीडीएस संबंधी सूचना केलेल्या आहेत. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी जलसंपदा विभागाच्या आणि वीज तोडणीचा जो कार्यक्रम सध्या सुरु आहे त्या संदर्भात काही चांगल्या सूचना केलेल्या आहेत. त्या संदर्भातील कारवाई निश्चित स्वरुपात करण्यात येईल. सन्माननीय सदस्या ॲड. उषाताई दराडे यांनी बॅकलॉगच्या संदर्भातील काही बाबींचा येथे उल्लेख केलेला आहे.

सभापती महोदय, वित्त विभागाच्या बाब क्रमांक 39, 40,41 व 42 च्या एकूण 82 कोटी 87 लाख 22 हजार रुपयाच्या, ऊर्जा विभागाच्या बाब क्रमांक 54,58 व 60 च्या 662 कोटी रुपयांच्या तसेच नियोजन विभागाच्या बाब क्रमांक 82 ते 116 च्या एकूण 194 कोटी 79 लाख 46 हजार रुपयाच्या, जलसंपदा विभागाच्या बाब क्रमांक 49 च्या एकूण 1 लाख रुपयाच्या, संसदीय कार्य विभागाच्या बाब क्रमांक 117 च्या एकूण 9 लक्ष रुपयाच्या पुरवणी मागण्या मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/

श्री. नारायण राणे (उद्योग मंत्री) : सभापती महोदय, उद्योग विभागाच्या बाब क्रमांक 55 व 59 आणि रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या बाब क्रमांक 155 अशा दोन विभागाच्या पुरवणी मागण्या सभागृहासमोर मांडलेल्या आहेत.

या दोन्ही विभागाच्या संदर्भात बोलताना सभागृहातील अनेक सन्माननीय सदस्यांनी आपले मनोगत, मार्गदर्शक स्वरुपाचे विचार मांडलेले आहेत त्या सर्वांचे मी स्वागत करतो. काही सन्माननीय सदयांनी सूचना केलेल्या आहेत तसेच काही चुकीच्या गोष्टी असतील तर त्या शासनाच्या नजरेस आणून दिलेल्या आहेत त्यांचेही मी आभार मानतो.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे .....

यामध्ये काही सन्माननीय सदस्यांनी टीकेच्या स्वरुपात मार्गदर्शन केले. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी रोजगार हमी योजनेमध्ये किंवा आपण 21 लाख नोकऱ्या कशा देणार, कोणत्या कंपन्या येणार, फक्त रोजगार मेळावे भरवून निधी खर्च करावयाचा, मेळाव्याला उद्योजक उपस्थित नसतात मग नोकऱ्या कशा देणार, अशा प्रकारची टीका केली. मला त्यांना सांगावयाचे आहे की, फक्त निधी खर्च करण्यासाठी असे मेळावे आयोजित केले जात नाहीत. जे मेळावे झाले त्या ठिकाणी किती नोकऱ्या उपलब्ध झाल्या, कोण उपस्थित होते त्याची माहिती मुद्दाम मी उदाहरण म्हणून देतो. आरोप करताना मोघम आरोप न करता पुरावे देऊन करावयाचे असतात.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी आरोप करताना शासनाच्या पुस्तकातूनच वाचून दाखविले आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य बोलत असताना आम्ही त्यांना व्यत्यय आणला नाही. त्यामुळे अशा प्रकारे सन्माननीय सदस्यांना मध्येच बोलता येणार नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, मी शासनाच्या पुस्तकातूनच उल्लेख केलेला आहे.

उप सभापती : माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. आपण नंतर बोलावे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, मी मुद्दाम सांगेन की, जानेवारी, 2011 ते डिसेंबर, 2011 या कालावधीत 1 लाख 91 हजार 22 उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झाल्या असून जानेवारी, 2012 मध्ये 16 हजार 934 उमेदवारांना नोकऱ्या देण्यात आलेल्या आहेत. 2009-2010 मध्ये 134 रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले. जवळपास 744 उद्योजक उपस्थित होते आणि 7395 उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झालेल्या आहेत. 2011-2012 मध्ये 190 रोजगार मेळावे आयोजित करण्यात आले असून 1139 उद्योजक उपस्थित होते आणि 20 हजार 908 उमेदवारांना नोकऱ्या प्राप्त झालेल्या आहेत. या मेळाव्यांचा फायदा अनेक बेरोजगार तरुण-तरुणींना होतो. म्हणून तशा प्रकारचे मेळावे भरविण्याची योजना रोजगार व स्वयंरोजगार विभागामार्फत केली जाते. जर कोठे चुकीचे मेळावे आयोजित केले जात असतील तर सन्माननीय सदस्यांनी उदाहरणादाखल सांगावे. त्या बाबतीत मी स्पष्टीकरण आणि कारवाई केल्याशिवाय राहणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे .....

डॉ. दीपक सांवत : मी शासनाच्या पुस्तकातूनच माहिती वाचून दाखविलेली आहे.

उप सभापती : मी आपल्याला सांगितले आहे की, माननीय मंत्री महोदयांचे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. मी आपल्याला नंतर बोलण्याची संधी देतो.

डॉ. दीपक सावंत : मी या पुस्तकातूनच माहिती वाचून दाखविलेली आहे. 2009-2010 मध्ये उद्योजक उपस्थित नव्हते. मग नोकऱ्या कशा दिल्या गेल्या एवढेच मी विचारले.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, प्रत्येक ठिकाणी कंपन्यांच्या मॅनेजमेंटचे लोक उपस्थित असतात. ते त्या ठिकाणी मुलाखती घेतात.

डॉ. दीपक सावंत : या पुस्तकामध्ये तसे दिलेले आहे.

श्री. नारायण राणे : त्याबाबत आपण नंतर सांगावे. चुकीचे असेल तर मी कारवाई करीन. मी आपल्या प्रश्नाला उत्तर देत आहे. माझ्याकडे सुध्दा शासनाचीच माहिती आहे. मी ही माहिती बाहेरुन आणलेली नाही. मी माझ्या मनाचे सांगत नाही. सन्माननीय सदस्यांनी विचारले की, 21 लाख नोकऱ्या कशा देणार ? नवीन उद्योग धोरण आणल्यानंतर त्यानुसार महाराष्ट्रात साडेपाच लाख कोटी रुपयांची गुंतवणूक होईल आणि त्या वेळेला 20 लाख नोकऱ्या उपलब्ध होतील अशी माहिती आम्ही दिलेली आहे. जी अंदाजित गुंतवणूक होते त्या प्रमाणामध्ये नोकऱ्या उपलब्ध होतात. येणारी गुंतवणूक लक्षात घेऊन या ठिकाणी ही आकडेवारी दिलेली आहे. सन्माननीय सदस्य शिवसेनेचे गट नेते श्री. दिवाकर रावते साहेब यांनी उद्योग विभागावर बोलताना माननीय मुख्यमंत्र्यांबद्दल या ठिकाणी म्हणाले की, ते वारंवार दिल्लीला शनिवार-रविवारी जातात. कोण कोठे जातात, काय करतात, काय बोलतात याबाबत त्यांचा पाठपुरावा चांगला दिसतो.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय नीट ऐकत नाहीत, माहिती सुध्दा नीट घेत नाहीत. काल माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे जे म्हणाले त्याला माननीय मुख्यमंत्र्यांनी जे उत्तर दिले ते मी सांगितले.

श्री. नारायण राणे : माझ्याकडे सगळ्यांची भाषणे आहेत.

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

श्री. दिवाकर रावते : काल माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे असे म्हणाले की, आपण का जाता ? त्या संदर्भात मी काय काय करुन येतो हे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, आपण आज सांगितले की, ते दिल्लीला जाऊन भेटतात. मला त्याबद्दल काही म्हणावयाचे नाही. गुंतवणूक वगैरेच्या बाबतीत माहिती देण्यासाठी मी कटिबद्ध आहे.

यानंतर श्री. कांबळे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नारायण राणे ....

मी त्यामध्ये कुठेही कमी पडणार नाही. आपण म्हटले आहे की, महाराष्ट्राचे उद्योग मंत्री निरुद्योगी असून आपणास त्यांचे उद्योग सांभाळावे लागतात. आपणाला त्यांनी सांगितले, असे आपण म्हणता. तुम्ही तर तुमच्या भाषणात उल्लेख केला. माझ्याकडे उद्योग खाते आहे. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली काम करीत असताना, महाराष्ट्र राज्यातील जनतेला माझे जे उद्योग उपयुक्त आहेत, तेच मी करेन आणि जे उपयुक्त नाहीत, ते मी करणार नाही. हे त्यांनाही माहीत आहे. सन्माननीय सदस्य विरोधी पक्षाचे असोत किंवा सत्तारुढ पक्षाचे असोत कोणत्याही विषयावर बोलताना पुराव्यानिशी, काही संदर्भ देऊन बोलले गेले पाहिजे आणि तरच त्याची दखल घेतली जाते आणि सभागृहात विश्वासार्हता निर्माण होते, एवढेच मी सांगेन. सभागृहाने उद्योग, रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या मागण्यांना पाठिंबा देऊन त्या मंजूर कराव्यात, अशी मी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, नगरविकास विभागाच्या पुरवणी मागण्या एफ 1 ते 3, बाब क्रमांक 36 ते 38 मधील एकूण 69 कोटी 76 लाख 37 हजार रुपयांच्या आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण, सन्माननीय सदस्य सर्वश्री रमेश शेंडगे, संजय केळकर, रामनाथ मोते व अन्य सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांची आमच्या विभागाने निश्चिपतणे दखल घेतली आहे. राज्यातील जवळजवळ 49 टक्के लोकसंख्या नागरी भागात राहते. परिणामी, नगरपालिका, महानगरपालिका यांना नागरी भागात सोयी सुविधा देण्यामध्ये मोठ्या प्रमाणात ताण पडतो. त्यामुळे सर्व गोष्टींचा विचार करुन राज्य सरकार, केंद्र सरकार, डीपीडीसी यांच्याकडून नगरविकास विभागाकरिता तरतूद केली जाते. त्या भागात नागरी सुविधा निर्माण करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रयत्न केला जातो.

सभापती महोदय, बाब क्रमांक 117 ही संसदीय कार्य विभागाशी संबंधित आहे. या वर्षीचा खर्च भागविण्याकरिता 9 लाख 9 हजार रुपयांची अतिरिक्त तरतूद केली आहे. सभागृहाने त्याला सुध्दा मान्यता द्यावी, अशी मी विनंती करतो. पुढील विषय वनांच्या संबंधीचा आहे. वनीकरण व वन्य जीव यांच्याकरिता 20 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसेच, ताडोबा व्याघ्र प्रकल्प करण्यासाठी तेथील शेतकऱ्यांचे, ग्रामस्थांचे पुनर्वसन करावे लागणार आहे. आपण त्याकरिता 29 कोटी 3 लाख 33 हजार रुपयांची तरतूद केली आहे. सभागृहाने त्यास देखील मान्यता द्यावी. सन्माननीय सदस्य श्री. रमेश शेंडगे यांनी असे सांगितले की, आपण 100 कोटी झाडे लावताना, शेळ्या-मेंढ्या यांच्या कुरणासाठी देखील विचार करावा. अन्यथा सगळ्या जागांवर वृक्ष लागवड झाल्याने अडचण निर्माण होईल. आपणाला त्या संदर्भातील जागा दुग्धविकास विभागाकडून मिळाली आहे. त्या जागेवर झाडांची लागवड करण्याऐवजी "वन भवन" उभे करण्याचे काम सुरु आहे.

(नंतर श्री.भारवि ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव....

विधी व न्याय विभागाच्या मागण्यांवर बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर यांनी राज्यातील न्यायालयीन इमारतींची डागडुजी, दुरूस्ती करणे आवश्यक आहे अशी सूचना केली आहे. येथे त्यांनी कल्याणचे उदाहरण दिले. कल्याण येथील न्यायालयाची इमारत गळत आहे असे त्यांनी सांगितले. शासनाने न्याय व्यवस्थेसंबंधी चांगले निर्णय घेतले आहेत. लोकांना झटपट न्याय मिळण्यासाठी चांगले निर्णय घेतले आहेत. कुटुंब न्यायालय, मॉर्निंग - इव्हीनिंग न्यायालयासह अन्य न्यायालयातील न्यायाधीशांची संख्या वाढविण्याची सूचना करण्यात आली आहे. त्यानुसार आपण न्यायाधीशांची संख्या वाढविली आहे.

सन 2006-2007 मध्ये 68 कामे शासनाने पूर्ण केली असून त्यावर 30 कोटी 14 लाख रूपये खर्च केले आहेत. सन 2007-2008 मध्ये 41 कोटी 17 लाख 15 हजार रूपये खर्च करून 44 न्यायालयांची दुरूस्ती केली आहे. सन 2008-2009 मध्ये 63 कोटी 43 लाख 68 हजार रूपये खर्च करून 51 न्यायालयांची दुरूस्ती करण्यात आली आहे. सन 2010-2011 मध्ये 115 कोटी 50 लाख 87 हजार रूपये खर्च करून 34 न्यायालयांची दुरूस्ती झाली आहे. सन 2011-2012 या वित्तीय वर्षामध्ये दिनांक 29-2-2012 पर्यंत 91 कोटी 74 लाख 11 हजार रूपये खर्च करण्यात आले आहेत.

उप सभापती : मी सन्माननीय सदस्यांना आपले म्हणणे थोडक्यात मांडावे अशी विनंती करतो त्याप्रमाणे आपण देखील आपले उत्तर समर्पक द्यावे.

श्री.भास्कर जाधव : होय. सभापती महोदय, विधी व न्याय विभागाच्या बाब क्र.50 ते 53 च्या 6 कोटी 74 लाख 28 हजार रूपयांच्या मागण्या आपल्या समोर ठेवल्या आहेत. एकूण 69 कोटी 21 लाख 22 हजार रूपयाची पूरक मागणी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे. वने, मत्स्य, नगरविकास, विधी व न्याय, संसदीय कार्य विभागाच्या मागण्या सभागृहासमोर ठेवल्या आहेत. त्यास सभागृहाने एकमताने मान्यता द्यावी अशी मी विनंती करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके (महसूल राज्यमंत्री) : सभापती महोदय, महसूल विभागाच्या मागणी क्रमांक सी-1, सी-5 या खालील बाब क्रमांक 16 ते 18 व 20 अन्वये एकूण 36 कोटी 18 लाख 16 हजार इतक्या रकमेच्या पुरवणी मागण्या सभागृहा समोर सादर केल्या आहेत. त्याचप्रमाणे पुनर्वसन व मदत कार्य विभागाच्या बाब क्रमांक-19 पात्र शेतकरी आत्महत्या प्रकरणात मृतकांच्या वारसांना शासनाकडून सानुग्रह अनुदानापोटी रूपये 6 कोटी 18 लाख, बाब क्रमांक-21 मुंबई बॉम्बस्फोटा मध्ये बळी पडलेल्या व्यक्तिांना अर्थ सहाय्य करणे 77 लाख 69 हजार, बाब क्रमांक- 22 नैसर्गिक आपत्तीमुळे कापूस, सोयाबीन व धान उत्पादक शेतकऱ्यांच्या निव्वळ उत्पान्नातील घट झाल्यामुळे बाधित शेतकऱ्यांना अर्थ सहाय्य देण्याबाबत 300 कोटी रूपये आकस्मिक निधीतून वाटप केलेले आहेत. त्याची भरपाई म्हणून व अतिरिक्त 1285 कोटी रूपये अशा मिळून 1585 कोटी रूपयांच्या मागण्या सभागृहाला सादर केलेल्या आहेत.

सहकार विभागाच्या बाब क्रमांक 135, 136, 137, 138, 139, 140 अशा मागण्या सभागृहाला सादर करण्यात आल्या आहेत. या विभागाच्या मागण्यांवरील चर्चेत सहभागी होताना सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, विक्रम काळे, संजयजी केळकर, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण, सन्माननीय सदस्य श्री.रमेशभाऊ शेंडगे, सन्माननीय सदस्य श्री.पाशा पटेल, सन्माननीय सदस्य परशुराम उपरकर, सन्माननीय सदस्य ॲड.उषाताई दराडे इत्यादींनी काही सूचना केल्या आहेत. मी सन्माननीय सदस्य श्री.पाशाभाई पटेल यांना सांगू इच्छितो की, नैसर्गिक आपत्तीमुळे कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या उत्पन्नामध्ये घट झाली आहे.

यानंतर श्री.भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके.....

त्याकरिता निरनिराळ्या जिल्हाधिकाऱ्यांना 300 कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. 30 मार्चपूर्वी हे अनुदान शेतकऱ्यांना दिले जाईल आणि आता 1285 कोटी रुपयांची पुरवणी मागणी आलेली आहे, तिचेही वाटप कोणत्याही परिस्थितीत पावसाळ्यापूर्वी किंवा पेरण्यापूर्वी शेतकऱ्यांना दिली जाईल. जवळजवळ 1400 कोटी रुपये कापूस उत्पादक शेतक-यांना मदत म्हणून देत आहोत. सोयाबीन व धान उत्पादकांचे जे नुकसान झाले त्यापोटी 600 कोटी रुपये असे एकूण 2000 कोटी रुपयांचे पॅकेज दिले आहे. ही सर्व रक्कम पावसाळ्यापूर्वी वितरित केली जाईल अशी ग्वाही देतो. मी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, महसूल, मदत व पुनर्वसन आणि सहकार विभागाच्या पूरक मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुलाबराव देवकर (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, परिवहन विभागाच्या बाब क्रमांक 13 नुसार रु.7.83 कोटीची पूरक मागणी सभागृहाला सादर केली आहे. पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विभागाच्या बाब क्रमांक 26 नुसार रु.2.83 कोटीची पूरक मागणी सादर केली आहे. या मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे यांनी चांगल्या दर्जाचे बोकड वाटप करण्यासाठी आरकेवाय योजनेतून पैसे मिळतात. ते त्वरित महामंडळाला द्यावेत. अहिल्यादेवी शेळी मेंढी विकास महामंडळाला निधी मिळावा अशा प्रकारची त्यांनी मागणी केली आहे. प्रामुख्याने शेळी मेंढी विकास महामंडळाकरिता राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या माध्यमातून 20 कोटी रुपये मंजूर केलेले होते. त्यापैकी 10 कोटी रुपये महामंडळाला वितरित करण्यात आले आहेत. त्यापैकी 1 कोटी रुपये महामंडळाकडून खर्च झालेले आहेत. उपयोगिता प्रमाणपत्र जर महामंडळाने दिले तर 1.5 कोटी रुपये इतका निधी मंजूर करुन त्यांच्यासाठी तरतूद करुन ठेवली आहे.

या महामंडळाला कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेळी मेंढी बाजार समिती स्थापन करण्यासाठी रु.7.5 कोटी इतका निधी मंजूर केलेला आहे. त्यापैकी 3.75 कोटी रुपये इतका निधी वितरित केलेला आहे. महामंडळाच्या प्रक्षेत्रामध्ये बळकटीकरण करण्यासाठी रु.7.33 कोटी रुपयांचा कार्यक्रम मंजूर असून त्यासाठी जवळपास 3.65 कोटी रुपये इतकी रक्कम वितरित केलेली असून 1 कोटी रुपये खर्च करण्यात आला आहे. मी सभागृहाला विनंती करतो की, परिवहन विभाग व पशुसंवर्धन विभागाच्या पूरक मागण्यांना मंजुरी देण्यात यावी.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.लक्ष्मण ढोबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील, माननीय सदस्या ॲड.उषा दराडे, श्रीमती विद्या चव्हाण, माननीय सदस्य सर्वश्री परशुराम उपरकर, राजन तेली, यांनी पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या पूरक मागण्यांवर आपले विचार मांडले आहेत. माननीय सदस्यांनी केलेल्या सूचना विचारात घेऊन त्यावर कार्यवाही करण्यासाठी निश्चितपणे विभागाच्या माध्यमातून मी प्रयत्न करेन.

सभापती महोदय, बाब क्रमांक 150, 151, 152, 153, 154 या पूरक मागण्यांवर सविस्तर चर्चा झाली.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे .....

सन्माननीय सदस्यांनी ज्या ज्या सूचना केलेल्या आहेत त्यांचा जरुर विचार करण्यात येईल एवढे सांगून पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या एकूण 15.69 कोटीच्या मागण्या सभागृहाने मान्य कराव्यात अशी मी विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत (उच्च व तंत्रशिक्षण तसेच विशेष सहाय्य राज्य मंत्री) : महोदय, उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या संदर्भात विचार मांडत असताना सन्माननीय सदस्य सर्वश्री. विक्रम काळे, संजय केळकर, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, डॉ. दीपक सावंत आणि सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अत्यंत मौलिक अशा सूचना केल्या आहेत, त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच या सूचनांचा जरुर विचार केला जाईल.

महोदय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या बाब क्र. 80 नुसार जी 2.5 कोटीची पुरवणी मागणी करण्यात आली आहे त्या मागणीला मंजुरी द्यावी अशी माझी विनंती आहे.

कामगार विभागाच्या बाब क्र. 56 व 57 नुसार 24.22 लाखाच्या दोन मागण्या सभागृहाच्या मान्यतेसाठी आलेल्या आहेत त्या मंजूर कराव्यात अशी माझी विनंती आहे.

उच्च व तंत्र शिक्षण विभागासंबंधी डॉ. दीपक सावंत यांनी मुंबई विद्यापीठाच्या संदर्भात काही सूचना मांडत असताना त्यांनी अशीही खंत व्यक्त केली की, मुंबई विद्यापीठाकडे विद्यार्थ्यांची संख्या कमी कमी होत चालली आहे पण ही वस्तुस्थिती खरी नाही. सन्माननीय सदस्यांना ही आकडेवारी कोठून मिळाली याची माहिती मला नाही पण मी सांगू इच्छितो की, कोणत्याही परिस्थितीत सन 2008-09 ते 2011-12 या कालावधीत प्रत्येक ॲकेडमिक वर्षात ही संख्या वाढतीच असून यावर्षी सुध्दा ती वाढलेलीच आहे असेही मी सभागृहाला सांगू इच्छितो. तसेच काही शाखांना "नॅक" चा दर्जा मिळाला नसल्याचे त्यांनी सांगितले पण मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, यासंदर्भात "पियर" समितीने भेट देऊन पाहणी केलेली आहे व त्या समितीचा रिझल्ट प्रलंबित आहे. तसेच प्राचार्यांची संख्या कमी असल्याचे त्यांनी सांगितले .....

श्री. दिवाकर रावते : या समितीने दौरा केला व त्याचा रिझल्ट अवेटेड असल्याचे आपण आताच म्हणालात. या समितीचा रिझल्ट म्हणजे निकाल आहे की निर्णय याबाबतचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे.

श्री.डी.पी.सावंत : महोदय, प्राचार्यांची जी पदे रिक्त असल्याचे सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिले त्यातील 90 टक्के पदे ही कायम विना अनुदानित महाविद्यालयांमधील असून त्याची आम्हालाही खंत वाटते. ही रिक्त पदे भरण्याच्या संदर्भात प्रत्येक वेळेला सह संचालक (उच्च व तंत्र शिक्षण) यांना सूचना दिलेल्या आहेत परंतु त्या पात्रतेचे उमेदवार मिळत

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी.सावंत .....

नसल्याने ही पदे रिक्त आहेत. तरी देखील ही प्रोसिजर चालू असून यापुढेही ती चालूच राहणार आहे. तसेच इतरही अनेक मोलाच्या सूचना सन्माननीय सदस्यांनी केल्या त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. या सूचनांचा शासन स्तरावर जरुर विचार करण्यात येईल असेही मी त्यांना सांगू इच्छितो.

सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अशी सूचना केली की, कोकण विभागातील सह संचालकांचे कार्यालय बंद आहे, तेथे रेग्युलर पोस्टींग करण्यात यावी याचाही विचार केला जाईल. आय.टी.आय. मध्ये जे निदेशक कंत्राटी पध्दतीने भरली जातात त्यांना विद्यावेतन अत्यंत कमी आहे व त्यात वाढ करावी. या अनुषंगाने शासन स्तरावर जरुर विचार करण्यात येईल. तसेच इतर ज्या सूचना मांडल्या आहेत त्यांची देखील गांभीर्याने दखल घेण्यात येईल एवढे बोलून उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या बाब क्र. 141 ते 147 या मागण्यांना मंजुरी द्यावी अशी मी विनंती करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अनिल देशमुख (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : अन्न व नागरी पुरवठ विभागाच्या बाब क्रमांक 68,69 व 70 या पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी मी सभागृहाला विनंती करतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय देवतळे (पर्यावरण सांस्कृतिक कार्य मंत्री) : सभापती महोदय, पर्यावरण व सांस्कृतिक विभागाच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री.संयय केळकर, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ. नीलम गो-हे तसेच सन्माननीय सदस्य श्री. सुभाष चव्हाण यांनी भाग घेतल्यामुळे मी त्यांचे आभार मानतो व त्यांनी ज्या अमूल्य सूचना केलेल्या आहेत त्यांचा निश्चित विचार केला जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, सांस्कृतिक कार्य व पर्यावरण विभागाच्या बाब क्रमांक 134,157 वरील पुरवणी मागण्या सभागृहाने मंजूर कराव्यात अशी विनंती करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव (क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सन्माननीय सभापती महोदय, गृह निर्माण विभागाच्या बाब क्रमांक 118,119,120 व 129 बाबीवर ज्या सन्माननीय सदस्यांनी सूचना केलेल्या आहेत त्याची नोंद घेण्यात आलेली असून गृह विभागाच्या 109,26,37,000/- रुपयांच्या पुरवणी खर्चाला सभागृहाने मान्यता द्यावी ही विनंती.

उप सभापती : सन 2011-2012 च्या खर्चाच्या पूरक विवरण पत्रावरील चर्चा आता संपली आहे.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 26 मार्च, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक संध्याकाळी 6 वाजून 36 मिनिटांनी सोमवार, दिनांक 26 मार्च, 2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही